**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

**पृ.शी./मु.शी.**: सदस्यांचा परिचय व शपथविधी

( सचिवांनी संबंधित सदस्यांचे नाव पुकारल्यानंतर )

श्री.आर.आर.पाटील ( उप मुख्यमंत्री ) : सभापती महोदय, विधान सभा सदस्यांद्वारा निर्वाचित श्री. शिवाजीराव बापुसाहेब देशमुख यांचा आपणास व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देतांना मला अतिशय आनंद होत आहे.

श्री. शिवाजीराव बापूसाहेब देशमुख यांनी शपथ घेतली.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, विधान सभा सदस्यांद्वारा निर्वाचित श्री. पांडुरंग पुंडलिक फुंडकर यांचा आपणास व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देताना मला अतिशय आनंद होत आहे.

श्री. पांडुरंग पुंडलिक फुंडकर यांनी शपथ घेतली.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, विधान सभा सदस्याद्वांरा निर्वाचित श्री. राणा जगजितसिंग पाटील यांचा आपणास व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देतांना मला अतिशय आनंद होत आहे.

श्री. राणा जगजितसिंग पद्मसिंग पाटील यांनी शपथ घेतली.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, विधान सभा सदस्याद्वारा निर्वाचित डॉ. नीलम दिवाकर गो-हे यांचा आपणास व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देतांना मला अतिशय आनंद होत आहे.

डॉ. नीलम दिवाकर गो-हे यांनी शपथ घेतली.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, विधान सभा सदस्याद्वारा निर्वाचित श्री. विनोद श्रीधर तावडे यांचा आपणास व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देतांना मला अतिशय आनंद होत आहे.

श्री. विनोद तावडे यांनी शपथ घेतली.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बी-1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील :सभापती महोदय, विधान सभा सदस्यांव्दारा निर्वाचित श्री.जयप्रकाश जीतमल छाजेड यांचा आपणास व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देतांना मला अतिशय आनंद होत आहे.

श्री.जयप्रकाश जीतमल छाजेड यांनी शपथ घेतली.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, विधान सभा सदस्यांव्दारा निर्वाचित श्री. हेमंत प्रभाकर टकले यांचा आपणास व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देतांना मला अतिशय आनंद होत आहे .

श्री.हेमंत प्रभाकर टकले यांनी प्रतिज्ञा केली.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, विधान सभा सदस्यांव्दारा निर्वाचित श्री.किरण जगन्नाथ पावसकर यांचा आपणास व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देतांना मला अतिशय आनंद होत आहे.

श्री. किरण जगन्नाथ पावसकर यांनी शपथ घेतली .

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, विधान सभा सदस्यांव्दारा निर्वाचित श्री.संजय रामचंद्र पाटील यांचा आपणास व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देतांना मला अतिशय आनंद होत आहे.

श्री.संजय रामचंद्र पाटील यांनी शपथ घेतली .

---

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>तोंडी उत्तरे.</u>**

**हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळाला उत्पादन सुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठी आर्थिक मदत उपलब्ध करुन देणेबाबबत**

**(1) * 37755 डॉ. दीपक सावंत, श्री. किसनचंद तनवाणी : दिनांक 23 नोव्हेंबर, 2007 रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या दिनांक 22 नोव्हेंबर, 2007 रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील प्रश्न क्रमांक 33541 ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **अन्न व औषधी द्रव्ये प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळाला उत्पादन सुविधांमध्ये अनुसूचि प्रमाणे सुधारणा करण्यासाठी लागणारी आर्थिक मदत उपलब्ध करुन देणेबाबबतच्या प्रस्तावाची छाननी पुर्ण झाली आहे काय,
(2) असल्यास, छाननीनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(3) अद्याप कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबा सिद्दिकी, श्री.मनोहर नाईक यांच्याकरिता** : (1), (2) आणि (3) हाफकीन महामंडळाच्या संचालक मंडळाने दिनांक 27 मार्च, 2008 रोजी झालेल्या बैठकीत असा निर्णय घेतला आहे की, घटसर्प, डांग्या खोकला, धनुर्वात इत्यादी लसीचे उत्पादन करण्याचा नविन प्रकल्प उभारणे ही महामंडळाची प्राथमिकता असल्याने त्यासाठी सन 2008-09 मध्ये शासनाने रु.15 कोटीचे भाग भांडवल स्वरुपात अर्थ सहाय्य करावे आणि उर्वरित रु.35 कोटीचे अर्थ सहाय्य टप्प्याटप्प्याने पुढील चार वर्षात हॅपीटेटीस-बी लस, डीपीटीएच लस, गोवर लस वगैरेचे उत्पादन, आणि संशोधन व विकास इत्यादीसाठी द्यावे. त्यानुसार अर्थ सहाय्य मिळण्याची विनंती महामंडळाने शासनाकडे केली आहे. त्यास अनुलक्षून रुपये 15 कोटी अर्थ सहाय्य देण्याबाबत निर्णय घेण्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करण्याचे दिनांक 2 एप्रिल, 2008 च्या पत्रान्वये महामंडळास कळविण्यांत आले आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, या अधिवेशनामध्ये हाफकिन महामंडळाच्या संबंधात तीन वेळा वेगवेगळ्या माध्यमातून प्रश्न उपस्थित झाला आहे. या ठिकाणी उत्तरात म्हटले आहे की, "हाफकीन महामंडळाच्या संचालक मंडळाने 27 मार्च 2008 च्या बैठकीत असा निर्णय घेतला आहे की, घटसर्प, डांग्या खोकला, धनुर्वात इ. लसींचे उत्पादन करण्याचा नवीन प्रकल्प उभारणे ही महामंडळाची प्राथमिकता असल्याने त्यासाठी 2008-09 मध्ये शासनाने 15 कोटी रूपयांचे भाग भांडवल स्वरूपात अर्थसहाय्य ..." सभापती महोदय, आज धनुर्वाताच्या लसीचा टिटानस टॉक्साईडचा महाराष्ट्रात तुटवडा आहे. आता आपण म्हणता आहात की, महामंडळाची हे लसीचे उत्पादन करण्याची प्राथमिकता आहे आणि त्यासाठी शासनाने 2008-09 मध्ये 15 कोटीचे

..2

ता.प्र.क्र. 37755 ...

डॉ. दीपक सावंत....

अर्थसहाय्य करावे तर मग हे 15 कोटीचे अर्थसहाय्य महामंडळास केव्हापर्यंत उपलब्ध आपण करून देणार आहात आणि महाराष्ट्रात आज धनुर्वाताच्या लसीचा जो तुटवडा आहे तो केव्हापर्यंत संपुष्टात येईल ?

श्री. बाबा सिद्दिकी : सभापति महोदय, सम्माननीय सदस्य ने यह कहा कि तीन बार यह मुद्दा इस सदन में उठाया गया है. जैसा मैंने पहले कहा था कि डिटेल प्रोजेक्ट रिपोर्ट प्रस्तुत करने के लिए हाफकीन महामंडल को कहा गया है. चूंकि हाफकीन महामंडल की तरफ से मेरे पास डिटेल प्रोजेक्ट रिपोर्ट आ चुकी है. लेकिन एम.डी. कर्नाटक में चुनाव के सिलसिले में गए हुए हैं, वे थर्ड वीक में आने वाले हैं, उनके वहां से आ जाने के बाद बोर्ड ऑफ डायरेक्टर की परमीशन ली जाएगी और उसके बाद मंजूरी के लिए वित्त विभाग को प्रस्ताव भेजा जाएगा.

डॉ. वसंत पवार : सभापती महोदय, हाफकीन ही एक औषध, लस इ. निर्मिती क्षेत्रातील एक नावाजलेली संस्था आहे आणि तिची दोन भागामध्ये विभागणी केलेली आहे. प्रत्येक वेळेस या संस्थेकडून शासनाकडे अर्थसहाय्याची विनंती करण्यात येते. तेव्हा माझा प्रश्न येथे असा आहे की, ही जी हेपीटेटीस-बी वगैरे लसींचे उत्पादन करणारी संस्था आहे, तिचे दोन विभाग आहेत, संधान आणि विकास यासाठी महामंडळाला काही स्वायत्तता देणार आहात का ? मार्केटमधून यासाठी फंड उभा करण्याची परवानगी देणार आहात का ? कारण या संस्थेच्या फार्मास्युटिकल विभागाचा नावलौकिक चांगलाआहे तेव्हा त्या दृष्टीने त्याचा चांगला विकास संस्था करू शकते. तरी त्यासाठी त्यांना मार्केटमधून फंड उभा करण्याची परवानगी आपण देणार काय ?

श्री. बाबा सिद्दिकी : सभापति महोदय, जैसा मैंने बताया था कि हाफकीन महामंडल को जिस चीज़ की जरुरत है, उसके लिए डिटेल प्रोजेक्ट रिपोर्ट भेजने के लिए हाफकीन महामंडल को कहा गया है. डिटेल प्रोजेक्ट रिपोर्ट आ चुकी है. अब सिर्फ बोर्ड ऑफ डायरेक्टर की परमीशन मिलना बाकी रह गया है. जैसे ही एम.डी. कर्नाटक से आ जाएंगे बोर्ड ऑफ डायरेक्टर की मान्यता मिल जाएगी और उसके बाद वह प्रस्ताव वित्त विभाग के पास भेज दिया जाएगा.

..3



KBS/MMP/SBT. श्री. गायकवाड नंतर --- 10:10

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 37755 ...

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, गेली दोन तीन वर्षे या संस्थेकडून उत्पादने थांबली आहेत. मी मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, मी त्यांना अडचणीत आणणार नाही, तरी त्यादृष्टीने त्यांनी काळजी करू नये. मात्र मी या निमित्ताने आपल्याला विचारू इच्छितो की, नागपूर अधिवेशनामध्ये आपण असे सांगितले होते की, या संस्थेचा 100 कोटीचा विकासाचा प्रकल्प आहे आणि त्यातील 50 कोटी रूपये आपण त्यांना टप्प्याटप्प्याने देणार आहात. त्यातील 15 कोटी आता मंजूर झालेले आहेत, त्याबद्दल जरूर आपले आभार. परंतु त्यातून इन्फ्रास्ट्रक्चर उभे करता येणार नाही. त्यासाठी उरलेले 50 कोटी रूपये त्यांना उभे करावे लागणार आहेत. त्यामुळे त्यांच्या 7-12 च्या उताऱ्यावर त्यांची जी जमीन आहे ती आली पाहिजे. तिचा जीआर आहे, तो त्यांच्या नावावर आपण काढणार आहात का ? जेणे करून त्या आधारे त्यांना पैसे उभे करता येतील.

श्री. बाबा सिद्दिकी : सभापती महोदय, त्यात काही अडचण नाही. पण मी याबाबत पूर्वी देखील सांगितले आहे की, यासाठी महसूल विभागाचा कंकरन्स पाहिजे आहे आणि त्यादृष्टीने माझे सचिव स्वत: प्रयत्न करीत आहेत.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, ही आपली प्राथमिकता आहे असे आपण उत्तरात म्हटलेले आहे. तर मग आम्हाला याचा कंकरन्स पाहिजे, त्याचा कंकरन्स घ्यायचा आहे, आमचे एमडी, सचिव कर्नाटकला गेले आहेत वगैरे अशी उत्तर आपण का देता आहात ?

यानंतर सौ. रणदिवे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ SBT/ MMP/ पूर्वी श्री.सुंबरे . . . . 10:15

ता.प्र.क्र.37755 . . . . डॉ.दीपक सावंत . . . .

आज महाराष्ट्रामध्ये लसीचा तुटवडा आहे. त्यामुळे मुलांचे मृत्यू होत आहेत. याठिकाणी उत्तरामध्ये म्हटल्याप्रमाणे लसीचे उत्पादन करण्याचा नवीन प्रकल्प उभारणे ही महामंडळाची प्राथमिकता असल्याचे केवळ कागदावर लिहिण्यापुरतेच आहे काय ? माझा प्रश्न असा आहे की, हे काम किती दिवसामध्ये पूर्ण होणार आहे ? तसेच 15 कोटी रुपये कधीपर्यंत उपलब्ध होणार आहेत ? माझे तीन मुद्दे आहेत की, 15 कोटी रुपये मिळाले पाहिजेत, लसीचे उत्पादन करण्यास सुरुवात केली पाहिजे आणि महामंडळाचे 7:12 च्या उताऱ्यावर नाव नोंदविले गेले पाहिजे आणि या तीन गोष्टी एकमेकांशी इंटरलिंक आहेत. तर या गोष्टी किती दिवसात होणार आहेते ?

श्री.बाबा सिद्दीकी : सभापती महोदय, आम्ही या बाबी लवकरात लवकर करणार आहोत.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, याठिकाणी कशा प्रकारची उत्तरे दिली जात आहेत ? हे आपण लक्षात घ्यावे. आज अधिवेशनाचा शेवटचा दिवस असल्यामुळे याबाबतीत आपण हस्तक्षेप करणे आवश्यक आहे.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी जे तीन मुद्दे उपस्थित केलेले आहेत, ते किती दिवसामध्ये पूर्ण होतील ? असा टाईम बाऊंड स्वरुपाचा प्रश्न विचारलेला आहे.

श्री.बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, कोई भी प्रक्रिया नियम के अनुसार होती है. मैंने यह आश्वासन दिया था कि 15 दिन के भीतर डिटेल प्रोजेक्ट रिपोर्ट आ जाएगी. उसके अनुसार रिपोर्ट आ चुकी है. महामंडल के एम.डी. चुनाव के सिलसिले में कर्नाटक गए हुए है, उनके वहां से लौटते ही बोर्ड ऑफ डायरेक्टर की मंजूरी ली जाएगी और उसके बाद यह प्रस्ताव वित्त विभाग के पास भेजा जाएगा. रेवेन्यू विभाग के पास फाईल गई है. पुना के कलेक्टर से भी रिपोर्ट मंगाई गई है. इस मामले को रेवेन्यू विभाग के प्रधान सचिव देख रहे हैं. अब सिर्फ वित्त विभाग एवम् महसूल विभाग की मंजूरी चाहिए. इस बारे में हम जल्द से जल्द कार्यवाही करेंगे.

डॉ.दीपक सावंत :सभापfr महोदय, क्या ये सारी प्रक्रिया तीन महीने में पूर्ण की जाएगी ?

श्री.बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, जल्द से जल्द करने की कोशिश की जाएगी.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, या विषयाच्या संबंधात जी.आर.काढावयाचा आहे, लसीचे प्रॉडक्शन सुरु करावयाचे आहे, निधी उपलब्ध करुन द्यावयाचा आहे. परंतु त्या प्रश्नांची उत्तरे मिळालेली नाहीत.

-----

...2

25-04-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) D-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मौजे पालशेत आगडी मंदिर ते आवोशी (ता.गुहागर) येथील रस्त्याच्या डांबरीकरणाबाबत**

**(2) * 40461 श्री.भास्कर जाधव** : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मौजे पालशेत आगडी मंदिर ते आवोशी ता.गुहागर येथील रस्ता डांबरीकरण व्हावा अशी तेथील ग्रामस्थांची व लोकप्रतिनिधींची तसेच मच्छिमार बांधवांचीही सातत्याने मागणी होत आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर रस्ता डांबरीकरण करुन जनतेची होणारी गैरसोय शासनाने दूर केली आहे काय,

(3) नसल्यास, शासन याबाबत कोणती कारवाई करीत आहे वा करण्यात येणार आहे ?

**श्री.रविशेठ पाटील, श्री.छगन भुजबळ यांच्याकरिता** : (1) होय.

(2) 1.7 कि.मी. लांबी पैकी 0.310 कि.मी.चे डांबरीकरण करण्यात आले आहे.

(3) निधी, निकष व प्राधान्यक्रमानुसार काम हाती घेण्याचे प्रयत्न रहातील.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मी या संपूर्ण आठवडयामध्ये सन्माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांना खूप त्रास दिलेला आहे आणि लोकांची कामे होण्यामध्ये, पॉझिटीव्ह उत्तरे देण्या मध्ये याचे फलित झालेले आहे. आज अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे. सदर रस्त्याची लांबी 1.7 कि.मी.असून त्यापैकी 0.310 कि.मी.लांबीच्या रस्त्याचे डांबरीकरण झालेले आहे. हा रस्त्या मच्छिमार जे.टी.कडे जाणारा आहे. संध्याकाळी पाच-सहा वाजल्यानंतर मासळी जे.टी.वर उतरविली जाते. या जे.टी.वर मोठया प्रमाणात मासे उतरविले जातात. त्यानंतर मच्छिमारांना डोक्यावर मासळी घेऊन 2 कि.मी.अंतर चालावे लागते. सुर्दैवाने हा रस्ता ई.जी.एस.मधून पूर्ण झाला आहे. आता या रस्त्याचे डांबरीकरण, दोन मोऱ्या, संरक्षित भिंत इ.कामे करावयाची आहेत. त्यासाठी 43 लाख रुपयांची एस्टीमेट देखील तयार करण्यात आले आहे. माझी अशी विनंती आहे की, यावर्षी सदरहू रस्त्यावर दोन मोऱ्या आणि डांबरीकरण ही दोन कामे मंजूर करुन ती करावयास पाहिजेत. तसेच संरक्षित भिंतीचे काम पुढच्या वर्षी मंजूर केले तरी हरकत नाही. तर याप्रमाणे कार्यवाही करणार आहात काय ?

श्री.रविशेठ पाटील : सभापती महोदय, हा रस्ता मच्छिमारांसाठी असल्यामुळे, या रस्त्यावर संरक्षित भिंत, दोन मोऱ्या आणि डांबरीकरण इ.कामे करावयाची असून यासाठी 41 लाख 26 हजार रुपयांचा खर्च येणार आहे. हा ग्रामीण मार्ग आहे. त्यामुळे या रस्त्याच्या कामासाठी डी.पी.डी.सी.कडून निधीची व्यवस्था झाली पाहिजे. तशा प्रकारे व्यवस्था झाली तर पुढच्या वर्षी काम घेण्यात येईल.

....3





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, हा रस्ता डी.पी.डी.सी. मधून व्हावा यासाठी आपण अनेक वेळा प्रयत्न केला आहे. मी याठिकाणी विषय कोट करीत नाही. पण परवा झालेल्या डी.पी.डी.सी.च्या बैठकीमध्ये आमच्या माननीय पालकमंत्र्यांनी विषय काढला. हा मच्छिमारांसाठी रस्ता आहे हे माननीय मंत्री महोदयांनी कबूल केले आहे. या कामासाठी 41 लाख 26 हजार रुपयांचे एस्टीमेट आहे. मघाशी सांगितल्याप्रमाणे संरक्षक भिंतीचे काम बाजूला ठेवावे. परंतु दोन मोऱ्या आणि रस्त्याच्या डांबरीकरण करण्याच्या बाबतीत माननीय मंत्री महोदयांनी आश्वासन द्यावे. माझी विनंती मान्य असेल तर आपण तसे सांगावे.

यानंतर कु.गायकवाड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 40461..

श्री. रविशेठ पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारला आहे, तो महत्वाचा प्रश्न आहे. आम्ही या वर्षी मोऱ्यांचे काम प्रस्तावित करु व पुढील वर्षी तेथे डांबरी रस्ता करण्याबाबत कार्यवाही करु.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, मोऱ्या बांधण्याकरिता 1लाख 80 हजार रुपये लागणार आहेत.

**उपसभापती** : या कामाकरिता अर्थ मंत्रालयाकडून परवानगी घेऊन माझ्या आमदार निधीमधील 10 लाख रुपये मी देईन. उर्वरित रक्कम आपण देणार काय ?

श्री. रविशेठ पाटील : होय.

श्री. दिलीप वळसे पाटील : आपल्याला असा रोल घेता येणार नाही. एकाच सन्माननीय सदस्यांना निधी देता येणार नाही. सर्वांना थोडा थोडा निधी वाटून द्यावा लागेल.

**उपसभापती** : असे करण्याकरिता आपल्याला माझी मुदत वाढवून द्यावी लागेल.

श्रीमती फौजिया खान :सभापति महोदय, अभी सम्माननीय सदस्य श्री भास्कर जाधव ने बताया कि पालक मंत्री ने कहा है कि विधान परिषद के सदस्य डीपीडीसी में प्रश्न नहीं उठा सकते हैं. इस बात पर मेरा आक्षेप है. इसलिए इसका खुलासा होना चाहिए कि विधान परिषद के सदस्य डीपीडीसी में प्रश्न क्यों नहीं उठा सकते हैं ?

श्री. रविशेठ पाटील : या वर्षी डीपीडीसी अंतर्गत 304 कामे मंजूर करण्यात आली आहेत. या कामांची किंमत 3588 रुपये आहे.

श्री. फौजीया खान :सभापति महोदय, अभी मैंने जो प्रश्न उठाया था, उसका खुलासा मंत्री महोदय नहीं किया है.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्रीमहोदय या प्रश्नास गांभीर्याने उत्तर देत नाहीत. हा विषय गंभीर आहे. या सदनातील सन्माननीय सदस्यांना डीपीडीसी अंतर्गत प्रस्ताव ठेवता येत नाही हा महत्वाचा प्रश्न आहे. त्यांनी या संदर्भात उत्तर दिले पाहिजे.

प्रा. बी.टी. देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव हे अतिशय जबाबदारीने बोलणारे सन्माननीय सदस्य आहेत. हा प्रश्न विचारताना त्यांनी अतिशय महत्वाची माहिती दिली आहे. डीपीडीसीमध्ये पालकमंत्र्यांनी निर्णय दिला आहे की, विधानसभेचे व

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी. देशमुख .. ता.प्र.क्र. 40461..

विधानपरिषदेमधील सन्माननीय सदस्यांनी बोलावयाचे नाही. माननीय मंत्री महोदयांनी दिलेल्या आश्वासनानंतर तो प्रश्न संपला होता. परंतु ही गोष्ट आक्षेपार्ह आहे. तेथील ठराव विनासुनावणीचे होऊ नयेत. या गोष्टींचा खुलासा झाला पाहिजे.

श्री. दिलीप वळसे पाटील : सभापती महोदय, विधान सभेतील किंवा विधान परिषदेतील सदस्यांमध्ये डीपीडीसीला भेदभाव करता येणार नाही. राज्यसभेचे सदस्य, विधानपरिषदेतील सदस्य, विधानसभेतील सदस्य, डीपीडीसीमध्ये असणारे सदस्य तसेच अशासकीय सदस्य या सर्वांना तेथे होणाऱ्या कामकाजामध्ये भाग घेता येतो. सन्माननीय सदस्यांनी येथे जी माहिती दिलेली आहे ती माहिती तपासून घेऊ. त्यामध्ये काही त्रुटी आढळून आल्यास यामध्ये दुरुस्ती करण्यात येईल. परंतु तेथे होणाऱ्या बैठकीमध्ये सन्माननीय सदस्यांनी बोलावयाचे नाही हे प्रत्यवाय नाही.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, मी सत्ताधारी पक्षाचा सदस्य असल्यामुळे, मी जबाबदारीने बोलत आहे. माझ्या जबाबदारीचे मला भान आहे. माननीय मंत्री महोदय, श्री. दिलीप वळसे पाटील हे नियम जाणणारे आहेत. डीपीडीसीमध्ये बैठक घेण्याकरिता किंवा तेथे बोलण्याकरिता कोणत्याही प्रकारची हरकत नाही. तसा मुद्दा नाही. कोणतेही काम असेल, जवाहार विहिरीचे काम, किंवा एखाद्या रस्त्याचे काम असेल तर त्याबाबत कामकाज सचिवांकडून त्याचा ठराव झालेला आहे. माननीय मंत्री महोदयांना माझी अशी विनंती आहे की, या विषयाचा वादाचा मुद्दा न करता हा ठराव आपण रद्द करावा. मी आपल्याला हा ठराव देतो. आमचे प्रस्ताव स्वीकारले जाणार नसतील तर केवळ चर्चा करण्यात काय अर्थ आहे ?

श्री.दिलीप वळसे पाटील : सभापती महोदय, डीपीडीसीमध्ये काय ठराव झालेला आहे, याची आपण तपासणी करुन घेऊ. शासकीय समित्यांचे सर्व नियम करुन त्या समितीमध्ये विधानसभा सदस्य किंवा विधानपरिषद सदस्यांना अध्यक्ष पद दिलेले आहे. जवाहर विहिर योजना असेल, संजय गांधी निराधार योजना असेल

यानंतर श्री. बरवड..

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 40461 ....... श्री. दिलीप वळसे-पाटील ....

तसेच अन्य प्रकारचे प्रस्ताव तालुका समन्वय समितीकडून डीपीडीसीमध्ये येत असतात. याचा अर्थ विधान परिषद सदस्यांना प्रस्ताव सुचविता येत नाहीत असे नाही. अनेक समित्यांचे चेअरमन...

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदय श्री. दिलीप वळसे-पाटील हे नियमावर बोलत आहेत. प्रत्यक्षात जे घडलेले आहे त्याबाबत त्यांनी सांगावे.

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, अनेक पालकमंत्री अनेक कमिट्यांवर आहेत. यासंदर्भात मी स्वत: संबंधित जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांशी बोलून सभागृहाच्या भावना त्यांच्या लक्षात आणून देऊ. यासंदर्भामध्ये आवश्यकता असेल तर राज्य सरकारच्या वतीने स्पष्ट निर्देश देण्यात येतील.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, त्या ठिकाणी आयुक्त असतात. त्यांनी अशा प्रकारचा ठराव करता येतो की नाही हे त्या ठिकाणी सांगावयास पाहिजे होते. त्या ठिकाणी जिल्हाधिकारी उपस्थित असतात. तो ठराव रद्द करणार की नाही ?

श्री. सुरेशदादा देशमुख : त्या ठिकाणी ठराव कसा घेतला ?

( दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात )

**उपसभापती** : या सदनामध्ये सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या अनुषंगाने नवीन मुद्दा उपस्थित झालेला आहे. अर्थात हा जो नवीन मुद्दा उपस्थित झालेला आहे तो लोकहितार्थ निर्माण झालेला मुद्दा आहे. वास्तविक विधान परिषदेतील सदस्य हे वेगवेगळ्या विभागातून निवडून येत असतात. स्थानिक स्वराज्य संस्थेव्दारे, विधानसभा सदस्यांव्दारे तसेच शिक्षक मतदारसंघातून, पदवीधर मतदारसंघातून विधान परिषदेचे सदस्य निवडून आलेले असतात. या सदस्यांना देखील शासनाच्या प्रत्येक प्रक्रियेमध्ये सहभागी होण्याचा अधिकार निश्चितपणे आहे. या ठिकाणी माननीय मंत्रिमहोदय म्हणाले की, यासंदर्भात विचारणा करुन योग्य ती संधी प्राप्त करुन देऊ. परंतु या क्षणाला त्या ठिकाणी असा भेदभाव होणे योग्य नाही. या सदनाच्या भावना लक्षात घेऊन यापूर्वी जर त्या ठिकाणी अशा प्रकारचा ठराव झाला असेल आणि विधान परिषदेच्या सदस्यांना अधिकार ठेवलेले नसतील तर जनहित आणि त्याची व्यापकता लक्षात घेऊन यामध्ये

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MMP/

ता. प्र. क्र. 40461 ....... **उपसभापती** .......

जरुर दुरुस्ती केली पाहिजे आणि ती दुरुस्ती करावी. यासंदर्भामध्ये जिल्हा पातळीवर जिल्हाधिकारी किंवा विभागीय आयुक्त यांनी असा काही प्रस्ताव किंवा ठराव केलेला असेल तर तो रद्दबातल करावा आणि या सगळ्या गोष्टी शासनाच्या निदर्शनास आणून विधान परिषद सदस्यांना विधानसभेच्या सदस्यांइतकेच हक्क प्राप्त व्हावेत यादृष्टीने.....

श्री. जयंत प्र. पाटील : आम्हाला हक्क आहेतच.

**उपसभापती** : विधानसभा सदस्यांइतकेच हक्क आपल्याला प्राप्त आहेत. माझे असे म्हणणे आहे की, डीपीडीसीच्या बैठकीमध्ये विधानसभा सदस्यांना जे हक्क आहेत तेच हक्क विधान परिषद सदस्यांना मिळत नसतील तर त्यांना ते प्राप्त करुन देण्यात यावेत अशा प्रकारची सूचना या सदनाने आपल्याला केलेली आहे, ती आपण शासनाच्या निदर्शनास आणून द्यावी आणि त्याप्रमाणे कृती करावी.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, जिल्हाधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस द्यावी. त्या ठिकाणी जिल्हाधिकारी हे सचिव म्हणून उपस्थित असतात. त्यांना शासनाची पध्दत, प्रोसीजर, नियम, कायदे माहीत असतात. त्या ठिकाणी त्यांनी पालकमंत्र्यांना मार्गदर्शन करावयास पाहिजे होते की, अशा प्रकारचा ठराव करता येणार नाही. त्या ठिकाणी त्यांनी योग्य ती काळजी घेतली नाही, कर्तव्य बजावले नाही म्हणून संबंधित जे जिल्हाधिकारी आणि आयुक्त असतील त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली पाहिजे.

**उपसभापती** : असा प्रकार त्या ठिकाणी झालेला असेल तर त्यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना विचारणा करण्यात यावी.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांच्या प्रश्नाच्या संदर्भात आपण असे सांगितले की, मी निधी देतो. आपल्याला निधी देता येणार नाही. आपला मतदारसंघ मर्यादित आहे.

**उपसभापती** : नियोजन विभागाची योग्य ती परवानगी घेऊन असे शब्द मी वापरले आहेत.

----

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पुणे येथील राजा केळकर संग्रहालयातील अनमोल वस्तुंच्या सुरक्षिततेबाबत**

**(३) * ३८७९३ श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री. संजय दत्त , श्री. सुरेशदादा देशमुख :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे येथील सुप्रसिध्द असलेल्या राजा केळकर संग्रहालयाची जागा अपुरी पडत असल्याने संग्रहालयातील साडेसतरा हजार अनमोल अशा वस्तु खोक्यामध्ये दाटीवाटीने कोंबून ठेवल्या असल्याचे माहे डिसेंबर, २००७ रोजी वा त्यादरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार खोक्यात दाटीवाटीने कोंबून ठेवलेल्या अनमोल वस्तुंना संग्रहालयात सुरक्षित ठेवण्यासाठी संग्रहालयाची जागा वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री.राणा जगजितसिंह पाटील श्री.अशोक चव्हाण यांच्याकरिता** : (१), (२) व (३) हे खरे नाही. राजा दिनकर केळकर संग्रहालयामधील सर्व वस्तु व्यवस्थीतरित्या प्रदर्शित करण्यासाठी संग्रहालयाची जागा अपुरी पडत आहे तरी देखील वस्तु खोक्यांमध्ये दाटीवाटीने कोंबून न ठेवता या वस्तुंची देखभाल व्यवस्थित करण्यात येवून त्या योग्यरित्या जतन करुन ठेवल्या आहेत.

संग्रहालयातील वस्तुंचे प्रदर्शन अधिक चांगल्या रितीने करता यावे यासाठी शासनाने बावधन बु., सर्व्हे क्र.२३, ता.मुळशी जि.पुणे येथे संग्रहालयाला ६ एकर इतकी जमीन अत्यल्प मोबदल्यात दिली आहे. या जागेवर नवीन संग्रहालय संकूल निर्मिती करण्यासाठी विकास प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.सुरेशदादा देशमुख : सभापती महोदय, पुणे येथील सुप्रसिध्द असलेल्या राजा केळकर संग्रहालयातील वस्तू सुरक्षित राहण्यासाठी या संग्रहालयासाठी असलेली जागा खूप अपुरी आहे. त्याठिकाणी ज्या पुराण वस्तू आहेत त्या व्यवस्थित पाहता येतील अशीही सोय नाही. त्या वस्तू धूळ खात पडल्या आहेत. उत्तरामध्ये " संग्रहालयातील वस्तुंचे प्रदर्शन चांगल्यारितीने करता याव्यात यासाठी शासनाने बावधन बु., सर्व्हे क्र.२३, ता.मुळशी, जिल्हा पुणे येथे संग्रहालयाला ६ एकर इतकी जमीन अत्यल्प मोबदल्यात दिली आहे. या जागेवर नवीन संग्रहालय संकूल निर्मिती करण्यासाठी विकास प्रकल्पाचे काम प्रगतीपथवर आहे, " असे नमूद केले आहे. या संग्रहालयासाठी लागणारा निधी उपलब्ध झाला आहे काय, या वस्तुंची निगा कशाप्रकारे ठेवणार आहे ? प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे म्हणजे नेमकी वस्तुस्थिती काय आहे त्याचा खुलासा मंत्रिमहोदय करतील काय ?

NTK/ SBT/ MMP/

ता.प्र.क्र.३८७९३....

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, राजा केळकर संग्रहालय १५ हजार चौ.फू.एवढया जागेमध्ये आहे. त्यामध्ये साधारणपणे २५०० वस्तू प्रदर्शित केलेल्या आहेत. २१ हजार आर्टिफॅक्टस्‌ना न्याय द्यावयाचा असेल, सर्व प्रदर्शित करावयाचे असतील तर खूप जागा लागणार आहे. त्यासाठी शासनाने बावधन बु.,ता.मुळशी, जि.पुणे येथे जागा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. त्या संग्रहालयाला जागेचा ताबाही देण्यात आलेला आहे. २००५ मध्ये ५ कोटी ८८ लाख रुपये शासनाने देण्याचा निर्णय घेतला आहे. सन २००४-०५ मध्ये शासनाने या कामासाठी २ कोटी रुपये बाजूला काढून ठेवले होते. परंतु संग्रहालयाच्या व्यवस्थापनाने पुढील निर्णय घेतलेला नाही. त्यामुळे बांधकामाचे काम सुरु झालेले नाही. २१ कोटीचा प्रारुप आराखडा तयार झालेला आहे. शासन या कामासाठी ५.८८ कोटी रुपये देण्यास तयार आहे. पुणे महानगरपालिका साधारणपणे तेवढीच रक्कम देण्यास तयार आहे. राष्ट्रीय संस्कृती निधीमधून या कामासाठी १०-११ कोटी रुपये सुध्दा उपलब्ध होऊ शकतील.

श्रीमती मंदा म्हात्रे : या कामासाठी शासन निधी देण्यास आहे. त्याबाबतची आकडेवारीही त्यांनी सांगितली आहे. परंतु हे काम प्रत्यक्षात केव्हा सुरु होईल आणि त्यामध्ये अडचण काय आहे ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : राजा केळकर संग्रहालयाच्या व्यवस्थापनाने कोथरुडला जागा उपलब्ध करुन द्यावी असे म्हटले आहे. त्यासंबंधी निर्णय होऊ शकला नाही. त्यामुळे प्रत्यक्षात जागेचे हस्तांतरण किंवा काम सुरु होऊ शकत नाही.

डॉ.वसंत पवार : पुणे येथील राजा केळकर वस्तू संग्रहालय जुने व प्रसिध्द आहे. या वस्तू संग्रहालयामध्ये साधारणपणे १७,५०० अनमोल वस्तू ठेवल्या आहेत. त्याठिकाणी चुकीचा उल्लेख असणारी जेम्स लेनची पुस्तके असल्यामुळे मागील काही काळामध्ये काही कार्यकर्त्यांनी या वस्तू संग्रहालयावर हल्लाबोल केला होता. या संग्रहालयामध्ये अनमोल वस्तू ठेवण्यासाठी कमिटी आहे काय ? एखादी अनमोल वस्तू तेथे ठेवावयाची की नाही याबाबतचा निर्णय ती कमिटी घेते काय ? या संग्रहालयाला महाराष्ट्र शासन मदत करते त्याशिवाय केंद्र सरकारकडूनही वेगळी मदत मिळते काय ?

नंतर श्री.शिगम.....

अस्वेधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 38793.....

श्री. राणा जगजितसिंह पाटील : हे खाजगी संग्रहालय होते. 1975मध्ये करारनामा करुन ते शासनाकडे हस्तांतरित करण्यात आले. तेथील कर्मचारी हे शासकीय कर्मचारी नसले तरी ते संग्रहालय शासनाकडे हस्तांतरित केल्यामुळे त्यासंदर्भातील जबाबदारी ही निश्चितपणे शासनाची आहे. शासन दरवर्षी 25 लाख रु. व्यवस्थापन निधी देत आहे. इमारातीचे भाडे आणि कर यासाठी 3 लाख 70हजार रुपये इतके अनुदान दिले जाते. केन्द्र सरकारच्या नॅशनल कल्चरल फंडात विशेष करारनामा करुन दिनांक 12.4.2002रोजी या संग्रहालयाचा समावेश केलेला आहे. नॅशनल कल्चरल फंडाच्या माध्यमातून नवीन वास्तू उभी राहील त्यावेळी तो निधी उपलब्ध होणार आहे.

श्रीमती फौजिया खान :सभापति महोदय, उत्तर में यह लिखा है कि " संग्रहालयामधील सर्व वस्तु व्यवस्थीतरित्या प्रदर्शित करण्यासाठी संग्रहालयाची जागा अपुरी पडत आहे तरी देखील वस्तु खोक्यांमध्ये दाटीवाटीने कोंबून न ठेवता या वस्तुंची देखभाल व्यवस्थित करण्यात येवून त्या योग्यरित्या जतन करुन ठेवल्या आहेत ".मेरा यह प्रश्न है कि सर्व वस्तु कहां रखी है और उसका जतन किस तरह से कर रहे हैं ?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : मी सांगितल्या प्रमाणे जवळ जवळ 21 हजार वस्तू आहेत. त्या व्यवस्थित पॅक करुन रुममध्ये ठेवलेल्या आहेत. त्या वस्तूंच्या सुरक्षिततेबाबत अडचण नाही.

श्री. सुरेशदादा देशमुख : 21 हजार वस्तू व्यवस्थित पॅक करुन ठेवलेल्या आहेत असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले. साडेसतरा हजार वस्तू दाटीवाटीने कांबून ठेवल्या आहेत काय असे प्रश्नामध्ये विचारलेले आहे. 2 कोटी रु. वेगळे ठेवलेले आहेत असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले.मग ते पैसे देखील खोलीमध्ये ठेवलेले आहेत काय ?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : जागा अपुरी आहे. 21 हजार आर्टिफॅक्टस् व्यवस्थित पॅक करुन ठेवलेल्या आहेत.

श्री. दिवाकर रावते : हा विषय दुर्लक्षिण्यासारखा नाही. हा गंभीर विषय आहे. माननीय मंत्री महोदयांचे उत्तर योग्य आहे काय ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील :उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, सर्व वस्तू प्रदर्शित करण्यासाठी संग्रहालयाला जागा अपुरी पडत असल्यामुळे त्या वस्तू प्रदर्शित करता येत नाहीत. त्या दाटीवाटीने कोंबून ठेवलेल्या नाहीत तर त्या व्यवस्थित पॅक करुन योग्यरीतीने जतन केलेल्या आहेत.

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 38793.....

श्री. दिवाकर रावते : ह्या वस्तू लोकांना पाहाण्यासाठी ठेवलेल्या आहेत की अन्य कोठे ठेवलेल्या आहेत ?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : त्या वस्तू व्यवस्थित पॅक करुन सुरक्षित ठेवलेल्या आहेत.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 10:35

**नागपूर जिल्ह्यातील विविध शासकीय रूग्णालयात एड्सग्रस्तांच्या रक्त तपासणीचे साहित्य उपलब्ध नसल्याबाबत**

**(५) * ३८८९२ श्री.सय्यद जामा , श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. सुरेशदादा देशमुख :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील इंदिरागांधी मेमोरियल हॉस्पिटल, मेडिकल हॉस्पिटल, ग्रामीण भागातील उप जिल्हा रूग्णालये व प्राथमिक आरोग्य केंद्र या ठिकाणी एड्सग्रस्तांच्या रक्त तपासणीचे साहित्यच उपलब्ध नाही, तसेच जिल्ह्यातील विविध खाजगी रूग्णालयात मात्र हे साहित्य मोठ्या प्रमाणात सहजतेने उपलब्ध आहे असेही आढळून आले आहे, जनजागृतीसाठी समोपदेशन वगैरे कार्यासाठी विभाग खर्च करित आहे, परंतु एड्स रक्त तपासणीचे साहित्य उपलब्ध नाही हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाने यासंदर्भात काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे, असल्यास त्याचा तपशील काय आहे,

(३) अद्याप कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुरेश शेट्टी, श्री.दिलीप वळसे-पाटील यांच्याकरिता** : (१) हे खरे नाही. नागपूर जिल्ह्यात २१ आय.सी.टी.सी. सेंटर व २ पी.पी.टी.सी.टी. सेंटर कार्यरत असून त्यामध्ये एड्सग्रस्तांच्या रक्ततपासणीसाठी आवश्यक साहित्य टेस्ट ट्यूब, टेस्ट ट्युब स्टॅन्ड, पीपेट, मायक्रोटीप्स हायपोक्लोराईड सोलुशन, कॉटन, स्पीरिट, डिस्पोजेबल सिरिंज, डिस्पोजेबल ग्लोज, मार्कर इत्यादी पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहेत.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. सय्यद जामा :सभापति महोदय, पिछले कुछ सालों में विदर्भ में नागपुर के आस-पास के क्षेत्रों में बहुत सारे लोग एचआयव्ही ग्रस्त पाए गए हैं. नागपुर में जितने भी सरकारी अस्पताल है, जैसे-इंदिरा गांधी मेडिकल कॉलेज और अन्य अस्पताल है वहां एड्सग्रस्तों के खून की जांच करने के लिए जिन साहित्य/साधनों की जरुरत होती है, उसकी बहुत कमी है. कई सरकारी अस्पताल में जब मरीज जाता है तो उसे कहा जाता है कि आप प्राईवेट अस्पताल में जांच कराईए क्योंकि हमारे पास जांच के साधन नहीं है. उत्तर में लिखा है कि नागपुर जिले में 21 आयसीटीसी सेंटर व 2 पीपीटीसीटी सेंटर में पर्याप्त प्रमाण में साहित्य उपलब्ध है. मैं यह जानना चाहता हूं कि क्या नागपुर के पास सावनेर, कामठी, पारशिवनी इत्यादी जगह पर जो सरकारी अस्पताल है, वहां शारीरिक जांच के साधनों की पूरी व्यवस्था है ?

4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 10:35

ता.प्र.क्र. ३८८९२...

श्री. सुरेश शेट्टी :सभापति महोदय, सम्माननीय सदस्य ने बहुत महत्वपूर्ण प्रश्न पूछा है. एचआयव्ही और एड्सग्रस्त लोगों के संबंध में पूरे देश में केन्द्रीय सरकार की नॅको नाम की संस्था कार्य कर रही है. २३ केन्द्रों पर एचआयव्ही और एड्सग्रस्तों का इलाज हो रहा है. इन केन्द्रों पर ऐसे मरीजों के लिए कौंसिलिंग इत्यादि का कार्य किया जाता है. नागपुर में एव्म नागपुर के आस-पास अनेक सरकारी अस्पताल हैं, जैसे-नागपुर में डागा अस्पताल, इंदिरा गांधी मेडिकल कॉलेज हैं और नागपुर के आस-पास ग्रामीण अस्पताल हैं, जैसे-कामठी, काटोल, मौदा, टाकाल घाट, पारशिवनी, रामटेक, हिंगणा, कळमेश्वर, उमरेड, सावनेर इत्यादि २१ जगहों पर सरकारी अस्पताल हैं और २१ आय.सी.टी.सी. सेंटर है. इन केन्द्रों पर एचआयव्ही टेस्टिंग, कौंसिलिंग और फर्स्ट टेस्ट होती है और एचआयव्ही पॉजीटिव व्यक्तियों की सेकंड और थर्ड टेस्ट की सारे २१ अस्पतालों में व्यवस्था है.

यानंतर श्री गिते

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ SBT/ MMP/ प्रथम श्री. शिगम... 10:40

ता.प्र.क्र.38892....

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी माहिती दिली की, सदर किटस् नॅको संस्थेकडून सप्लाय होतात. परंतु या संस्थेच्या टेस्ट किटस् ठराविक रुणालयांमध्ये नसतात. पहिली टेस्ट केल्याशिवाय गर्भवती महिलेला दुसरी टेस्ट करता येत नाही, तसेच तिला पुढील ट्रीटमेंट घेता येत नाही. नॅकोकडून टेस्ट किट उपलब्ध झाल्या नाहीत तर अशा इर्मजन्सीच्या वेळी राज्य शासन या प्रथम टेस्ट कीट दुस-या संस्थेकडून खरेदी करील काय ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, रुग्णाची टेस्ट घेण्यात येते त्यावेळी टाईप-1 ची प्रथम टेस्ट घेण्यात येते, त्या टेस्टसाठी लागणारे किटस् नॅको संस्थेकडून येतात. भारतातील प्रत्येक राज्यात नॅको संस्थेकडूनच या किटस् पुरविल्या जात असतात. टाईप-1 ची टेस्ट झाल्यानंतर पुन्हा रुग्णास टाईप-2 आणि टाईप-3 अशा दोन टेस्ट कराव्या लागतात. टाईप-2 व टाईप-3 च्या टेस्ट संबंधीच्या किटस् राज्य शासनाकडून खरेदी करुन पुरविल्या जातात. परंतु टाईप-1 च्या टेस्टचे किटस् हे नॅको मार्फतच वितरण होत असते. शासकीय रुग्णालयांमध्ये या किटस् उपलब्ध नसतात असे कधी होत नाही. त्यामुळे इर्मजन्सी किटस् खरेदी करण्याचा प्रश्न येत नाही. मी यासंबंधीची आकडेवारी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो. संपूर्ण महाराष्ट्रात मार्च 2007, एप्रिल, 2007 आणि मार्च 2008 या दोन तीन महिन्यात नॅको संस्थेच्या किटस् मोठया प्रमाणात उपलब्ध होत्या.

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सावंतवाडी येथील पंचायत समितीच्या शिक्षण विभागातील**

**एका लिपिकाने शिक्षकांच्या बदल्यामध्ये केलेला भ्रष्टाचार**

**(४) * ४००७६ श्री.राजन तेली, श्री. संजय दत्त, श्री.जैनुद्दीन जव्हेरी :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावंतवाडी येथील पंचायत समितीच्या शिक्षण विभागातील एका लिपिकाने दिनांक २५ मे, २००७ रोजी आणि २९ मे, २००७ रोजी तयार करण्यात आलेला मेमो आणि शिक्षकांना देण्यात आलेल्या ऑर्डरवर स्वत: सह्या करून शिक्षकांच्या बदल्यामध्ये भ्रष्टाचार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्राथमिक शिक्षक समितीने संबंधित दोषी असणाऱ्या लिपिकावर त्वरित कारवाई केली नाही तर उपोषणाला बसण्याचा इशारा शिक्षणाधिकारी यांना दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,त्यानुसार संबंधित दोषींवर कारवाई करण्यात आली आहे काय,

(४) नसल्यास, याबाबत होत असलेल्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. रणजित कांबळे,श्री.विजयसिंह मोहिते पाटील यांच्याकरिता** : (१) शिक्षकांच्या बदल्यांमध्ये अनियमितता झाली आहे.

(२) होय.

(३) होय. प्राथमिक चौकशीमध्ये जिल्हास्तरीय बदली मेमो पूर्वीचे तालुका बदली मेमो तयार करुन निर्गमित करणे, रिक्त शाळांच्या यादीतील शाळा तालुकास्तरावरुन अगोदरच भरणे, जिल्हा मेमोत शिक्षकांना दिलेल्या शाळा बदलून त्यांना तालुका स्तरावरुन दुसऱ्या शाळा देणे, जादा शिक्षक दिल्याचे दिसून येणे, बदलीस पात्र नसलेल्या एका शिक्षकाची बदली नियमबाह्य रितीने करणे या बाबी निदर्शनास आल्याने संबंधित लिपिक व तत्कालीन प्रभारी गट शिक्षणाधिकारी यांचे विरुध्द विभागीय चौकशी करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. राजन तेली : सिधुदूर्ग जिल्हयात जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागात फार मोठया प्रमाणात गोंधळ सुरु आहे. डी.एड. आणि बी.एड. बेरोजगार गेल्या चार वर्षापासून उपोषण करीत आहेत, अद्यापही तो प्रश्न सुटलेला नाही. शिक्षकांच्या बदल्यांमध्ये तर मोठया प्रमाणात अनियमितता

...३



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र. क्र. ४००७६...

श्री. राजन तेली....

झाली आहे. याबाबतीत माझा प्रश्न असा आहे की, या प्रकरणी संबंधित लिपीक व तत्कालीन प्रभारी गट विकास शिक्षणाधिकारी यांचे विरुध्द विभागीय चौकशी पूर्ण झाली आहे काय ? असल्यास, चौकशी अहवाल प्राप्त झाला आहे काय ? चौकशी पूर्ण झाली नसल्यास ती किती कालावधीपर्यंत पूर्ण करण्यात येईल ?

यानंतर श्री. कानडे...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 40076 पुढे सुरु....

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, 27.7.07 रोजी चौकशी सुरु केली आणि त्या चौकशीचा अहवाल 26.8.07 रोजी म्हणजे एक महिन्याच्या अवधीतच प्राप्त झालेला आहे.

श्री. राजन तेली : सभापती महोदय, अहवालामध्ये कोणत्या गोष्टींचा उल्लेख करण्यात आला आहे ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, पंचायत समितीने ज्या बदल्या केल्या त्याच्यामध्ये अनियमितता झाल्याचे आढळून आले आहे. जिल्हा परिषदेच्या बदल्यांचा प्रस्ताव येण्याआधीच पंचायत समितीने बदल्या केल्या. जे शिक्षक बदलीस पात्र नाहीत अशा काही शिक्षकांच्या बदल्या केल्या. 8 शाळामधील जादा शिक्षकांच्या बदल्या केल्या. अशा प्रकारची अनियमितता अहवालातून निदर्शनास आल्यानंतर चौकशी केली आणि त्यानंतर या सर्व बदल्यांना मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी तात्काळ स्थगिती दिली. यातील 22 शिक्षक लोअर कोर्टात गेले आणि त्यांनी 30.12.2007 रोजी स्थगिती घेतली.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, सिंधुदूर्ग जिल्हा परिषदेमधील शिक्षकांच्या बदल्यांचा विषय आहे. रत्नागिरी जिल्हा परिषदेधील एका प्रकरणाबाबत मी लक्षवेधी सूचना दिली होती. परंतु ती सदनात येण्याची शक्यता दिसत नाही. जिल्हा परिषदेमधील एका अधिकाऱ्याने प्रत्यक्षपणाने कुठेही मुलाखत न घेता अर्ज न मागविता काही शिक्षकांना नेमणुका दिल्या आहेत. नेमणुका दिल्यानंतर शिक्षक हजर झाले. काही दिवसानंतर ही बाब लक्षात आल्यानंतर यासंबंधात मी लक्षवेधी सूचना दिली. म्हणून माझा प्रश्न असा आहे की ज्या अधिकाऱ्याने या प्रकरणात फार मोठा घोटाळा केलेला आहे त्याच्यावर शासन कोणती कारवाई करणार आहे ? सभापती महोदय, दशरथ रघुनाथ साळवी हा गुहागर पंचायत समितीमधील शिक्षक आहे. विषयतज्ज्ञ आहे. परंतु कोणत्याही प्रकारचे कारण नसताना तसेच त्याचे काम चांगले असताना आणि त्याला आदर्श शिक्षकाचा पुरस्कार मिळाला असताना देखील त्याची महाड पंचायत समितीमध्ये बदली केली आहे. शासन याची दखल घेऊन सदरहू शिक्षकाची गुहागर पंचायत समितीमध्ये नेमणूक करणार आहे काय ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी मूळ प्रश्नापेक्षा वेगळा प्रश्न विचारला आहे. तरी देखील माननीय सदस्यांनी जी माहिती दिली आहे त्याबाबतीत ताबडतोब कारवाई करु.

......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.40076 पुढे सुरु...

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी उत्तर देताना सांगितले की, पंचायत समितीने चुकीच्या पध्दतीने बदल्या केल्या आणि त्या बदल्यांना मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी स्थगिती दिलेली आहे. लोअर कोर्टात सुध्दा या बदल्यांना स्थगिती घेतलेली आहे. या प्रकरणामध्ये जी अनियमितता झालेली आहे त्याचे स्वरुप अतिशय गंभीर आहे. सभापती महोदय, उत्तरामध्ये ही गोष्ट मान्य केलेली आहे की, जिल्हा स्तरीय बदली मेमो पूर्वीच तालुका बदली मेमो तयार करुन निर्गमित करणे, रिक्त शाळांच्या यादीतील शाळा तालुका स्तरावरुन अगोदरच भरणे, जिल्हा मेमोत शिक्षकांना दिलेल्या शाळा बदलून त्यांना तालुका स्तरावरुन दुसऱ्या शाळा देणे, जादा शिक्षक दिल्याचे दिसून येणे, बदलीस पात्र नसलेल्या एका शिक्षकाची बदली नियमबाहयरितीने करणे याबाबी चौकशीमध्ये निदर्शनास आलेल्या आहेत. न्यायालयाने जो निर्णय दिलेला आहे त्याचे पालन व्हावे त्याबाबत काही म्हणणे नाही. परंतु एवढया गंभीर चुका असताना फक्त विभागीय चौकशी कशी काय पुरेशी ठरु शकते ? एवढी अनियमितता ज्या अधिकाऱ्यांनी केलेली आहे त्यांच्यावर ताबडतोबीने कारवाई करण्यात सरकारला कोणती अडचण आहे ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, या प्रकरणामध्ये अनियमितता झाल्यानंतर बदल्यांना मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी ताबडतोब स्थगिती दिली. प्रश्नाच्या अनुषंगाने देखील चौकशी करण्यात आली. गटशिक्षणाधिकारी आणि गट विकास अधिकारी आणि संबंधित लिपिक यांनी बदल्या करतान सहया केल्या होत्या त्यांच्यावर ॲक्शन न घेता दुसऱ्या लिपिकावर ॲक्शन घेतलेली आहे. त्याला आता पुन्हा सेवेत घेण्याबाबत कार्यवाही करीत आहोत.

नंतर श्री.भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

25-04-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) K=1

SGB/ SBT/ MMP/ 10:50

ता.प्र.क्र.40076........... श्री.रणजित कांबळे....

बीईओ यांच्यावरील कारवाई त्याच स्तरावर होईल. बीडीओ यांच्यावरील कारवाई शासन स्तरावर होईल. आम्ही ताबडतोब ॲक्शन घेऊ. ई.ओ. हे गंभीर दिसून आले नाहीत. आदेश दिल्यानंतर कोर्टात देखील एक्सपार्टी निर्णय झाला. त्यामुळे या संदर्भात कडक कारवाई करु. अशी प्रकरणे होणे चुकीचे आहे. शासनाने स्पष्टपणे आदेश दिलेले आहेत की, बदली कशी झाली पाहिजे, बदली कशी केली पाहिजे. ई.ओ., बीईओ आणि बीडीओ या तिघांवर कडक कारवाई करु.

-----

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**दारावे (ता.मावळ, जि.पुणे) येथील लवासा कंपनीच्या गिरीस्थान प्रकल्पास वीज पुरवठ्याबाबत**

**(६) * ३९०२० श्री. अनिल परब , डॉ. दिपक सावंत :** सन्माननीय **ऊर्जा (अपारंपारिक ऊर्जा वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दारावे (ता.मावळ, जि.पुणे) येथे लवासा कंपनीमार्फत उभारण्यात येत असलेल्या गिरीस्थान विकास प्रकल्पास स्वतंत्र फिडर द्वारे ४.६ मेगाव्हॅट इतकी वीज मंजूर करण्यात येऊन त्याची चाचणी माहे डिसेंबर, २००७ च्या सुमारास घेण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापूर्वी उक्त प्रकल्पास पिरंगुट येथूनही यापूर्वी वीज पुरवठा करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकल्पाच्या आसपासची गावे भारनियमन व वीजेच्या लपंडावाने त्रस्त असताना उक्त प्रकल्पास ४.६ मेगाव्हॅट अतिरिक्त वीज पुरवठा करण्याची नेमकी कारणे काय आहेत, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी नेमकी वस्तुस्थिती काय आहे ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील** : (१) होय हे खरे आहे. लवासा कंपनीतर्फे मुळशी तालुक्यातील दासवे येथे विकसित करण्यात येणाऱ्या गिरीस्थान विकास प्रकल्पास दिनांक २०/१०/२००७ रोजी उच्च दाबावर ४,५०० के.व्ही.अे. करार मागणीसाठी (कॉन्ट्रक्ट डिमांड) विद्युत पुरवठा करण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) विजेची मागणी व उपलब्धता यामधील तफावतीच्या परिणाम स्वरुप भारनियमन करण्यात येत असले तरी नवीन विद्युत पुरवठ्यावर कोणताही निर्बंध घालण्यात आलेला नाही. लवासा कंपनीने मागणी केल्यानुसार व अन्य आवश्यक बाबींची पूर्तता केल्यानंतर या कंपनीस नियमानुसार विद्युत पुरवठा करण्यात आलेला आहे. या प्रकल्पास तसेच मुळशी तालुक्यातील सदर परिसरातील गावांना मा.विद्युत नियामक आयोगाच्या मार्गदर्शक तत्वाच्या आधारे फक्त दर गुरुवारी सकाळी ०६.०० ते रात्री १०.०० या कालावधीसाठी भारनियमन करण्यात येते.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, वरसगाव धरणावरील वीज निर्मिती केंद्रातून आजूबाजूच्या गावे भारनियमनात होरपळत असताना स्वतंत्र फिडरद्वारे किती वीज पुरवठा लवासा प्रकल्पाला केला जात आहे? या वीज निर्मिती केंद्रात एकूण किती वीज निर्मिती होते व त्यापैकी किती वीजपुरवठा व्यावसायिकांना आणि गावाच्या वापरासाठी केला जातो?

श्री.दिलीप वळसे पाटील : सभापती महोदय, लवासा प्रकल्पासाठी जी वीज पुरवठयाची मागणी होती ती सुरुवातीला १०० मे.वॅटची होती. यासाठी या कंपनीने १५.९.२००४ रोजी अर्ज केला होता. परंतु नंतर याच कंपनीने सुधारित अर्ज नोव्हेंबर, २००६ मध्ये केला आणि आम्हाला सध्या १०० मे.वॅट ऐवजी ४.६ मे.वॅट विजेची गरज आहे अशी मागणी केली. त्यानंतर

..२..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

एमईआरसीच्या तरतुदीनुसार डेडिकेशन डिस्ट्रीब्यूशन फॅसिलिटी ही जी संकल्पना आहे त्या अंतर्गत आम्ही आमच्या खर्चाने वीज मागतो आहोत, हा वीज पुरवठा आम्हाला करावा अशी मागणी त्यांनी केली. त्याप्रमाणे राज्य वीज मंडळाने त्यांना वीजपुरवठा दिला आणि हा पुरवठा २०.१०.२००७ पासून सुरु झाला आहे.

डॉ.दीपक सावंत : हे जे गिरीस्थान आहे तेथे आलिशान बंगले आहेत, हॉटेल्स आहेत, क्लब हाऊस असे वातावरण तेथे आहे हे खरे आहे काय? या प्रकल्पाचे मालक कोण आहेत? या कंपनीवर मेहेरनजर का दाखविण्यात आली? आजूबाजूच्या गावात अंधार असताना या ठराविक स्पॉटला असे झुकते माप का दिले?

श्री.दिलीप वळसे पाटील : सभापती महोदय, या प्रकल्पाला कोणतेही झुकते माप दिले गेले नाही, मेहेरनजर दाखविलेली नाही. राज्यामध्ये धोरण आहे, एखादा इंडस्ट्रिअल ग्रूप असेल, कमर्शियल ग्रूप असेल, पाणीपुरवठा योजना असेल आणि अशा प्रकारच्या स्पेशल डेडिकेशन फिडरची मागणी केली तर धोरणाप्रमाणे एक्स्प्रेस फिडरवरुन वीज पुरवठा करण्याचे धोरण आहे, त्या धोरणाप्रमाणे हा वीज पुरवठा करण्यात आला आहे. त्यामुळे या विशिष्ट प्रकल्पावर मेहेरनजर दाखविली, स्पेशल केस केली अशी परिस्थिती नाही. प्रकल्प कोणाचा आहे या बाबतची माहिती माझ्याकडे उपलब्ध नाही.

डॉ.दीपक सावंत : माहिती पटलावर ठेवली जाईल काय?

श्री.दिलीप वळसे पाटील : याबाबतची माहिती घेऊन संबंधित सदस्यांना देण्यात येईल.

श्री.अरविंद सावंत : मालक कोण आहेत याची मंत्रीमहोदयांना माहिती नाही ही आनंदाची गोष्ट आहे. यावरुन शासन किती गांभीर्याने लक्ष देते हे कळते. या कंपनीला वीज पुरवठा केला, परंतु त्या कंपनीचे मालक कोण आहेत, त्यांचे नाव काय आहे याची मंत्रीमहोदयांना माहिती नाही हे आश्चर्यकारक आहे. वीज मंडळाकडून तेथे प्रत्येक शुक्रवारी सकाळी १० ते दुपारी १ वाजेपर्यंत भारनियमन केले जाते, त्या वेळेत या लवासा प्रकल्पामध्ये भारनियमन सुरु असते का? लवासा प्रकल्पामुळे वीज मंडळाला किती उत्पन्न मिळते?

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : 40076** .......

श्री. दिलीप वळसे -पाटील : सभापती महोदय, प्रत्येक तालुक्यामध्ये, जिल्हयामध्ये वेगवेगळे फिडर असतात तेथील टीएनडी लॉसेस आणि एमईआरसीने ठरवलेल्या प्रोटोकॉल प्रमाणे भारनियम करण्यात येत असते. मुळशी तालुका हा इंडस्ट्रीयल तालुका असल्यामुळे ॲग्रीकल्चर कनेक्शनपेक्षा या ठिकाणी इंडस्ट्रीयल फिडर जास्त आहेत, कन्झ्यूमर जास्त आहेत त्यामुळे अन्य ठिकाणी जास्त भारनियमन असतांना सुध्दा मुळशी तालुक्यात फक्त चारच तास भारनियमन केले जात असते कारण एमईआरसीने जो प्रोटोकॉल ठरवून दिलेला आहे त्याप्रमाणे येथे भारनियमन केले जात असते. मुळशी तालुक्यात सुध्दा जवळ जवळ याच प्रोटोकालप्रमाणे भारनियमन करण्यात येते असते.

-------------

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**धुळे येथील वीज वितरण कंपनीचे देयके परस्पर वठवून फसवणूक केल्याबाबत**

**(७) * ३८९८३ श्री. दिवाकर रावते , डॉ. निलम गोऱ्हे , डॉ. दीपक सावंत : तारांकित प्रश्न क्रमांक ३७२०६ ला दिनांक २९ नोव्हेंबर, २००७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **ऊर्जा (अपारंपारिक ऊर्जा वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे येथील वीज वितरण कंपनीचे देयके परस्पर वठवून फसवणूक केल्याबाबतची विभागीय चौकशी पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, या चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील** : (१) नाही.

(२) व (३) विभागीय चौकशी सुरु करण्यासंदर्भातील प्रशासकीय कार्यवाही पूर्ण झाली असून सकृतदर्शनी कसूरदार आढळलेल्या ४ अधिकारी/कर्मचारी यांना दोषारोपपत्र (चार्ज शीट) देण्यात येत आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या प्रकरणात एकूण ५६,४७,७६१ रुपयांचा घोटाळा झालेला असून हा घोटाळा कर्मचा-यांनी केलेला आहे. यासंदर्भात आपण १६.८.२००७ रोजी चौकशी करण्यासाठी समिती नेमली होती. चौकशी नेमून आठ महिने झालेले आहेत. त्यामुळे सहा महिने झाल्यानंतर या ठिकाणच्या कर्मचा-यांना कामावर परत घेतले आहे काय ? या ठिकाणच्या कर्मचा-यांना कामावर घेतले नसेल तर या प्रकरणात सुरु करण्यात आलेल्या चौकशीचा अहवाल कधी येईल ? तसेच या प्रकरणाचा निर्णय कधी लागेल ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, प्राथमिक चौकशीमध्ये कर्मचारी दोषी आढळून आल्यानंतर या ठिकाणच्या ज्या कर्मचा-यांना निलंबित करण्यात आले होते त्यापैकी अधीक्षक अभियंता यांना कामावर घेतलेले आहे कारण ही घटना ज्या दिवशी घडली त्याच्या आधी म्हणजे एक किंवा दोन दिवस ते अधीक्षक अभियंता पदावर जॉईंट झाले होते. त्यांचा या प्रकरणाशी प्रत्यक्षात काही सहभाग नव्हता. परंतु बाकीचे जे कर्मचारी आहेत त्यांना निलंबित करण्यात आलेले आहे. त्यांच्यावर पोलीस केस दाखल करुन त्यांना अटक झाली होती. या प्रकरणाची व्याप्ती लक्षात घेता या प्रकरणात अधिक चौकशीची गरज आहे असे वाटल्यामुळे हे प्रकरण आपण सीआयडीकडे दिनांक १४.१.२००८ रोजी सुपूर्द करण्यात आले. हा प्रश्न काही एका विभागापुरता किंवा जिल्हयापुरता नसून राज्याच्या बाहेर सुध्दा काही लोक याच्याशी संबंधित आहे. त्यामुळे या

...३



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : 38983** .......

श्री. दिलीप वळसे-पाटील.....

प्रकरणात सर्व चौकशी होऊन सर्व संबंधितांवर कठोर कारवाई झाली पाहिजे म्हणून हे प्रकरण सीआयडीकडे वर्ग करण्यात आलेले आहे. सीआयडीकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कारवाई करण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, जे अधीक्षक अभियंते दोनच दिवसापूर्वी जॉईंट झाले होते त्यांना आपण पुन्हा कामावर घेतलेले आहे त्याबद्दल मला काही बोलावयाचे नाही परंतु अगोदर जे अधीक्षक अभियंते या कामावर होते त्यांचा या प्रकरणाशी संबंध होता म्हणून अगोदरच्या अधीक्षक अभियंत्यांवर कारवाई झाली आहे का ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, अगोदर अधीक्षक अभियंता म्हणून काम करणा-या अधिका-यावर कारवाई करण्याचा प्रश्न येत नाही कारण धुळे जिल्हयामध्ये ज्या विंड मिल्स आहेत त्या विंड मिल्स मधून जी वीज मिळते ती वीज, वीज मंडळाने खरेदी केल्यानंतर त्याचे पेमेंट करावयाचे असते त्यासंदर्भात चेक्स तयार करुन ते चेक्स एका लिस्टच्या आधारे ते बँकेकडे पाठविले जातात. नॉर्मली ही कृती मंडळाच्या अधिका-यांनी करण्याची आवश्यकता असते परंतु या घटनेमध्ये हा चेक्स कंपनीच्या एजंटजवळ दिला त्या एजंटने कार्यालयापासून ते बँकेपर्यंत जाईपर्यंत यादीतील नावे बदलण्यात आली आणि पैसे ट्रान्सफर करण्याचा प्रयत्न केला. मेरठ आणि बाकीच्या ठिकाणावरुन एका एका दिवशी ४०-४० लाख रुपये काढण्यात आले. परंतु ही बाब निदर्शनास आल्यानंतर आपण बाकीचे पेमेंट त्वरित थांबवले आणि जवळपास ५.४० कोटी रुपये किमतीचे चेक्स असतांना सुध्दा ५६,८७,६६१ रुपये एवढेच पैसे त्यांना काढता आले. अशा प्रकारची घटना अगोदर सुध्दा घडली नव्हती ही घटना पहिल्यांदाच घडलेली आहे. ही घटना ज्यावेळेस घडली त्यावेळेस आधीचे ए.सी. त्या ठिकाणी नव्हते आणि नवीन ए.सी. दोन दिवसापूर्वी जॉईंट झाले होते. त्यामुळे आधीच्या अधीक्षक अभियंत्यावर गुन्हा दाखल करण्याचा प्रश्न येत नाही.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.38983..

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात मी गेल्या अधिवेशनामध्ये दिनांक 30.11.2007 रोजी नियम 93 ची सूचना दिली होती त्या संबंधी माननीय मंत्रिमहोदयांनी नेहमीच्या पध्दतीप्रमाणे विस्तृत असे तीन पानांचे निवेदन दिले होते. त्यावेळी त्यांनी असे उत्तर दिले होते की 27 जुलै रोजी सबंधित कर्मचा-याविरुध्द फिर्याद दाखल करण्यात आली आहे दिनांक 30.11.2007 रोजी ही 93 ची सूचना दिली होती इतका कालावधी उलटून गेल्यानंतरसुध्दा संबंधिताविरुध्द कोणतीही कारवाई झालेली नाही. नियम 93 च्या सूचनेच्या निवेदनामध्ये जे उत्तर दिले होते तेच उत्तर ते पुन्हा आज देत आहेत तेव्हा या संदर्भात लवकरात लवकर चौकशी करण्यात येण्ार आहे काय, त्याचप्रमाणें वीज मंडळाची देयके देण्याची कामे मध्यवर्ती सहकारी बॅन्कांकडे आहेत, पतपेढयांकडे आहेत त्यामुळे भ्रष्टाचार होत आहे तेव्हा ही पध्दत बंद येणार आहे काय ?

श्री.दिलीप वळसे - पाटील : सभापती महोदय , सन्माननीय सदस्यांनी नागपूरच्या अधिवेशनात हा प्रश्न उपस्थित केला होता त्यावेळी पोलिसांच्या रेग्युलर ब्रँचमार्फत या प्रकरणाच्या तपासाचे काम सुरु होते तसेच संबंधित लोकांना अटक करण्यात आली होती. या प्रकरणाची राज्य सरकारला जास्त गंभीरता वाटल्यामुळे सी.आय.डी.कडे चौकशी देण्यात आलेली आहे.संबंधित बॅन्क कर्मचारी, इतर कर्मचारी यांच्या विरुध्द कारवाई होणे अभिप्रेत आहे. त्यामुळे नियम 93 च्या सूचनेच्या निवेदनात दिलेले उत्तर मी येथे आज पुन्हा देत आहे असे नाही. या उत्तरामध्ये सुधारणा झाली असून या प्रकरणाचा तपास दिनांक 14.1.2008 रोजी सी.आय.डी.कडे हस्तांतरित केलेला आहे आणि सी.आय.डी.कडून तपास होत नाही तोपर्यत पुढे जाता येणार नाही . त्याचबरोबर सन्माननीय सदस्यांनी बिलाच्या संदर्भात दुसरा प्रश्न विचारलेला आहे त्याबाबतीत मी त्यांना सांगू इच्छितो की तो प्रश्न वेगळा आहे. मंडळाच्या वसुलीसंबंधीचा हा मुद्दा नाही तर पेमेन्ट संबंधीचा मुद्दा आहे त्यामुळे मंडळाची रिकव्हरी थांबू नये यासाठी सर्वतोपरी काळजी घेण्यात येत आहे.

**उपसभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होऊन नियमित बैठक सकाळी 11.30 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची विशेष बैठक सकाळी 11.02 ते 11.30 वाजेपर्यंत स्थगित झाली)

-----

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

( सभागृह स्थगितीनंतर ...)

**सभापतीस्थानी - माननीय उपसभापती**

**सभापतींची निवडणूक व अभिनंदनपर भाषणे.**

**उपसभापती** : सभापती निवडणुकीसंबंधात मला सदस्यांना विदित करावयाचे आहे की, विरोधी पक्षातर्फे अशी विनंती केली गेली आहे की, सभापती निवडीसाठीचा प्रस्ताव प्रथम त्यांच्याकडून मांडला जावा. तरी त्यासाठी सभागृहाची संमती आहे काय ?

श्री. विलासराव देशमुख (मुख्यमंत्री) : आमची हरकत नाही.

**उपसभापती** : ठीक आहे. सभापती निवडीसाठीचा प्रस्ताव विरोधी पक्षातर्फे प्रथमत: माननीय श्री.पांडुरंग फुंडकर यांनी मांडावा.

श्री. पांडुरंग फुंडकर (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मी आपल्या अनुमतीने खालील प्रस्ताव मांडतो -

" श्री. देशमुख, शिवाजीराव बापूसाहेब यांची महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती म्हणून निवड करण्यात यावी."

**उपसभापती** : श्री. दिवाकर रावते या प्रस्तावाला अनुमोदन देतील.

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : महोदय, माननीय श्री.पांडुरंग फुंडकर यांनी मांडलेल्या प्रस्तावाला मी अनुमोदन देतो.

( यानंतर सौ. रणदिवे .... ओ 1 ..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : आता सन्माननीय सदस्य श्री.दिलीपराव देशमुख यांनी आपला प्रस्ताव मांडावा.

श्री.दिलीपराव देशमुख (उस्मानाबाद-बीड-लातूर स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने खालील प्रस्ताव मांडतो,

"श्री.शिवाजीराव बापूसाहेब देशमुख यांची महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती म्हणून निवड करण्यात यावी."

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार या प्रस्तावाला अनुमोदन देतील.

श्री.उल्हास पवार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिलीपराव देशमुख यांनी "श्री.शिवाजीराव बापूसाहेब देशमुख यांची महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती म्हणून निवड करण्यात यावी" असा जो प्रस्ताव मांडलेला आहे, त्या प्रस्तावाला मी अनुमोदन देतो.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी यांनी आपला प्रस्ताव मांडावा.

श्री.अरुण गुजराथी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने खालील प्रस्ताव मांडतो,

"श्री.शिवाजीराव बापूसाहेब देशमुख यांची महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती म्हणून निवड करण्यात यावी"

**उपसभापती** : सन्माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे या प्रस्तावाला अनुमोदन देतील.

श्रीमती उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी यांनी "श्री.शिवाजीराव बापूसाहेब देशमुख यांची महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती म्हणून निवड करण्यात यावी" असा जो प्रस्ताव मांडलेला आहे, त्या प्रस्तावाला मी अनुमोदन देते.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी आपला प्रस्ताव मांडावा.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने खालील प्रस्ताव मांडतो,

"श्री.शिवाजीराव बापूसाहेब देशमुख यांची महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती म्हणून निवड करण्यात यावी."

. . . .ओ-2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य डॉ.एन.पी.हिराणी या प्रस्तावाला अनुमोदन देतील.

डॉ.एन.पी.हिराणी (यवतमाळ स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी "श्री.शिवाजीराव बापूसाहेब देशमुख यांची महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती म्हणून निवड करण्यात यावी" असा जो प्रस्ताव मांडलेला आहे, त्या प्रस्तावाला मी अनुमोदन देतो.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत रघुवंशी यांनी आपला प्रस्ताव मांडावा.

श्री.चंद्रकांत रघुवंशी (धुळे तथा नंदुरबार स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने खालील प्रस्ताव मांडतो.

"श्री.शिवाजीराव बापूसाहेब देशमुख यांची महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती म्हणून निवड करण्यात यावी."

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.सय्यद मुझफ्फर हुसैन या प्रस्तावाला अनुमोदन देतील.

श्री.सय्यद मुझफ्फर हुसैन (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत रघुवंशी यांनी "श्री.शिवाजीराव बापूसाहेब देशमुख यांची महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती म्हणून निवड करण्यात यावी" असा जो प्रस्ताव मांडलेला आहे, त्याला मी अनुमोदन देतो.

**उपसभापती** : खरे म्हणजे हा प्रस्ताव मतास टाकण्याचा प्रश्न उद्भवत नाही. कारण हा प्रस्ताव एकमताने मांडलेला आहे. आता मी सदर प्रस्ताव मतास टाकतो.

प्रस्ताव एकमताने संमत झाला.

-----

. . . .ओ-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : याठिकाणी मी आदरणीय सभापतींच्या संदर्भात थोडक्यात अभिनंदनपर भाषण करतो. आदरणीय श्री.शिवाजीराव बापूसाहेब देशमुख यांची आज या सदनामध्ये एकमताने पुन्हा सभापती म्हणून फेरनिवड करण्यात आलेली आहे. आदरणीय श्री.शिवाजीराव देशमुख यांचे व्यक्तिमत्व हे संपूर्ण महाराष्ट्राला परिचित आहे. मी माझे स्वत:चे परम भाग्य समजतो की, मला त्यांच्या नेतृत्वाखाली काम करण्याची संधी मिळाली. याठिकाणी सभापती म्हणून त्यांची फेरनिवड झाली आहे, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यासाठी मी फारच लहान आहे. परंतु सभागृहाने एकमताने हा जो निर्णय घेतलेला आहे, तो महाराष्ट्राच्या राजकीय परंपरेला साजेसा आणि या राज्याच्या लौकिकामध्ये भर घालणारा असा आहे. मी त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन करतो. मला त्यांच्या नेतृत्वाखाली आणखी दोन वर्षे काम करण्याची संधी मिळणार आहे हे मी माझे परम भाग्य समजतो. तसेच याठिकाणी माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, माननीय विरोधी पक्षनेते, शिवसेनेचे गटनेते माननीय श्री.दिवाकर रावते आणि इतर सन्माननीय सदस्यांचे देखील मी मन:पूर्वक आभार मानतो आणि पुन्हा एकदा आदरणीय सभापती श्री.शिवाजीराव बापूसाहेब देशमुख यांचे अभिनंदन करुन मी माझे भाषण थोडक्यात संपवितो.

-----

यानंतर कु.गायकवाड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DVG/ MMP/ SBT/ प्रथम श्रीमती रणदिवे.. 11:40

**उपसभापती** ......

आता माननीय श्री. शिवाजीराव देशमुख यांनी सभापतीस्थान स्वीकारावे अशी मी त्यांना विनंती करतो.

( यानंतर श्री. शिवाजीराव देशमुख सभापतीस्थान स्वीकारतात. )

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2...

श्री. विलासराव देशमुख ( मुख्यमंत्री ) : या सदनाने एकमताने माननीय श्री. शिवाजीराव देशमुख यांची सभापती या पदावर फेर निवड केली आहे त्या बद्दल सदनातील सर्व सन्माननीय सदस्यांचे मी मन:पूर्वक आभार मानू इच्छितो.

सभापती महोदय, या सभागृहाची जी उच्च परंपरा आहे, त्या परंपरेचे जतन करण्याचा चांगला पायंडा या सभागृहाने पाडला आहे. त्यांची निवड होत असताना एक अतिशय चांगली गोष्ट माननीय विरोधी पक्षनेत्यांनी केली आहे. सन्माननीय विरोधीपक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर व सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सरकारने प्रस्ताव मांडण्याच्या ऐवजी विरोधी पक्षाच्या वतीने ठराव मांडला. अशाप्रकारे एक अतिशय औचित्यपूर्ण काम विरोधी पक्षाने केलेले आहे. त्याबाबत मी प्रथम माननीय गटनेत्यांचे व विरोधी पक्षातील सर्व सन्माननीय सदस्यांचे विशेष आभार मानू इच्छितो.

श्री.. शिवाजीराव देशमुख हे काँग्रेस पक्षाचे एक ज्येष्ठ नेते आहेत. विधानपरिषदेतील कामाचा अतिशय दांडगा अनुभव त्यांच्या पाठीशी आहे. माजी मुख्यमंत्री कै. वसंतदादा पाटील यांच्या तालमीत तयार झालेले ते नेते आहेत. सांगली जिल्हा हा खऱ्या अर्थाने कार्यकर्त्यांची खाण म्हणून ओळखला जातो. कृष्णा नदीच्या काठी जे जे वाढले, ज्यांनी कृष्णेचे पाणी पचविले त्यांच्यावर कोठल्याही पाण्याचा कसलाही परिणाम होत नाही. आपले कार्यक्षेत्र हे शिराळयासारखा डोंगरी व दुर्गम असा भाग आहे. त्या ठिकाणाहून आपल्या कार्याची सुरुवात झाली. त्यानंतर आपण 9 वर्षे नोकरी केली होती. त्यानंतर सार्वजनिक जीवनामध्ये आपण स्वत:ला झोकून दिले. जिल्हा परिषद, पंचायत समिती येथे काम करण्याचा आपल्याला प्रचंड दांडगा अनुभव आहे. येथे काम केल्यानंतर विधानसभेमध्ये आपले पदार्पण झाले. तेथे 4 वेळा निवडून आलात. कै. वसंतदादा पाटील यांनी गृह खात्याचे नेतृत्व पद दादांना दिले. सांगली जिल्हयाचे पालकमंत्री म्हणून देखील आपण काम केले आहे. आपला सहवास आम्हाला लाभला. आपले काम आम्ही अतिशय जवळून पाहिले आहे. काँग्रेस पक्षाचा एक भाग म्हणून आपण काम केले आहे. तसेच कॅबिनेट मंत्री म्हणून अनेक खात्यांमधील काम आपण अतिशय यशस्वीपणे केलेले आहे. अभ्यासू, कुशाग्र संघटक, मृदुभाषी व तितकेच कठोर असे त्यांच्या स्वभावाचे अनेक पैलू आपण सर्वांनी पाहिले आहेत.

यानंतर श्री. बरवड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलासराव देशमुख ......

आपल्याला दुसऱ्यांदा या सदनाचे सभापती म्हणून काम करण्याची संधी मिळत आहे. या सदनाचे कामकाज चालविणे हे अतिशय जिकिरीचे असते. कारण विरोधी पक्ष आणि सत्ताधारी पक्ष यांच्यामध्ये योग्य समन्वय साधणे आणि काम करीत असताना सर्वांना समान न्याय देणे हे अतिशय कठीण काम असते. या ठिकाणी पदोपदी निर्णय करावे लागतात. काही वेळा निर्णय आवडतात तर काही वेळा निर्णय आवडत नाहीत. काही वेळा सदनातील सन्माननीय सदस्यांचा रोष ओढवून घ्यावा लागतो. परंतु सामाजिक, ग्रामीण भागातील किंवा जनतेचे इतर जे महत्वाचे प्रश्न आहेत त्या प्रश्नांच्या बाबतीत जेव्हा सदनामध्ये विरोधकांकडून किंवा सत्ताधारी पक्षाकडून आवाज उचलला जातो तेव्हा त्याला न्याय मिळावा अशा प्रकारची भूमिका आपण वेळोवेळी घेतलेली आहे. म्हणून आपला हा सगळा अनुभव लक्षात घेतल्यानंतर या सदनाने एकमताने आपली फेरनिवड करणे याचाच अर्थ असा आहे की, आपण चार वर्षे ज्या पध्दतीने या सदनामध्ये काम केले त्या कामकाजावर शिक्कामोर्तब करण्याचे काम आपल्या फेरनिवडीने झाले असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही. आपल्या पुढच्या कारकिर्दीला मी मनापासून शुभेच्छा देतो. माननीय सभापती महोदयांनी आमच्याकडे अधिक लक्ष द्यावे अशी सत्ताधारी पक्षाला नेहमी अपेक्षा असते परंतु त्याचबरोबर विरोधी पक्षाला सुध्दा हीच अपेक्षा असते. एकदा आपण या सर्वोच्च खुर्चीवर बसल्यानंतर आपण कोणत्याही पक्षाचे नसता याची मला जाणीव आहे. म्हणून आपण ज्या खुर्चीवर बसलेला आहात त्या खुर्चीची उंची वाढविण्याचे काम तसेच यापूर्वी झालेल्या अनेक सभापतींनी जे जे आदर्श या सभागृहामध्ये घालून दिलेले आहेत त्या तोडीचे निर्णय आपल्याकडून होत राहतील आणि जनतेच्या प्रश्नाला न्याय मिळेल अशा प्रकारची अपेक्षा व्यक्त करतो आणि मनापासून आपल्या कारकिर्दीला शुभेच्छा देतो. पुन्हा एकदा मी सदनाचे आभार मानतो. धन्यवाद.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...2...

RDB/ MMP/ SBT/

श्री. पांडुरंग फुंडकर ( विधानसभेने निवडलेले ) : माननीय सभापती महोदय, आज या सभागृहाने आपली एकमताने पुन्हा एकदा सभापती म्हणून निवड केली त्याबद्दल मी माझ्या पक्षातर्फे तसेच व्यक्तिश: मनापासून आपले अभिनंदन करतो. 1978 पासून माननीय सभापती महोदयांशी माझ ा संबंध आला. 1978 मध्ये मी पहिल्यांदा महाराष्ट्र विधानसभेमध्ये निवडून आलो त्यावेळी माननीय सभापती महोदय आपणही विधानसभेमध्ये होता. अनेकदा आपण त्या काळातील आठवणी या ठिकाणी बोलून दाखवत असता. आपले पद हे सर्वोच्च पद आहे. खरे म्हणजे या ठिकाणी माननीय मुख्यमंत्र्यांनी ज्या भावना व्यक्त केलेल्या आहेत त्या भावनांशी तर मी सहमत आहेच परंतु संसदीय लोकशाहीमध्ये काही रुढी आणि परंपरा पाळावयाच्या असतात. एक जबाबदार विरोधी पक्ष म्हणून आम्ही ती भूमिका या ठिकाणी पार पाडली. पण या देशामध्ये अनेक उदाहरणे अशी आहेत की, ज्या ठिकाणी सभापती महोदय सत्ताधारी पक्षाचे असतात त्या ठिकाणी उपसभापतीपद विरोधी पक्षाला दिले जाते. महाराष्ट्रामध्ये मागील काही अपवादात्मक घटनांमुळे या ठिकाणी तशा प्रकारची स्थिती निर्माण होऊ शकली नाही. पुढील काळामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी दिलदारपणे महाराष्ट्रात ही परंपरा रुजवावी अशी मी या ठिकाणी अपेक्षा व्यक्त करतो. गेली सहा वर्षे मी या सभागृहामध्ये आहे. चार वर्षे माननीय सभापतींच्या नेतृत्वाखाली काम करण्याची संधी मला मिळाली.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

गेली 3 वर्षे मी विरोधी पक्षाचा नेता म्हणून काम केले करीत आहे. या सभागृहाचे काम करीत असताना अनेकदा काही प्रसंगावरुन सत्तारुढ व विरोधी पक्षामध्ये कटुता आली होती. त्यावेळी अत्यंत कौशल्याने ते वादंग आपण शमविले आहे. प्रसंगी आमचा राग अनावर झाल्याने तो आपल्यावर काढण्याचा प्रयत्न आमच्याकडून झाला. परंतु एवढे सर्व होऊनही एक प्रगल्भ व्यक्तिमत्व सभापतीपदी असावे अशी सर्वांनी भावना व्यक्त केली. आपल्याला गेल्या अनेक वर्षापासून सार्वजनिक जीवनाचा अनुभव आहे. सांगलीसारख्या जिल्हयातून काळया आईच्या मातीतून आपले नेतृत्व पुढे आलेले आहे. कै.वसंतदादा पाटील यांच्या नेतृत्वाखाली हे नेतृत्व घडलेले आहे, त्यामुळे अशी अनुभवी व्यक्ती या पदावर असावयास पाहिजे या प्रकारची भावना आमची निश्चितपणे होती. माननीय सभापतींनी वेळ प्रसंगी सत्तारुढ पक्षाला झुकते माप दिले आहे तसेच सन्माननीय मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांना मी सांगू इच्छितो की, विरोधी पक्षाने मांडलेल्या प्रश्नालाही काही प्रसंगी झुकते माप दिले आहे. त्याचे मी उदाहरण सांगेन. झुणका-भाकर केंद्रासंबंधी मंत्रिमंडळाचा निर्णय झाला. त्यानंतर झुणका-भाकर केंद्राचा प्रश्न सभागृहात उपस्थित केला त्यावेळी माननीय सभापतींनी हस्तक्षेप करुन तो निर्णय थांबविण्यास सांगितला आणि तसा आदेशही त्या खूर्चीवरुन दिला. शेतक-यांच्या आत्महत्यांसंबंधीचा प्रश्न असो किंवा शेतक-यांचा कोणताही प्रश्न असो या प्रश्नासंबंधी आपण त्या खूर्चीवरुन न्याय देण्याचा प्रयत्न केल्याचे आम्ही अनुभवले आहे. एखाद्यावेळी आमच्यामुळे आपले मन दुखावले गेले असेल पण ते प्रसंगानुरुप होते. त्या वेळेपुरते ते मर्यादित होते. असे असूनही एक चांगली परंपरा महाराष्ट्रामध्ये पडावी आणि संपूर्ण देशात तसा संदेश जावा या उद्देशाने आम्हाला यासंबंधीचा प्रस्ताव मांडावयाचा आहे, त्याला आपण मान्यता द्यावी अशी मी माननीय उपसभापतींना विनंती केली. त्यांनी देखील ती तेवढया दिलदारपणाने मान्य केली. त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. आमचे उपसभापती म्हणण्यापेक्षा आपल्या सर्वांचे माननीय उपसभापती हे किती दिलदार आहेत मी सांगण्याची आवश्यकता आहे असे वाटत नाही. माननीय उपसभापती महोदय हे दिलदार व्यक्तिमत्व असल्याचे मी आणि ते एका जाहीरसभेमध्ये असतानाच मान्य केले आहे. माननीय सभापतींना पुढील कारकिर्दीसाठी शुभेच्छा

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

देतो, ते दोन्ही बाजूला सारखाच न्याय देतील. एखाद्या न्यायमूर्तींप्रमाणे योग्य तो न्याय त्या पदावरुन देतील अशी अपेक्षा व्यक्त करतो. या सभागृहाला अनेक महान व्यक्ती सभापती म्हणून लाभल्या आहेत. कै.जयंतराव टिळक यांचे आगळे वेगळे व्यक्तिमत्व होते. त्यांनी या पदावर विराजमान होऊन काम केलेले आहे. त्याच परंपरा पुढे चालू राहतील अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि पुन्हा एकदा शुभेच्छा देतो आणि माझे वक्तव्य संपवितो.

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MMP/

श्री.आर.आर.पाटील (उपमुख्यमंत्री) : सभापती महोदय, आपली या सदनाच्या सर्वोच्चपदावर बिनविरोध निवड झाली त्याबद्दल सदनाच्यावतीने अंत:करणापासून अभिनंदन करतो. मी सुरुवातीलाच सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर आणि शिवसेना पक्षाचे गट नेते सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना मनापासून धन्यवाद देतो. या सदनाला आजपर्यंतची ज्येष्ठ आणि श्रेष्ठ परंपरा आहे. त्यामध्ये बिनविरोध निवडीने किंबहुना, सूचक पध्दतीने आपली निवड करुन या परंपरेत अधिक चांगली भर पाडण्याचे काम या सदनामध्ये झाले आहे. देशभरामध्ये संसदीय प्रणाली स्वीकारली आणि विधानपरिषदा असाव्यात की नसाव्यात याबद्दल काही वादही झाले आहेत.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MMP/ MMP/ SBT/ पूर्वी श्री. खंदारे 11:55

(श्री. आर.आर.पाटील...

मधल्या सात वर्षाच्या काळात पुलाखालून बरेच पाणी गेले. देशातील विधानपरिषदांनी आपले महत्व आणि आपले अस्तित्व किती आवश्यक आहे हे सिध्द केले. सभापती महोदय, ज्या राज्यांनी विधानपरिषदा बरखास्त केल्या होत्या त्यांनी सुध्दा या संस्था अत्यंत आवश्यक आहेत ही भूमिका अलिकडच्या काळामध्ये मान्य केली आहे. या सदनामध्ये विविध क्षेत्रातील तज्ज्ञ यावेत, शासनाला त्यांनी मार्गदर्श करावे, चांगले कार्य करण्यासाठी आपल्या अनुभवाचा, विविध क्षेत्रातील माहितीचा उपयोग व्हावा म्हणून या सदनाकडून अपेक्षा व्यक्त केल्या जातात. मला आणखी एका गोष्टीचा विशेष आनंद आहे की, आपण सांगली जिल्हयातील आहात. सांगली जिल्हयातील एक स्वातंत्र्य सैनिक वि.स.पागेसाहेब सलग 18 वर्षे या सर्वोच्च स्थानावर होते. आपले सर्व व्यक्तिमत्व वसंतदादा पाटील, वि.स. पागेसाहेब यांच्या सान्निध्यामध्ये घडले.

सभापती महोदय, आपल्या समाजिक आणि राजकीय जीवनाची सुरुवात आपल्या शिक्षणानंतर तासगाव तालुक्यातून आपण एक्स्टेन्शन ऑफिसर म्हणून सुरु केली. आजही जुन्या पिढीतील कार्यकर्ते तासगावमध्ये आपण केलेल्या कामाच्या आठवणी सांगतात. ही सर्व कामे करीत असताना कै. वसंतदादा पाटील यांच्या बरोबर आलेला संपर्क, सांगली जिल्हयातील राजकारणाला असलेले एक अभूतपूर्व महत्व, सर्व वाळवा-शिराळा तालुका स्वातंत्र्याच्या आंदोलनामध्ये तावूनसुलाखून निघालेला, त्यामध्ये आपल्या सारख्या व्यक्तीचे राजकारणामध्ये येणे हे निश्चितच स्वाभाविक होते. जिल्हा परिषदेचा सदस्य म्हणून, सभापती म्हणून नंतर आमदार म्हणून आपण निश्चितपणे चांगली कामगिरी केली. त्याचबरोबर अलिकडच्या काळामध्ये दुरापास्त होत चाललेली निष्ठा ही काय असू शकते हे कै. वसंतदादा पाटील यांच्या काळामध्ये आपण दाखवून दिले. एकदा कै. वसंतदादा पाटील हे सुध्दा आपल्याला विधानसभेचे तिकीट देऊ शकले नव्हते. अपक्ष म्हणून निवडून आल्यानंतर, शिराळा-वाळवा जनतेने बहुमताने आपल्याला विजयी केल्यानंतर निकाल लागण्यापूर्वीच मी विजयी झालो तरी वसंतदादांचाच आणि पराभूत झालो तरीही वसंतदादांचाच आणि कॉंग्रेस पक्षाचाच हे निवडणुकीपूर्वी आपण घोषित केले. अलिकडच्या काळामध्ये अपक्ष म्हणून निवडून आल्यानंतर वाटाघाटी सुरु होतात. पण त्या वाटाघाटी आपण

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. आर.आर.पाटील....)

केल्या नव्हत्या. निष्ठा काय असते हे आपण दाखवून दिले. अनेक वेळा कै. वसंतदादा पाटील यांच्या जीवनामध्ये चढउतार आले असताना आपण त्यांना निष्ठेने आणि तहहयात साथ केली. कै.वसंतदादा पाटील यांनी आपणास अनेक संधी दिल्या. अनेक खात्यांची मंत्रीपदे आपण भूषविलीत. मिळालेल्या त्या संधीचे आपण सोने केले. काही वेळा सत्तेमुळे आणि खुर्चीमुळे माणसे मोठी होतात तर काही माणसे त्या बसलेल्या खुर्चीला मोठे करण्याचे काम करीत असतात. आपणाला ज्या ज्या संधी मिळाल्या त्या संधीला मोठे करण्याचे काम केले. सांगली जिल्ह्यामध्येच नव्हेतर महाराष्ट्राच्या राजकारणामध्येही एक शांत, संयमी, अभ्यासू नेतृत्व म्हणून आपले महत्व अनन्यसाधारण आहे. आपल्या बद्दल माझ्या मनामध्ये आणि एकूणच सगळया सदनाच्या मनामध्ये आदराची भावना आहे. पण माझ्या मनामध्ये आदराची भावना असण्याचे आणखी एक कारण असे की, 1989 साली वसंतदादा पाटील यांच्या निधनानंतर सांगली जिल्ह्यामध्ये अनेक कार्यकर्ते खऱ्या अर्थाने पोरके झाले होते. आता राजकारणामध्ये भवितव्य काय असे प्रश्न माझ्यापासून अनेकांना पडले होते. विधानसभेमध्ये येण्याची पहिली संधी देण्यामध्ये आपले खूप मोठे योगदान आहे. किंबहुना ती संधी आपण दिली नसती तर आज ज्या गोष्टी मला मिळाल्या त्या माझ्या भाग्यामध्ये आल्या नसत्या. माझ्या जडणघडणीमध्ये मला श्री. शरद पवारसाहेबांपर्यन्त नेण्यामध्ये आपला मोलाचा वाटा होता.हे आपले ऋण माझ्यावर आहेत. थोडेसे राजकीय मतभेद झाले तरी सुध्दा हे ऋण मी नेहमीच मान्य केलेले आहेत.

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

ABG/ SBT/ MMP/ MMP/ SBT/ प्रथम श्री. शिगम 12:00

श्री.आर.आर.पाटील...

या सदनात आपली पहिल्यांदा सभापतीपदी बिनविरोध निवड झाली. आपण सभापतीस्थानी आसनस्थ झाल्यानंतरचा मागील चार वर्षाचा कार्यकाल संपूर्ण सदनाने बघितला आहे. एक गोष्ट स्वाभाविक आहे की, सदनातील दोन्ही बाजूच्या सदस्यांच्या जास्तीच्या अपेक्षा पूर्ण करणे डायसवरुन शक्य होत नाही. परंतु कोणत्याही वादात न येता सगळया सदनाला न्याय दिला पाहिजे आणि सदनाला न्याय देताना महाराष्ट्रातील गावागावातील विविध जाती धर्माच्या, विविध वर्गाच्या लोकांना न्याय दिला पाहिजे अशी भूमिका आपण निश्चितच ठेवली आहे. आपल्या मार्गदर्शनाखाली अत्यंत उच्च दर्जाचे काम या सदनाने केले आहे. मला निश्चितपणे खात्री आहे की, आपली बिरविरोध निवड झाल्यानंतर, आपल्या अनुभवसंपन्नतेचा फायदा सदनाला होईल. त्याचा फायदा शासनाला होईल, पर्यायाने जनतेला सुध्दा होईल. आपल्याला चांगले आरोग्य लाभावे, आपली कारकिर्द उत्कृष्ट आणि यशस्वी व्हावी आणि महाराष्ट्राच्या संसदीय जीवनाचा दर्जा आपल्या हातून उंच व्हावा यासाठी मनापासून शुभेच्छा देतो. पुन्हा एकदा सन्माननीय विरोधी पक्षाच्या सदस्यांना मनापासून धन्यवाद देऊन आपले अभिनंदन करतो. जयहिंद. जय महाराष्ट्र.

--------

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले): सभापती महोदय, आपण पुन:श्च आपल्या आसनावर स्थानापन्न झालेले पाहतांना आम्हाला खूप आनंद झालेला आहे. आपल्याला मी मनापासून शुभेच्छा देण्यासाठी मी उभा आहे. सभागृहाच्या नेत्यांनी आपण बिनविरोध निवडून आल्याबद्दल शुभेच्छा दिल्या. हा प्रस्ताव आम्ही प्रथमत: मांडून आमच्या मनामध्ये असलेल्या आपल्याबद्दल असलेल्या आदराला त्यांनी थोडीशी ठेच पोहोचविली. सभापतीपदी आपली निवड एकमताने झालेली आहे. बिनविरोध मध्ये "विरोध" हा शब्द आहे तो शब्द आम्हाला मंजूर नाही. आमच्या सदनाचे तुम्ही एकमताने निवडून आलेले आमचे सभापती आहात अशी आमची भावना आहे. माझ्या मनात आपल्याबद्दल असलेल्या भावना मी नेहमी व्यक्त करीत आलेलो आहे. त्या भावना तशाच जपून ठेवलेल्या आहेत. विदर्भातील शेतक-यांच्या आत्महत्या होत असताना व ही बाब मला असहय झाल्यानंतर मी आपल्या दालनात आलो आणि आपणाला सांगितले की, अधिवेशन सुरु झाल्यानंतर मला रोज एक मिनिटांचा वेळ देत चला. आम्ही मरणा-या शेतक-यांकरिता काही करीत नाही. या सभागृहातील सदस्यांचे निधन झाल्यानंतर सभागृहात शोकप्रस्ताव मांडल्यानंतर भावना व्यक्त केल्या जातात. परंतु ज्या शेतकरी बांधवांनी या सदनात आम्हाला निवडून पाठविलेले आहे. त्यांना या सभागृहात येऊन आपल्या भावना व्यक्त करण्याची संधी मिळत नाही. म्हणून त्यांच्याविषयी भावना व्यक्त करण्यासाठी मला सुरुवातील एका मिनिटांचा वेळ द्या. तो वेळ आपण दिला आणि मी सतत 27 दिवस आत्महत्या केलेल्या शेतक-यांचा भावना सभागृहात मांडत होतो. आत्महत्या केलेल्या शेतक-यांना आदरांजली आपल्या सद्‌भावनेमुळे दिली गेली. त्या गोष्टीचे मला फार मोठे समाधान आहे. मी नम्रपणे सांगू इच्छितो की, इतर वेळेस मी आक्रमक असतो, कधी कधी मी आक्रस्ताळेपणा देखील करीत होतो. शेतक-यांच्या प्रश्नावर आग्रह धरल्यानंतर मात्र आपण कधीही तडजोड करु दिली नाही. या प्रश्नाच्या बाबतीत सरकारला देखील कधीही तडजोड करुन दिली नाही. आपण पुढाकार घेऊन शेतक-यांबद्दल भावना व्यक्त करण्याकरिता या सभागृहाला नेहमीच मान्यता दिली तो आदर फार मोलाचा आहे. तो आदर फार मोलाचा आहे. आपला संस्कार सांगणारा आहे. माननीय मुख्यमंत्री म्हणाले की, कृष्णेचे पाणी ज्यांनी घेतले आहे, त्यांना काहीच बाधत नाही. आपण गोदावरी तिरातील माणसे आहोत. त्याच सद्‌भावनेने कृष्णेचे पाणी आमच्या गोदावरीत मिसळण्याकरिता 56 टी.एम.सी.पाणी द्यावे म्हणून मागणी करीत आहोत. त्यासाठी टाहो

3....



ABG/ SBT/ MMP/ MMP/ SBT/ प्रथम श्री. शिगम 12:00

श्री. दिवाकर रावते...

फोडला जातो आहे. परंतु ते पवित्र पाणी आमच्याकडे येऊ शकत नाही ही व्यथा सुध्दा आहे. पण मला एक गोष्ट अशीही कळून आली की, आपण त्यावेळी राज्यमंत्री झाला होतात. परंतु आताचे मंत्री प्रत्येक गोष्टीत हट्ट धरतात. मी ज्या जिल्हयाचा आहे, त्याच जिल्हयाचे पालक मंत्रीपद मला दिले जावे. कारण त्या ठिकाणचे अधिराज्य माझ्या हातात असले पाहिजे. पूर्वी अदलाबदल व्हावयाची. ज्या जिल्हयातील मंत्री असेल त्याना दुस-या जिल्हयाचे पालक मंत्रीपद देण्यात येत असे. परंतु ही प्रथा आता हट्टापायी बदलली आहे. आमचे माननीय मुख्यमंत्री कृष्णा नदीच्या जिल्हयातील पालक मंत्री झाल्यामुळे पर्यायाने कृष्णा नदीचे पाणी प्यायल्यामुळे त्यांना गेली अनेक महिने काहीही बाधा पोहोचलेली नाही. माननीय मुख्यमंत्र्यांच्या व्यक्तीमत्वामध्ये काय काय दडले आहे आणि काय काय घडले आहे हे आम्हाला या माध्यमातून समजल्यामुळे आम्हाला फार बरे वाटले....

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

SSK/ MMP/ SBT/ 12:05

श्री. दिवाकर रावते....

सभापती महोदय, आम्ही मनापासून आणि प्रेमाने आजचा हा प्रस्ताव मांडलेला आहे. आमच्या भावना दोन आहेत. भाऊंनी त्या मांडलेल्या आहेत. लोकशाही पध्दतीमध्ये संपूर्ण देशामध्ये सभापतींची निवडणूक ही सन्माननीय असते . त्या पदावर पोहोचल्यानंतर त्या व्यक्तिमत्वाकरिता ते इतके आदरणीय असते आणि नि:पक्षपाती असते म्हणून त्याकरिता निवडणूक होता कामा नये. त्याचवेळी उपसभापतीपद किंवा उपाध्यक्ष पद हे विरोधी पक्षाला दिले जाते. परंतु आम्ही हात दाखवून अवलक्षण केलेले असल्यामुळे आणि आमच्यावर हे सगळे ओढवून घेतले असल्यामुळे आमची खंत कशी व्यक्त करणार. पण भविष्यात असे व्हावे अशी आशा व्यक्त केलेली आहे. पण आमच्या उपसभापतींनी आपले अभिनंदन करताना असे सांगितले की भविष्यात आणखी 2/3 वर्षे आपल्या सहवासात जाणार आहेत त्यामुळे मला आनंद होत आहे त्यामुळे तोही प्रश्न निर्माण झालेला आहे. लोकशाही संकेतानुसार विरोधी पक्षात बसलो असताना ते संकेत सांभाळायचे असतात आणि पाळायचे असतात.ते आपल्यामुळे सदनाच्या माध्यमातून करता आले याबद्दलही आम्हांला आनंद होत आहे. प्रा.फरांदे सर यांना आम्ही पाहिले आणि आता आपल्या नेतृत्वाखाली आम्ही येथे बसलो आहोत. संघर्ष असतात ते विषयाचे असतात आणि त्या वेळेपुरते असतात. व्यक्तिगत म्हणून मला आपण पितृतुल्य आहात याची जाणीव आपल्याला आहे.सभापती म्हणून येथे बसला असताना आमच्या अपेक्षा असतात त्या पूर्ण होत नाहीत तेव्हा संघर्ष होतो. काल झाला असेल, आज असेल आणि उद्याही होईल तो टळणार नाही. फक्त एकच अपेक्षा आहे की, मागील वेळी आपण श्री. गडकरी साहेब बोलले की तुमचे फार लक्ष उजवीकडे असते डावीकडे पहात जा त्यावेळी आपण असे म्हणाला होता की, मी डावीकडे आणि उजवीकडेही पहात नाही मी समोर पाहतो. यावेळेला थोडे डावीकडेही बघा. उजव्या बाजूकडे सत्तेचे सामर्थ्य आहे. जसे झुणका-भाकरच्या संदर्भात निर्णय देताना पाहिले. अशा अनेक गोष्टी आहेत. म्हणून मी आपल्या नेतृत्वाखाली काम करीत असताना निष्ठेचा विषय उपमुख्यमंत्र्यांनी सांगितला तो फार मोलाचा आहे. कै.वसंतदादांवर असलेल्या निष्ठा व्यक्त करण्याबाबत आपण उदाहरण दिले. त्या आम्हांला माहीत असल्या तर प्रश्न नव्हता. पण डॉ. पतंगराव कदम याठिकाणी पाहिजे होते ते सांगलीचे आहेत.मी पडलो तरी आणि विजयी झालो तरी दादांचा असेन असे आपण म्हणाला होता. हे संस्कार असतात. राजकीय संस्कार ज्या मातीने आपल्याला दिले त्या संस्कारातील हे पैलू आम्हीही पाहिला. आपण

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

श्री. संजय पाटील यांना विधानपरिषदेमध्ये आणून संघर्ष कसा म्यान केला तेही पाहिले आहे. श्री. संजय पाटील यांचे मनापासून स्वागत करतो. असो तो राजकीय वारसा आहे. यशवंतरावाचा असेल किंवा दादांचा असेल तो मी माझ्या व्यक्तिगत बोलण्यात नेहमी व्यक्त करीत आलो आहे. आमच्यावर तुम्ही विरोधी पक्ष म्हणून वडीलकीच्या नात्याने माया करावी. सभापती म्हणून आपण निश्चितप्रकारे योग्य तो न्याय द्याल याबद्दल शंकाच नाही. समोर थोडे बघण्यापेक्षा थोडेसे डावे उजवे करावे एवढीच एक अपेक्षा व्यक्त करतो. मनापासून शुभेच्छा देतो. राजकारणातील आपला गाढा अनुभव इतक्या वर्षातील या क्षेत्रातील अनुभवातून आम्हांला देखील जीवनात काही शिकायला मिळेल अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि पुन्हा एकदा माझ्या वतीने आणि माझ्या पक्षाच्या वतीने आपले अभिनंदन करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

धन्यवाद.

जयहिंद, जमहाराष्ट्र.

-----

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, आपले मनापासून अभिनंदन करण्यासाठी मी उभा आहे. विरोधी पक्षांनी एकमताने हा प्रस्ताव मान्य केलेला आहे. महाराष्ट्रातील लोकशाही ही हिंदुस्थानच्या तुलनेत विचार केला तर अत्यंत प्रगल्भ आणि अत्यंत विचारी अशी लोकशाही आहे. आपल्या निवडीचा ठराव विरोधी पक्षनेते मांडतात हा आपल्या आयुष्यातील सर्वात आनंदाचा क्षण असेल. सत्ताधारी पक्ष नव्हे तर विरोधी पक्ष म्हणतो आहे की, आपण सभापती व्हावे म्हणून अत्यंत आनंदाचा क्षण आहे आणि  या क्षणामध्ये आम्हीही सहभागी होत आहोत. आपण 1974 आपण  काम करीत आहात. आपण सुरुवातील सरकारी नोकरी केली म्हणजे विस्तार अधिकारी म्हणून काम करीत होता. पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेच्या माध्यमातून देखील आपण काम केले आहे. 1978 पासून 1995 पर्यंत आपण विधानसभेचे सदस्य होता. त्यानंतर वेगवेगळया खात्याचे मंत्री म्हणून देखील आपण काम केले आहे. विशेषतः कृषी, ग्रामीण विकास आणि सार्वजनिक बांधकाम ही खाती आपण यशस्वीपणे सांभाळली आहेत.सरकारमध्ये मंत्री असताना खाती सांभाळावी लागतात आणि विधानसभेचा अध्यक्ष किंवा विधानपरिषदेचा सभापती म्हणून काम करीत असताना माणसे सांभाळावी लागतात.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी.......

ही माणसे सांभाळणे फार कठीण आहे. सभापती महोदय, मी देखील अशाच पध्दतीने मागील 5 वर्षाच्या काळात विधानसभेमध्ये पीठासीन अधिकारी म्हणून काम करीत असताना ही खुर्ची खाली बसलेल्यांना जितकी आनंददायी वाटते तितकी खुर्चीवर बसलेल्यांना समाधानकारक वाटत नाही हे अनुभवले आहे. या खुर्चीला देखील शॉक बसतात, चटके बसतात. त्या खुर्चीवर बसणाऱ्या माणसाची काही वेळेला परिस्थिती अडकित्त्यात आणि सुपात अशी देखील असते. इतका वरच्या बाजूने आणि खालच्या बाजूने दबाव असतो. परंतु आपली न्यायबुध्दी महत्वाची आहे. ती न्यायबुध्दी आपण सांभाळली, त्याचेच रुपांतर याठिकाणी दिसून येते. म्हणूनच सर्वांनी एकत्रित येऊन आपली याठिकाणी बिनविरोध निवड केली. याचा लाभ निश्चितपणे महाराष्ट्रातील जनतेला होईल. मी स्पीकर असताना ज्यावेळी परदेशात एका स्पीकरच्या दालनात बसलो होतो, त्या स्पीकर महोदयांनी ते ज्या खुर्चीवर बसत होते त्या खुर्चीच्या मागच्या बाजूला भिंतीवर लिहून ठेवले होते. 'I have no freinds, I have no enemies'. मला कोणीही शत्रू नाही आणि मला कोणी मित्रही नाही. त्यामुळे आपण या खुर्चीवर बसत असताना सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सांगितले की, थोडे डावीकडे बघा. मी उजव्या बाजूला बसत असल्यामुळे मी सांगेन थोडे उजवीकडे लक्ष द्यावे. सभापती महोदयांच्या दृष्टीने उजवी आणि डावी बाजू नसते. त्यांना दिसते ते फक्त न्याय कसा देता येईल? न्यायाची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. मागील काळात आपण हे काम केले आहे. पुढच्या काळात आपल्याकडून हीच अपेक्षा आहे. अत्यंत प्रसन्न, सुंदर आणि शालिन, सर्वांना सोबत घेऊन जाणारे व्यक्तिमत्व महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सभापतीपदी पुन्हा विराजमान झाल्याबद्दल आनंद व्यक्त करुन पुनश्च अभिनंदन करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख (अमरावती विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सभापती या नात्याने लागोपाठ दुसऱ्या वेळेला एकमताने निवड झाल्याबद्दल मनापासून आपले अभिनंदन करण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे. खरे म्हणजे आपली निवड जाहीर केल्यानंतर माननीय मुख्यमंत्री आणि माननीय विरोधी पक्षनेते यांनी आपल्याला त्या आसनापर्यंत नेऊन बसविले. खरी पध्दतच अशी आहे की, या दोघांनी आपल्याला उचलून तेथपर्यंत न्यायचे. पुढे पुढे व्यावहारिकदृष्ट्या कठीण होत असल्यामुळे ती पध्दत बंद होत गेली. मूळ पध्दत अशीच आहे. उचलून न्यायचे काम करायला माणसे तयार होत नसत. याचे कारण त्या कामाचा जो इतिहास आहे, विशेषत: ब्रिटिश पार्लमेंटला जगातील संसदेची जननी म्हटले जाते. तेथे दोन्ही बाजूकडील संघर्ष हा प्रश्न नव्हता. हा प्रश्न बऱ्याच उशिरा आला. सत्ताधारी आणि विरोधी पक्ष यांच्यामधील संघर्ष हा त्यावेळी प्रश्न नव्हता. त्यावेळी प्रश्न काय होता? राजाच्या जवळची सत्ता खेचून लोकांच्या प्रतिनिधींमध्ये आणायची असा तो संघर्ष होता. हाऊस ऑफ कॉमन्सच्या 5 सदस्यांचे कॉमन्सवर नियंत्रण असले पाहिजे अशा प्रकारची जाहीर भूमिका पार्लमेंटमध्ये घेतल्यानंतर राजा लवाजम्यानिशी आला आणि ते पाच लोक कुठे आहेत ते दाखवा. त्या पाच लोकांना सभागृहाने संरक्षण दिले. त्यावेळेला सभापतींनी त्यांना असे सांगितले की, राजेसाहेब, मला पहावयास डोळे नाहीत आणि मला बोलायला तोंड नाही. सभागृह जे बोलेल तेच मी बोलेन. सभागृह पाहिल तेच मी पाहणार आहे. सभापतींची भूमिका कठीण कठीण होत गेली. राजाच्या हातून पर्स काढून घेणे कठीण होते. एक वेळ माणसाच्या हातून पर्स काढून घेता येईल. परंतु राजाची पर्स खालसा करण्याची भूमिका इतिहासामध्ये बजावावी लागली. त्यामुळे सभापती होण्यास कोणी माणूस तयार होत नसत. म्हणून दोघेजण ते नाही नाही म्हणत असताना त्यांना उचलून नेऊन सभापतीपदी बसविण्यात येत असे. या पार्लमेंटच्या रेकॉर्डमध्ये नोंदविलेल्या गोष्टी आहेत. ते नाही नाही म्हणत आणि हे उचलून तेथे नेऊन बसवित असत. पुढे पुढे राजाचा त्रास कमी झाला आणि एकमेकांचा त्रास सुरु झाला. हे सत्तेच्या मागचे आकर्षण आहे. त्यामुळे ती भूमिका नाही म्हटले तरी कठीण राहिली.

(नंतर श्री.जुन्नरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख ...

पण हळू हळू उचलून नेण्यापासून ते आसनापर्यंत पोहचवण्यापर्यंत यामध्ये बदल झाला.

सभापती महोदय, आपली एक मताने निवड झाल्यामुळे मला फार आनंद झालेला आहे. माननीय अरुणभाई गुजराथी यांना स्वतःचा अनुभव असल्यामुळे लोकशाहीमध्ये सभापती म्हणून काम करतांना कोणकोणत्या प्रसंगाना सामोरे जावे लागते याबद्दल त्यांनी वर्णन केलेले आहे. सभापतीपदी बसून दोन्ही बाजूला समतोल कायम ठेवणे हे फार जिकीरीचे काम आहे खरे म्हणजे ही एक पार्लमेंटरी कसरत आहे. मला गेल्या पाच-सहा वर्षापासून जो अनुभव आलेला आहे त्यातील एका बाबीचा मला उल्लेख केला पाहिजे की, संसदीय आयुधे वाया जाऊ नये यासाठी आपण फार काळजी घेतलेली आहे. अनेकदा सार्वजनिक प्रश्नावर विरोधी पक्षाच्या वतीने संघर्ष होतो, गोंधळ होतो आणि सभागृहाचे कामकाज बंद पडते. यापूर्वी असे व्हायचे की, गोंधळामुळे सभागृहाचे कामकाज बंद पडले की, कामकाज पत्रिकेमध्ये दाखवण्यात आलेली अर्धातास चर्चा, लक्षवेधी सूचना, 93 च्या सूचना गोंधळामध्ये लॅप्स होत असत. त्यावेळेस आपण उपस्थित केलेली चर्चा गोंधळामुळे लॅप्स होत असे अशी पूवी पध्दत होती. आपण एवढया मेहनतीने लक्षवेधी, अर्धा तास चर्चा लावली परंतु गोंधळामुळे लॅप्स झाल्यामुळे मला सुध्दा खुप दुःख होत असे. तसेच सदस्यांनाही फार वाईट वाटत असे. त्यावेळी आम्ही काही सदस्यांनी यातून मार्ग काढला होता. त्यावेळेस आम्ही माननीय टिळक साहेब आणि फरांदे साहेबांना भेटून सांगायचो की, आमचा गोधंळात काही सुध्दा संबंध नव्हता त्यामुळे आमचे प्रश्न का लॅप्स करता? त्यावेळी आम्हाला स्पेशल कन्सेशन दिले जात असे. आता संसदीय आयुधाचा वापर करणा-या सदस्यांच्या भावनाची आपण नोंद घेऊन गोंधळ झाला तरी कामकाज लॅप्स करीत नाही त्यामुळे आम्हाला आपला फार आधार आहे. अशा कामांच्या संदर्भात जादा सिटींग घेऊन एक दोन तासात आपल्याला अर्धा तास चर्चा पूर्ण करतात येतात. परंतु आपण या ठिकाणी सभापती म्हणून आल्यापासून खरे म्हणजे आपण सदस्य म्हणून या सभागृहामध्ये बरीच वर्षे काम केलेले असल्यामुळे, ज्यावेळेस अशा प्रकारे गोंधळ होतो त्यावेळेस आपण कामकाज लॅप्स न करता नंतर का होईना आमचे विषय चर्चेला घेतात ते एक आपण चांगले काम केलेले आहे. मला अजून एका गोष्टीचा उल्लेख करावयाचा आहे की, अनुशेषाच्या संदर्भात सदस्य म्हणून या सभागृहात जी भूमिका घेतली होती तीच भूमिका आपण त्या

...2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख ...

पदावरुन सुध्दा कायम ठेवलेली आहे. सर्व भागांचा काही सारखा विकास तोळा-मासाने होत नसतो परंतु हा असमतोल मोठया प्रमाणात वाढणे महाराष्ट्राच्या हिताचे नाही अशा प्रकारची भूमिका मानणारा मी मनुष्य आहे असे आपण त्यावेळेस सांगितले होते. आपण सदस्य म्हणून अनुशेषाच्या संदर्भात जे भाषण केले होते त्याची प्रत माझ्याकडे आहे व सभापती झाल्यानंतर सुध्दा आपण या प्रश्नाला न्याय दिलेला आहे. मला आठवते की, 5 कोटी रुपयांच्या संदर्भात जो शासन निर्णय निघाला होता त्याबाबत आम्ही आग्रह धरला होता की, 1974 पासून जी व्यवस्था चालू आहे ती व्यवस्था 2005 मध्ये बदलवणे हे काही बरोबर नाही. त्यावेळेस आपण सभागृह तहकूब केले होते. या विषयाच्या दालनात आपल्या दालनात बैठक बोलावली. दालनातील बैठकीमध्ये माननीय आर.आर.पाटील तसेच डॉ सुनील देशमुख हे सुध्दा उपस्थित होते. आपण त्यावेळेस सांगितले होते की, ही गोष्ट मला बरोबर वाटत नाही. कायदा असतांना असे करणे बरोबर नाही. त्यावेळेस आबा म्हणाले की, मी या विषयाच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्रीमहोदयांचा सल्ला घेतो व सभागृह सुरु झाल्यानंतर हा जीआर रद्द करु असे सांगण्यात आले. आपण ज्या तळमळीने हा प्रश्न मार्गी लावला त्याबद्दल मला फार आनंद वाटला. सभापती महोदय, आपण अनुशेषाच्या संदर्भात सभापतीस्थानाहून जी भूमिका घेतली, जो न्याय दिला त्याबद्दल मी आपला आभारी आहे.

सभापती महोदय, मला एका गोष्टीचा अजून एकदा उल्लेख केला पाहिजे की, ज्यावेळेला आपण मंत्रिमंडळामध्ये होता त्यावेळी अनुशेषाविषयी तत्कालीन मुख्यमंत्री कै. वसंतदादा पाटील यांचे ठाम मत होते की, अनुशेषाबद्दल ज्याला वाटेल तसे बोलणे योग्य नाही. त्यावेळी त्यांनी अनुशेषाच्या संदर्भात तंज्ञाची समिती नेमली व राज्याचा सरासरी विकास किती झाला, कोण मागे आहे, कोण पुढे आहे याची शहानिशा करुन त्यावर उपाययोजना करु असे सांगितले व त्यासंदर्भात दांडेकर समितीची नियुक्ती करण्यात आली. दांडेकर समितीचा रिपोर्ट आल्यानंतर दोन्ही सभागृहात ठराव मांडला गेला त्या चर्चेमध्ये आम्हा काही सदस्यांना आपण सहभागी करुन घेतले होते. त्यावेळी दोन्ही सभागृहामध्ये एकमताने ठराव करुन राष्ट्रपती महोदयांना आपण विनंती केली. अनुशेषाच्या संदर्भात आपण मनापासून सहभागी होता. अनुशेषाच्या प्रश्नाला आपण जो न्याय दिला त्याबद्दल मी मनापासून अभिनंदन करतो आणि माझे दोन शब्द संपवतो. -----

--------

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ MMP/ SBT/ 12=20

श्री.हर्षवर्धन पाटील ( संसदीय कार्य मंत्री ) :सभापती महोदय, विधान परिषदेच्या सभापती पदी आज आपली निवड झाल्याबद्दल सर्व प्रथम मी आपले मनापासून अभिनंदन करतो. लोकशाही पध्दतीने व सर्वांच्या संमतीने सभापती पदी आपली निवड झाल्याबद्दल सर्व प्रथम विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर तसेच गट नेते सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते या सदनातील सर्व पक्षाचे प्रमुख आणि पक्ष प्रतोद यांचे मी संसदीय कार्य मत्री म्हणून आभार मानतो.

सभापती महोदय, मला एका गोष्टीची आठवण होते की 1991 साली आपण महाराष्ट्र प्रदेश कॉग्रेस कमिटीचे अध्यक्ष असतांना मला प्रथम जिल्हा परिषदेचे तिकीट आपल्या मार्फतच मिळाले होते. या गोष्टीची आठवण या निमित्ताने मला होणे स्वाभाविक आहे. सभापती महोदय, सांगली जिल्हयाचे वैशिष्टय असे आहे की ,कै. वि.स.पागे यांनी 18 वर्षे या सभागृहाचे सभापती म्हणून काम केले होते, त्या नंतर कै. जयंतराव टिळक यांनी या सभागृहाचे सभापती म्हणून 16 वर्षे काम केले होते, त्याचप्रमाणे कै. मंगलदास पकवास यांनी 1937 ते 1947 अशा प्रकारे दहा वर्षे सभागृहाचे सभापती म्हणून काम केलेले आहे. त्याचप्रमाणे आपली सभागृहाच्या सभापतीपदी दुस-यांदा निवड होणे ही अभिमानाची गोष्ट आहे. कै.वि.स. पागे हे 18 वर्षे सभापती होते आणि त्यांनी 18 वर्षे सभागृहाच्या सभापती पदाची परंपरा चालवली होती या सभागृहाचे सभापती म्हणून आपली देखील कारकिर्द त्याच प्रमाणे व्हावी अशी अपेक्षा जर मी व्यक्त केली तर ते चुकीचे ठरणार नाही.

सभापती महोदय, दिनांक 25.4.2014 पर्यंत आपली मुदत राहणार आहे. राजकारणामध्ये समाजकारणामध्ये आता कोॲलिशन कल्चर आहे. सत्ताधारी आणि विरोधी पक्षामध्ये सुध्दा कोॲलिशन कल्चर आहे. त्यामुळे सभागृहाचे कामकाज सभापती म्हणून काम चालविणे किती अवघड आहे याची मला कल्पना आहे. गेल्या तीन साडेतीन वर्षापासून संसदीय कार्य मंत्री म्हणून मी काम करीत असून दिवसातून अनेक वेळा आपल्या बरोबर दालनामध्ये चर्चा करण्याचा योग येतो.त्याचबरोबर अनेक सन्माननीय सदस्यांबरोबर देखील चर्चा करण्याचा योग येतो. अशा क्रिटीकल परिस्थितीमध्ये सर्वांना बरोबर घेऊन, सभागृहाचा डेकोरम पाळून सभागृहामध्ये सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडविणे हे अवघड काम आपल्या मार्फत चालले आहे त्याचा आम्हा सर्वांना मनापासून अभिमान वाटतो.

2.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ MMP/ SBT/

श्री.हर्षवर्धन पाटील ...

सभापती महोदय, पंचायत समितीमध्ये विस्तार अधिकारी म्हणून आपण नऊ वर्ष काम केले होते, त्यानंतर आपली जिल्हा परिषदेचे सदस्य म्हणून निवड झाली ,त्यानंतर शिराळा पंचायत समितीची सभापती म्हणून आपण काम केलेले आहे. त्याचबरोबर जिल्हा परिषदे सभापती म्हणूनही आपण काम केलेले आहे . आपली कारकिर्द मी पाहिली असून आपल्या नावासमोर सभापती हा शब्द अनेकदा लागला गेला आहे. पंचायत समितीच्या सभापती पदी पासून ते सभागृहाच्या सभापतीपदी पर्यत अनेकदा आपल्या नावापुढे सभापती पद लागलेले आहे. त्याचबरोबर आणखी एक वैशिष्टय असे आहे की ,आपण एकदा सभापती झाल्यानंतर पुन्हा दोन तीन वेळा रिपीट
झालेला आहात अशा प्रकारे जर मी आपल्या कार्याची माहिती दिली तर ती चुकीची आहे असे म्हणता येणार नाही. त्याचबरोबर आपण शिराळा मतदारासंघात डोंगरी विकास परिषद घेतली होती तेव्हा पासून डोंगरी विकासाकरता वेगळा फंड महाराष्ट्रातील डोंगरी मतदारसंघाकरिता दिला जात असून हा वेगळा फंड निर्माण करण्यामध्ये आपला सिंहाचा वाटा आहे याचा येथे उल्लेख करणे गरजेचे आहे . सभापती महोदय ,आपल्या एकूण चार टर्म्स झालेल्या आहेत आमदार, राज्यमंत्री, मंत्री म्हणून आपण काम केलेले आहे अशा प्रकारे विविध खात्याचे मंत्री म्हणून आपण केलेले असून आपले काम जर पाहिले तर आपल्याला या सर्व कामाचा प्रचंड अनुभव असून कॉग्रेस पक्षामध्ये ज्येष्ठ नेते म्हणून आपल्याकडे पाहिले जात आहे. त्याचबरोबर हे सभागृह सर्वोच्च असून या सभागृहातून राज्यातील जनतेला निश्चितपणे न्याय मिळेल तसेच सर्व पक्षांना बरोबर घेऊन महाराष्ट्रातील जनतेचे प्रश्न सोडविण्याकरता जे जे म्हणून या सभागृहाया माध्यमातून काम करावे लागेल ते काम आपण कराल अशी अपेक्षा मी या निमित्ताने व्यक्त करतो तसेच आपल्या भावी कार्यास सुयश चिंतितो व पुन्हा एकदा अभिनंदन करुन माझे भाषण संपवितो.

----

नंतर श्री.सुंबरे

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/SBT/MMP. श्री. गायकवाड नंतर --- 12:25

श्री. कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, आपले अभिनंदन करण्याइतका मी मोठा नाही. परंतु मी इतकेच सांगतो की, महाराष्ट्रात ज्यांच्या पायाशी झुकावे असे फार थोडे पाय आहेत त्यापैकी आपण एक आहात. म्हणून आपण पुन्हा एकदा या सभागृहाचे सभापती झाला आहात त्याबद्दल मला सर्वात जास्त आनंद होतो आहे आणि तो मी येथे व्यक्त करीत आहे. आज या सभागृहाने आपली एक मताने निवड केली आहे पण त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे विरोधी पक्षाने त्यासाठी प्रथम प्रस्ताव मांडून आपली निवड करावी यामध्येच सारे काही स्पष्ट झालेले आहे. सभापती महोदय, या सभागृहात सभापतींची एक फार मोठी परंपरा पागे-टिळकांपासून आहे ती आपण आपण या अगोदरच्या सभापती पदाच्या काळात नुसती चालविलीच नाही तर ती संवर्धित केली आहे. मी या सभागृहात नवीन सदस्य म्हणून निवडून आल्यानंतर मला आपले जे व्यक्तिश: मार्गदर्शन मिळाले आणि अन्य सदस्यांनाही जे मार्गदर्शन मिळत होते व आहे ते पहावयास मिळाले. त्यामुळे आम्हाला आपला फार मोठा आधार मिळालेला आहे. सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख यांनी इंग्लंड मधील लोकशाही परंपरा सांगताना तेथील राज्याने तेथील सभापतीचा शिरच्छेद केला होता म्हणून सभागृहाच्या दोन्ही नेत्यांनी म्हणजे सभागृहाचा नेता आणि विरोधी पक्षाचा नेता या दोघांनी एकत्रितपणे सभापतींना घेऊन जाण्याची प्रथा रूढ झाली. आज तो संघर्ष राजसत्तेशी नसला तरी विरोधी पक्षाला देखील आपण जे झुकते माप देत आहात त्यामुळे आपल्याबद्दल नेहमीच विरोधी पक्षाला आपलेपणा वाटलेला आहे आणि आपण ब्रिटीश परंपरेशी सुसंगत अशी मूल्ये नेहमीच आपण या सभागृहात जपण्याचे काम केलेले आहे. त्यामुळे आमच्या मनामध्येही सातत्याने आपल्याबद्दलचा आदर वृद्धिंगत झालेला आहे. सभापती महोदय, या ठिकाणी माननीय उपमुख्यमंत्री महोदयांनी स्व. वसंतरावदादा पाटील यांचा उल्लेख केला. मी पत्रकार म्हणूनही पाहिले आहे की, तेव्हापासून आपल्या निष्ठा या कधीही बदलल्या नाहीत. त्यांच्याशी आपल्या निष्ठा केवळ व्यक्तिगत निष्ठा नव्हत्या तर त्यांनी सुरू केलेल्या सहकारी चळवळशी देखील आपल्या निष्ठा निगडित होत्या, आपल्यापाशी सामाजिक निष्ठाही होत्या. मी ट्रेनमधून जाताही आपला प्रवास पाहिला आहे. इतका निरपेक्ष मनाचा, निर्व्याज माणूस म्हणून आपली या ठिकाणी पुन्हा एकदा फेरनिवड सभागृहाने करावी यामध्ये आपले मोठेपण दिसून येते. मी पुन्हा सांगतो की, आपले अभिनंदन करणे हा माझा अधिकार नाही, पण मनापासून त्याबद्दल आनंद व्यक्त करतो आणि थांबतो. धन्यवाद.

** ..... वाय 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, आपली पुन्हा एकदा या सभागृहाचे सभापती म्हणून निवड झाली आहे त्याबद्दल आपल्याला शुभेच्छा देण्यासाठी मी उभा आहे. आपण ज्या सांगली जिल्ह्यातून आला आहात तो क्रांतिसिंह नाना पाटील यांचा जिल्हा आहे. ब्रिटीशांच्या काळात पत्री सरकार किंवा प्रति सरकार क्रांतिसिंहानी स्थापन केले होते आणि या राज्यात खऱ्या अर्थाने स्वकीयांचे राज्य स्थापन करण्यास सुरूवात केली त्या जिल्ह्यातील आपण आहात. त्यामुळे सांगली जिल्ह्याचा अनुभव असताना, आता या ठिकाणी माननीय मुख्यमंत्री उपस्थित नाहीत, पण मला नवीन माहिती मिळाली की, माननीय मुख्यमंत्री हे मंत्री झाल्यानंतर पहिल्यांदा सांगली जिल्ह्याचे पालकमंत्री झाले होते. त्यामुळे सांगलीकरांचा नेहमीच त्यांना पाठिंबा असल्यामुळे त्यांची सांगलीकरांवर चांगली पकड आहे. सभापती महोदय, मी निश्चितपणे सांगतो की, आपली निवड ही येथे एकमताने झाली पण त्यापेक्षाही या सभागृहामध्ये अनेकदा संघर्ष झाला पण आज आपले नाव सभापती पदासाठी सुचविताना पहिले सूचक आणि अनुमोदक म्हणून विरोधी पक्षाकडून सुचविले गेले आणि त्यामध्ये सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी अनुमोदन दिले. त्यातच मला आपला जास्त मोठेपणा समजून येतो. सन्माननीय सदस्य श्री.रावते यांनी अनेकदा सभागृहामध्ये संघर्ष केला आहे, अनेकवेळा सभागृहाचे कामकाजही बंद पाडले परंतु सभापतीपदासाठी निवडीची वेळ आली तेव्हा पहिल्या प्रथम त्यांनी आपल्या नावास अनुमोदन दिले, आणि एकमताने आपली निवड झाली त्याबद्दल मला निश्चितच आपला अभिमान वाटतो. सभापती महोदय, आपला जो शांत स्वभाव आहे, तसा मी संतापी स्वभावाचा आहे. पण मी आपल्याला पहिल्यांदा भेटलो ते माझ्या काकांबरोबर, श्री.दत्ता पाटील हे माझे काका, त्यांच्या बरोबर आपण ग्रामविकास विभागाचे मंत्री असताना आम्ही काही कामानिमित्त आपल्याला भेटलो होतो. तेव्हा आमचे काका त्यांच्या नेहमीच्या स्वभावाप्रमाणे जोरजोरात, तावातावाने आपले म्हणणे आपल्यासमोर मांडत होते आणि आपण त्यांच्यापुढे शांत राहून शांतपणे बोलत होता. पहिल्यांदा नाही म्हटले, तरी नंतर आपण तो प्रश्न सोडविला आणि आमचे काम केले. ते माझ्या डोक्यामध्ये पक्के बसले. सार्वजनिक जीवनामध्ये काम करीत असताना माणसाने किती शांत राहिले पाहिजे आणि काम केले पाहिजे हे मला तेव्हा समजून आले. ...

( यानंतर सौ.रणदिवे .... झेड 1 ..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ MMP/ SBT/ पूर्वी श्री.सुंबरे . . . . 12:30

श्री.जयंत प्र.पाटील . . . .

सभापती महोदय, मी निश्चितपणे सांगू इच्छितो की, आपण गेल्या चार वर्षामध्ये ज्या पध्दतीने काम केले आहे, त्याबाबतीत सांगत असताना मी उल्लेख करु इच्छितो की, तुम्ही आमच्यासारख्या छोट्या पक्षांना वेळोवेळी संधी दिल्यानंतर . . . .

श्री.आर.आर.पाटील (खाली बसून) : माननीय सभापतींच्या शांतपणाचा तुमच्यावर काही परिणाम झाल्याचे दिसत नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, आपण याठिकाणी एक वेगळी परंपरा निर्माण केलेली आहे. मग लक्षवेधी सूचना असोत, नियम 93 अन्वये सूचना असोत किंवा इतर कामे असोत, ते काम कसे पूर्ण होईल आणि प्रत्येक सन्माननीय सदस्यांना मुद्दे मांडण्या कशी संधी मिळेल यादृष्टीने कामकाज केलेले आहे. मी आपल्याला तुमच्या कार्यालयामध्ये येऊन भेटलो होतो, तेव्हा सांगितले होते की, आपली सभापती पदावर बिन विरोध निवड होईल आणि त्याप्रमाणे निवड झालेली आहे. म्हणून मी आपल्याला पुन्हा एकदा माझ्यातर्फे आणि माझ्या पक्षातर्फे शुभेच्छा देतो.

----

. . . .झेड -2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुमंत गायकवाड (नामनियुक्त) : सभापती महोदय, आज आपली सभापती म्हणून दुसऱ्यांदा निवड झाली आहे, त्याबद्दल मी रिपब्लिकन पक्षाच्यावतीने अभिनंदन करतो.

सभापती महोदय,याठिकाणी आपले अभिनंदन करीत असताना मला एवढेच सांगावयाचे आहे की, या सदनामध्ये रिपब्लिकन पक्षाचे दोन सन्माननीय सदस्य आहेत आणि त्यांनाही सदनातील कामकाजामध्ये सहभागी करुन घेण्याची प्रथा आहे.पण ही प्रथा आज याठिकाणी पाळली गेली नाही. ही प्रथा नेहमी पाळली जावी असे माझे म्हणणे आहे. रिपब्लिकन पक्षाला गृहीत धरुन चालणार नाही. म्हणून मला याठिकाणी आपले अभिनंदन करीत असताना एवढेच सांगावयाचे आहे की, आपण सांगली जिल्ह्यातून आलेले आहात. सांगली जिल्हा हा क्रांतीकारकांचा जिल्हा आहे, प्रमुख कार्यकर्त्यांचा आहे. पूर्वी एकच सातारा जिल्हा होता. मी देखील त्याच जिल्ह्यातील आहे. आपण ज्यावेळी महाराष्ट्र कॉंग्रेसचे अध्यक्ष होता, त्यावेळी मला कर्मवीर दादासाहेब गायकवाड आणि माननीय श्री.रा.सू.गवई यांच्याबरोबर आपल्याला भेटण्याचा अनेक वेळा योग आला आहे. आपल्या कामकाजाची पध्दत ही सर्वांना बरोबर घेऊन जाण्याची आहे. मी या सदनामध्ये नवीन सदस्य आहे आणि मी येथेही पाहिले आहे की, आपण सर्वांना बरोबर घेऊन या सदनाचे कामकाज करीत आहात. म्हणूनच आज विरोधी पक्षाने सभापती म्हणून आपले नाव सुचविले आणि सर्वानुमते आपली सभापती म्हणून दुसऱ्यांदा निवड झालेली आहे. पुढच्या कालावधीमध्ये सुध्दा आपले काम निश्चितपणे उज्वल होईल आणि आपण सर्वांना बरोबर घेऊन पुढे जाल अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि माननीय सभापती, आपले रिपब्लिकन पक्षाच्यावतीने अभिनंदन करतो.

-----

. . . .झेड-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



APR/ MMP/ SBT/ 12:30

श्री.जी.एल.ऐनापूरे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, लोकशाहीमध्ये विधानमंडळ ही मंदिरे मानली जातात. त्यापैकी विधानसभा ही तंत्रावर आणि बलाबलवर चालते आणि विधान परिषद सद्सद्विवेक बुध्दीवर चालते असे म्हटलेले आहे. विरोधी पक्षाकडून सूचना आणि अनुमोदन होऊन आपली विधानपरिषदेचे सभापती म्हणून बिनविरोध निवड झाली. त्याबद्दल सर्व शिक्षक प्रतिनिधींच्या वतीने आपले अभिनंदन करतो. सभागृहामध्ये बिनविरोध निवड होणे हा आपला थोरपणा आणि आपला गौरव आहे याबद्दल जसा सर्वांना आनंद झालेला आहे. तसा मलाही व्यक्तीश: आनंद झालेला आहे. सर, सभापती राजकारणातील नामवंत व्यक्ती किंवा लोकशाहीचा अनुभव असलेली व्यक्ती, तसा आपला मोठेपणा, आपली मंत्रीपदाची कारकीर्द देखील महत्वाची आहे. त्याप्रमाणे मला व्यक्तीश: ते आणखी एका गोष्टीसाठी मोठे आणि महनीय वाटतात. या संस्थेचे व्यवस्थापक श्री.बापूसाहेब साळुंखे यांना डिलीट पदवी देण्याचा प्रसंग होता. तेव्हा बऱ्याच लोकांनी विरोध केला होता. त्यावेळी बापूसाहेबांचे महत्व पटवून देण्यासाठी, खऱ्या गोष्टी सांगण्यासाठी मोठया माणसाची गरज होती. मग आम्ही आपल्याकडे आलो आणि आपल्याला माहिती सांगू लागल्यानंतर आपण एक मिनिटामध्ये सांगितले की, ऐनापूरे, आपण मला आणखी समजावून सांगण्याची गरज नाही.

यानंतर कु.गायकवाड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DVG/ MMP/ SBT/ प्रथम श्रीमती रणदिवे.. 12:35

श्री. जी.एल. ऐनापूरे..

मंत्रीमंडळाची बैठक अर्धवट सोडून आपण राज्यपालांपर्यंत गेले. तेथे त्यांनी पटवून सांगितले व श्री. बापू साहेब साळुंखे यांना डी लिट पदवी देण्याचा निर्णय झाला. मला आठवते यामुळे कदाचित आपल्याला व्यक्तिगत जीवनामध्ये काही त्रास झाला. परंतु आपण त्या निर्णयाला आपण ठाम राहिलात. आमच्या संस्थेच्या संस्थापकांचा गौरव नेहमीच लक्षात राहील. या बद्दल आम्ही आपले कृतज्ञ राहू. संसदीय लोकशाहीचा विचार करीत असताना कोणी सांगितले उजवीकडे पहा तर कोणी सांगितले डावीकडे पहा. परंतु आपण नेहमी समोर पहात असतात. आम्ही आपल्या समोरच बसतो. त्यामुळे, आमच्याकडे लक्ष असू द्या. डावीकडे बघण्यात व उजवीकडे बघण्यात आम्ही कोठे वाहून जाणार नाही. त्यामुळे सध्या आपली जशी नजर आमच्यावर आहे तशीच राहू द्या. मी आपल्याला शुभेच्छा देऊन आपल्याला सुयश चिंततो. आपण अजून मोठे व्हावे अशी इच्छा व्यक्त करतो तसेच ईश्वरचरणी प्रार्थना करतो. धन्यवाद.

-----------------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, आपली या सार्वभौम सभागृहामध्ये, सभापती या पदावर एकमताने निवड झालेली आहे. मी आपणास सांगू इच्छितो की, मी सन 2002 मध्ये पहिल्यांदा निवडून आलो होतो. त्यावेळी आपण याच जागेवर बसत होता. त्यावेळी माननीय श्री. फरांदे हे या सदनाचे सभापती होते. त्यावेळी ते सभागृहाचे कामकाज सुरु झाल्यापासून शेवटपर्यंत सभागृहामध्ये बसत होते. एखाद्या महत्वाच्या विषयावर चर्चा उपस्थित करणे आवश्यक असेल तर तशा प्रकारची चर्चा उपस्थित करीत असत. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी आताच सांगितले की, शेतकऱ्यांचा प्रश्न ज्या ज्या वेळी उपस्थित करण्यात आला त्या वेळी हस्तक्षेप करुन ते चर्चेमध्ये सहभागी झाले. तसेच सभागृहामध्ये अनेक वेळा या विषयावर चर्चा त्यांनी उपस्थित केल्याचे आम्ही पाहिलेले आहे. श्री.फरांदे यांच्यानंतर आपली एकमताने या सार्वभौम सभागृहाचे सभापती म्हणून निवड झाली. मी ज्यावेळी सभागृहामध्ये नवीन सदस्य म्हणून निवडून आलो होतो, त्यावेळी नवीन सन्माननीय सदस्यांना बोलण्याची जाणीवपूर्वक संधी ते देत असते. निरनिराळया विषयावर सन्माननीय सदस्यानी लक्ष द्यावे, त्याबाबत विचार मांडावेत अशी त्यांची भूमिका असायची. पक्ष संघटनेमध्ये त्यांनी अनेक वर्षे काम केलेले आहे. कॉँग्रेस पक्षामधून त्यांनी काम केले आहे. सन 1991 मध्ये प्रदेश कॉँग्रेस कमिटीचे अध्यक्ष म्हणून निवडून आले होते. त्यावेळी देखील आपल्याबरोबर काम करण्याची संधी आम्हाला प्राप्त झाली होती.

सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी सांगितले की, या सभागृहाच्या काही प्रथा आहेत. सत्ताधारी पक्षाचे सभापती निवडून आलेले असतील तर उपसभापती हे विरोधी पक्षाचे असावे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सांगितले की, ही चूक आम्हीच मागच्या वर्षी केली आहे, त्यामुळे हे घडू शकलेले नाही. पुढील काळात ही चूक सुधारावी व विरोधी पक्षामधून उप सभापती निवडण्यात यावे अशी भूमिका मांडण्यात यावी. आपण हे स्पष्टपणे मान्य केलेले आहे की या बाजूच्या पक्षाची सत्ता पुढच्या वर्षी येईल व उपसभापती आपल्या बाजूने राहील.

श्री. अरविंद सावंत ( बसून ) : शेवटी कुत्र्याची शेपूट..

..3..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही



DVG/ MMP/ SBT/ प्रथम श्रीमती रणदिवे.. 12:35

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या वतीने व व्यक्तिगत स्वरुपाने मी आपले अभिनंदन करु इच्छितो. आपली पुढील कारकीर्द यशस्वी व्हावी यासाठी आपल्याला पक्षाकडून सहकार्य देण्याची ग्वाही देऊन पुन्हा एकदा आपल्याला शुभेच्छा देऊन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

जय हिंद जय महाराष्ट्र !

---------

यानंतर श्री. बरवड..

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांच्या तोंडून अनवधानाने जे छोटेसे वाक्य निघाले ते मी कामकाजातून काढून टाकत आहे.

श्री. मधुकर चव्हाण ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : आदरणीय सभापती महोदय, या वरिष्ठ सभागृहाच्या सभापतीपदी आपली एकमताने निवड झाली हे महाराष्ट्राच्या राजकीय क्षेत्रातील प्रगल्भतेचे आणि समजूतदारपणाचे लक्षण आहे आणि माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर. आर. पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे या देशामध्ये एक संदेश जाईल. पूर्वीच्या काळामध्ये राजा हा सर्वोच्च असल्यानंतर सुध्दा अंतिम निर्णय राजगुरुचा ऐकला जावयाचा ? राजगुरु हे जंगलात राहात होते परंतु त्यांचा राजदंड त्या ठिकाणी महत्वाचा होता. अंतिम निर्णय त्यांचा मानला जावयाचा. आता राजेशाही गेली आणि इंडायरेक्ट डेमॉक्रसी आली आणि जनतेचे प्रतिनिधी म्हणून राजाच्या स्वरुपामध्ये या ठिकाणी राज्यकर्ते आले. या ठिकाणी राज्यकर्ते किंवा मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री सुध्दा खाली बसलेले असतात आणि ज्यांना काहीही प्रशासकीय अधिकार नाहीत परंतु न्यायाचा तराजू ज्यांच्या हातामध्ये आहे असे सर्वोच्च पद आपल्याकडे थोड्या उंचीवर ठेवले गेलेले आहे. सभापती महोदय, या ठिकाणी अनेक संघर्षाचे प्रसंग आले परंतु आपण कधीही तोल सोडलेला नाही हे आम्हा सगळ्यांच्या लक्षात आले. सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांनी सांगितल्याप्रमाणे या ठिकाणी अनेक वेळेला प्रथा बाजूला ठेवून अनेक कामकाज रद्द केलेले नाही किंवा लॅप्स केलेले नाही. साधारणपणे महाराष्ट्र सोडून देशाच्या इतर राज्यांमध्ये आपण पाहिले तर त्या ठिकाणी सदनाचे कामकाज चालू असताना जे प्रसंग घडतात तसे प्रसंग या ठिकाणी घडल्याचे मला तरी माहीत नाही. कधी प्रसंग घडले असतील त्यावेळी या ठिकाणी लॉबीमध्ये यावयाचे परंतु त्यावेळी मला वेदना व्हावयाच्या आणि आपण या ठिकाणी कशा प्रकारचे वर्तन करतो, चुकीचे वर्तन तर केले नाही ना असे वाटावयाचे.

सभापती महोदय, निवडणूक लढून निवडून येण्याचा एक वेगळा आनंद असतो परंतु एकमताने निवडून येण्याचा आनंद कमी लोकांच्या भाग्यात असतो. ते भाग्य आपल्याला मिळाले आहे. आपल्या आयुष्यात आपण हे भाग्य जपून ठेवलेले असेल. राजनीतीमध्ये आयुष्यात असे प्रसंग येतात की, अमृताचे घोट सुध्दा घ्यावे लागतात परंतु शंकरासारखे विषाचे घोट प्राशन करुन

....2....

RDB/ MMP/ SBT/

श्री. मधुकर चव्हाण ......

निळकंठ होण्याची वेळ सुध्दा येत असते. सन्माननीय उपमुख्यमंत्री काही तरी बोलण्याचा प्रयत्न करीत आहेत. मी त्यांना सांगू इच्छितो की, रात्रीचा सूर्य मावळल्यानंतर उद्याची पहाट होत असते या जीवनाच्या सिध्दांतावर विश्वास ठेवणारा मी आहे. सभापती महोदय, आपण या ठिकाणी न्यायाची भूमिका घेतली. या ठिकाणी अनेक अर्ध्या तासाच्या चर्चा असतील. लक्षवेधी सूचना असतील त्यासंदर्भात आपण आपल्या अधिकारामध्ये अनेक वेळा आदेशही दिलेले आहेत. मी भारतीय जनता पक्षाचा प्रतोद म्हणून आणि सदस्य म्हणून आपल्याला पूर्ण ग्वाही देतो की, या ठिकाणी आमचे सर्व सन्माननीय सदस्य आपण दिलेल्या आज्ञा पाळतील. आपला सन्मान ठेवला जाईल आणि सभागृहाचे कामकाज अतिशय सुरळीत आणि उत्तमप्रकारे चालण्यासाठी पूर्णत: सहकार्य आपल्याला मिळेल. आपले वय माझ्यापेक्षा मोठे असल्यामुळे आपल्याला केवळ मनापासून शुभेच्छा देण्यापलीकडे, आपल्या संस्कृतीमध्ये अशी पध्दत आहे की, मोठ्या माणसाला आपण तोलूनमापून बोलावयाचे असते, म्हणून मी ईश्वराजवळ प्रार्थना करतो की, हे पद आपण जे अतिशय न्याय पध्दतीने आपण सांभाळणार आहात त्यासाठी आपल्याला अतिशय चांगले आरोग्य, दीर्घायुध्द लाभो आणि आपल्या नेतृत्वाखाली या सभागृहामधील चर्चेची जी एक उंची आहे ती अधिकाधिक उंच होत जाईल अशा तऱ्हेची अपेक्षा व्यक्त करुन पुन्हा आपले मन:पूर्वक अभिनंदन करतो.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ SBT/

श्री. संजय पाटील (विधानसभेने निवडलेले) : माननीय सभापती महोदय, या सभागृहाच्या सभापतीपदी आपली पुनश्च निवड झाली त्याबद्दल मी आमच्या पक्षाच्या वतीने आणि व्यक्तिश: माझ्यावतीने शुभेच्छा व्यक्त करतो. सचोटी, नैतिकता आणि प्रतिष्ठेचे मूर्तीमंत उदाहरण म्हणून आपल्याकडे पाहिले जाते.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय पाटील.....

माझ्यापूर्वीच्या अनेक सन्माननीय सदस्यांनी अभिनंदनाच्या प्रस्तावावर सद्‌भावना व्यक्त केलेल्या आहेत. त्या सद्‌भावनांशी मी सहमत होऊन आपल्या भावी कारकिर्दीला सुशय चिंतितो, आपल्याला उत्तम आरोग्य लाभो अशी शुभेच्छा व्यक्त करुन मी येथे थांबतो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे ( विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, आपली या सभागृहाच्या सभापतीपदी बिनविरोध निवड झाली त्याबद्दल राष्ट्रवादी पक्षाच्यावतीने सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी आणि सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी अभिनंदन केलेलेच आहे. मी याठिकाणी एका बाबीचा स्पष्टपणे उल्लेख करु इच्छिते की, आपल्याकडे प्रदीर्घ अनुभव आणि प्रचंड संयम आहे. या सभागृहात नव्याने येणा-या सदस्यांसाठी त्याचा उपयोग होतो. याचे मी एक उदाहरण सांगेन. माझे पहिले अधिवेशन ऑब्झर्व्हेशनमध्येच गेले. पण दुसरे अधिवेशन सुरु होण्यापूर्वी मी पक्षाच्या कामात व्यस्त होते. त्यामुळे मी तारांकित प्रश्न वेळेवर देऊ शकले नव्हते. तारांकित प्रश्न देण्याच्या दिवशी मी सकाळी कार्यालयात पोहोचले. मी त्यादिवशी 30-32 प्रश्न स्वत:च्या हस्ताक्षरामध्ये लिहून दाखल केले. त्यावेळी माननीय सभापतींनी मला बोलावून सांगितले की, तुमच्या प्रश्नांमध्ये गडबड आहे. तारांकित प्रश्न तयार करण्यासाठी तुम्ही प्रथम दैनंदिन काम बाजूला ठेवून या कामामध्ये लक्ष दिले पाहिजे आणि स्वत: प्रश्न तयार केले पाहिजेत. आपल्याला ही मोठी संधी आहे. अशाप्रकारची सूचना मला केली. विशेष उल्लेख, औचित्याचा मुद्दा, अर्धा-तासाची चर्चा, लक्षवेधी सूचना, तारांकित प्रश्न मी स्वत: तयार करुन देण्याची सुरुवात केली. त्याचा परिणाम म्हणून मागील 2 वर्षापासून सामाजिक प्रश्न, जिल्हयाचे प्रश्न मांडण्यासाठी मला खूप फायदा झाला. माझ्या मनात सभागृहाबाबत एक आदरयुक्त भीती होती. मला अनेक वर्षांचा राजकीय अनुभव असल्यामुळे आणि सन्माननीय उपसभापती देखील आमच्या पक्षाचे असल्यामुळे ही भीती कमी होण्यास मदत झाली. परंतु आपण कॉंग्रेस पक्षाचे वयोवृध्द मान्यवर आहात. या सभागृहाला चांगले नेतृत्व लाभल्यामुळे ही भीती दूर झाली, मोकळेपणाने मला काम करता आले. या सभागृहात येणा-या नवीन सभासदांमध्ये एक आत्मविश्वास निर्माण होण्यासाठी संयमी, पितृतुल्य व्यक्तीकडून मार्गदर्शन मिळते ही गोष्ट मान्य करणे गरजेचे आहे. मी मागील काळातील इतिहासाबद्दल बोलणार नाही. मी पुन्हा एकदा आपले अभिनंदन करते, भावी वाटचालीला शुभेच्छा देते आणि माझे दोन शब्द संपविते.

------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सर्वसाधारण प्रथा अशी आहे की, सदनाचे सन्माननीय नेते, सन्माननीय विरोधी पक्ष नेते, विविध पक्षाचे गट नेते एखाद्या विषयावर बोलत असतात. आज याठिकाणी काही सन्माननीय सदस्यांनी बोलण्यासाठी हात वर केलेला आहे. मला वाटते की, ही प्रथा आपल्याला कधी तरी बदलावी लागेल.

श्री.गोविंदराव आदिक ( विधानसभेने निवडलेले ) : आदरणीय सभापती महोदय, मी प्रथम व्यक्तीश:, माझ्या पक्षाच्यावतीने अंत:करणापासून आपले अभिनंदन करतो. आपण आताच म्हटले आहे की, सभागृहाच्या प्रथा, परंपरा आहेत, त्या पाळल्या पाहिजेत.

**सभापती** : त्याला मी अपवाद केला आहे.

श्री.गोविंदराव आदिक : सभापती महोदय, एखाद्या विषयावर किती भाषणे व्हावीत याबद्दल आपण भावना व्यक्त केल्या आहेत त्याच्याशी मी देखील सहमत आहे. माझी सन्माननीय सदस्यांना विनंती राहील की, या प्रस्तावावर आणखी काही सन्माननीय सदस्यांनी भाषण करण्यापेक्षा प्रातिनिधीक स्वरुपामध्ये पक्षाच्या नेत्यांनी भाषण केल्यानंतर इतर सदस्यांनी भाषण करु नये अशी परंपरा आहे. कारण माननीय सभापती, सभागृहाचे सन्माननीय नेते, सन्माननीय विरोधी पक्ष नेते आणि गट नेत्यांचा मान सन्मान रहात नाही, किंबहुना, त्यांची अप्रतिष्ठा होते असे म्हटले तर ते वावगे होणार नाही. आपण म्हटल्याप्रमाणे या प्रस्तावावर आणखी भाषणे होऊ नयेत. ही संकल्पना आज नाही तर पुन्हा कधी तरी पाळली जावी. सभापती महोदय, आज या सभागृहात नवीन परंपरा पडलेली आहे.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MMP/ SBT/ पूर्वी श्री. खंदारे 12:50

(श्री. गोविंदराव आदिक...)

या लोकशाहीच्या इतिहासामध्ये पहिल्यांदाच विरोधी पक्षनेत्यांनी सभापती पदासाठी जी सूचना आणली ती या सभागृहाची प्रतिष्ठा वाढविणारी फार मोठी गोष्ट घडलेली आहे. त्यामुळे मी माननीय विरोधी पक्षनेत्यांचेही या निमित्ताने अभिनंदन करतो. या पुढे अधिक भाषणे न करता आपण पुढील कार्यवाही करावी अशी मी आपल्याला विनंती करतो.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सभागृहाचे नेते, सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर, सन्माननीय गटनेते श्री.दिवाकर रावते, सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख, सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील, दोन्ही बाजूचे सर्व सन्माननीय सभासद-बंधू आणि भगिनी, एका अत्यंत चांगल्या आणि सदृढ लोकशाहीच्या अनुषंगाने महाराष्ट्र विधानसभेच्या सर्व लोकप्रतिनिधींनी मला निवडून देऊन या ठिकाणी पुन्हा एकदा मला आपली सेवा करण्याची संधी दिली. आजचे विशेष असे की, सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर, सन्माननीय गटनेते श्री. दिवाकर रावते यांनी माझ्या नावाची सूचना आणि अनुमोदन दिले होते. या व्यतिरिक्त सत्तारुढ पक्षातर्फे कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस आणि अन्य सर्वांनी माझ्या नावाची सूचना आणि अनुमोदन दिले होते. सन्माननीय मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री, सन्माननीय विरोधी पक्षनेते, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते या नेत्यांनी आपल्या सर्वांचा प्रतिनिधी म्हणून मला या ठिकाणी स्थानापन्न केले. प्रथम सन 2004मध्ये मला महाराष्ट्र विधानपरिषदेचा सभापती म्हणून या सदनामध्ये काम करण्याची संधी मिळाली. त्या नंतरच्या काळात आजचा हा माझ्या जीवनातील अत्यंत महत्वाचा असा दिवस मानावा लागेल आणि म्हणून आज या ठिकाणी आपल्या सर्वांच्या प्रेमाने सर्वांनी दिलेल्या सहकार्यामुळे मला पुन्हा एक वेळ ही कामाची संधी मिळालेली आहे. मला या गोष्टीची जरुर जाणीव आहे की हा काटेरी मुकूट आहे. काटेरी मुकुटाला वर काटे असतात. परंतु हा मुकूट असा आहे की, या मुकुटाला वर कमी आणि आतमध्ये चिकार काटे असतात. असे असताना सुध्दा सातत्याने हसतमुख राहून सर्वांना समजून घ्यावे, नकळत कधीतरी माझ्या भावंडांनी या ठिकाणी एखादी भावना अत्यंत तीव्र संतापात मांडली असेल तर ती समजून घेणे, त्या पाठिमागची जनकल्याणाची, लोककल्याणाची भावना समजून घेणे जरुरीचे आहे. या सभागृहामध्ये आपण लोकप्रतिनिधी म्हणून निवडून येत असतो. लोकांचे प्रश्न आपण येथे सोडवितो. समाजातील उपेक्षित माणूस, तळागाळातील माणूस, कष्टकरी, शेतकरी, मागासवर्गीय समाज, विद्यार्थी अशा सर्वांचे प्रश्न अनेक माध्यमातून या ठिकाणी पोटतीडिकीने मांडतो, सोडवितो. मघाशी सामाननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटीलसाहेब तसेच सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी सांगितल्याप्रमाणे संसदीय लोकशाहीमध्ये असणा-या आयुधांचा वापर अत्यंत अचूक पध्दतीने करण्याची हे सभागृह एक पवित्र ताकद आहे. सन्माननीय श्री. आर.आर.पाटीलसाहेब हे राज्याचे उपमुख्य मंत्री आहेत. ...

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MMP/ SBT/ SBT/ प्रथम श्री.शिगम 12:55

सभापती...

पण लक्षवेधीकार श्री.आर.आर.पाटील यांना विधानसभा सभागृहात संधी मिळाली. त्या संधीच्या माध्यमातून त्यांचे व्यक्तिगत फुलो-या सारखे वाढले, मोठे झाले. आमदारांना विधिमंडळाच्या कामकाजाची माहिती व्हावी यादृष्टीने अमरावती येथे ट्रेनिंग कार्यक्रम आयोजित केला. त्या ठिकाणी एक प्रकार झाला आणि त्या प्रकाराची माहिती लोकप्रतिनिधींनी सदनात मांडली. त्या लोकप्रतिनिधींनी त्या प्रसंगाची माहिती सदनात दिल्यानंतर जवळपास 11 ते 12 पोलीस अधिका-यांना जन्मठेपेची शिक्षा झाली. एवढे मोठे सामर्थ, एवढी मोठी ताकद या सभागृहामध्ये आहे. सर्वसामान्य समाजाला केंद्र बिंदू मानल्यानंतर, या उपेक्षित समाजाच्या काखेतील कुबडया फेकून द्या, त्या समाजाला स्वयंभू करा. या सर्वसमान्य उपेक्षित समाजाचा विकास होण्यासाठी शासनाने ज्या योजना सुरु केल्या आहेत, त्या कशा पध्दतीने राबविल्या गेल्या आहेत, कोणते दोष त्या योजनांमध्ये आहे, त्या योजना भविष्यात चांगल्या प्रकारे कशा राबविता येतील यादृष्टीने चर्चा करणारे हे वरिष्ठ सभागृह आहे. या सभागृहामध्ये राज्यातील कानाकोप-यातील अनेक मान्यवर या ठिकाणी काम करीत आहेत. शिक्षण, कला, साहित्य, शहरी आणि ग्रामीण भागात समाजाभिमुख काम करणा-या व्यक्तींना या सभागृहातील लोकप्रतिनिधीत्व दिले जाते. विविध क्षेत्रातून आलेल्या लोकप्रतिनिधींच्या अनुभवाचा फायदा शासनाने घेणे आवश्यक आहे. विविध क्षेत्रातून आलेल्या लोकप्रतिनिधींच्या सहकार्याने या वरिष्ठ सभागृहाचे कामकाज चालविले जाते. या सभागृहात काही विषयांच्या चर्चा अतिशय पोटतिडकीने होतात. त्या विषयात काही दोष असतील तर ते शासनाच्या निदर्शनास आणून दिले जातात. कायदा चांगला व्हावा यासाठी सभागृहातील सन्माननीय सदस्य प्रयत्नांची पराकाष्ठा करतात. म्हणून माझे स्वत:चे मत आहे की, सन्माननीय श्री.आर.आर.पाटील यांना लक्षवेधीकार म्हणून संधी मिळाली नसती तर यदाकदाचित त्यांच्या उत्कृष्ट वत्कृत्वाने तसेच त्यांच्या प्रभावी व्यक्तीमत्वाच्या जोरावर ते दुस-याही क्षेत्रात पुढे आले असते. लहानातला लहान कार्यकर्ता आपल्या प्रभावी कामामुळे राज्य स्तरावरही पोहोचू शकतो. जनतेची अनेक गाऱ्हांणी समजू शकतो, ऐकू शकतो आणि ती सोडवू शकतो अशा पध्दतीचे हे पवित्र सभागृह आहे. त्या सभागृहाचा सभापती म्हणून आपल्या समोर येण्याची संधी मला दिली गेली आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते, या सभागृहातील सत्ताधारी पक्षातील तसेच विरोधी पक्षातील सर्व सदस्यांचा खरोखरच मी ॠणी आहे. मी विधानसभा

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती...

सदस्य म्हणून काम करीत होतो, त्यावेळी आपली लक्षवेधी सूचना चर्चेला यावी म्हणून प्रयत्न करावे लागत. लक्षवेधी सूचना चूकून आली आणि वेळ संपला या करिता ती सूचना रहित झाली तर त्यावेळी मनाला जे दु:ख होते, वेदना होतात, वेगळयाच असतात. लक्षवेधी सूचना असेल, अर्धा तास चर्चेची सूचना असेल, अन्य कोणतीही चर्चा असेल तर ती चर्चा शक्यतो लॅप्स होऊ नये या मताचा मी आहे. जे राज्यमंत्री म्हणून काम करतात, मंत्री म्हणून काम करतात, त्यांना निष्णात व्हावयाचे असेल तर अनेक वार छातीवर झेलण्याची तयारी ठेवली पाहिजे. माझा स्वत:चा एक अनुभव मी या ठिकाणी सांगतो. मी आणि श्री.विलासराव देशमुख पूर्वी गृह राज्यमंत्री होतो. अधिवेशन सुरु असताना एका दिवशी सभागृहात विरोधी पक्षाच्या सदस्यांनी सरकारवर जबरदस्त हल्ला केला. त्यावेळी आम्ही दोघे नवखे होतो...

यांनतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ SBT/ MMP/ SBT/ MMP/ 13:00

**सभापती** .....

इश्यू मोठा क्रिटीकल होता. जिल्हाधिकारी आणि डीएसपीचे यांचे मत असे होते की, त्याठिकाणी गोळीबार झाला.लाठीचार्ज जरुर झाला. दरम्यानच्या काळामध्ये त्यावेळच्या लोकप्रतिनिधींनी अशी तक्रार केली की, एक मनुष्य सोलापूरमध्ये आहे आणि तो त्याठिकाणी दवाखान्यात ॲडमिट आहे त्याला एक गोळी लागली आहे. ही गोळी पोलिसांच्या फायरींगमुळे लागली असे म्हणायचे की अन्य कुठल्या कारणाने लागली असे म्हणायचे असा एक इश्यू होता.त्यावेळी माझ्या लक्षात आले की आपण सखोल अभ्यास करु शकलो आणि अनेक वार पचविण्याची किंवा टक्कर देण्याची मानसिकता जोपर्यंत होत नाही तोर्यंत सभागृहामध्ये प्रश्नांचा जो भडीमार होतो त्याच्यासमोर आपण टिकू शकणार नाही. म्हणून मला जरुर सरकारबाजूकडून आणि माझ्या मित्रांकडून असे म्हणता येईल की, अशा अनेक पध्दतीमुळे सभागृहाच्या कामकाजाच्या दृष्टीने त्याचा फार उपयोग होतो. आज मी जरुर सांगेन की, सरकारमधील राज्यमंत्री आहेत ते दीड वर्षापूर्वी कसे होते आणि आज कसे आहेत याचा विचार केला तर श्री. राणा जगजितसिंह पाटील असतील किंवा श्री. रणजित कांबळे असतील किंवा श्री. राजेश टोपे असतील किंवा श्री.शिंगणे असतील किंवा श्री. शेगांवकर यांचे उदाहरण देता येईल. अशा पध्दतीने सातत्याने तयारी केली आणि सातत्याने तोंड देण्याचा प्रयत्न केला तरच खऱ्या अर्थाने राज्यमंत्री तयार होऊ शकतो. म्हणून मी हा घेतलेला निर्णय आहे. मला अत्यंत आनंद आणि अभिमान आहे की लोकशाहीची ताकद किती मोठी आहे. अर्धा-तास चर्चेच्या माध्यमातून शेकडो प्रश्न मार्गी लावले. शेकडो प्रश्न सुटले. शेकडो प्रश्नाला न्याय देण्याचा प्रयत्न केला. लक्षवेधी किंवा अन्य सर्व आयुधांचा वापर करुन आपण काम केले. म्हणून याठिकाणी मला दुसऱ्या वेळेला जी संधी दिली त्याबद्दल मी आपला ऋणी आहे. स्वर्गीय वसंतदादांच्या नजरेत बसलेला छोटयातील छोटा कार्यकर्ता आहे. श्री. आर.आर.पाटील, श्री. संजय पाटील किंवा अन्य मंडळींना हे माहीत आहे की, सांगलीच्या 100 कार्यकर्त्यांमध्ये शेवटचा कार्यकर्ता कोण असेल तर तो मी शिवाजीराव देशमुख. असाही काळ गेला. त्यादृष्टीने सामान्य माणसाला केंद्रबिंदू मानून त्याची सातत्याने सेवा करावी त्यादृष्टीने अनेक बारकावे समजून घ्यावेत. मी अनेक बारकावे समजून घेतले त्याचाही मला फायदा झाला आणि त्यानंतरच्या काळामध्यें मी शिराळयामध्ये आलो. मी ग्रामविकास खात्यात 9 वर्षे सेवा केली. मला सांगायला अभिमान आहे की 1958 मध्ये मी विस्तार अधिकारी झ ाालो आणि 1988 मध्ये

....2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**

राज्याचा ग्रामविकास मंत्री झालो. आज 50 वर्षानंतर याठिकाणी तुम्हा सर्वांच्या शुभेच्छा आणि आशीर्वादामुळे पुन्हा याठिकाणी आलो. म्हणून माझी इच्छा अशी आहे की सर्वसामान्य माणसाला उभे करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावयाचा असेल तर तुम्ही आम्ही सातत्याने प्रयत्नांची पराकाष्ठा केली पाहिजे. स्वर्गीय वसंतदादांच्या मार्गदर्शनाखाली आणि आशिर्वादाने काँग्रेसच्या माध्यमातून त्यावेळेला स्वर्गीय इंदिरा गांधीच्या शुभेच्छा असल्यामुळे आणि आज याठिकाणी मी अभिमानाने सांगेन की श्रीमती सोनिया गांधी आणि श्री. शरद पवार यांच्यामुळे याठिकाणी काम करण्याची संधी मिळाली. हे मी आज बोलतो आहे. मात्र यानंतर माझी याबाबतीमधील या सभागृहातील भूमिका अशी राहील की मी सभापती म्हणून काम करीत असताना मी अधिक्य जरुर राहीन. मला एका वेळा आठवते की श्री. मधुकर सरपोतदार निरोपाच्या वेळी बोलले होते त्यावेळी मी सांगितले होते की माझी नजर पुढे आहे. दोघांनाही वाटणे गरजेचे आहे की ती नजर त्यांच्याकडे आहे. तुम्हांलाही वाटणे गरजेचे आहे की माझी नजर तुमच्याकडे आहे आणि याही बाजूच्या सदस्यांना वाटले पाहिजे की माझी नजर आपल्याकडे आहे. अशा पध्दतीने कौशल्याने काम करणे गरजेचे आहे. शिराळा मतदारसंघ डोंगरी आहे. त्या डोंगरी मतदारसंघामध्ये चालत जाण्याशिवाय अन्य कुठलाही मार्ग नव्हता. त्याठिकाणी सामान्य समाजाने लोकांनी माझी निवड केली. मघाशी श्री. आर.आर.पाटील यांनी सांगितलेला अनुभव खरा आहे. मी शिस्तप्रिय कार्यकर्ता होतो. कितीही अन्याय झाला तरी मर्यादा सोडायच्या नाहीत या पध्दतीने मी वागत होतो.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**............

1972 साली मला दुर्दैवाने काँग्रेसच्या तिकिटापर्यंत पोहोचता आले नाही. 1978 साली देखील पोहोचता आले नाही. माझ्या लोकांनी मला सांगितले आता वेगळा विचार करावा. त्यावेळी मी माझ्या लोकांनी सांगितले की, आता माझी एक अट तुम्हाला मान्य असेल तर मी हा विचार करेन. मी निवडून आलो तरी काँग्रेसचा आणि वसंतदादांचा आणि अपयशी ठरलो तरी वसंतदादांचा. ही अट तुम्हाला मान्य असेल तर मी नक्की यादृष्टीने असा काहीतरी विचार करावयास तयार आहे. सुदैवाने ती माझी विनंती मी टिकवू शकलो. त्यावेळची परिस्थिती अशी होती की, दोन्ही बाजूने फक्त 8 ते 9 आमदारांचा फरक होता. अशा वेळेला गव्हर्नरसमोर आम्हा आठ अपक्षांचा तुमचा पाठिंबा कोणाला आहे याची खात्री केली गेली. त्यानंतर स्व.वसंतदादा पाटील यांना मुख्यमंत्री पदाची शपथ दिली गेली. सुदैवाने जे मी बोललो ते टिकवू शकलो. या पध्दतीचे मी आयुष्यामध्ये काम केले. डोंगरी विभागाच्या अनुषंगाने बॅ.अंतुले मुख्यमंत्री असताना आमची सातत्याने मागणी होती, त्या मागणीला सुध्दा शासनाने योग्य पध्दतीने न्याय दिला. सुदैवाने राज्यामध्ये काम करीत असताना जसे पंचायत समितीमध्ये अनेक स्तरावर काम केले. जिल्हा परिषदेमध्ये काम केले. तसे त्यानंतरच्या काळात राज्यमंत्री, नंतर मंत्री पदावर काम करता आले. पण मी एक गोष्ट नक्की ठरविली की, कोणत्याही मंत्रिमंडळात असलो तरी अन्य कोणतीही खाती ज्याची असतील ती मुख्यमंत्री देतील, पण मी त्यांच्याकडे दोन खात्यांची सातत्याने मागणी करीत होतो. त्यापैकी एक होते पुनर्वसन आणि दुसरे माजी सैनिक कल्याण विभाग. माझा स्वत:चा त्याबाबत विश्वास आहे. महाराष्ट्र म्हटल्यानंतर लढवय्या महाराष्ट्र, छत्रपती शिवरायांचा महाराष्ट्र असे म्हणत असताना महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यामध्ये असणारे 4-5 लाख माजी सैनिक आहेत, त्यांचे कल्याण चांगल्या प्रकारे झाले पाहिजे यावर माझी धारणा होती. त्याचबरोबर महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यामध्ये ज्या पध्दतीने सर्वांगीण विकास झाला पाहिजे असे मानतो, अनेक प्रकल्प उभे करतो, असे प्रकल्प उभे करीत असताना जे पाण्यामध्ये बुडतात, ज्यांचे जीवन उद्‌ध्वस्त होते त्या सामान्य माणसाला त्याच हिरीरीने तुम्ही आम्ही उभे केले पाहिजे. या अनुषंगाने मी ही दोन खाती सातत्याने मागितली. म्हणून या दृष्टीने काम करीत असताना मला माझ्या सर्व सहकाऱ्यांनी जास्तीत जास्त सहकार्य दिले आणि जे काही करणे शक्य आहे त्यादृष्टीने मला लोकांनी पाठबळ दिले. शिराळा मतदारसंघ म्हणजे शिराळा आणि वाळवा. या मतदारसंघाचे वैशिष्टय म्हणजे 1925 साली आजचा जंगल

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**............

सत्याग्रह ब्रिटिशांविरुध्द त्यावेळी जंगलामध्ये झाला होता. 1930 सालचा भिडाशी बंद, त्यावेळच्या ब्रिटिश पार्लमेंटमध्ये ज्याची चर्चा झाली, तो सुध्दा शिराळा तालुक्यातील आहे. सांगली जिल्हयामध्ये 14 हुतात्मा स्मारके आहेत. त्यातील 6 स्मारके शिराळा तालुक्यात आहेत. अशा प्रकारचा ज्वलंत इतिहास असणारा तालुका, ज्या तालुक्याने खऱ्या अर्थाने मला मोठे केले, तुम्ही सर्वांनी सातत्याने प्रेम दिले. अशा वेळी माझे हे नक्की अभिवचन राहील की, याठिकाणी काम करीत असताना सुदृढ लोकशाहीच्या दृष्टीने जास्तीत जास्त सामान्य माणसांना न्याय देणारी जबरदस्त लोकशाहीची शक्ती म्हणून या वरिष्ठ सभागृहाची जी यापूर्वीची परंपरा आहे, तीच परंपरा यानंतरच्या काळात सुध्दा मी जरुर टिकवेन. यापूर्वी सुध्दा कै.वि.स.पागे, स्व.जयंतराव टिळक, श्री.रा.सु.गवई, प्रा.ना.स.फरांदे किंवा त्यापूर्वी जे अनेक मान्यवर या सभागृहाचे पीठासीन अधिकारी झाले त्यांनी जोपासलेली परंपरा आहे, त्यांनी ज्या पध्दतीने या वरिष्ठ सभागृहाचे स्थान अत्यंत बळकट करण्याचा प्रयत्न केला ती परंपरा जतन करणे, तुम्हा सर्वांना सातत्याने विश्वास देणे, उपेक्षित माणसाला, समाजाला केंद्रबिंदू मानून त्याला उभे करण्याचा प्रयत्न केलेला आहे आणि करीत राहणार आहे. आपण याठिकाणी माझी निवड केल्याबद्दल मी सर्वांचा आभारी आहे. जय हिंद, जय महाराष्ट्र !

----------

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपल्या कारकिर्दीची सुरुवात एका चांगल्या कामाने व्हावी यासाठी मी उभा आहे. शेकडो कुटुंबांना आपल्या एका शब्दामुळे अभय मिळाले आहे. आपण झुणका भाकर केंद्राच्या संदर्भात शब्द दिला होता त्यावेळेस माननीय उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले होते की, मी झुणका भाकर केंद्राच्या संदर्भात दोन दिवसात निवेदन करतो. झुणका भाकर केंद्राच्या निवेदनाने आपल्या कारकिर्दीला सुरुवात व्हावी अशी माझी प्रामाणिक इच्छा आहे. दोन दिवसात निवेदन करण्यात येईल असे सांगितल्यानंतर सुध्दा आम्ही एक आठवडा या निवेदनाची वाट पाहिली त्यामुळे आज झुणका भाकरीचे निवेदन करण्यात यावे अशी माझी अपेक्षा आहे.

----------

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: विरोधी पक्षनेत्यासंबंधी घोषणा

**सभापती** : माझ्याकडे शिवसेना-भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र विधीमंडळ पक्ष नेत्याने दिनांक 25 एप्रिल, 2008 रोजी पत्र देऊन असे कळवले आहे की, विधानपरिषदेचे विरोधीपक्ष नेते म्हणून पांडुरंग पुंडलिक फुंडकर यांची दिनांक 25 एप्रिल, 2008 पासून निवड करण्यात येत आहे.

-------------

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**:विरोधी पक्षाच्या प्रतोदासंबंधी घोषणा

**सभापती** : विधानपरिषद शिवसेना गट नेत्याच्या रिक्त असलेल्या पदावर श्री. दिवाकर नारायण रावते, विधानपरिषद सदस्य यांची विधानसभा विरोधी पक्ष नेते श्री. रामदास कदम यांनी विधानपरिषदेच्या शिवसेना पक्षाचा गट नेता म्हणून दिनांक 25 एप्रिल, 2008 पासून नियुक्ती केली आहे.

----------------

....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>विरोधी पक्ष नेता तसेच शिवसेना गट नेत्यांच्या नियुक्तीसंबंधी अभिनंदनपर भाषण</u>

श्री. आर.आर.पाटील ( उपमुख्यमंत्री ) : सभापती महोदय, या सदनामध्ये विरोधीपक्ष नेता म्हणून माननीय सदस्य श्री. पांडुरग फुंडकर तसेच शिवसेनेचे गट नेते म्हणून श्री. दिवाकर रावते यांची निवड झाल्याबद्दल मी अभिनंदन करतो.

या सदनातील कामकाज लोकाशाही पध्दतीने चालण्यासाठी तितक्याच जबाबदार विरोधी पक्षाची, विरोधी पक्ष नेत्यांची आवश्यकता असते. महाराष्ट्रातील बदललेल्या वातावरणात भारतीय जनता पार्टी पक्षामधून श्री. पांडुरंग फुंडकर यांची निवड झाल्याबद्दल अभिनंदन. ( थोडे थांबून ) भारतीय जनात पार्टीबद्ल काय बोलावे हे सूचत नव्हते. जर भारतीय जनता पक्षाची एकसंघता असेल तर या एकसंघतेला आमच्या शुभेच्छा आहे. हा एकसंघपणा असाच रहावा, ऑफ दि रेकॉर्ड, ऑन दि रेकॉर्ड जे आज वाचावयास मिळते, ठीक आहे तो तुमचा पक्षांतर प्रश्न आहे, तुम्ही कुस्त्या खेळल्या तरी तो तुमचा पक्षांतर प्रश्न आहे परंतु प्रेक्षक म्हणून आम्ही बघू, वाचक म्हणून आम्ही वाचू. महाराष्ट्राला याचीही आवश्यकता आहे. ती गरज बराच काळ आमच्या बाजूने भागवली जात होती परंतु ती बंद झाल्यानंतर ती उणीव कोणी तरी भरुन काढावयास पाहिजे. ठीक आहे. सत्तारुढ बाजूने माननीय विरोधीपक्ष नेत्यांची स्तुती केली किंवा आपल्या बद्दलची वस्तुस्थिती सांगितली तरी ती योग्य आहे. या सदनामध्ये अनेक वेळा सत्तेच्या माध्यमातून प्रश्न सोडवित असतांना काही गोष्टीकडे दुर्लक्ष होते, काही गोष्टी लक्षातही येत नाही, आणि नेमक्या त्याच बाबी, त्याच उणिवा लक्षात आणून देणे ही विरोधी पक्षाची प्रमुख जबाबदारी असते. माननीय फुंडकर साहेब शेतक-यांच्या प्रश्नासंदर्भात पोटतिडकीने यासदनात विचार मांडत असतात. आपली अनेक भाषणे सरकारला धोरणे घ्यावयास भाग पाडत असते व सरकारला मार्गदर्शन करणारी असतात.

सभापती महोदय, विधानपरिषद गट नेता म्हणून या ठिकाणी माननीय रावते साहेबांची निवड झालेली असल्यामुळे आता आपली जबादारी वाढलेली आहे.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ SBT/ MMP/ 13=15

श्री.आर.आर.पाटील .....

सभापती महोदय, एखादा सामान्य कार्यकर्ता म्हणून काम करीत असतांना कितीही आक्रमकतेने वागले तरी ते चालू शकते परंतु जसजशा मोठया पदावर निवड होत जाते तसतसा संयम अधिक वाढण्याची आवश्यकता असते. शांत व संयमाने सभागृहाचे कामकाज चालावे म्हणून ही अवघड जबाबदारी आपल्या पक्षाने आपल्यावर टाकलेली असावी असे मला वाटते.तसे पाहिले तर आपण मोकळेपणाने काम करीत आहात सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते अधिक चांगल्याप्रकारे काम करीत होते. कदाचित श्रेष्ठींना असे वाटले असावे की, या सभागृहामध्ये शांत आणि संयमी चर्चेची आवश्यकता आहे त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांच्यावर गट नेते पदाची जबाबदारी टाकू या म्हणूनच या सभागृहाचे कामकाज शांतपणे पार पाडण्याची जबाबदारी तुमच्या पक्षाने तुमच्यावर टाकलेली आहे असे मला म्हणावेसे वाटते. दोन्हीही अनुभव संपन्न नेत्यांचे मी स्वागत करतो परंतु आता आपल्याला शुभेच्छा कशा द्यावयाच्या हा माझ्या समोर प्रश्न आहे. याचे कारण असे की आपले काम प्रभावी व्हावे असे म्हणणे म्हणजे आमचे काय होईल हा सुध्दा प्रश्न निर्माण होईल. परंतु आपल्याला कमीत कमी त्रास होईल, कमीत कमी प्रश्न उपस्थित करावे लागतील या दृष्टीनेच आम्ही सत्ताधारी पक्षाच्या वतीने काम करीत राहू तुम्हीसुध्दा शांत आणि संयमाने कायमपध्दतीने काम करावे. या पदावर कोणी तरी आहे त्या व्यक्तीचे अस्तित्व दिसले पाहिजे त्याचबरोबर समोरच्या बाजूला बसलेल्या व्यक्तीला ओरखडे तर घेतले पाहिजे परंतु जखमा होणार नाही या पध्दतीने काम करावे. आतापर्यंत ज्या खेळीमेळीच्या वातावरणात आपले काम चालले आहे ते भविष्यात सुध्दा चालावे अशा प्रकारच्या भावना व्यक्त करुन आपल्याला शुभेच्छा देतो तसेच या सदनाचा नेता म्हणून सांगू इच्छितो की, महाराष्ट्राच्या विधान परिषदेने इतके चांगले काम करावे की देशातील विधान परिषदांना आपली विधान परिषद मार्गदर्शक व्हावी .अशा प्रकारे सगळयांनी चांगले काम करावे अशी अपेक्षा मी व्यक्त करतो. आज नऊ सन्माननीय सदस्यांचा शपथ विधी झालेला आहे त्यांचे देखील मी स्वागत करतो आणि आता पुढील कामकाज घेण्यात यावे अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो

-----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी : लेखी उत्तरे

मु.शी : तारांकित प्रश्नासंबंधी अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे

श्री.राणा जगजितसिंह पाटील (कृषी राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने " अमरावती जिल्हयामध्ये भेसळयुक्त व कमी दर्जाच्या रासायनिक मिश्र खतांची विक्री होत असल्याबाबत " या विषयावरील सर्वश्री जगदीश गुप्ता, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, सागर मेघे यांच्या दिनांक 8 एप्रिल 2008 रोजी उत्तरित झालेल्या तारांकित प्रश्न क्रमांक 39639 ची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : कृपया सोबत जोडलेली अधिक माहिती येथे छापावी )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राणा जगजितसिंह पाटील (कृषी राज्य मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने " पळाशी - सावरगाव (जि.औरंगाबाद) येथील रब्बीच्या पिकांना लागलेल्या कीड व रोगांमुळे शेतक-यांचे होत असलेले आर्थिक नुकसान " या विषयावरील सर्वश्री संजय दत्त, एस.क्यु.जामा. सुरेशदादा देशमुख, गोविंदराव आदिक, राजन तेली यांच्या दिनांक 8 एप्रिल 2008 रोजी उत्तरित झ ालेल्या तारांकित प्रश्न क्रमांक 37633 ची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : कृपया सोबत जोडलेली अधिक माहिती येथे छापावी )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामराजे नाईक निंबाळकर (जलसंपदा मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने " राज्यातील भूभाग पाण्याखाली जाऊ नये यासाठी अलमट्टी धरणामध्ये 509.016 मी. तलांकाचे वर पाणी साठा करु नये यासाठी नवीन कृष्णा पाणीतंटा लवादाकडे केलेल्या मागणीवर अंतिम निर्णय घेण्या बाबत " या विषयावरील प्रा.शरद पाटील, श्री.जयंत प्र.पाटील यांच्या दिनांक 15 मार्च 2007 रोजी उत्तरित झालेल्या तारांकित प्रश्न क्रमांक 24390 ची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस :कृपया सोबत जोडलेली अधिक माहिती येथे छापावी )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

25-04-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) II 5

VTG/ SBT/ MMP

पृ.शी . लेखी उत्तरे

मु.शी : अतारांकित प्रश्नोत्तराची 25 ते 34 यादी सभागृहासमोर ठेवणे

विशेष कार्य अधिकारी : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अतारांकित प्रश्नोत्तराची यादी क्रमांक 25 ते 31 मुद्रित स्वरुपात तसेच यादी क्रमांक 32 ते 34 अमुद्रित स्वरुपात सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अतारांकित प्रश्नोत्तराची यादी क्रमांक 25 ते 31 मुद्रित स्वरुपात तसेच यादी क्रमांक 32 ते 34 अमुद्रित स्वरुपात सभागृहासमोर ठेवण्यात आल्या आहेत.

( प्रेस : येथे सोबत जोडलेल्या याद्या छापाव्यात )

:

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे**

डॉ.सुनील देशमुख (संसदीय कार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग, नाशिक, धुळे, नंदूरबार, जळगाव, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली ,सोलापूर, कोल्हापूर, औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली ,बीड, नांदेड, उस्मानाबाद अमरावती, अकोला, बुलढाणा,, यवतमाळ, नागपूर, वर्धा, भंडारा ,गोदिंया व गडचिरोली या जिल्हा परिषदांचे सन 2006 -2007 चे वार्षिक प्रशासन अहवाल सभागृहासमोर ठेवते.

**सभापती** : वार्षिक प्रशासन अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

--

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे सन 2006-2007 या वर्षाचे (1) वित्तीय लेखे (2) विनियोजन लेखे (3) नागरी अहवाल (4) नागरी - शेतकरी पॅकेजेसचे कार्यसिध्द लेखापरीक्षण " (5) महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांचे व्यवस्थापन अहवाल व (6) महसुली जमा अहवाल सभागृहास सादर करतो.

**सभापती** : भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे सन 2006-2007 या वर्षाचे (1) वित्तीय लेखे (2) विनियोजन लेखे (3) नागरी अहवाल (4) नागरी - शेतकरी पॅकेजेसचे कार्यसिध्द लेखापरीक्षण " (5) महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांचे ि व्यवस्थापन अहवाल व (6) महसुली जमा अहवाल सभागृहास सादर करण्यात आले आहेत.

---

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राणा जगजितसिंह पाटील (उद्योग राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादितचा सन 2000-2001, 2001-02, 2002-03, व 2003-04 चा अनुक्रमे 24वा, 25वा, 26वा व 27वा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

***

**विधेयकांना संमती व अधिसंमती**

**सभापती** : विधान परिषदेने पारित केलेल्या विधेयकांना विधानसभेकडून संमती मिळाल्याची आणि दोन्ही सभागृहांद्वारे पारित केलेल्या विधेयकांना राज्यपालांची अधिसंमती मिळाल्याची यादी विशेष कार्याधिकारी वाचून दाखवतील.

विशेष कार्याधिकारी : **(अ) खालील विधेयके विधानसभेने कोणत्याही सुधारणेशिवाय परत केली**. ....

1) सन 2007 चे वि.प.वि.क्रमांक 13 - मुंबई महानगरपालिका (तात्पुरती सुधारणा) विधेयक, 2007.

2) सन 2008 चे वि.प.वि.क्रमांक 4 - मुंबई परगणा व कुळकर्णी वतने नाहीशी करण्याबाबत, मुंबई (समाजास उपयुक्त) सेवा इनामे रद्द करण्याबाबत, मुंबई विलीन प्रदेश किरकोळ दुमाला वहिवाटी नाहीशा करण्याबाबत, मुंबई गावची कनिष्ठ वतने नाहीशी करण्याबाबत आणि महाराष्ट्र मुलकी पाटील (पद रद्द करणे) (सुधारणा) विधेयक, 2008

3) सन 2008 चे वि.प.वि.क्रमांक 6 - मुंबई महानगरपालिका (दुसरी सुधारणा) विधेयक, 2008.

4) सन 2008 चे वि.प.वि.क्रमांक 8 - महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे यिमन करण्याबाबत) (सुधारणा) विधेयक, 2008.

5) सन 2008 चे वि.प.वि.क्रमांक 9 - मुंबई न्यायालय फी (सुधारणा) विधेयक, 2008.

...... जेजे 2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विशेष कार्याधिकारी .....

6) सन 2008 चे वि.प.वि.क्रमांक 10 - महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते आणि निवृत्तीवेतन (सुधारणा) विधेयक, 2008.

7) सन 2008 चे वि.प.वि.क्रमांक 11 - महाराष्ट्र उच्च न्यायालय (खंड न्यायपीठाद्वारे रिट अर्जांची सुनावणी व मुंबई येथील उच्च न्यायालयातील एकस्व पत्र अपिलांची पद्धती रद्द करणे) (सुधारणा) विधेयक, 2008.

8) सन 2008 चे वि.प.वि.क्रमांक 12 इ श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर विश्वस्तव्यवस्था (प्रभादेवी) (सुधारणा) विधेयक, 2008.

**(ब) खालील विधेयकांना राज्यपालांची अधिसंमती मिळाली.**

1) सन 2008 चे वि.स.वि.क्रमांक 5 - मुंबई मोटार वाहन कर; मोटार वाहने (उतारूंवर कर आकारणी); महाराष्ट्र शिक्षण व रोजगार हमी (उपकर); विजेच्या विक्रीवरील कर; राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर., कर अधिनियम(सुधारणा) आणि रोजगार हमी (सुधारणा); आणि मुंबई राज्य टंचाई निवारण निधी (निरसन) विधेयक, 2008.

2) सन 2008 चे वि.स.वि.क्रमांक 6 - महाराष्ट्र (पुरवणी) विनियोजन विधेयक, 2008.

3) सन 2008 चे वि.स.वि.क्रमांक 9 - महाराष्ट्र मूल्यवर्धित कर (सुधारणा) विधेयक, 2008.

4) सन 2008 चे वि.स.वि.क्रमांक 15 - महाराष्ट्र विनियोजन (लेखानुदान) विधेयक,2008.

***

..... जेजे 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**अनुसूचित जाती कल्याण समितीचा अहवाल सादर करणे.**

श्री. वसंतराव खोटरे (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अनुसूचित जाती कल्याण समितीचा सातवा अहवाल (2007-08) सभागृहाला सादर करतो.

**सभापती** : अनुसूचित जाती कल्याण समितीचा सातवा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

**अंदाज समितीचा अहवाल सादर करणे.**

श्रीमती मंदा म्हात्रे (समिती सदस्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अंदाज समितीचा सतरावा व अठरावा अहवाल सभागृहास सादर करते.

**सभापती** : अंदाज समितीचा सतरावा व अठरावा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

**अनुसूचित जमाती कल्याण समितीचा अहवाल सादर करणे.**

श्री. विलासराव शिंदे (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अनुसूचित जमाती कल्याण समितीचा सातवा अहवाल सभागृहाला सादर करतो.

**सभापती** : अनुसूचित जमाती कल्याण समितीचा सातवा अहवाल सभागृहास सादर झाला आहे.

**औचित्याच्या मुद्याबाबत अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे.**

डॉ.विजयकुमार गावित (आदिवासी विकास मंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने डॉ.दीपक सावंत, वि.प.स. यांनी दिनांक 25 जुलै 2007 रोजी "कुपोषित बालकांसाठी सिरपच्या जागी काही प्रमाणात माल्ट खरेदी केल्याबाबत " या विषयावर उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्यासंदर्भातील अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : औचित्याच्या मुद्यासंदर्भात अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

**अधिक माहिती**

( प्रेस : कृपया येथे सोबतची अधिक माहिती छापावी. )

( यानंतर सौ. रणदिवे....केके 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ SBT/ MMP/ पूर्वी श्री.सुंबरे . . . . 13:25

पृ.शी./मु.शी.: विनंती अर्ज समितीचा अहवाल सादर करणे

डॉ.एन.पी.हिराणी (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "अशासकीय अनुदानित तंत्रशिक्षण संस्थांतील शिक्षक (वर्ग आठवी ते दहावीला शिकविणारे) व शिक्षकेतर पदांना पाचव्या वेतन आयोगातील त्रुटी दूर करणे" या विनंती अर्जावरील विनंती अर्ज समितीचा अहवाल सादर करतो.

**सभापती** : विनंती अर्ज समितीचा अहवाल सादर करण्यात आला आहे.

----

पृ.शी./मु.शी.: नियम 93 अन्वये सूचना

**सभापती** : आज नियम 93 अन्वये फक्त एक सूचना प्राप्त झाली होती. पण मी ती दालनामध्ये नाकारली आहे.

----

. . . .2 के-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: औचित्याचे मुद्दे

**सभापती** : याठिकाणी पाच-सहा औचित्याचे मुद्दे आहेत. सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढीलप्रमाणे औचित्याचा मुद्दा मांडत आहे.

सभापती महोदय, काल विधान भवनासमोर ठाणे जिल्हयातील लोकप्रतिनिधींनी पाण्याच्या संबंधात उपोषण केले होते. खरे म्हणजे शासनाने वेळोवेळी असे जाहीर केलेले आहे की, आम्ही ठाणे येथील पाणी कपात कमी केलेली आहे. पूर्वी पाणी कपात 20 टक्के होती, ती आता 14 टक्क्यावर आणलेली आहे.पण आजही ठाणे जिहयामध्ये पाण्यासाठी मोठया प्रमाणात लोक वणवण फिरत आहेत. मग तो महानगरपालिकेतील भाग असो, नगरपालिकेतील भाग असो किंवा ग्रामीण भाग असो.त्यामुळे हा विषय पुढच्या दोन महिन्यामध्ये गंभीर स्वरुप धारण करणार आहे.या जिल्हयामध्ये सहा ते सात धरणे आहेत. त्यातील काही धरणांचे पाणी मुंबईला येते. एम.आय.डी.सी.च्या माध्यमातून देखील पाणी उपलब्ध होते. परंतु आज अशी स्थिती आहे की, ठाणे येथे जवळजवळ 36 टक्के पाणी कपात आहे.त्यामुळे आठवडयातील तीन दिवस पाणी मिळते आणि चार दिवस पाणी मिळत नाही अशी ठाणे जिल्हयामधील स्थिती आहे. या जिल्हयामध्ये होणारे वाढते नागरीकरण, वाढते शहरीकरण, औद्योगिकीकरण, वाढती लोकसंख्या असे यामध्ये सगळे विषय आहे. जर अशा परिस्थितीत वेळीच उपाययोजना केली नाही तर ही परिस्थिती सुधारणार नाही. शासनाच्या माध्यमातून पाणी कपात कमी केल्याचे जाहीर केले जाते, परंतु ती कमी होण्याऐवजी तेवढीच रहाते. सध्या ती वाढलेली आहे. त्यामुळे पुढच्या काळामध्ये पाण्याच्या टंचाई मुळे या जिल्हयात प्रचंड प्रमाणात अशांतता निर्माण होऊ शकते. संघर्ष होऊ शकतो अशा प्रकारची स्थिती ठाणे जिल्हयामध्ये निर्माण झालेली आहे. त्यामुळे ही वस्तुस्थिती औचित्याच्या मुद्याव्दारे शासनासमोर मांडत आहे. शासनाने याबाबत त्वरित कार्यवाही करावी. तसेच ठाणे जिल्हयातील एम.आय.डी.सी.चे अधिकारी, महानगरपालिका आणि नगरपालिकांचे प्रमुख आणि त्या भागातील लोकप्रतिनिधी यांची तातडीने बैठक बोलविण्यात यावी आणि या विषयाच्या संदर्भात तोडगा काढण्यात यावा अशी मी औचित्याच्या मुद्याव्दारे शासनाला विनंती करीत आहे.

----



APR/ SBT/ MMP/ 13:25

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभागृहासमोरील कामकाजाबाबत

**सभापती** : मी सभागृहातील सन्माननीय सदस्यांना एवढेच सांगू इच्छितो की, आज सभागृहासमोर जे कामकाज आहे, त्यामध्ये नियम 93 अन्वये निवेदन, लक्षवेधी सूचना, अंतिम आठवडा प्रस्ताव आणि अशासकीय ठराव आहेत. मला असे वाटते की, .. . . .

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मला असे वाटते की, दुपारी 2.30 वाजेपर्यंत कामकाजपत्रिकेवर जे विषय दाखविण्यात आले आहेत, ते घ्यावेत. त्यानंतर अर्धा तास ब्रेक घेऊन आणि मग दुपारी 3.00 वाजता अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेला सुरुवात करावी.

**सभापती** : सायंकाळी 5.00 ते 5.30 वाजेपर्यंत सभागृहाचे कामकाज संपावयास पाहिजे. या दृष्टीकोनातून मला असे वाटते की, आज नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनांच्या संबंधात जी निवेदने प्राप्त झाली आहेत, ती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात यावीत.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, आम्ही नियम 93 च्या निवेदनांवर एकेक प्रश्न विचारतो.

**सभापती** : आज आपल्यासमोर नियम 93 ची 32 निवेदने आहेत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आम्ही एकेक प्रश्न विचारतो.

**सभापती** : ठीक आहे. आजच्या कामकाजपत्रिकेवर ज्या लक्षवेधी सूचना दाखविण्यात आलेल्या आहेत, त्यातील लक्षवेधी क्र.4 पुढे ढकलण्यात आली आहे. मग दोन ते तीन लक्षवेधी सूचना शिल्लक रहातात. मला असे वाटते की, या लक्षवेधी सूचनांच्या संबंधात दोन-तीन प्रश्न विचारण्यात यावेत.

यानंतर कु.गायकवाड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** ...

शासकीय ठराव लॅप्स न करता ते पुढे ढकलण्यात येईल

सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. दिवाकर रावते ( विधानसभा सदस्यांद्वारा निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढीलप्रमाणे औचित्याचा मुद्दा मांडत आहे.

महाराष्ट्र शासनाच्या बाबत उच्च न्यायालयामधील मुद्दा मांडण्याचा मी प्रयत्न करीत आहे. सहारा भूखंडाबाबत वर्तमानपत्रामध्ये छापून आलेली सर्व बातमी मी वाचली. या सदनामध्ये या विषयासंबंधी चर्चा झालेली नाही. न्यायालयाच्या निर्णयानुसार जे भूखंड सोडून देण्यात आले आहेत अशा प्रकारचे निवेदन माननीय महसूलमंत्र्यांनी विधानसभेमध्ये केले होते. माननीय महसूल मंत्र्यांनी केलेले निवेदन असत्य असल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आलेले आहे. महसूल मंत्र्यांनी ॲडव्होकेट जनरल श्री. व्ही. एस. थोरात यांनी न्यायालयामध्ये असे सांगितले आहे की, माननीय महसूल मंत्र्यांनी जो निर्णय घेतला आहे त्यामध्ये चूक झालेली आहे. शासनाच्या वतीने अक्षम्य अशी चूक झालेली आहे.

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, माझी या बाबत हरकत आहे. जी प्रकरणे उच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ट असतात त्या प्रकरणांविषयी या सभागृहामध्ये चर्चा केली जाऊ नये.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आम्ही या प्रकरणाच्या मेरीटवर बोलत नाही. न्यायालयामध्ये जे शपथपत्र सादर केलेले आहे ते पब्लीक डॉक्युमेंट होते. त्याबाबत बोलण्याचा अधिकार सर्व नागरिकांना आहे. हे सर्व मी जाणीवपूर्वक बोलत आहे. शासनाच्या वतीने अत्यंत दुर्दैवी अशी घटना घडलेली आहे. राज्याचे ॲडव्होकेट जनरल श्री. बी.एस थोरात यांनी न्यायालयामध्ये असे सांगितले आहे की, महसूल मंत्र्यांची चूक झालेली आहे. लेखी स्वरुपात न्यायालयामध्ये सांगण्यात आले आहे. माननीय मंत्रीमहोदयांनी नसलेल्या गोष्टीच्या आधारावर निर्णय घेतला आहे, व भूखंड सोडला आहे. ही घटना मी आपल्यासमोर औचित्याच्या माध्यमातून मांडत आहे.

**( सभापतीस्थानी : माननीय उपसभापती )**

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी जो मुद्दा औचित्याच्या माध्यमातून मांडलेला आहे या संदर्भात मी सांगू इच्छितो की, हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. वर्तमानपत्रामध्ये जी बातमी आलेली आहे, ती त्यांच्या पक्षाच्या मुखपत्राच्या अनुषंगाने येथे मांडत आहेत. वकीलांनी उच्च न्यायालयामध्ये काय सांगितले आहे, ही वस्तुस्थिती सभागृहाला माहीत नाही. ही वस्तुस्थिती केवळ वर्तमानपत्राच्या आधारे मांडणे योग्य होणार नाही. तसेच येथे माननीय महसूल मंत्र्यांचा नामोल्लेख होणे बरोबर होणार नाही असा माझा हरकतीचा मुद्दा आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, कोणत्याही पक्षाच्या मुखपत्रामध्ये काय बातमी आली आहे हे सांगण्याचा अधिकार सन्माननीय सदस्यांना आहे की नाही हा वादाचा मुद्दा ठरू शकतो. पक्षाचे मुखपत्र व इतर वर्तमानपत्रामध्ये देखील ही बातमी छापून आली होती. मानीनय मंत्री महोदयांच्या बाबत काही गैर प्रकार घडला असेल तर तो विषय सभागृहामध्ये मांडण्याचा हक्क प्रत्येक सन्माननीय सदस्यांना आहे अशी माझी धारणा आहे. सहारा भूखंडाचे प्रकरण कित्येक दिवसांपासून गाजत आहे. या विषयाबाबत सभागृहात बोलणे हा सन्माननीय सदस्यांचा हक्क आहे. त्यामुळे हा औचित्याचा मुद्दा आपण फेटाळून लावावा.

या नंतर श्री. बरवड ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी या औचित्याच्या मुद्याव्दारे आजच्या वर्तमानपत्रात "सहारा भूखंडाच्या व्यवहारात चूक झाल्याची भर न्यायालयात कबुली" या मथळ्याखाली जी बातमी आलेली आहे तो विषय मांडला. त्यावर सन्माननीय सदस्यांनी हरकत घेतली आणि हे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे हा विषय सभागृहात मांडता येणार नाही असे सांगितले. मी याबाबतीत वकील म्हणून अतिशय जबाबदारीने सांगू इच्छितो की, एखादी गोष्ट ज्यावेळी कोर्टात सादर केली जाते आणि कोर्ट ती मान्य करुन घेते त्यानंतर तो विषय न्यायप्रविष्ट राहात नाही. ते पब्लिक डॉक्युमेंट होते. त्यावर चर्चा करण्याचा अधिकार लोकांना राहतो. एखादा साक्षीदार तपासावयाचा असेल, एखादे कागदपत्र कोर्टासमोर गेलेले नसेल, एखाद्या गोष्टीचा पुरावा कोर्टासमोर आला नसेल तर अशा गोष्टीवर कोर्टाच्या व्यतिरिक्त बाहेर चर्चा करता येत नाही. सन्माननीय सदस्यांनी एवढेच सांगितले की, राज्याचे ॲडव्होकेट जनरल यांनी कोर्टात चूक झाली हे मान्य केले. त्यावर न्यायाधीशांनी सांगितले की, आपण जे म्हणत आहात ते लेखी स्वरुपात चार आठवड्यात द्यावे आणि त्याला रिजॉईन्डर म्हणून पुन्हा पक्षकारांचे काय म्हणणे आहे ते देखील त्यानंतर दोन आठवड्यांनी द्यावे. त्यामुळे त्यांनी जे तोंडी सांगितले ते न्यायालयाने सकृतदर्शनी मान्य करुन लेखी स्वरुपात मागितलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी यासंदर्भात कोणतीही चुकीची किंवा आक्षेपार्ह टिप्पणी केलेली नाही तसेच कोणाचेही नाव घेतलेले नाही. वर्तमानपत्राच्या आधारावर सन्माननीय सदस्य बोलत आहेत असा हरकतीचा मुद्दा सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी उपस्थित केलेला आहे. वृत्तपत्रे हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे. या सभागृहातील अर्ध्यापेक्षा अधिक प्रश्न, अर्ध्यापेक्षा अधिक चर्चा वर्तमानपत्राच्या माध्यमातूनच होत असतात. त्यामुळे वर्तमानपत्राच्या माध्यमातून एखाद्या गोष्टीची चर्चा करु नये हा हरकतीचा मुद्दा चुकीचा आहे.

**उपसभापती** : मी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकलेले आहे. मी या ठिकाणी माझा निर्णय देतो. एखाद्या प्रकरणाच्या बाबतीत जर न्यायालयीन प्रक्रिया चालू असेल मग ती कोणत्याही स्टेजला असली तरी ती न्यायप्रविष्ट बाब आहे असेच आपण म्हणतो. त्यामुळे सदरची बाब आता सभागृहात उपस्थित करता येणार नाही.

---

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

डॉ. नीलम गोऱ्हे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. गेले दोन दिवस वाहिन्यांवरुन सातत्याने चर्चा चाललेली आहे आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी सभागृहामध्ये जाता जाता उल्लेख केला होता की, क्रिकेट सामने चालू असताना काही अश्लील नृत्ये दाखवली जात असतात. चिअर्स गर्ल्सच्या संदर्भामध्ये निर्णायकपणाने आम्हाला सभागृहात उत्तर मिळाले नव्हते. त्यानंतर आम्ही सन्माननीय गृह राज्यमंत्र्यांचे असे निवेदन वाहिन्यांवरच ऐकले की, यावर आम्ही बंदी आणणार आहोत. म्हणून या औचित्याच्या मुद्याव्दारे मी मागणी करते. क्रिकेटबद्दल सगळ्या जनतेचे प्रेम योग्य आहे आणि त्यातून बऱ्याचशा चांगल्या गोष्टी घडत असतात परंतु त्या निमित्ताने या चिअर्स गर्ल्सचा जो सगळा उपक्रम आपण आणलेला आहे त्याबाबत सांगू इच्छिते की, प्रत्येक जागतिकीकरणाबद्दलच्या त्यांच्या पध्दती आपण घेतल्याच पाहिजेत असे नाही. म्हणून क्रिकेटच्या या सामन्यांच्या संयोजकांना क्रिकेटच्या सामन्यांबरोबर या नृत्यांना परवानगी दिलेली असेल तर ती परवानगी आपण काढून घ्यावी. क्रिकेटचे सामने जरुर खेळू शकतात परंतु चिअर्स गर्ल्स हा प्रकार महाराष्ट्रामध्ये होऊ नये यादृष्टीने औचित्याच्या मुद्याव्दारे मी आपले लक्ष वेधत आहे. माननीय गृह राज्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. त्यांनी कृपया आम्हाला याबाबत सांगावे.

**उपसभापती** : चिअर्स लिडर्सच्या संदर्भामध्ये मला स्वत:ला माहीत नव्हते. मी काल ते पाहिले. परंतु सन्माननीय सदस्यांनी हा जो मुद्दा मांडला तो खरोखरच गांभीर्याने तपासणे अत्यंत आवश्यक आहे. महाराष्ट्रच नव्हे तर भारतामध्ये देखील, आपण इतके संस्कृतीप्रधान लोक आहोत की, स्त्री ही परदेशस्थ आहे की देशस्थ आहे हे महत्वाचे नसून स्त्रियांचा आपण नेहमीच आदर केलेला आहे. स्त्रियांकडे आपण माता, भगिनी या सगळ्या संदर्भात पाहिलेले आहे. त्यांचे असे उघडेनागडे चित्रण संपूर्ण जनतेसमोर करणे हे शोभादायक नाही असे माझे स्पष्ट मत आहे. त्यांना जर मनोरंजनच करावयाचे असेल तर आपल्याकडे ढोल, लेझीम, तुतारी असे सगळे चांगले प्रकार आहेत, त्यांना परवानगी दिली तर आपण मान्य करु शकतो. परंतु क्रिकेट हा खेळ इतका लोकप्रिय

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MMP/

**उपसभापती** ......

आहे की, त्याकरिता या गोष्टींची आवश्यकताच नाही. त्यामुळे ते परवानगी देऊन करावे किंवा नाही यापेक्षा त्याला परवानगी देऊच नये या मताचा मी आहे. जर आपण भारतीय संस्कृतीची काही तरी कदर करणार असू किंवा आब राखणार असू तर अशा प्रकाराला आपण परवानगी देखील देऊ नका अशी माझी सूचना आहे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती**....

त्यांना परवानगी देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. एकीकडे आदरणीय उपमुख्यमंत्री महोदयांनी महाराष्ट्रातील, विशेषत: मुंबईतील डान्सबार बंद केले आहेत. त्याच्यापेक्षा भयानक प्रकार लोकांसमोर दाखविले जात आहेत.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, आपल्या निदेशाप्रमाणे....

**उपसभापती** : मंत्रिमहोदयांना मी निदेश देत नाही, त्यांना माझी सूचना आहे. कारण निदेश या शब्दाचे विडंबन होते. मंत्रिमहोदयांनी दुसरा कोणताही शब्द वापरावा, परंतु निदेश असे म्हणू नये.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : आदरणीय सभापतींनी निदेश दिल्याप्रमाणे....

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण हल्ली कोणाच्या दबावाखाली आहात काय ? आपण निदेश हा शब्द वापरत नाही.

**उपसभापती** : शासनाला 'निदेश' या शब्दाची ॲलर्जी आहे. त्यामुळे मी असे म्हटले आहे.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, आपण केलेल्या सूचनेप्रमाणे ही संपूर्ण बाब तपासून घेण्यात येईल.

**उपसभापती** : यामध्ये तपासण्यासारखी कोणती बाब आहे ? सगळे लोक उघडया डोळयाने पहात आहेत. मंत्रिमहोदयांनी एक गोष्ट लक्षात घ्यावी. सभागृहामध्ये सन्माननीय सदस्य बोलतात ती बाब खरी आहे असे मानले जाते. टी.व्ही.वरुन मॅचच्या वेळी जे काही दाखविले जाते ते आपण पाहिले नाही काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, मी पाहिलेले नाही.

श्री.दिवाकर रावते : मंत्रिमहोदय, काय तपासणार, कपडे ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सन्माननीय सदस्यांनी माझे म्हणणे पूर्ण होऊ द्यावे. त्यांचे जे नृत्य चालू आहे ते राज्य सरकारच्या कोणत्या नियमाखाली, कायद्याखाली बंद करता येईल ते तपासून पाहिले जाईल असे मी म्हटले होते.

------

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, सभागृहात सन्माननीय गृह राज्यमंत्री उपस्थित आहेत. त्यांच्यासमोरच मी माझा औचित्याचा मुद्दा मांडत आहे. नागपाडा पोलीस हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी येणा-या पोलिसांसंबंधीचा हा मुद्दा आहे. आजपर्यंत पोलीस लोकांकडून पैसे घेतात असे ऐकले होते. परंतु त्याठिकाणी वेगळी गोष्ट निदर्शनास आलेली आहे. त्या हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी येणा-या पोलिसांची लूट होते आहे. पोलीस शल्य चिकित्सक हे पद रिक्त आहे. आपले खाते या पदाच्या नियुक्तीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे. तेथे एकच वैद्यकीय अधिकारी मागील 2-3 वर्षापासून कार्यरत आहेत. त्यांच्याकडेच या पदाचा चार्ज आहे. त्यांची तीन वर्षानंतरही बदली झालेली नाही. त्या हॉस्पिटलमध्ये चाचण्या होत नाहीत, सर्व चाचण्या करण्यासाठी बाहेर जावे लागते. त्यांच्याकडून उपचारासाठी पैसे घेतले जातात. याबाबत अनेक वेळा वर्तमानपत्रातून बातमी छापून आलेली आहे. पोलिसांवर दिवसेंदिवस मानसिक ताण वाढत आहे. डयूटीमध्ये वाढ होत आहे. त्याठिकाणी पोलिसांना खर्च करावा लागतो हा प्रकार निंदनीय आहे. पोलीस शल्य चिकित्सक हे पद किती दिवसामध्ये भरले जाणार आहे याबाबत मंत्रिमहोदयांनी खुलासा करावा अशी विनंती या औचित्याच्या मुद्याद्वारे करु इच्छितो.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी औचित्याच्या मुद्याद्वारे पोलिसांच्या हॉस्पिटलचा मुद्दा उपस्थित केला आहे. त्याबाबतची सविस्तर माहिती मागविण्यात येईल त्यामध्ये दोष आढळला तर कारवाई करण्यात येईल.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : यानंतर सन्माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्रीमती उषा दराडे : सभापती महोदय, मी खालील सार्वजनिक महत्वाच्या तातडीच्या विषयावर औचित्याचा मुद्दा मांडत आहे.

"सर्वोच्च न्यायालयाच्या निवाडयाच्या आधारे मराठवाडा श्रमिक संघटनेने बीड जिल्हयातील 99 वन कामगारांना कायम स्वरुपी सेवेत सामावून घ्यावे अशी वारंवार मागणी केली आहे. या विषयाची तक्रार युएलपी क्रमांक 422/90, 98/90, 27/91 अंतर्गत दिलेल्या न्यायालयीन निर्णयाची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने शासन परित्रक सामान्य प्रशासन विभाग 18/11/96 अन्वये गठित केलेल्या सचिव समितीने प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर केला. सदर शिफारशीस अनुलक्षून मंत्रिमंडळासमोर सादर करावयाच्या प्रस्तावास सामान्य प्रशासन विभागाने सहमती दर्शविली आहे. तर वित्त विभागास प्रस्ताव सादर केला असता वित्त विभागाने शासन सेवेत घेण्यासाठी अधिसंख्य वन मजुरांची पदे निर्माण करण्याबाबत निर्णय घेता येईल का याबाबत, त्यास अनुलक्षून शासकीय अधिवक्ता यांचे अभिमत घेण्यात आले. या प्रकरणी वित्तीय बोजा अपेक्षित असल्याने प्रस्ताव वित्त विभागास सादर केला.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 13:45

(श्रीमती उषाताई दराडे ....)

या प्रश्नासंबंधी मी या अधिवेशनामध्ये तारांकित प्रश्न विचारला होता त्यावेळी हा प्रस्ताव कॅबिनेट पुढे ठेवू आणि कामगारांना कायम करण्याचा निर्णय घेऊ असे माननीय वन मंत्र्यांनी सांगितले होते. तथापि, बीड जिल्हयामध्ये 1 एप्रिल पासून एमआरईजीएस सुरु झाली आहे. त्यामध्ये 1 एप्रिल पासून हजेरी पत्रक संरक्षक मजूर म्हणून भरता येणार नाही व ग्रामपंचायतीमध्ये आपले नाव नोंदवा अशी नोटीस एस.पी.जयकर, वनक्षेत्रपाल अधिकारी, दारुर जिल्हा बीड यांनी व्यंकटी भाऊ मुंडे यांना देणे यामुळे या वन कामगारांमध्ये असंतोष निर्माण झालेला आहे. प्लॅनमध्ये कायमस्वरुपी करण्याचा निर्णय झाल्यानंतर सुध्दा अशा पध्दतीने एमआरईजीएसमध्ये नाव टाका अशी जी पत्रे गेलेली आहेत त्याची वन विभागाने ताबडतोब दखल घेऊन आश्वासन दिल्याप्रमाणे 99 वन कामगारांना कायम करावे अशी मी औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाला विनंती करीत आहे.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये शिवजयंती आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहाने साजरी करण्याची परंपरा आहे. मी नियम 93ची एक सूचना दिली होती. मुंबईतील कुलाबा येथे केन्द्र शासनाची वेधशाळा आहे. या वेधशाळेमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी करण्याचा मानस तेथील अधिकारी आणि कर्मचा-यांनी व्यक्त केला आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यासाठी त्या ऑफीसच्या अधिका-याला बोलावले असता तो दाक्षिणात्य अधिकारी पुष्पहार अर्पण करण्यासाठी आला नाही. इतकेच नाही तर तो असे म्हणाला की, हा तुमचा लोकल कार्यक्रम आहे, छत्रपती शिवाजी महाराज कोण आहेत, त्यांना मी ओळखत नाही, हा स्थानिक राजकारणाचा भाग आहे, मी काही येणार नाही. त्यानंतर 14 तारखेला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती तेथील कर्मचारी आणि अधिका-यांनी साजरी करण्याचा मनोदय व्यक्त केला आणि पुन्हा त्या संबंधित अधिका-याने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यास नकार दिला. अशा प्रकारचा हा केन्द्र शासनाचा अधिकारी महाराष्ट्रात बसतो. हा अधिकारी महाराष्ट्राच्या अस्मितेला नख लावतो. ज्यांना संपूर्ण महाराष्ट्र आपले दैवत मानतो अशा छत्रपती शिवाजी महाराजांना मी ओळखत नाही असे म्हणतो, ते स्थानिक राजकारण आहे अशी संभावना करतो, अशा अधिका-यावर काय कारवाई करणार असे मी विचारले होते. हा केन्द्र शासनाच्या कार्यालयातील अधिकारी असला तरी त्याने महाराष्ट्राच्या अस्मितेला नख लावण्याची हिंमत करता कामा नये. मी या विषयासंबंधी 10 एप्रिल 2008 रोजी नियम 93ची सूचना दिली होती. आज 25 तारीख असून त्यासंबंधीचे निवेदन आलेले नाही. हा विषय सामान्य प्रशासन विभागाशी संबंधित आहे की, सांस्कृतिक खात्याशी संबंधित आहे की गृह विभागाशी संबंधीत आहे या बाबतीत कदाचित संभ्रम असल्यामुळे त्याचे उत्तर आजतागायत आले नाही. म्हणून मी हा विषय

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

औचित्याच्या मुद्याद्वारे येथे मांडलेला आहे. तेव्हा ज्या दाक्षिणात्य अधिका-याने छत्रपती शिवप्रभूंचा आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अवमान केला त्या अधिका-याला शासनाने जाब विचारावा अशी मी विनंती करतो.

**उपसभापती** : या प्रकरणी संबंधितांना पत्र गेलेले असले तरी सुध्दा शासनाने याबाबतीत त्वरित विचारणा करावी.

श्री. गणेश नाईक (पर्यावरण व कामगार मंत्री) : होय.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. मौजे राहनाल, हळवेपाडा, ता. भिवंडी, जिल्हा ठाणे येथील आदिवासी दलित, भटके, विमुक्त आणि ओ.बी.सी. समाजाच्या तेथील रेल्वेच्या जागेत असलेल्या 335 झोपड्या दिनांक 26.5.2005 रोजी कोणतीही पूर्वसूचना न देता हटविण्यात आल्या. तेव्हा तेथेच पुनर्वसन करण्यात यावे यासाठी तेथील जनतेने आंदोलन, धरणे, मोर्चा इत्यादी द्वारे शासन दरबारी मागणी केली होती. त्यानंतर या प्रकरणी विधान परिषदेमध्ये चर्चा देखील उपस्थित करण्यात आली होती.

या नंतर श्री. गिते.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ SBT/ MMP/ प्रथम श्री.शिगम 13:50

श्री.रामनाथ मोते...

त्यावर उत्तर देतांना माननीय मंत्री महोदयांनी झोपडीधारकांचे पर्यायी जागेत पुनर्वसन करण्यात येईल असे आश्वासन दिनांक 24 मार्च, 2006 रोजी दिले होते. मात्र अजूनही या लोकांचे पुनर्वसन करण्यात आले नाही. दिनांक 27.2.2007 रोजी माननीय महसूल राज्यमंत्री महोदय यांच्याकडे बैठक आयोजित करण्यात आल्याबाबतचे पत्र श्रमजीवी संघटनेला पाठविण्यात आले होते. मात्र सदर बैठक काही कारणास्तव रद्द करण्यात आली. त्यानंतर आजपर्यंत बैठक आयोजित करण्यात आली नाही. परिणामी गोर-गरीब जनतेमध्ये शासनाविषयी चुकीचा संदेश जात आहे. तो जाऊ नये यासाठी झ ोपडीधारकांच्या पुनर्वसनाबाबत बैठक आयोजित करुन पुनर्वसन योजना जाहीर करावी जेणेकरुन गोर-गरीब जनतेला दिलासा मिळू शकले. या सार्वजनिक दृष्टया महत्वाच्या विषयावर विशेष उल्लेखाची सूचना दाखल करीत आहे.

सभापती महोदय, शासनाने याबाबतीत सत्वर दखल घ्यावी अशीही विनंती या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून करतो.

डॉ. राजेंद्र शिंगणे: सभापती महोदय, या विषयांच्या संदर्भात लवकरच बैठक घेण्यात येईल आणि पुनर्वसनाचे काम मार्गी लावले जाईल.

-------------

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>पॉईंट ऑफ इन्फर्मेशनसंबंधी</u>**

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, शेळी-मेढी व्यवसायाला उद्योगाचा दर्जा देण्यात येईल यासंबधी अधिवेशन संपण्यापूर्वी निर्णय घेतला जाईल अशा प्रकारचे आश्वासन शासनाने दिले आहे. आज अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे. शासनाने यासंबंधी अजूनपर्यंत काहीही निर्णय जाहीर केलेला नाही. म्हणून शासनाला यासंबंधी ताबडतोब जी.आर.काढण्यासंबंधी आपण आदेश द्यावेत अशी माझी विनंती आहे.

**उपसभापती** : ठीक आहे.

---------

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



ABG/ SBT/ MMP/ प्रथम श्री.शिगम 13:50

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, विधानपरिषद आणि विधानसभेच्या सदस्यांना मुंबई येथे वास्तव्यासाठी आमदार निवासातील सदनिका देण्यात आलेल्या आहेत. गेल्या सात वर्षापासून मी या सदनाचा सदस्य आहे. काही सन्माननीय सदस्यांना आमदार निवासातील तीन-तीन, चार-चार सदनिका दिलेल्या आहेत आणि काही सदस्यांना फक्त एकच सदनिका दिलेली आहे. मला देखील एकच सदनिका दिलेली आहे. ब-याच आमदारांनी जबरदस्तीने सदनिका आपल्या ताब्यात घेऊन ठेवलेल्या आहेत. ज्यांच्याकडे जास्त सदनिका आहेत त्यांच्याकडून सदनिका काढून घ्याव्यात आणि ज्या सदस्यांना एक सदिनका दिलेली आहे, त्यांना दुसरी एक सदनिका उपलब्ध करुन देण्यात यावी यासंबंधी आपण निर्देश द्यावेत अशी माझी विनंती आहे.

**उपसभापती** : ही बाब माननीय सभापतीच्या अखत्यारितील आहे. आपली अडचण मी माननीय सभापतींच्या निदर्शनास आणून देईन आणि हा विषय पुढील अधिवेशनात उपस्थित करण्याची वेळ येऊ देणार नाही याची दक्षता घेईन.

--------------

4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## <u>नियम 93 ची निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवणे.</u>

**उपसभापती** : आज नियम 93 ची निवेदने 45 आहेत. निवेदनाची संख्या खूप मोठी आहे. या निवेदनाच्या बाबतीत काय करावयाचे याबाबत आपणच मला मार्गदर्शन करावे.

श्री. जयंत प्र.पाटील : प्रत्येक निवेदनावर एक-एक मिनिटे चर्चा करु.

**उपसभापती** : मी माननीय विरोधी पक्ष नेत्यांना विचारु इच्छितो की, या निवेदनाच्या बाबतीत काय करावयाचे ?

डॉ.दीपक सावंत : सदर निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात यावीत.

श्री. पांडुरंग फुंडकर : ही निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात यावीत.

**उपसभापती** : ठीक आहे.

-------------

5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 ची निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

विशेष कार्य अधिकारी : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने आज प्राप्त झालेली नियम 93 च्या सूचनेवरील निवेदन क्रमांक 1 ते 45 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहेत.

( प्रेस : येथे सोबत जोडलेली क्रमांक 1 ते 45 ही निवेदने कृपया छापावीत. )

---------

6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ. शी.** : अवेळी झालेल्या पावसामुळे वीटभट्टयांचे झालेले नुकसान

**मु. शी.** : अवेळी झालेल्या पावसामुळे वीटभट्टयांचे झालेले नुकसान यासंबंधी श्री. गुरुनाथ कुलकर्णी,श्रीमती मंदा म्हात्रे,सर्वश्री.भास्कर जाधव, प्रतापसिंह मोहिते पाटील,जितेंद्र आव्हाड,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्रीमती मंदा म्हात्रे ( विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

" राज्यात विशेषत: कोकणातील सिंधुदूर्ग, रत्नागिरी व रायगड जिल्हयातमार्च व एप्रिल,2008 या महिन्यात पडलेला अवेळी मुसळधार पाऊस, या पावसामुळे कोकणातील विटभट्टयांचे झालेले कोटयावधी रुपयाचे नुकसान, सिंधुदूर्ग जिल्हयातील विटभट्टया पूर्णपणे वाहून जाऊन विटभट्टया व्यावसायिकांचे झालेले लाखो रुपयांचे नुकसान, शासनाने या संदर्भात अद्यापही नुकसानीची पाहणी नकरणे, त्यामुळे तेथील शेतकरी वव्यावसायिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष व चिंतेचे वातावरण, शासनाने या संदर्भात झालेल्या नुकसानाची चौकशी करुन शेतकऱ्याना व विटभट्टया व्यावसायिकांना मदत करण्याची तेथील शेतकरी व लोकप्रतिनिधींनी केलेली मागणी, विटभट्टया व्यावसायिकांना बँकेकडून कर्ज मिळवून देण्याबाबत तसेच शासनाने इतर माध्यमातून मदत करुन विटभट्टया पूर्ववत सुरु करण्याबाबत केलेली वा करावयाची उपाययोजना "

डॉ.राजेंद्र शिंगणे ( महसूल राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

7...



श्रीमती मंदा म्हात्रे : राज्यात अवेळी पाऊस पडल्यामुळे विटभट्टयांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे. शासनाच्या निकषाप्रमाणे विटभट्टी व्यावसायिकांना आर्थिक मदत देण्यात येत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नाही असे निवेदनात म्हटले आहे. कोकणात विटभट्टया शेतक-यांच्या आहेत. त्यामुळे विटभट्टी व्यावसायिकांना नुकसान भरपाई देण्यासाठी विशेष तरतूद करण्यात येऊन सदर व्यावसायिकांना नुकसान भरपाई देण्यात येईल काय ? निकषाप्रमाणे नुकसान भरपाई दिली जाते, त्या निकषामध्ये विटभट्टी व्यावसायिकाचा समावेश करण्याबाबतीत शासन निर्णय घेईल काय ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : राज्यात ज्या ज्या वेळी नैसर्गिक आपत्ती आली, त्या त्या वेळी विटभट्टी व्यावसायिकांना नुकसान भरपाई दिली गेलेली नाही. सी.आर.एफ.च्या निकषामध्ये विटभट्टी व्यावसायिक बसत नाहीत त्यामुळे त्यांना मदत दिली जात नाही. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे या विभागातील विटभट्टया शेतक-यांच्या आहेत काय ही बाब तपासून घेण्यात येईल. मंत्रिमंडळाची उप समिती आहे, त्या समिती समोर विटभट्टी व्यावसायिकांच्या नुकसान भरपाईचा विषय ठेवला जाईल आणि सकारात्मक निर्णय घेण्याचा प्रयत्न केला जाईल.

श्री. विक्रम काळे : अतिवृष्टीमुळे कोकणात आंबा पिकाचे नुकसान झाले आहे. त्याप्रमाणे मराठवाडयात देखील अतिवृष्टीमुळे द्राक्ष पिकाचे प्रचंड नुकसान झाले आहे. याबाबतीत सर्व्हे करुन मराठवाडयातील नुकसानग्रस्त शेतक-यांना नुकसान भरपाई दिली जाईल काय ?

डॉ.राजेंद्र शिंगणे: हा प्रश्न विटभट्टी व्यावसायिकांचे झालेले नुकसान यासंदर्भातील आहे. परंतु अवेळी झालेल्या पावसामुळे मराठवाडयात द्राक्ष पिकाचे नुकसान झाले आहे काय याबाबतीत कृषि विभागाकडून पाहणी केली जाईल आणि त्यासंदर्भात अहवाल प्राप्त झाल्यानंतर निकषाप्रमाणे मदत करण्यात येईल.

-------------

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MMP/ SBT/ MMP/ SBT/ 13:55

**पृ. शी.** : अलिबाग तालुक्यातील कमळपाडा येथील स्वजलधारा योजनेतून होणारा पाणीपुरवठा

**मु. शी.** : अलिबाग तालुक्यातील कमळपाडा येथील स्वजलधारा योजनेतून होणारा पाणीपुरवठा यासंबंधी श्री. जयंत प्र.पाटील ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. जयंत प्र.पाटील ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील कमळपाडा (शहाबाज) येथे रुपये २ कोटीची स्वजलधारा पाणीपुरवठा योजना कार्यान्वित होऊन या योजनेतून फुकट पाणी न मिळाल्याने दिनांक १६ मार्च २००८ रोजी ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीवर गावच्या पंचानी प्रभाग क्रमांक २ मध्ये बहिष्कार टाकणे, ज्या पंचानी असा निर्णय घेतला त्यांनी मात्र आपल्या मर्जीतील ३ उमेदवार दुसऱ्या प्रभागातून या प्रभागासाठी उमेदवार म्हणून उभे करणे, पंचाच्या बहिष्काराच्या निर्णयाविरुध्द या प्रभागात एकूण ७ उमेदवारांनी अर्ज दाखल करणे, त्यांच्याविरुध्द बहिष्कार टाकून त्यांना वाळीत टाकण्याचा निर्णय पंचानी घेणे, पंचानी ज्या उमेदवारांना वाळीत टाकले त्यापैकी श्री.दिवाकर गोपाळ पाटील यांनी दिनांक २३ मार्च २००८ रोजी तुकाराम बीज उत्सवानिमित्त दिनांक २२ मार्च २००८ रोजी सार्वजनिक गावकीच्या भांड्यांची मागणी केली असता त्यास तुम्हाला वाळीत टाकले आहे असे सांगून भांडी देण्यास पंचानी नकार देणे, तसेच दिनांक २२ मार्च २००८ रोजी पंचांकडील लोकांनी वाळीत टाकलेल्या लोकांच्या घरावर दगडफेक करुन नवरात्र उत्सव मंडळाच्या मंडपासह सुमारे १५ घरांचे मोठ्या प्रमाणात नुकसान करणे, परिणामी तेथील परिसरात दहशतीचे वातावरण, पंचांच्या या अन्याय वागणुकीबाबत त्यांचेविरुध्द कारवाई होण्याची आवश्यकता व या प्रकरणी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

"

श्री. रणजित कांबळे ( पाणीपुरवठा व स्वच्छता राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, ही लक्षवेधी पाणीपुरवठयाची नाही. मोफत पाणी पाहिजे म्हणून तेथील ग्रामस्थ निवडणुकीवर बहिष्कार टाकतात. 70 टक्के गावकऱ्यांनी पाणीपट्टी भरावयाला तयार आहे असे सांगितले. त्यांनी निवडणुका लढविल्या. निवडणुकीमध्ये मारहाणीचे प्रकार घडले. ही लक्षवेधी खरे पाहता गृहखात्याशी संबंधित आहे. पण पाणीपुरवठा मंत्री उत्तर देत आहेत. तेथे मारामारी झालेली आहे. गावातील लोक पाणीपट्टी भरण्यासाठी तयार आहेत. पाणीपुरवठा योजना चालू ठेवावी लागते. गावामध्ये दहशतीचे वातावरण आहे. पाणीपट्टी भरु नये म्हणून सांगतात. याठिकाणी पोलीस कारवाई होईल काय आणि पाणीपट्टी भरतात त्यांना संरक्षण मिळेल काय ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली माहिती ही खरी आहे. पाणी फुकटात द्या अशी काही ग्रामस्थांची मागणी होती. त्यांची मागणी अशी होती की नवीन योजना आहे त्याचे पाणी सार्वजनिक विहिरीमध्ये सोडून द्या आणि त्यानंतर तेथून आम्ही पाणी घेणार त्यामुळे बिल देण्याची गरज नाही. यासंदर्भात तक्रार केली आणि ग्रामस्थांनी सांगितले की आम्ही निवडणुकीवर बहिष्कार टाकू. त्याच्यामध्ये श्री. दिवाकर पाटील ही व्यक्ती होती त्याच्या गटाने नॉमिनेशन भरले आणि निवडून आले. त्यानंतर त्या गावामध्ये पाच लोक होते त्यांनी भांडीकुंडी घेण्यासाठी विरोध केला. त्यामध्ये बहिष्कार टाकणार, बोलणार नाही, मदत घेणार नाही असे सांगितले. 22 मार्च रोजी सार्वजनिक स्वरुपाचे काम होते त्याठिकाणी श्री.दिवाकर पाटील यांच्या गटाने पंचांच्या सामानाला लॉक टाकून दगडफेक केली आणि तेथे वाद निर्माण झाला. लूटमार झाली. घटनास्थळी ताबडतोब पोलीस आले त्यामध्ये जवळपास 76 लोकांना अटक करण्यात आली. त्यांच्यावर 141, 143, 147, 149, 324 आणि 420 अशी कलमे लावण्यात आली आहेत. 60 लोकांवर 110 कलम लावण्यात आले आहे. मूळ वाद आहे तो फुकट पाणी देण्यासंबंधीचा आहे.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, पाणीपट्टी भरली गेली पाहिजे. ते महत्वाचे काम आहे. तेथील लोकांचे मी प्रबोधन करतो. मंत्रीमहोदयांनी निवेदनामध्ये म्हटले आहे की तक्रारी प्राप्त झाल्या नाहीत.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, दोन तक्रारी आल्या होत्या. एक तक्रार जिल्हाधिकाऱ्यांकडे 13.2.08 रोजी आणि दुसरी तक्रार14.3.8 रोजी पोलीस स्टेशनला दिली.

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MMP/ SBT/ SBT/ MMP/ 14:00

लक्षवेधी सूचना क्रमांक-2...........

श्री.जयंत प्र.पाटील : निवेदनात म्हटले आहे की, जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार प्राप्त झाली नाही. चार बैठका झाल्या. तीन बैठकांना मी उपस्थित होतो. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी पाच बैठका घेतल्या. एका गटाचा आग्रह कायम आहे की, एमआयडीसीने मोफत पाणी द्यावे. शासनाने मोफत पाणी देण्याचा निर्णय घेतला असेल तर मी स्वागत करतो. परंतु शासन मोफत पाणी देऊ शकत नाही. त्यादृष्टीने जे पाणीपट्टी भरतात, योजना चालू रहावी म्हणून आग्रह धरतात त्यांच्याबाबत अडथळे आणले जातात त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे. 30 टक्के लोकांना मोफत पाणी हवे आहे, परंतु 70 टक्के लोक पाणीपट्टी भरण्यास तयार आहेत. त्यांना संरक्षण देणार आहात काय?

श्री.रणजित कांबळे : शासनाचे मोफत पाणी देण्याचे धोरण नाही. पाणी हवे असेल तर पाणीपट्टी भरणे बंधनकारक आहे. त्याशिवाय पाणी दिले जाणार नाही. दोन गटामध्ये भांडण झाले. एका गटाने रुमला लॉक लावले.......

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मंत्रीमहोदय चुकीचे बोलत आहेत. मी त्या गावाशेजारी राहतो. मी रोज त्या गावात जात असतो. चुकीची माहिती रेकॉर्डवर आणून कसे चालेल? या प्रश्नाबाबत मागील वर्षभर बैठका घेतल्या जात आहेत. आमदार या नात्याने मी स्वत: बैठक घेतली आहे. या सभागृहाचा सदस्य म्हणून मला आपल्याकडून संरक्षण हवे आहे. पाणीपट्टी भरतात आणि नळयोजना चालू रहावी म्हणून प्रयत्न करतात त्यांना शासनाने पाणी दिले पाहिजे. अन्यथा नळयोजना बंद होईल.

श्री.रणजित कांबळे : मोफत पाणी मिळणार नाही हे शासनाचे स्पष्ट धोरण आहे. परंतु दोन गटात मारामारी झाली.......

**उपसभापती** : मोफत पाणी द्यायचे धोरण नसेल आणि जे ग्रामस्थ पैसे भरणार नसतील त्यांचा पाणीपुरवठा बंद करावा. अन्यथा पाणीपट्टी भरावयास सांगावे.

श्री.रणजित कांबळे : पाणीपट्टी भरावीच लागते. अन्यथा पाणी मिळणार नाही. एका गटाचे म्हणणे आहे की, आम्हाला मोफत पाणी द्यावे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : शासन मोफत पाणी देणार नाही. परंतु 70 टक्के लोक पाणीपट्टी भरण्यास तयार आहेत, त्यांनी पाणी द्यावे अशी मागणी केली आहे. जे मोफत पाणी मागत आहेत त्यांना बाजूला करुन जे पाणीपट्टी भरण्यास तयार आहेत त्यांना पाणी द्यावे आणि जे अडथळा आणतात त्यांच्यावर कारवाई करावी.

श्री.रणजित कांबळे : या प्रश्नाबाबत संबंधितांची सन्माननीय उपमुख्यमंत्री महोदयांसमवेत एकत्रित बैठक घेऊन योग्य ती ॲक्शन घेऊ.

----------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**लक्षवेधी सूचना क्रमांक-1 संबंधी**

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, आजच्या कामकाजपत्रिकेतील पहिली लक्षवेधी सूचना घेण्यात यावी. मी काही महत्वाच्या कामानिमित्त लॉबीमध्ये बसलो होतो. हा माझा दोष आहे.

**उपसभापती** : ही लक्षवेधी सूचना यापूर्वी पुकारली होती व सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांनी ती उपस्थित केल्यानंतर त्यावर चर्चा होऊन मंत्रीमहोदयांनी उत्तर देखील दिले आहे.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, हा अत्यंत महत्वाचा विषय आहे.

**उपसभापती** : ठीक आहे. आता संबंधित सन्माननीय मंत्रीमहोदय देखील सभागृहात उपस्थित नाहीत. मी नंतर संधी देतो. आता पुढील लक्षवेधी सूचना विचारात घेण्यात येत आहे.

---------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MMP/ SBT/ SBT/ MMP/ 14:00

**पृ. शी.** : सोलापूर येथील टॉवेल्स इंडिया एक्स्पोर्ट लिमिटेड या कंपनीची परस्पर केलेली विक्री.

**मु. शी.** : सोलापूर येथील टॉवेल्स इंडिया एक्स्पोर्ट लिमिटेड या कंपनीची परस्पर केलेली विक्री यासंबंधी सर्वश्री अरविंद सावंत, परशुराम उपरकर,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय कामगार मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"सोलापूर येथील टॉवेल्स इंडिया एक्सपोर्ट लिमिटेड या कंपनीच्या मालकाने सदर कंपनी व कारखान्याची परस्पर केलेली विक्री, नव्या व्यवस्थापनाने तेथील कामगारांची जुनी देणी देण्यास दिलेला स्पष्ट नकार, कर्जवसुली लवादाने कामगारांच्या बाजूने दिलेला निर्णय, टॉवेल्स इंडियाचा कंपनीने एक्झिम बँकेकडून घेतलेले मोठया प्रमाणात वरिल कर्ज, परंतू सदर कर्जाची परतफेड करण्याचा जाणीवपूर्वक केलेली टाळाटाळ, परिणामी एक्झिम बँकेने त्यांना घेऊन केलेला लिलाव, सदर लिलावात मेसर्स सुरेश कंपनीने ६ कोटी ५२ लाख रुपयांत ती विकत घेऊन तीचे मेहरु टेक्सटाईल्स असे केलेले नामकरण, लिलावातून आलेल्या पैशातून तेथील शेकडो कायम कामगारांच्या रास्त देणी देण्यास नव्या व्यवस्थापनाने दिलेला स्पष्ट नकार, आता हा प्रश्न राज्याच्या कामगार मंत्र्यांनी सोडविण्यासाठी कामगारांनी घातलेले साकडे, परंतू त्याकडे शासनाने दुर्लक्ष केल्याने तेथील शेकडो कामगारांनी एक्झिम बॅकेसमोर सामुहिक आत्महत्या करण्याचा घेतलेला निर्णय, शासनाच्या दुर्लक्षामुळे जनतेत व कामगार कुटूंबियांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष व संतापाची लाट लक्षात घेता याप्रकरणी शासनाने तातडीने केलेली व करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.गणेश नाईक (कामगार मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

(नंतर श्री.जुन्नरे....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, सर्वसामान्य माणसाला कसे नाडले जाते याचे उत्तम उदहारण या लक्षवेधीत आहे.सोलापूर येथील टॉवेल्स इंडिया एक्सपोट्र लिमिटेड कंपनी तोटयात गेली. बँकेचे 19 कोटी रुपये भरले नाही म्हणून बँकेने या कंपनीचा लिलाव करुन तीची विक्री केली. या कपंनीची विक्री करीत असतांना, लिलाव करीत असतांना नियमाप्रमाणे कामगार खात्याला, कमिशनरांना कळविणे आवश्यक होते परंतु तसे न कळविण्यात आले नाही त्यामुळे या कंपनीमध्ये किती कामगार काम करीत होते? या कंपनीचा लिलाव केल्यानंतर ही कंपनी दुस-यां कंपनीने म्हणजे मे. सुरेश कंपीनीने लिलावात विकती घेतली. या कंपनीने तेथभ्ल कामगारांची जुनी देणी देण्यास नकार दिलेला असून जुन्या कंपनीची देणी देण्यात आमचा काही संबंध नाही असे नवीन कंपनीने सांगितलेले आहे. मुळ कंपनीचा मालक तोटयात गेल्यामुळे त्याने कामगारांची देणी दिलेली नाही व नवीन कंपनी म्हणते की, ही कंपनी मी लिलावात विकत घेतल्यामुळे जुन्या कामगारांची देणी देण्याच्या संदर्भात आमचा काही संबंध नाही त्यामुळे हा कंपनीमालक सुध्दा कामगारांची देणी देण्यास तयार नाही.जुना मलाक बुडीत गेल्यामुळे तोही कामगारांची देणी देत नाही. दरम्यानच्या काळात कंपनी विकल्यानंतर जी रक्कम मिळाली त्या रक्कमेतून कामगरांची देणीत देता आली असती त्यामुळे यासंदर्भात कामगार खाते काय करणार आहे? या कारखान्याची विक्री होण्यापूर्वी आपल्या खात्याला कळवण्यात आले होते काय? आपल्या खात्याला कळविले नसेल तर संबंधित अधिका-यांने कोणती कारवाई करणार? कंपनी विकल्यानंतर लिलावातून जी रक्कम आली त्या रक्कमेतून कामगारांची देणी देण्याबाबत कामगार खात्याच्या अधिका-यांनी कोणते उत्तर प्रयत्न केले व या कंपनीत किती कामगार होते?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सांवत यांनी सोलापूर जिल्हयातील टॉवेल्स इंडिया एक्सपोर्ट लि. एम.आय.डी. चिंचोली या कंपनीच्या अनुषंगाने प्रश्न विचारलेला आहे. त्यांनी विचारले आहे की, या कंपनीत किती कामगार काम करीत होते. मी आपल्याला सांगू इच्छितो की, 130 कर्मचारी या ठिकाणी कार्यरत आहेत. या कंपनीने एक्सपोर्ट इम्पोर्ट बँक ऑफ इंडिया एक्झीम बँक यांच्याकडून 4.96 कोटी रुपये कर्ज घेतले होते, ओरिएंटल बँक ऑफ कॉमर्स यांच्याकडून 4.77 कोटी रु. घेतले व सीकॉम कडून 9.82 कोटी रुपये घेतले होते. असे एकूण 19.55 कोटी रुपयाचे कर्ज घेऊन कंपनी सुरु केली होती. दुर्दैवाने काही

श्री. गणेश नाईक....

कारणामुळे ही कंपनी घाटयात गेली आणि बॅकांचे हप्ते कंपनीकडून फेडले न गेल्यामुळे Securitization and Reconstruction of Financial Assets, Enforcement and Security Interest Act 2002 या अन्वये या कंपनीचा 1.12.2004 ताबा घेतल्यानंतर या कपंनीने उत्पादनावर लक्ष न घातल्यामुळे 3.12. ला कंपनी विक्रीसाठी निघाली. 19.55 कोटी आणि त्यावरील व्याज फेडता न आल्यामुळे कंपनीची विक्री करावी लागली तसेच ही कंपनी फार कमी किमतीत विकली गेली. ही कंपनी मेरु टेक्सटाईल बँकेने ही कंपनी बँकेकडून विकत घेतली. ही विक्री चुकीच्या पध्दतीने झाल्या बाबत मूळ कंपनीने कोर्टामध्ये दावा दाखल केला. पी.एफ. खात्याने या कंपनीच्या कारभाराला सील करण्याचा प्रयत्न केल्यानंतर पी.एफ. फंडाची 30.51 लक्ष रुपये कर्मचा-यांना देण्यात आली व यावरील व्याज आणि दंड असे 12 लक्ष रुपये देण्याची तयारी दाखवली होती. अशा प्रकारे पी.एफ. च्या रक्कमेचा भाग उरकल्यानंतर या कामगांराची ग्रॅच्यूटी, पी.एफ. व इतर जी हक्काची रक्कम आहे त्याची मागणी युनीयनने विकत घेतलेल्या कंपनीकडे मागणी केल्यानंतर मेरु कंपनीने सांगितले की, आमचा यामध्ये संबंध नाही, आम्ही ही कंपनी लिलावात विकत घेतली आहे.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ SBT/ MMP/ 14=10

श्री.गणेश नाईक ..,.

परंतु त्यानी सागितले की, हे पैसे देण्याशी आमचा काहीही संबंध नाही. आम्ही बॅन्केकडून ही मालमत्ता विकत घेतलेली आहे. त्यामुळे त्यांनी हात वर केले आहेत. कामगार आयुक्तांकडे अशा प्रकारचे पत्र दिल्यानंतर त्यांनी कंपनीला अशी सूचना केली की, तुम्ही या कामगारांना पैसे देण्याची जबाबदारी घ्यावी परंतु त्यांनी नकार दिला. किंबहुना कामगार आयुक्त कार्यालयाला त्यांनी पत्रसुध्दा दिलेले नाही. मघाशी सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी विचारले की याबाबतीत शासनाला काही कळविले होते काय किंवा विचारले होते काय ? त्याबाबतीत मी त्यांना सांगू इच्छितो की, या कंपनीने कामगार खात्याला काहीही विचारले नाही. 1 कोटी 7 लाख 99 हजार रुपयांची मागणी युनियन मार्फत केली होती तेव्हा माननीय न्यायालयाने सांगितले की, हया प्रकरणी अगोदरच निर्णय दिलेला आहे तरीसुध्दा विलंब माफ करुन त्यांच्या देय रकमेबाबत अपील निर्णयासाठी स्वतंत्र अर्ज करण्यास परवानगी देण्यात येईल . तुम्ही स्वतंत्रपणे अर्ज केल्यास त्या अर्जाबाबत निश्चितपणे आम्ही विचार करु असे न्यायालयाने सांगितले परंतु त्या संघटनेने अर्जच केला नाही अशा परिस्थितीमध्ये ज्या लोकांनी युध्द करावयास पाहिजे त्याच लोकांनी शस्त्र ,खाली ठेवले आहे व माघार घेतल्यामुळें हे सर्व कामगार उघडयावर पडलेले आहे. टॉवेल्स इंडिया एक्सपोर्ट लिमिटेड या कंपनीला व एक्झिम बॅन्क यांना प्रतिवादी करण्यात आलेले आहे तथापि सदरचे प्रकरण संघटनेने पुन्हा अर्ज करण्याचा हक्क राखून दिनांक 28.2.2008 रोजी न्यायालयातून मागे घेतले व न्यायालयाने तसे आदेश दिनांक 28.2.2008 रोजी पारीत केलेले आहेत . अशा प्रकारे न्यायालयीन कक्षेत कामगारांची होरपळ होत आहे याची जाणीव शासनाला आहे म्हणून शासनाकडून हे प्रकरण पुन्हा उपस्थित केले जाईल .या प्रकरणात शासन स्वत: पार्टी बनेल आणि या कामगारांना न्याय देण्याचा प्रयत्न करील.

------

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**लक्षवेधी सूचना क्रमांक 4 पुढे ढकलण्याबाबत**

**उपसभापती** : चौथी लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात आली आहे .

श्री.दिवाकर रावते : ही लक्षवेधी सूचना महत्वाची असल्यामुळे ती घेण्यात आली पाहिजे.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी: सभापती महोदय, माझी पहिली लक्षवेधी सूचना देखील महत्वाची आहे.

**उपसभापती** : ती लक्षवेधी सूचना घेण्यात आली होती

श्री.गुरुनाथ कुलकर्णी :माझी लक्षवेधी सूचना महत्वाची आहे.

श्री.दिवाकर रावते :त्यावर माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे.

**उपसभापती** :सन्माननीय सदस्यांना मी तेच सांगितले आहे.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ SBT/ MMP/

**पृ.शी.मुशी** : लक्षवेधी सूचनांसंबंधीची निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवणे

विशेष कार्य अधिकारी : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेतील बाब क्रमांक 13 (ब) च्या अंतर्गत दाखविण्यात आलेल्या क्रमांक 1 ते 265 या लक्षवेधी सूचनांसबंधीची निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहेत.

( प्रेस :कृपया सोबत जोडलेली क्रमांक 1 ते 265 निवेदने छापावीत )

.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



VTG/ SBT/ MMP/

**विशेष उल्लेख**

पृ.शी : दापोली, जि.रत्नागिरी येथील रोजगार हमी योजनेची कामे स्थानिक व्यक्तींना न मिळणे

मु.शी : दापोली, जि.रत्नागिरी येथील रोजगार हमी योजनेची कामे स्थानिक व्यक्तींना न मिळण्याबाबत श्री.संजय केळकर,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी विशेष उल्लेखासंबबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.संजय केळकर ( कोकण विभाग पदवीधर ) :सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासबंधीची सूचना मांडतो.

" शासन नियोजन विभागाकडील पत्र क्रमांक रोहयो - 2005/क्र.354/ रोहयो - 1,दिनांक 24.8.2005 अन्वये खेडयातील बेरोजगार व्यक्तींना रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून रोजगार उपलब्ध व्हावा या उद्देशाने मौजे गव्हे ता.दापोली, जि. रत्नागिरी येथील बेरोजगारांनी सन 2005 साली शासनाकडे रोहयो खाली काम मिळावे म्हणून विनंती अर्ज दिलेला आहे सदरचा अर्ज प्रशासनाच्या फे-यात अडकून पडल्याने अद्यापही सदर गावच्या बेरोजगाराना रोजगार उपलब्ध झालेला नाही आज सदर गावातील बेरोजगार काम नसल्याने स्थलांतर करत आहेत या लोकांना शासन धोरणानुसार आहे त्या ठिकाणी रोजगार उपलब्ध व्हावा म्हणून सदर विषय मी विशेष उल्लेखाव्दारे उपस्थित करीत आहे. "

----

5.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी : जुन्या डी.एड. धारकांनी आपल्या मागण्यांसाठी सुरु केलेले उपोषण

पृ.शी : जुन्या डी.एड. धारकांनी आपल्या मागण्यांसाठी सुरु केलेल्या
उपोषणा बाबत श्री.विक्रम काळे,वि.प.स.
यांनी दिलेली विशेष उल्लेखासंबंधीची सूचना

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी विशेष उल्लेखासंबंधी सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी. :-

श्री.विक्रम काळे (औरंगबाद विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"शासनाने दिनांक 1 एप्रिल 2008 रोजी शासन निर्णय काढून जुन्या डी.एड. धारकावर अन्याय केलेला आहे .याबाबत शासनाचे लक्ष वेधण्यासाठी डी.एड. कृती समितीच्या वतीने आझाद मैदानावर गेल्या 20 दिवसापासून उपोषण सुरु आहे...

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे .....

त्या पैकी 27 विद्यार्थ्यांची प्रकृती गंभीर झाली आहे. 20 दिवस उपोषण करूनही शासनाने त्याची दखल घेतलेली नाही म्हणून शेवटी त्या विद्यार्थ्यांनी परवा विधान भवनावर धडक मोर्चा काढला आणि विधान भवनाच्या दरवाजावर ठिय्या आंदोलन केले. आंदोलकांच्या भावना अतिशय तीव्र झालेल्या आहेत तसेच त्या 150 विद्यार्थ्यांवर लाठीहल्ला झालेला आहे. जुने डीएड आणि नवीन डीएड धारकांचा हा जो वाद झालेला आहे त्यातून गंभीर प्रश्न निर्माण झालेला आहे. त्यामुळे शासनाने लक्ष घालून हा वाद मिटवावा अशी विनंती मी या विशेष उल्लेखाद्वारा करीत आहे.

***

...... यूयू 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : गोदावरी मनार स.सा.का.लि.शंकरनगर, ता.बिलोली, जि.नांदेड,
कर्जापोटी जि.म.स.बँकेने ताब्यात घेणे.

**मु. शी.** : गोदावरी मनार स.सा.का.लि.शंकरनगर, ता.बिलोली, जि.नांदेड,
कर्जापोटी जि.म.स.बँकेने ताब्यात घेणे याबाबत श्री.सय्यद जामा,
वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.सय्यद जामा यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. सय्यद जामा (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

" गोदावरी मनार सहकारी साखर कारखाना लिमिटेड, शंकर नगर, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड वर नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे कर्ज असल्याने बँकेने कारखाना ताब्यात घेऊन मे. डॉलेक्स इंडस्ट्रीज लि. मुंबई यांना पहिल्या वर्षी रुपये 1.25 कोटी नंतर प्रत्येक वर्षी 2.50 कोटी भाडे व गाळपावर प्रति टन रु. 65 प्रमाणे हंगाम 2006-07 पासून भाडेतत्वावर देणे, डॉलेक्स इंडस्ट्रीजवर बँकेचे व शासनाचे नियंत्रण नसल्यामुळे मनमानी कारभार चालणे, जसे शेतक-यांच्या ऊसाचा दर शासनाने ठरवून दिलेल्या दरापेक्षा कमी दर देणे, ऊसाचे बिल वेळेवर अदा न करणे, ऊसाचे बिल धनादेशाद्वारे देत असल्यामुळे ब-याच शेतक-याचे धनादेश बाऊन्स होणे, कामगाराचे वेतन वेळेवर न देणे व भविष्य निर्वाह निधी न भरणे, त्यामुळे डॉलेक्स इंडस्ट्रीजवर गुन्हा नोंद होणे, ऊसाचे गाळप मोठयाप्रमाणात करुन देखील रेकॉर्डवर कसल्याच प्रकारची नोंद न करता गाळप कमी दाखविणे, साखर व मोनलासीस काळया बाजारात विकणे, प्रति टन 65 रुपये व शासनाची एक्साईज चुकवणे, ज्यामुळे शासनाचे कोटयावधी रुपयांचे होत असलेले नुकसान, डॉलेक्स इंडस्ट्रीजच्या विरुध्द तक्रार करण्यासाठी गेल्यास जिल्हाधिकारी व बँकेचे अधिकारी टाळाटाळ करणे, त्यामुळे जिल्हाधिकारी व बँकेचे अधिकारी यात आर्थिक व्यवहार झाल्याची शक्यता, परिणामी जनतेत पसरलेली असंतोषाची भावना, या संबंधात चौकशी करुन तातडीची कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाने करावयाची उपाययोजना ".

सभापति महोदय,मैं विशेष उल्लेख के माध्यम एक गंभीर समस्या की ओर शासन का ध्यान खींचना चाहता हूं. नांदेड के बिलोली तालुका में गोदावरी मनार सहकारी साखर कारखाना है.इस

...3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री सय्यद जामा ....

कारखाने की आर्थिक स्थिति अच्छी न होने के कारण और फाईनान्शियल लाईबिलिटीज होने के कारण सरकार ने इसको टेकओव्हर किया है.उसके बाद शुगर कमिश्नर की ओर से यह कारखाना मे. डॉलेक्स इंडस्ट्रीज लि. मुंबई को लीज पर दे दिया गया. यह डॉलेक्स इंडस्ट्रीज किसकी है, इस का मालिक कौन है, किसी को पता नहीं है. यह कंपनी गन्ना उत्पादकों के साथ अन्याय कर रही है, बेईमानी कर रही है. यह कंपनी मुआवजा भी नहीं दे रही है. शुगर कमिश्नर ने जो रेट तय किया है, वह भी यह कंपनी नहीं दे रही है. यह कंपनी ट्रक के आने-जाने का कोई रिकॉर्ड नहीं रख रही है. इस कंपनी को प्रथम वर्ष के लिए 1.25 करोड़ रुपये और उसके बाद के वर्षो के लिए 2.50 करोड़ रुपये किराये पर यह कारखाना चलाने के लिए दिया गया है तथा क्रॅशिंग के लिए प्रति टन रु. 65 अनुसार दर तय की गई है. डॉलेक्स इंडस्ट्रीज पर बैंक का एवम् शासन का कोई नियंत्रण न होने के कारण मनमानी कारभार चल रहा है. शासन ने गन्ने की जो दर निश्चित की है, कंपनी उससे कम दर किसानों को दे रही है. गन्ने का बिल समय पर नहीं दिया जा रहा है. इस तरह से डॉलेक्स कंपनी किसानों को लूट रही है इसलिए इस कंपनी के खिलाफ अविलंब कार्रवाई की जाए, मैं इस सरकार से यह अनुरोध इस विशेष उल्लेख के माध्यम से करता हूं. धन्यवाद.

.....

..... यूयू 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : 60 वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांना शासनातर्फे देण्यात येणाऱ्या सोयी-सवलतींमध्ये तफावत असणे.

**मु. शी.** : 60 वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांना शासनातर्फे देण्यात येणाऱ्या सोयी-सवलतींमध्ये तफावत असणे याबाबत श्री.चरणसिंग सप्रा, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.चरणजितसिंह सप्रा यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. चरणसिंह सप्रा (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

" शासनातर्फे वय वर्षे 60 पूर्ण असलेल्या वयस्कर व्यक्तींना विविध सवलती व सुविधा प्रदान करण्यात येतात. परंतु या सवलती व सुविधा देताना 60 ते 65 वर्षे वयातील वयस्कर नागरिकांना कमी सलती व सुविधा प्रदान करण्यात येतात व 65 वर्षे वयावरील वयस्कर नागरिकांना जास्त सवलती व सुविधा देण्यात येतात. शासनाच्या या 60 व 65 वर्षे वयावरील वयस्कर नागरिकांतील देण्यात येत असलेल्या सवलती व सुविधांच्या तफावतीमुळे ज्येष्ठ नागरिकांमध्ये असंतोषाची भावना आहे. सर्व ज्येष्ठ पगारिक ज्यांचे वर 60 असो वा 65 असो, त्यांना शासनाच्या सवलती व सुविधा सारख्याच मिळावयास पाहिजेत. या बाबत सर्वेक्षण केले असता असे दिसेल की, आजच्या जीवन शैलीत मानवाच्या वय वर्षे 70 ते 80 वरून घसरले असून ते 60 ते 65 वर आले आहे. तर मग शासन पुरस्कृत सोयी व सवलतींचा लाभ घेण्यासाठी एखाद्या व्यक्तीला त्याच्या आयुष्याच्या शेवटच्या घटकेपर्यंत वाट पहावी लागणे हे मानवतेच्या दृष्टीकोनातून चुकीचे आहे. या संदर्भातील शासनाच्या दुटप्पी धोरणामुळे त्यांच्या या छोट्या आशा-अपेक्षांना धक्का बसतो आणि सर्व सुविधांचा लाभ घेण्यासाठी त्यांना वयाच्या 65 वर्षापर्यंत वाट पहावी लागते. ती वाट पाहण्याच्या प्रक्रियेत अर्ध्याहून अधिक वयस्क नागरिक मरण पावतात व उर्वरित अर्धे नागरिकांची त्या सुविधांसाठी नवे प्रमाणपत्र तयार करून घेण्याची इच्छाशक्ती व ताकद हिरावलेली असते. बऱ्याचदा अशा ज्येष्ठ वयस्क नागरिकांना ज्येष्ठ नागरिक असल्याच्या प्रमाणपत्र मिळविण्यासाठी किमान 4 ते 5 वेळा तलाटी वा तहसिलदारांकडे जावे लागते. .....

( यानंतर सौ.रणदिवे....व्हीव्ही 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ SBT/ MMP/ पूर्वी श्री.सुंबरे . . . . 14:20

श्री.चरणसिंग सप्रा . . . .

अशा मुळे वयस्क व्यक्तींना त्रास होऊ नये व त्यांना सोयी-सवलती मिळाव्यात यासाठी धोरण आखण्यात आलेले आहे, त्याअंतर्गत या ज्येष्ठ नागरिकांना ओळखपत्र मिळविण्यासाठी जर एवढा त्रास सहन करावा लागत असेल तर ती लज्जास्पद बाब आहे. म्हणून ज्येष्ठ नागरिकांना ओळखपत्र देण्याची जी प्रक्रिया तत्परतेने पूर्ण करण्याच्या बाबतीत आदेश दिले जावेत. तसेच हे ओळखपत्र सदर व्यक्तीच्या घरी घरपोच पाठविण्यात यावे. शासन ज्येष्ठ नागरिकांना ज्या सोयी-सवलती देत आहे, त्या देत असताना 65 वर्षाच्या आतील नागरीक आणि 65 वर्षाच्या वरील नागरिक अशी तफावत न ठेवता सर्वांना समान सोयी-सवलती देण्यात याव्यात असे मी विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनाला सांगू इच्छितो. धन्यवाद.

----

. . . .2 व्ही-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: मुंबईतील विविध स्पोटर्स् क्लबमध्ये दोन्ही सभागृहाच्या सदस्यांना सभासदत्व मिळण्याबाबत

मु.शी. : मुंबईतील विविध स्पोटर्स् क्लबमध्ये दोन्ही सभागृहाच्या सदस्यांना सभासदत्व मिळण्याबाबत श्री.सुभाष चव्हाण वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"मुंबईमध्ये असंख्य स्पोटर्स् क्लब आहेत. उदा.वेलिंग्टन क्लब, नॅशनल स्पोटर्स् क्लब ऑफ इंडिया, रेडिओ क्लब, अंधेरी क्लब, जिमखाने इत्यादी. या सर्व क्लबचे नियंत्रण शासनाच्या अधिपत्याखाली येते. म्हणून या विशेष उल्लेखाव्दारे मुंबईत ज्यांचे विधान सभा /विधान परिषद सदस्यांचे कायमस्वरुपी वास्तव्य आहे. त्या दोन्ही सभागृहाच्या सदस्यांना या क्लबमध्ये सदस्यत्व मिळावे असे मी सभागृहाच्या निदर्शनासू आणू इच्छितो.

शासनाचे प्रशासकीय (आय.ए.एस.) अधिकारी या क्लबचे नियमित सदस्य असतात. त्याच धर्तीवर सार्वजनिक दृष्टया व सभागृहाच्या सदस्यांच्या हिताच्या दृष्टीने मी विशेष उल्लेखाच्या माध्यमातून सूचित करु इच्छितो."

सभापती महोदय, मुंबईमध्ये असंख्य स्पोटर्स् क्लब आहेत. उदा.वेलिंग्टन क्लब, नॅशनल स्पोटर्स् क्लब ऑफ इंडिया, रेडिओ क्लब, अंधेरी क्लब, जिमखाने, सी.सी.आय.इ.ठिकाणी जे सरकारी आय.ए.एस.अधिकारी आहेत किंवा एखाद्या जिल्हाधिकाऱ्याची बदली झाली तर त्यांना तेथे ताबडतोब सभासदत्व बहाल केले जाते. मी आपल्या निदर्शनास आणून देत आहे की, हे सर्व क्लब शासनाच्या अधिपत्याखाली येतात. मी या विशेष उल्लेखाव्दारे असे सूचित करीत आहे की, मुंबईमध्ये ज्यांचे कायम स्वरुपी वास्तव्य आहे अशा विधानसभा आणि विधान परिषदेच्या सन्माननीय सदस्यांना सभासदत्व मिळावे अशी मी या सदनाच्या माध्यमातून शासनाला विनंती करीत आहे.

काही सन्माननीय सदस्य (खाली बसून) : सगळयांनाच सभासदत्व मिळाले पाहिजे.

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, बाकीच्या सन्माननीय सदस्यांनाही सभासदत्व मिळावे.

. . . .2 व्ही-3





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

याबाबतीत काही हरकत नाही. मुंबईमध्ये कोणत्याही आय.ए.एस. अधिकाऱ्याची बदली झाली किंवा एखाद्या प्रिन्सीपल सेक्रेटरीची बदली झाली की त्यांना ताबडतोब या सर्व क्लबचे सभासदत्व बहाल केले जाते. त्याप्रमाणे या दोन्ही सभागृहातील ज्या सन्माननीय सदस्यांचे मुंबईमध्ये कायम स्वरुपी वास्तव्य आहे, त्यांना देखील या सर्व क्लबमध्ये सभासदत्व बहाल करण्यात यावे असे मी विशेष उल्लेखाव्दारे सूचित करु इच्छितो.

श्री.दिवाकर रावते (खाली बसून) : सभापती महोदय, याचा विचार करण्यात यावा. याबाबतीत आपण आम्हाला सहानुभूती दाखवावी.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी विशेष उल्लेखाव्दारे एक महत्वाचा मुद्दा मांडलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी अशी माहिती दिली आहे की, जे आय.ए.एस.अधिकारी, आय.पी.एस.अधिकारी आहेत, त्यांची मुंबईमध्ये बदली झाल्यानंतर त्यांना मुंबईतील जे महत्वाचे निरनिराळे क्लब आहेत, तेथे ताबडतोब सभासदत्व बहाल केले जाते. त्याप्रमाणे विधानसभा आणि विधान परिषदेचे जे सभासद आहेत, त्यांना देखील ते जोपर्यंत त्या-त्या सभागृहाचे सभासद आहेत, तोपर्यंत आपोआप मुंबईतील या सर्व क्लबचे सभासदत्व मिळाले पाहिजे. सभापती महोदय, याठिकाणी मुंबई उपनगर जिल्हयाचे माननीय पालकमंत्री देखील उपस्थित आहेत. त्यामुळे याबाबतीत ताबडतोब अंमलबजावणी करण्यासंबंधात आपण शासनाला आदेश द्यावेत अशी मी आपल्याला विनंती करतो.

**उपसभापती** : गंमत अशी आहे की, मी या आसनावरुन दिलेले निर्देश शासनाकडूनच ऐकले जात नाहीत. तर क्लबवाले काय ऐकणार आहेत ? सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी विशेष उल्लेखाव्दारे सूचना मांडलेली आहे, येथपर्यंत ठीक आहे.

----

. . . .2 व्ही-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



पृ.शी. : एमआयजी क्लबच्या ताब्यात असलेला भूखंड युवा

खेळाडूंसाठी काही वेळ राखून ठेवणे

मु.शी : एमआयजी क्लबच्या ताब्यात असलेला भूखंड युवा खेळाडूंसाठी काही वेळ राखून ठेवणे याबाबत श्री. कपिल पाटील, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"वांद्रे पूर्व येथील एमआयजी क्लबच्या ताब्यात असलेला भूखंड म्हाडाच्या गांधीनगर वसाहतीच्या लेआऊट मध्ये खेळाच्या मैदानासाठी आरक्षित आहे. हा भूखंड म्हाडाने लीजवर एमआयजी क्लबला दिलेला आहे. सदर मैदान नागरिकांना फिरण्यास अथवा खेळण्यास सकाळी तीन तास व संध्याकाळी तीन खास खुले असते.

एमआयजी क्लबने राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय किर्तीचे अनेक खेळाडू घडविले आहेत. या खेळाडूंचे निरंतर प्रशिक्षण, प्रॅक्टीस व क्रीडा संवर्धनासाठी क्लबने विशिष्ट वेळ राखून ठेवला आहे. या नामवंतांच्या प्रॅक्टीससाठी तसेच उदयोन्मुख युवा खेळाडूंसाठी या मैदानातील काही वेळ राखून ठेवणे आवश्यक आहे. 24 तास मैदान सर्वांना खुले ठेवल्यास त्यास बाधा येते.

वरील बाब लक्षात घेऊन एमआयजी क्लबला लीजवर मैदान देताना दिलेल्या शर्ती व्यतिरिक्त इतर शर्ती लादणे अन्यायकारक होईल. तसेच त्यांच्या या उपक्रमांसाठी योग्य त्या वेळाचे वाटप करणे आवश्यक आहे. शासनाने ते करावे अशी मागणी मी या निमित्ताने करीत आहे."

सभापती महोदय, यापूर्वी सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी जी सूचना केलेली आहे, त्याचे मी समर्थन करतो. क्लबचा उपयोग करण्यासाठी नव्हेतर या क्लबनां ज्या उद्देशाने जागा उपलब्ध करुन दिलेली आहे, त्याप्रमाणे त्या जागांचा उपयोग होतो की नाही हे पहाण्यासाठी, त्यावर लक्ष ठेवण्यासाठी लोकप्रतिनिधींना मुंबईतील क्लबचे सभासदत्व देण्याशिवाय दुसरी कोणतीही व्यवस्था असू शकत नाही असे माझे म्हणणे आहे.

. . . .2 व्ही-5



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, मी याठिकाणी जो विशेष उल्लेख मांडलेला आहे, त्याबाबतीत सांगावयाचे तर वांद्रे येथे एमआयजी क्लब आहे. या क्लबच्या ताब्यामध्ये असलेले मैदान जनतेसाठी खुले करण्यात आलेले आहे. परंतु याठिकाणी श्री.सचिन तेंडूलकर, विनोद कांबळी इ.अनेक नामवंत खेळाडू तयार झालेले आहेत. तसेच येथे अनेक उदयोन्मुख खेळाडू प्रशिक्षण घेत असतात. या सगळया खेळाडूंच्या प्रशिक्षणासाठी, प्रॅक्टीससाठी काही काळ हे मैदान राखून ठेवणे आवश्यक आहे. जर हे मैदान संपूर्ण वेळ जनतेसाठी खुले ठेवले तर जे नामवंत खेळाडू आहेत किंवा तेथे जे उदयोन्मुख खेळाडू तयार होत आहेत, त्यांच्यासमोर आता प्रॅक्टीस कुठे करावयाची ? असा प्रश्न निर्माण होईल. म्हणून अशा खेळाडूंसाठी क्लबने विशिष्ट वेळ राखून ठेवण्याची आवश्यकता आहे अशी मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून सूचना करतो. धन्यवाद.

----

यानंतर कु.गायकवाड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DVG/ SBT/ MMP/ प्रथम श्रीमती रणदिवे.. 14:25

**उपसभापती** : आता विशेष उल्लेख संपलेले आहेत तरी देखील मी काही सन्माननीय सदस्यांना विशेष उल्लेख मांडण्याची परवानगी देतो.

**पृ.शी** : न्यायालयीन कामासाठी वकिलांना देण्यात येणाऱ्या सोयी,सुविधा

**मु.शी** : न्यायालयीन कामासाठी वकिलांना देण्यात येणाऱ्या सोयी,सुविधा याबाबत श्रीमती उषा दराडे यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्रीमती उषा दराडे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्रीमती उषा दराडे ( विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमताने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

"विधी सेल राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वकील सेलच्या बैठकीत ठराव घेऊन विविध विषयांवर मागण्या शासनास सादर केल्या. त्यामध्ये राज्यातील इमारतींना बांधकामासाठी भरीव तरतूद, मागणी प्रमाणे वकील संघ व चेंबर्ससाठी शासकीय भूखंड उपलब्ध करुन देणे, ज्युनियर वकीलांना 1000 रु महिना स्टायपेंड देणे, महाराष्ट्र राज्य वेलफेअर ॲक्ट फंड ॲक्ट 1981 मध्ये अमेंडमेंट करणे, न्यायालयीन कामकाज मराठीतून होण्यासाठी जिल्हा व तालुका स्तरावर पायाभूत सुविधा उपलब्ध करणे, महसुली निवाडयांचे अधिकार दिवाणी न्यायालयास द्यावेत, महिलांचे आरक्षणाचे बिल मंजूर करणेबाबत पाठपुरावा करणे, दहा वर्षे वकीली व्यवसाय करणाऱ्या वकीलांना नोटरी म्हणून नियुक्ती देणे या बाबत कायद्यात तरतूद करणे, न्यायालयात आय.टी लायब्ररी साठी निधीची व्यवस्था करणे, आमदार फंडातून निधी लायब्ररीत किंवा न्यायालयाच्या बांधकामास देण्याची प्रक्रिया सुटसुटीत करणे न्यायाधिशांच्या इमारती ( निवासस्थाने तालुका पातळी पासून अद्ययावत करणे प्रत्येक जिल्हयात कुटुंब न्यायालये स्थापन करणे, या सामाजिक , सार्वजनिक महत्वाच्या विषयावर विशेष उल्लेख देत आहे. शासनाने तातडीने उपाय योजना करावी ही नम्र विनंती."

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी** : श्रीमती. वैशाली तरटे यांचे सामान काही गुंडांनी टॅक्सीमधून पळविणे

**मु.शी** : श्रीमती वैशाली तरटे यांचे सामान काही गुंडांनी टॅक्सीमधून पळविणे याबाबत सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्रीमती मंदा म्हात्रे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्रीमती मंदा म्हात्रे (विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

"औरंगाबाद येथील मूळ रहिवासी असलेले डॉ. नरेंद्र हिरालाल तरटे हे नोकरीच्या निमित्ताने दक्षिण कोरीयाला राहतात. त्यांची पत्नी वैशाली तरटे ही काल सकाळी 7 वाजता मुंबईला पोहचली. विमानतळावरून कांदिवली परिसरात टॅक्सीन येत असताना मागून एक टॅक्सी येऊन त्यांच्या टॅक्सीला अडविले. त्या टॅक्सीतील 4,5 गुंडांनी त्यांची पर्स व इतर सर्व सामान पळविले. म्हणजेच दरोडयासारखा प्रकार केला. त्या टॅक्सीचा क्रमांक एमएच 04 -2 R 4912 असून सौ. वैशाली तरटे यांनी आक्रोश करुन काही उपयोग झाला नाही. त्यांच्या टॅक्सी ड्रायव्हरला देखील मारहाण करण्यात आली व त्यानंतर त्यांनी तेथून पोबारा केला. त्यांच्या पत्नीने कांदिवली पोलीस स्टेशनला तक्रार केली. 24 तासाचा कालावधी हाऊन देखील संबंधितांवर कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही. राज्यातील कायदा व सुव्यवस्थेबद्दल त्यांच्या मनात संभ्रम निर्माण झाला असून ती आपल्याच राज्यात असुरक्षित आहे"

सभापती महोदय, आता सभागृहामध्ये माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर.आर. पाटील हजर आहेत. या महिलेला न्याय मिळावा या दृष्टीने शासनाने प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्यांनी पोलिस स्टेशनमध्ये टॅक्सीचा क्रमांक दिलेला आहे. तरी देखील कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.

श्री. आर.आर. पाटील : सभापती महोदय, या बाबत सन्माननीय सदस्यांकडून माहिती घेण्यात येईल व संबंधित पोलीस स्टेशनला सूचना दिली जाईल.

----------

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी** : सोलापूर येथील विद्यापीठाला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव देणे

**मु.शी** : सोलापूर येथील विद्यापीठाला पुण्यश्लोक अहिल्या देवी होळकर यांचे नाव देणे या बाबत श्री. प्रकाश शेंडगे यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश शेंडगे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. प्रकाश शेंडगे ( विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

महाराष्ट्रातील विविध विद्यापीठांना त्या त्या भागातील संत, महात्म्यांची नावे देण्यात आली आहेत. सामाजिक क्षेत्रात गौरवास्पद काम केलेल्या पुण्यश्लोक होळकरांचे सामाजिक आणि धार्मिक व राजकीय कार्य पाहता त्यांचा उचित गौरव करण्यासाठी सोलापूर येथील विद्यापीठास पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर असे नाव देण्यात यावे.

सदर विषय सार्वजनिक दृष्टीने महत्वाचा असल्याने मी विशेष उल्लेखाद्वारे सभागृहात मांडू इच्छितो.

-----------

**उपसभापती** : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 3.00 वाजता पुन: भरेल.

( दुपारी 2.29 ते 3.00 मध्यंतर )

----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( मध्यंतरानंतर )

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

**पृ. शी.** : जादूटोणा आणि अनिष्ट व अघोंरी प्रथा यांचे समूळ उच्चाटन विधेयक .

**मु. शी.** : सन 2005 चे वि. स. वि. क्रमांक 89 - महाराष्ट्र जादूटोणा आणि अनिष्ट व अघोरी प्रथा यांचू समूळ उच्चाटन विधेयकावरील संयुक्त समितीचे प्रतिवृत्त सादर करण्याची मुदत वाढविण्यासंबंधी प्रस्ताव

श्री. चंद्रकांत हंडोरे ( सामाजिक न्याय मंत्री ) : सभापती महोदय, सन 2005 चे वि. स. वि. क्रमांक 89- अंधविश्वास आणि अज्ञानावर पोसल्या जाणाऱ्या अनिष्ट व दुष्ट प्रथांपासून समाजातील सर्वसामान्य लोकांचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने, तसेच समाजातील सर्वसामान्य लोकांचे मानसिक, शारीरिक व आर्थिक शोषण करुन त्यांचे नुकसान करण्याच्या, व त्याव्दारे समाजाची घडी विस्कटून टाकण्याच्या दुष्ट हेतूने वैदू व भोंदूबाबा यांनी सर्वसामान्यत: जादूटोणा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तथाकथित अतींदिय किंवा अतिमानुष शक्ती किंवा चमत्कार करुन भूतपिशाच्च यांच्या नावाने जनमानसात रुजवलेल्या अंध विश्वासापोटी निर्माण होणाऱ्या अनिष्ट व दुष्ट प्रथांचा व अघोरी रुढींचा मुकाबला करुन त्याचे समूळ उच्चाटन करण्याच्या दृष्टीने यासंबंधात समाजामध्ये जागृती व जाणीव निर्माण करण्याकरिता तसेच निकोप व सुरक्षित वातावरण निर्माण करण्याकरिता, आणि तद्नुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक यावर विचार करण्याकरिता दिनांक 17 एप्रिल, 2007 रोजी नियुक्त केलेल्या संयुक्त समितीचा अहवाल सादर करण्यासाठी नेमून दिलेली मुदत पुढील अधिवेशनाच्या अखेरपर्यंत वाढविण्यात यावी, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MMP/ SBT/

**पृ.शी./मु.शी.**: धर्मादाय रुग्णालयांच्या तपासणीकरिता नेमलेल्या तदर्थ समितीचा अहवाल सादर करण्याची मुदत वाढविणे

श्री. चंद्रकांत हंडोरे ( सामाजिक न्याय मंत्री ) : सभापती महोदय, मी प्रस्ताव प्रस्तुत करतो की, मुंबईतीरल धर्मादाय रुग्णालयांच्या तपासणीसंदर्भातील दिनांक 2 ऑगस्ट, 2007 रोजी महाराष्ट्र विधान परिषदेने नियुक्त केलेल्या तदर्थ समितीचा अहवाल सादर करण्यासाठी निश्चित केलेली मुदत विधान परिषदेच्या पुढील अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत वाढवून देण्यात यावी.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला

---

....3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MMP/ SBT/

**पृ.शी.** : मुस्लीम समाजाच्या शैक्षणिक आधुनिकीकरण करण्यासाठी मदरसा बोर्ड स्थापण करण्याच्या संदर्भात सखोल चौकशी करुन उपाययोजना सुचविण्यासाठी तदर्थ समिती नियुक्त करणे

**पृ.शी.** : मुस्लीम समाजाच्या शैक्षणिक आधुनिकीकरण करण्यासाठी मदरसा बोर्ड स्थापण करण्याच्या संदर्भात सखोल चौकशी करुन उपाययोजना सुचविण्यासाठी तदर्थ समिती नियुक्त करण्याबाबत शालेय शिक्षण मंत्र्यांचा प्रस्ताव

श्री. चंद्रकांत हंडोरे ( सामाजिक न्याय मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विधान परिष्द नियम 158 अन्वये खालील प्रस्ताव मांडतो.

"दिनांक 14 डिसेंबर, 2006 रोजी विधान परिषद सभागृहात उत्तरित झालेल्या सर्वश्री सदाशिव पोळ, जितेंद्र आव्हाड, प्रा. फौजीया खान, वि. प. स. यांच्या "मुस्लीम समाजाच्या शैक्षणिक आधुनिकीकरण करण्यासाठी मदरसा शिक्षण बोर्ड स्थापन करणे" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 23361 वरील चर्चेच्या वेळी माननीय शालेयशिक्षण राज्यमंत्री यांनी दिलेल्या आश्वासनानुसार सदर प्रकरणी सखोल चौकशी करुन उपाययोजना सुचविण्यासाठी दोन्ही सभागृहांच्या खालील 9 सदस्यांची तदर्थ समिती गठीत करण्यात यावी.

1) श्री. हाफीज धत्तुरे, वि. स. स. ........

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या प्रस्तावासंबंधी मी माहिती घेण्याचा प्रयत्न केला आहे. केवळ मुस्लिम सदस्यांचा समावेश असलेली ही समिती गठित होणार असेल तर त्याला आमची हरकत आहे. त्याऐवजी दोन्ही सभागृहातील सदस्यांची ही समिती असावी. त्यामध्ये सर्व धर्माचे सदस्य असावेत. मदरशांना अनुदान देऊन त्या समाजातील लोकांना मुख्य प्रवाहामध्ये आणून त्यांना शिक्षणाचा उपयोग व्हावा हा उद्देश प्रश्न उपस्थित करण्यामागचा होता. ही समिती शक्यतो सर्व पक्षाच्या सदस्यांची असावी. त्यांच्या हितासाठी ही समिती काम करणार असल्यामुळे या समितीमध्ये दोन्ही सभागृहातील ज्येष्ठ सदस्यांची नियुक्ती करावी.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, हा प्रस्ताव मांडण्यालाच माझा विरोध आहे.

श्री.दिवाकर रावते : सभागृहामध्ये मंत्रिमहोदयांनी दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने हा प्रस्ताव मांडला जात आहे. त्यावेळी कोणी विरोध केला नव्हता. प्रश्न एवढाच आहे की, मुस्लिम समाजातील लोकांना मुख्य प्रवाहामध्ये आणले पाहिजे. त्याबाबत सन्माननीय मुख्यमंत्री आणि सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांनी मदरशांना अनुदान देण्याचे जाहीर केलेले आहे. या शिक्षण बोर्डाच्या अंतर्गत येणारा अभ्यासक्रम कसा असावा हे ठरविले जाणार आहे. त्यामुळे या समितीमध्ये केवळ मुस्लिम सदस्यांची नियुक्ती न करता सर्व पक्षाचे सदस्य असावेत. त्यामुळे सन्माननीय मंत्रिमहोदयांनी त्याप्रमाणे सभागृहात नावे सांगावीत.

**उपसभापती** : सन्माननीय मंत्रिमहोदयांना मी सांगू इच्छितो की, आपण सन्माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांना सभागृहात येण्यास सांगावे. या समितीच्या सदस्यांची नावे त्यांनाच जाहीर करु द्यावीत. तेच योग्य होईल. मला वाटते की आता सन्माननीय सदस्यांनी हा विषय वाढवू नये. नियम 158 चा प्रस्ताव नंतर घेण्यात येईल.

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीपूर्व नाही

NTK/ MMP/ SBT/

**पृ.शी.**: राज्यातील कायदा व सुव्यवस्थेचा पूर्णपणे बोजवारा उडणे

**मु.शी.**: राज्यातील कायदा व सुव्यवस्थेचा पूर्णपणे बोजवारा उडणे याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर, मधुकर सरपोतदार, नितीन गडकरी, दिवाकर रावते, विनोद तावडे, अरविंद सावंत, संजय केळकर, डॉ.दीपक सावंत, श्री. मधुकर चव्हाण, डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री प्रकाश शेंडगे, अनिल परब,वि.प.स. यांचा प्रस्ताव

श्री.पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्ष नेता) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने म.वि.प.नियम 259 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

"गेल्या काही महिन्यात राज्यातील कायदा व सुव्यवस्थेचा पूर्णपणे बोजवारा उडणे,राज्यातील मुंबई, पुणे, ठाणे सारख्या मोठ्या शहराबरोबरच ग्रामीण भागातही दरोडे, घरफोड्यांचे वाढते प्रकार, सोन्या-चांदीची दुकाने व बँकांवरील दरोड्यात वित्तहानी बरोबर जीवीतहानी होणे, वृध्दांच्या हत्त्या, अंमली पदार्थ व नकली नोटांची छपाई करणाऱ्या टोळ्यांची सतत वाढ होणे, राज्यभर सिमी, लष्कर-ए-तोयबा व अल्-कायदा आदी अतिरेकी संघटनांचे पसरत चाललेले जाळे, प्रभू रामचंद्राची गाणी वाजविण्यावरुन घडवून आणलेल्या दंगली, त्यांच्या वाढत्या कारवाया, या कारवायांना आळा घालण्यात तसेच गुन्हेगारांमध्ये कायद्याची जरब बसविण्यात पोलिसांना आलेले अपयश, सावकारी रोखून सावकारांवर कठोर कारवाई करण्यात शासनास आलेले अपयश, भिवंडी येथील पोलीस स्टेशनचे बांधकाम करण्यात आलेले अपयश, पोलिसांचे मनोधैर्य खच्ची करणाऱ्या घटनांचे वाढते प्रमाण, पोलिसांची रिक्त असणारी हजारो पदे त्यामुळे पोलिसांवर वाढत असणारा अतिरिक्त ताण, त्यामुळे कोलमडून पडलेली कायदा सुव्यवस्था, याबाबत करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

सभापती महोदय, खरे म्हणजे चोपडयामध्ये घडलेल्या दंगलीच्या संदर्भात काल नियम 289 चा प्रस्ताव आम्हाला मांडावयाचा होता. कायदा व सुव्यवस्थेवर दोन वेळा चर्चा होऊनही नाईलाजास्तव अंतिम आठवडा प्रस्तावाद्वारे कायदा व सुव्यवस्थेवरील चर्चा उपस्थित करावी लागली आहे.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पांडुरंग फुंडकर...)

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. अरविंद सावंत)**

सन्माननीय श्री. आर.आर.पाटीलसाहेब, आपण या राज्याचे उपमुख्यमंत्री झालात आणि गृह खाते देखील आपणाकडे आले. त्यामुळे माझ्यासारख्याच्या मनामध्ये खोलवर आशेचा किरण दिसू लागला की, निदान आता तरी या राज्याचे गृह खाते नीट चालेल, कारभार नीट केला जाईल आणि कायदा व सुव्यवसथेमध्ये थोडी फार सुधारणा होईल. मला असे वाटण्याचे कारणही तसे घडले होते. आपण उपमुख्यमंत्री झाल्याबरोबर डान्सबार बंद केलेत, गुटखा बंद केलात, आपण करीत असलेल्या घोषणेबाबत हायकोर्टातून स्थगित मिळेल किंवा कसे याचा विचार न करता अनेक लोकप्रिय घोषणा केल्या. घोषणे प्रमाणे कारवाई करण्याचे प्रामाणिकपणे प्रयत्न केलेत. गुटखा बंद केलात, डान्सबार बंद केलेत. यामुळे आपण एकदम प्रकाशझोतात आलात. त्यानंतर राज्यातील शेतक-यांच्या होत असलेल्या आत्महत्या पाहून, सावकारीमुळे शेतकरी आत्महत्या करीत आहेत हे आपल्या लक्षात आल्यानंतर सावकारांच्या बाबतीत सुध्दा कोपरापासून ढोपरापर्यन्तची भाषा आपण वापरलीत. त्यामुळे महाराष्ट्र राज्याच्या अशा धडाडीच्या उपमुख्यमंत्र्यांकडून क्रांतिकारी असे निर्णय घेतले जातील अशी आम्हाला आशा वाटत होती. क्रांतिकारी निर्णय घेतले गेले परंतु त्यांची अंमलबजावणी मात्र झाली नाही. आपला हेतू चांगला होता. आपण प्रामाणिकपणे चांगल्या गोष्टींचा निर्णय घेतला. आपल्या प्रामाणिकपणाबद्दल माझ्या मनामध्ये कोणतीही शंका नाही. परंतु आपण घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी अजिबात होऊ शकली नाही. महाराष्ट्राचे चित्र असे उभे राहिले की, हा दंगलखोर महाराष्ट्र, सावकारीवाला महाराष्ट्र, डान्सबार बंद झाल्यानंतर ते पुन्हा सुरु झालेला महाराष्ट्र, चंबळच्या खो-यातील दरोडेखोर आपल्या महाराष्ट्रात आले की काय असे वाटायला लावणारा दरोडेवाला महाराष्ट्र अशा प्रकारचे आपल्या राज्याचे चित्र उभे राहिलेले आहे आणि म्हणून हा कायदा आणि सुव्यवस्थेच्या संदर्भातील चिंताजनक ठराव मांडण्याची आमच्यावर पाळी आलेली आहे.

सभापती महोदय, परवा चोपडयाला दंगल झाली. लग्नाची वरात एका प्रार्थनास्थळासमोरुन जात असताना "मंदिर वहि बनायेंगे" या गाण्याची कॅसेट वाजवली जात होती त्यावेळी एका गटाने

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पांडुरंग फुंडकर....)

त्या वरातीवर दगडफेक सुरु केली आणि दंगलीला सुरुवात झाली. पोलिसांनी केलेल्या गोळीबारामध्ये 2 ठार आणि 18 जखमी झाले. अतिरक्त जिल्हाधिकारी श्री. नितीन महाजन यांनी गोळीबाराचे आदेश दिले नव्हते अशा प्रकारचे वक्तव्य केले होते. जर पोलिसांना गोळीबाराचे आदेश दिले नव्हते तर मग हा गोळीबार कसा आणि कोठून झाला असा प्रश्न निर्माण होतो. गोळीबार हवेत केला गेला असे जरी सांगितले तरी मग त्या गोळीबारामध्ये दोन व्यक्ती मृत कशा झाल्या ? एकाच्या डोक्याला आणि एकाच्या पोटाला गोळी लागून दोन व्यक्ती मृत्यूमुखी पडल्या. या प्रकरणी आपण सी.आय.डी.चौकशीची घोषणा केली. सभापती महोदय, "मंदिर वहि बनायेंगे" या गाण्याची कॅसेट या महाराष्ट्रामध्ये दंगल धडविण्यासाठी कारणीभूत होते की काय अशा प्रकारची स्थिती निर्माण झालेली आपण पहात आहोत. मी माननीय उपमुख्यमंत्र्यांना एका गोष्टीची आठवण करुन देऊ इच्छितो. नोव्हेंबर-डिसेंबरच्या दरम्यान अचलपूरमध्ये देवीची मिरवणूक चालली होती. मिरवणूक शांततेत चालली होती. अचलपूर सारख्या एका सेन्सेटिव्ह गावामध्ये ही कॅसेट वाजली म्हणून देवीच्या मिरवणुकीवर दगडफेक झाली. एका बाजूला ही दगडफके केली गेली आणि दुस-या बाजूला 1 कि.मी. वर असलेल्या बाजारपेठेमध्ये प्रिप्लॅनड् 2 हजाराचा जमाव रॉकेलचे डबे आणि पंप घेऊन गेले, दुकानांचे लॉक तोडून, जे लॉक तुटले नाहीत ते गॅस कटरने तोडून दुकानातील तिजोरी आणि माल लुटून नंतर दुकानांना आगी लावण्यात आल्या. या दंगलीचे निमित्त काय तर "मंदिर वहि बनायेंगे" नावाची कॅसेट वाजवली म्हणून ही दंगल झाली. अशा प्रकारची दंगल अचलपूरमध्ये घडली, जळगावमध्ये घडली. त्यानंतर रावेरमध्ये रामनवमी निमित्त निघालेल्या रामाच्या पालखीच्या मिरवणुकीवर एका जमावाने दगडफेक केली. ...

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

त्या दगडफेकीत एक पोलीस कर्मचारी जखमी झाला. यावेळी दोन्ही समुदायाचे नागरिक समोरासमोर आले आणि त्यांनी एकमेकावर दगडफेक करण्यास सुरुवात केली. त्या ठिकाणी रामजन्माची मिरवणूक सुरु होती, त्या मिरवणुकीवर दगडफेक करुन दंगल घडविण्याचा प्रयत्न झाला. अचलपूर, रावेर, चोपडा या शहरांमध्ये दंगड घडविली गेली. माननीय गृहमंत्र्यांना सांगू इच्छितो की, "मंदिर वही बनाऐगें" ही कॅसेम मी स्वत: ऐकली. त्यात ऑब्जेक्शन घेण्यासारखे काही नाही. एका कवीने ती कविता लिहिली आहे. अशी परिस्थिती असताना त्या कॅसेटचे निमित्त करुन दंगल घडविण्याचे प्रयत्न केले जातात हे बरोबर नाही. या कॅसेटच्या संदर्भात पोलीस खात्याने आदेशच काढण्यास सुरुवात केली आहे. कार्यक्रम करताना ही कॅसेट वाजविली तर तुमच्या विरुध्द कारवाई केली जाईल अशा प्रकारचे आदेश परवानगी घेणा-यांना दिले जातात. यासंदर्भात जिल्हाधिकारी, अमरावती यांचा आदेश वाचून दाखवितो त्यात असे म्हटले आहे की, "ज्याअर्थी पोलीसस अधीक्षक, अमरावती, ग्रमीण यांनी त्यांचे दिनांक 11.4.2008 पत्र क्रमांक पो.अ.ग्रा.जि.वि.शा/जा.द./प्रतिबंद/1139/2008 अन्वये कळविले की, जिल्हयामध्ये येत्या कालावधीत रामनवमी, हनुमान जयंती या सणांचे दरम्यान निघणा-या शोभा यात्रा/ मिरवणुकीमधून "मंदिर बही बनायेंगे " हे गाणे कॅसेट,सिडी,व्हीडीओ किंवा डी.जे.व्दारे प्रक्षेपित करुन धार्मिक तेढ निर्माण करण्याचा काही हिंदु संघटनांचा प्रयत्न आहे.

आणि ज्या अर्थी या गाण्याचे वाजविण्यामुळे दिनांक 22.10.2007 रोजी अचलपूर शहरात दुर्गा उत्सवाचे मिरवणुकीचे वेळेस जातीय दंगल उसळलेली होती.

आणि ज्या अर्थी दंगलीमुळे मोठया प्रमाणात वित्त हानी झाली होती व नागरिकांचे दैनंदिन जीवन धोक्यात आले होते.

आणि ज्या अर्थी पोलीस अधीक्षक, अमरावती, ग्रामीण यांनी दिलेल्या माहिती नुसार अशी परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता पुन्हा निर्माण झालेली आहे.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

आणि ज्याअर्थी यामुळे रामनवमी व हनुमान जयंती सणाचे कालावधीतील मिरवणुका, शोभायात्रा दरम्यान " मंदिर वही बनायेंगे" या गाण्याच्या वाजविण्यामुळे जिल्हयातील जातीय व धार्मिक एकोपा व सलोखा भंग पाऊन सार्वजनिक शांतता भंग होण्याची किंवा दंगल उसळण्याची शक्यता बळावली आहे.

त्याअर्थी येत्या रामनवमी व हनुमान जयंती सणांचे दरम्यान फौजदारी प्रक्रिया संहिता चे कलम 144 अन्वये अमरावती जिल्हयातील पोलीस अधीक्षक, अमरावती (ग्रामीण) यांचे कार्यक्षेत्रात या आदेशाचे दिनांकापासून " मंदिर बही बनायेंगे" हे गाणे ऑडीओ किंवा व्हीडीओ पध्दतीने कुठल्याही व्यक्तीने, संघटनेने प्रक्षेपीत करण्यावर बंदी घालण्यात येते. सदरहू आदेश दिनांक 25.4.2008 चे 00 वाजेपर्यंत अमलात राहतील.

सदरहू आदेश आज दिनांक 12.4.2008 रोजी माझ्या सही व शिक्यानिशी देण्यात आले आहे. " सदरहू आदेश अपर जिल्हाधिकारी, अमरावती यांनी काढले आहेत. अमरावती जिल्हाधिकारी यांनी अमरावती जिल्हयासाठी आदेश काढलेला आहे. "मंदिर वही बनायेंगे " या गाण्यामध्ये काही आब्जेक्शन्स आहेत काय ?काही आक्षेपार्ह शब्द आहेत काय ? असल्यास, त्याबाबतची माहिती माननीय गृहमंत्र्यांनी सभागृहात द्यावी. परंतु ग्रामीण विभागातील अधिकारी कॅसटचा विषय पुढे करुन आपल्या अंगावरील घोंगडे झटकण्याचा प्रयत्न करीत आहेत. पोलीस अधिकारी हा विषय पुढे करुन हिंदु संघटनांना दाबण्याचा प्रयत्न करतात. खामगाव येथील एका संघटनेचा कार्यकर्ता लाऊडस्पीकरची परवानगी घेण्यासाठी पोलीस स्टेशनमध्ये गेला. पोलीस स्टेशन, खामगाव यांनी त्या कार्यकत्यास नोटीस दिली आहे. सदर नोटीस दिनांक 13.4.08 रोजी दिली आहे. ती नोटीस मी माननीय उपमुख्यमंत्र्यांकडे सादर करण्यास तयार आहे....

यानंतर श्री. कानडे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ...

सभापती महोदय, त्यांनी सांगितले की, आपणांस नोटीस देण्यात येते की, 13/4/08 रोजी रामनवमीनिमित्त निघणाऱ्या मिरवणुकीत सहभागी होणार आहात आपल्याकडून सदर उत्सव व मिरवणुकीत इतर समाजाच्या भावना दुखावणारे व भावना भडकविणारे गाणे व धून वाजविल्यामुळे दोन धर्मियांमध्ये तेढ निर्माण होऊन शांतता भंग होऊन कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याअनुषंगाने मुंबई पोलीस कलम 36 अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन आपणांस कळविण्यात येते की, आपण बनाएंग मंदीर हे गाणे सदर उत्सवानिमित्त अगर मिरवणुकी दरम्यान वाजवू नये. आपण सदर आदेशाचे उल्लंघन केल्यास ध्वनीक्षेपक संच, वाद्य व इतर संबंधित साहित्य जप्त करुन योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल व होणाऱ्या परिणामाची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील याची नोंद घेण्यात यावी. सही अे.बी.कानडे,पोलीस निरीक्षक, खामगांव. पोलीस स्टेशनने हे पत्र दिले आहे. अमरावतीच्या पोलीस अधिक्षकांनी आदेश काढला, खामगांवच्या पोलीस स्टेशनने आदेश काढला आणि 2/3/4 ठिकाणी अशा प्रकारच्या दंगली घडल्या या केवळ कॅसेटमुळे घडल्या अशा प्रकारचा उल्लेख झाला. या देशामध्ये घटनेने दिलेला अधिकार वापरुन प्रत्येकाला आपल्या धर्माची पूजा करण्याचा, धर्माचे आचरण करण्याचा आणि धर्माप्रमाणे वागण्याचा अधिकार राज्य घटनेने दिलेला आहे. असे असताना मंदिर वही बनाएंगे या एका गाण्यासाठी अशा प्रकारे अनेक लोकांवर केसेस करण्यात आल्या आणि दंगली करण्यात आल्या. धर्मांध लोकांनी मिरवणुकीवर हल्ले केले, लग्नाच्या वरातीवर हल्ले केले आणि आपला धर्मांधपणा दाखवून दिला आणि पोलीस मात्र त्यांना रोखू शकले नाहीत. या नोटीसेसमुळे दोन मिरवणुकीवर परिणाम झाला की अशा प्रकारचे आदेश दिल्यामुळे लोक मिरवणुकीमध्ये येण्यास घाबरत होते कारण पुन्हा आपल्यावर अशा प्रकारच्या केसेस दाखल होतील. कुणाला रोखता आहात ? या देशात सर्वांना जगण्याचा अधिकार आहे. या देशात आपल्या धर्माप्रमाणे आचरण करण्याचा अधिकार आहे. आबासाहेब आपण गृहमंत्री असतानाहिंदूना असे का वागविले जात आहे हे मला समजत नाही. राममंदिराचे झाले. एवढेच नव्हे तर सांगली जिल्हयामध्ये काय झाले? आपण राहता त्या जिल्हयात काय झाले ? शिवप्रतिष्ठानचे संस्थापक श्री. संभाजीराव भिडे गुरुजी त्यांनी काय म्हटले तर जोधा अकबर या चित्रपटावर बंदी आणण्यासाठी त्यांचे कार्यकर्ते त्याठिकाणी गेले आणि फक्त निदर्शने केली. काही गुन्हा केला नव्हता. खरे म्हणजे

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ...

संभाजीराव भिडे आबासाहेब आपल्या गावचे आहेत, एक चांगले समाजसेवक आहेत. चांगले काम करणारा कार्यकर्ता आहे. परंतु भिडे यांच्या संघटनेने जोधा अकबर या चित्रपटावर बंदी आणण्यासाठी निवेदन देण्याचा प्रयत्न करीत असताना निदर्शने करीत असताना तुमचे कर्तव्यदक्ष पोलीस अधिक्षक काली-पिली फेम,बंदी फेम पोलीस अधिक्षक कृष्णप्रसाद यांनी काय केले ? खरे पाहिले तर या माणसाला प्रसिध्दीची फार हौस आहे. आबासाहेब तुमच्या जिल्हयात तुम्ही या अधिकाऱ्याला घेतले आहे पण जरा जपून. चांगले केले. तुम्हांला आता त्यांची कर्तव्यदक्षता समजून येईल. भिडेसारख्यास एका वृध्द माणसाला चोपून काढून त्याठिकाणी दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला. सांगली हे गुंडांच्या ताब्यात देण्याचे पाप कृष्णप्रसाद यांनी केले. काय शिक्षा करणार आहात ? काय केले भिडे गुरुजींनी ? परंतु हिंदूंचा स्वाभिमान दुखावणारी गोष्ट असणाऱ्या जोधा अकबर या चित्रपटाविरोधात शांततेने आंदोलन करीत असताना पोलीस प्रमुख कृष्णप्रसाद यांनी जनरल डायरची भूमिका बजावली असे भिडे गुरुजी म्हणाले.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...........

आम्ही नाही म्हटले. 'स्वातंत्र्यपूर्व काळात जालियनवाला बागेत जो भयंकर प्रकार घडला त्याहून भयंकर प्रकार सांगलीत घडला' अशी जळजळीत प्रक्रिया शिवप्रतिष्ठानचे संस्थापक श्री.संभाजीराव भिडे यांनी दैनिक सामनाच्या प्रतिनिधीशी बोलताना दिली. सन्माननीय उपमुख्यमंत्री महोदय आपण ज्यांच्याबद्दल कौतुकाचे वक्तव्य केले त्या एका समाजप्रेमी माणसाने, ज्येष्ठ माणसाने, ज्येष्ठ समाजसेवकाने अशा प्रकारची प्रतिक्रिया दिली त्याअर्थी तेथे काय घडले याची कल्पना आपण करु शकता. हे काय चालले आहे? या राज्यातील हिंदूंना चोपायचे आणि धर्मांधाना, या राज्यातील गुंडांना मोकळीक द्यायची असे ठरविले आहे काय? सांगलीतील घटना छोटी होती. परंतु पोलीस दलाने त्या घटनेकडे वेगळ्या अर्थाने पाहिले आणि सांगली शहर गुंडांच्या ताब्यात दिले. त्या शहराची झालेली हानी भरुन न निघण्यासारखी आहे. सांगलीत लाठीमार केला आणि तो देखील निरपराध लोकांवर केला. शिवप्रतिष्ठानच्या लोकांवर केला आणि त्याची दखल घेणार आहात की नाही? याची चौकशी करणार आहात की नाही? सन्माननीय उपमुख्यमंत्री महोदय, ज्याप्रमाणे तुमचे पोलीस अधीक्षक वागले त्या संदर्भात काही निर्णय घेणार आहात की नाही? मी दोन आदेशाच्या प्रती तुमच्याकडे दिल्या आहेत. आपल्याकडून माझ्या दोन अपेक्षा आहेत. 'मंदिर वही बनायेंगे' या गाण्यावर महाराष्ट्र सरकारने बंदी घातली आहे का? या प्रश्नाचे उत्तर अपेक्षित आहे. जर बंदी घातली नसेल तर ज्या ज्या अधिकाऱ्यांनी अशा प्रकारचे आदेश काढून त्याठिकाणी बंदी घातली आणि गाणे वाजविण्याच्या मुलभूत हक्कावर गदा आणली त्या अधिकाऱ्यांवर कारवाई करणार आहात का? त्या गाण्यामुळे दंगल घडली असे सांगितले जात आहे. त्या कारणामुळे जर मिरवणुकीवर बंदी आणण्याचा प्रयत्न झाला असेल तर ते देखील योग्य नाही. सन्माननीय उपमुख्यमंत्री महोदय, मंदिर वही बनायेंगे या गाण्याच्या कॅसेटसंबंधी खुलासा आपण उत्तराच्या भाषणात केला पाहिजे. दुसरा महत्वाचा मुद्दा म्हणजे हा छत्रपती शिवरायांचा महाराष्ट्र आहे. या छत्रपती शिवरायांच्या महाराष्ट्राची किती अवहेलना होत आहे हे बघायचे असेल तर खरोखरच शिर्डीजवळील राहाता येथील घटनेची चौकशी करावी. छत्रपती शिवरायांचा पुतळा दोन वर्षे गोडावूनमध्ये धूळ खात पडला होता. मंत्रिमंडळातील महसूलमंत्री श्री.नारायण राणे यांनी त्या जागेचे भूमीपूजन केले. पुतळा बसविण्याचा निर्णय झाला. जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी घेण्यात आली. जिल्हाधिकाऱ्यांच्या परवानगीनंतर पुतळयाचे आदेश दिले गेले. त्या शिल्पकाराने पुतळा

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...........

तयार केला. जे.जे.स्कूल ऑफ आर्टस्‌ची परवानगी घेण्यात आली. इतके सगळे झाल्यानंतर नगरपरिषदेमध्ये सत्तांतर झाले. सत्तांतर झाल्यानंतर त्याठिकाणी नगराध्यक्षपदी एका महिलेची निवड झाली. त्या महिला नगराध्यक्षांच्या लक्षात आले की, माझ्या महाराष्ट्रामध्ये छत्रपती शिवरायांचा पुतळा दोन वर्षे गोडावूनमध्ये धूळ खात पडला आहे. या महिलेने महाराष्ट्राच्या महिलेचा बाणा दाखविण्याचा प्रयत्न केला. तो पुतळा बसविण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी तेथील स्थानिक आमदारांनी तो प्रयत्न का रोखला? याचे कारण म्हणजे तो पुतळा त्या महिलेने बसविला तर त्याचे श्रेय तिला मिळेल. म्हणून तो पुतळा बसविण्याचे काम रोखण्यात आले. सन्माननीय उपमुख्यमंत्री महोदय, आपण गृहमंत्री आहात, किमान आपल्या कार्यकाळात या महाराष्ट्राची अस्मिता असलेल्या, स्वाभिमान असलेल्या, ज्यांच्या नावाने आपण राज्य करीत आहात त्या छत्रपतींचा पुतळा काही कारण नसताना दोन वर्षे गोडावूनमध्ये धूळ खात पडला असेल तर तुमच्या आमच्या दृष्टीने ही शरमेची बाब आहे. याची दखल घेणार आहात की नाही? हेही सभागृहाला सांगितले पाहिजे. एका बाजूला 'मंदिर वही बनायेंगे' या गाण्यावर बंदी घातली आणि दुसऱ्या बाजूला छत्रपतींचा पुतळा उभारण्यावर बंदी घातली, श्री.संभाजीराव भिडे यांना जालियनवाला बागेत घडलेल्या घटनेप्रमाणे मारण्याचा प्रकार झाला, धर्मांधांना मोकळे रान करुन देण्याचा प्रयत्न झाला आणि आपण गप्प बसून आहात. यामुळे आपल्या इमेजला धक्का लागणार आहे. म्हणून याची आपण दखल घेतली पाहिजे आणि यासंबंधीची स्पष्टता महाराष्ट्राला समजली पाहिजे.

(नंतर श्री.जुन्नरे.....

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ....

महाराष्ट्राचे सरकार आणि महाराष्ट्राच्या गृहमंत्री कुठल्या पध्दतीने वागत आहेत हे महाराष्ट्रातील जनतेला समजले पाहिजे? "मंदिर वही बनायेंगे" या गाण्यावर महाराष्ट्रच्या मुख्यमंत्र्यांनी बंदी आणलेली आहे की, अधिका-यांनी आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करतात हे महाराष्ट्रातील जनतेला समजले पाहिजे.

सभापती महोदय, मी या ठिकाणी दंगलीच्या संदर्भात उल्लेख केला, " मंदिर वही बनायेंगे", तसेच शिवरायांच्या पुतळयांच्या संदर्भात उल्लेख केलेला आहे. आज छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यात हिदु समाजाविरुध्द कट कारस्थान केले जात आहे. तुमच्या सारख्या संत गाडगे महारांजाचा वारसा घेतलेल्यांची, आपल्या सारख्या माणसांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न चालला आहे त्यामुळे याकडेही अधिक बारकाईने लक्ष देण्यीच आवश्यकता आहे.

सभापती महोदय, सुरतमध्ये निवडणूक असतांना ठाणे- अहमदाबाद हायवेवर कॉंगेस कार्यकर्त्यांची गाडी अडवून त्यांना लुटण्यात आले, मारहाण केली गेली, त्यांच्या जवळचे पेसे लुटले गेले, चोप दिला गेला. केवळ ही एकच घटना घडली असे नसून असे अनेक प्रकार अहमदाबाद हायवेवर होत आहेत. अहमदाबाद हायवेवर जेव्हा दरोडा पडला त्या ठिकाणावरुन पोलीस स्टेशन अवघ्या दोन कि.मी. अंतरावर होते परंतु पिक्चरमध्ये दाखवले जाते त्या प्रमाणे तुमचे पोलीस सर्व घटना झाल्यानंतर पोहचले. या दरोडेखोरांना पकडले गेले काय? या घटनेने पूर्ण जिल्हा हादरुन गेला आहे. चंबळच्या खो-याला लाजवेल असे प्रकार ठाणे जिल्हयातच नाही तर संपूर्ण महाराष्ट्रात सुरु आहे. ठाणे जिल्हयातून 3-4 हायवे जातात. त्यामुळे हायवेवर जर अशा प्रकारे दरोडयाचे सत्र सुरु झाले तर लोकांना रस्त्यावरुन चालणे सुध्दा मुष्कील होईल त्यामुळे आपले पोलीस कोणते काम करीत आहेत? या घटना केवळ ठाणे जिल्हयातील हायवेवरच घडतात असे नाही तर शिर्डीला जाणा-या भक्तांवर सुध्दा हल्ले होत आहेत. साईबाबाच्या भक्तांची लूट होते व खुनी सत्र थांबविण्यासाठी नाशिक पोलीस सक्रीय झाले आहे असे म्हटले होते त्यामुळे या गुन्हयातील किती लोकांना पकडण्यात आलेले आहे. साईबाबाच्या दर्शनासाठी शिर्डीला जावे की, नाही असा प्रश्न साईभक्तांसमोर निर्माण झालेला आहे. त्यामुळे लूट आणि खुनी सत्र थांबविण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे.

....2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ....

सभापती महोदय, दरोडेखोर आणि लुटमारीचे प्रकार केवळ ठाणे आणि मुंबईतच चालू आहेत असे नसून संपूर्ण महाराष्ट्रात दरोडे आणि लुटमारीचे सत्र सुरु आहे. दरोडेखोरांनी संपूर्ण महाराष्ट्रात दहशत निर्माण केलेली आहे. दरोडेखोरीचे लोन मुंबई, ठाण्यापुरते मर्यादीत न राहता संपर्ण महाराष्ट्रात पोहचले आहे. दिवसाढवळया लोकांच्या घरात घुसुन माल लुटला जातो, रायफल दाखवली जाते, पिस्तुल दाखवले जाते आणि माल लूटून नेला जातो. पिक्चर मध्ये शोभावे तसे सगळे झाल्यानंतर पोलीस घटनेच्या ठिकाणी पोहचतात.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ MMP/ SBT/ प्रथमश्री.जुन्नरे 15.35

श्री.पांडुरंग फुंडकर ...

अशा प्रकारचे गुन्हे घडत असतांना महाराष्ट्राचे पोलीस खाते काय कारवाई करीत आहे ?

सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांना मी विचारु इच्छितो की, आपण डान्सबार बंद केलेले आहेत परंतु आजही मुंबईमध्ये ते का सुरु आहेत ? डान्सबारवर बंदी आणली तरी प्रत्यक्षात काही ठिकाणी डान्सबार सुरुच आहेत. फेब्रुवारी महिन्यामध्ये वर्तमानपत्रात एक बातमी प्रसिध्द झाली होती. मुंबईच्या दादर भागामध्ये असा एक प्रकार सुरु झाला होता. उप मुख्यमंत्र्यांच्या नावावर पोलीस हप्ते गोळा करीत होते. मी सुरुवातीलाच सांगितले होते की, आपण खरेखर प्रामाणिक आहात . परंतु आपल्या विभागातील लोकांनी आपल्याच नावावर हप्ते वसूल केलेले आहेत. वर्तमानपत्रात अशी बातमी आली होती की, दादरच्या शिवाजी पार्क परिसरात मदिरा, बियर बारमध्ये शनिवार दिनांक 16 फेब्रुवारी 2008 रोजी पोलील निरीक्षक श्री. जॉर्ज आणि उप पोलीस निरीक्षक श्री.सुनील कांबळे व पोलीस खबरे श्री.सुनील चौधरी हे तिघेहीजण घुसले व त्यांनी बार मालकांकडे हप्त्याची मागणी केली. ही वसुली उपमुख्यमंत्री महोदयांसाठीच आहे असे त्यांनी सागितले. विशेष म्हणजे पालिसांनी स्वत: बरोबर श्री.सुनील चौधरी नावाचा खब-या घेंतला होता.परंतु बारचा मालकसुध्दा खमक्या निघाला व त्याने हा डाव उधळून लावला तसेच तिंघांनाही त्याने बदडून काढले होते." हा खबऱ्या तासगावमधील प्राथमिक शाळेतील हेडमास्तरांचा मुलगा आहे.त्याच्या मदतीने पोलिसांनी हप्ते वसूल करण्याचे धाडस केले आहे त्यावरुन असे दिसून येते की, हे प्रकार सुरुच आहेत. काही ठिकाणच्या बारमध्ये 15 मुली पकडल्या जातात तर काही ठिकाणच्या बारमध्ये 20 मुली पकडल्या जातात. बारबालाचे प्रकार अजूनही थांबलेले नाहीत. अनेक ठिकाणी डान्सबार अजूनही सुरुच आहेत. आपल्या बंदीचा फायदा घेऊन पोलीस स्टेशनने मात्र आपले हप्ते वाढवून घेण्यास सुरुवात केलेली आहे . आपले हप्ते वाढवून घेण्यासाठी , आपल्या हप्त्याचा स्तर वाढविण्यासाठी आपण पोलिसांना मदत केलेली आहे.या डान्सबारमधून 20 मुलींना अटक दुस-या डान्सबासरमधून 15 मुलींना अटक अशा प्रकारच्या बातम्या सतत वर्तमानपत्रातून येत आहेत.

. सभापती महोदय, डान्सबारप्रमाणे आणखी एक विष राज्यातील तरुण पिढीमध्ये घुसविण्याचे पाप आपल्या शासनाच्या माध्यमातून सुरु आहे. या शासनाने गुटखाबंदी केलेली आहे.गुटखाबंदी संबंधीचा प्रश्न या सभागृहामध्ये आम्ही अनेकदा उपस्थित केला होता. गुटखाबंदीसंबंधी संबंधित

2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर ...

विभागाचे माननीय मंत्री महोदय असे उत्तर देतात की, सुप्रीम कोर्टाने या संदभा्रत स्टे दिलेला आहे.सुप्रीम कोर्टाने गुटखाबंदीला स्टे दिलेला आहे पंरतु गुटख्यामध्ये असलेला मॅग्नेशियम कार्बोनेट टाकण्यामध्ये बंदी घातलेली नाही. मॅग्नेशियम कार्बोनेट हा घटक गुटख्यामध्ये वापरण्याची तरतूद कायद्यात नसतांनासुध्दा तो घटक वापरला जात आहे त्याबाबतीत आम्ही सभागृहात वारंवार उल्लेख करीत आहोत . मॅग्नेशियम कार्बोनेटचा वापर गुटख्यामध्ये मोठया प्रमाणावर केला जात असून हा घटक अत्यंत विषारी असून त्यातून अनेक रोग माणसाच्या शरीरामध्ये प्रवेश करतात कोर्टाने .गुटखा बंदीला स्टे दिला आहे परतु मॅग्नेशियम कार्बोनेटवर सुप्रीम कोर्टाने बंदी घातलेली नाही . मॅग्नेशियम कार्बोनेट युक्त गुटखा या राज्यात विकला जातो त्याबाबतीत प्रश्न विचारल्यानंतर सप्लाय करणा-यांचे आणि मूळ मालकांचे पत्ते आम्हाला सापडत नाहीत त्यामुळे ते पकडले जात नाहीत. काही जणांवर केसेस दाखल केल्या आहेत परंतु विकणा-यावर केसेस घातल्या आहेत उत्पादकांवर घातलेल्या नाहीत असे उत्तर दिले जाते. तेव्हा या प्रश्नाच्या मुळाशी जाण्याची गरज आहे. महाराष्ट्रातील एक तरुण पिढी बरबाद करण्याचे काम हे गुटखा उत्पादक करणार असतील तर ते पाप तुम्ही घेऊ नका. संबंधित विभाग जर त्यासंबंधी चौकशी करणार नसेल तर पोलीस खात्याच्या माध्यमातून मॅग्नेशियम कार्बोनेट हा घटक गुटख्यामध्ये टाकून त्याची विक्री केली जाते तेव्हा त्यांचे करखाने उदध्वस्त करण्यात यावेत, त्यांना अटक करण्यात येऊन मोका खाली केसेस दाखल करण्यात यावेत अशी मागणी मी या चर्चेच्या निमित्ताने करीत आहे.

सभापती महोदय, यानंतर मी चौथा मुद्दा मांडणार आहे. तो मुद्दा सावकारीसंबंधी आहेत. माननीय उपमुख्यमंत्री कर्तव्यदक्ष आहेत हे मी सांगितले आहे.परंतु आपल्या विभागावर मात्र दुस-या कोणाचा तरी अधिकार चालत असल्याचे दिसून येते आमच्या खामगाव मध्ये राज्यातील एक मोठा सावकर राहतो हे आपल्याला देखील माहीत आहे त्याच्यावर 35 गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. हे सर्व गुन्हे रजिस्टर करण्यात आले असून त्याबाबत कोठे तरी खळबळ माजली आणि माननीय मुख्यमंत्र्याच्या कार्यालयातून पोलीस स्य्टेशनला फोन करण्यात आला . माझ्याकडे स्टेशन डायरीची झेरॉक्स प्रत आहे. त्याची एक प्रत मी आपल्याला दिलेली आहे. पाोलीस स्टेशनला फोन करुन मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयाला असे सांगण्यात आले की ,आमदाराच्या वडिलांच्या विरुध्द अवैध सावकारीसबंधीच्या तक्रारी दाखल झालेल्या आहेत .

नतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. फुंडकर ....

मुख्यमंत्री सांगेपर्यंत त्यांच्यावर गुन्हा दाखल करू नका. अशा पद्धतीने मुख्यमंत्री कार्यालयातून आदेश दिले गेले. म्हणजे राज्याचे उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री असलेल्या माननीय श्री.आर.आर. पाटील यांना मी सांगू इच्छितो की, आता तुमच्या खात्यावर त्यांचा, त्यांच्या खात्याचा अधिकार सुरू झाला आहे. खरे तर तुमचे गृह खाते हे स्वतंत्रपणे चालले पाहिजे परंतु तुमच्या खात्यावर त्यांचाही वॉच ठेवला जातो आहे. सभापती महोदय, माझ्याकडे कलेक्टर कार्यालय, बुलढाणा यांचे पत्र आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक यांना हे पत्र लिहिले असून ते आमदार श्री.दिलीप सानंद यांच्या विरोधात आलेल्या तक्रारीबाबत आहे. संदर्भा माननीय मुख्यमंत्री यांच्या 1.6.2006 रोजीच्या बैठकीत दिलेले निर्देश. एका सावकार आमदाराच्याबद्दल ही बैठक होती आणि कलेक्टर एस.पी.ला त्या संदर्भात 5.6.2006 रोजी पत्र लिहितो आहे. सभापती महोदय, मी ते पत्रच येथे वाचून दाखवितो. त्या पत्राचा विषय असा होता की, माननीय आमदार श्री.दिलीपकुमार सानंदा व त्यांच्या कुटुंबातील सदस्यांविरूद्ध होत असलेल्या अवैध सावकारीच्या तक्रारींबाबत. आणि संदर्भ होता तो माननीय मुख्यमंत्र्यांनी दिनांक 1.6.2006 रोजीच्या बैठकीत दिलेले निर्देश. माननीय मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी एका व्यक्तिगत विषयावर मुख्यमंत्री बैठक घेतात, मुख्यमंत्री एवढे रिकामे झाले काय? झुणका-भाकर केंद्रवाल्यांसाठी बैठक घेण्यास माननीय मुख्यमंत्र्यांना वेळ नाही. परंतु त्यांच्या वर्षा बंगल्यावर अवैध सावकारी करणाऱ्या आमदाराबाबत बैठक घेण्यास वेळ आहे. सभापती महोदय, त्या पत्रात कलेक्टर एसपींना लिहितात की, "दि.1.6.2006 रोजी माननीय मुख्यमंत्री यांच्या निवासस्थानी उपरोक्त विषयावर सविस्तर चर्चा झाली. या बैठकीस माननीय आमदार श्री.दिलीपकुमार सानंदा यांनी त्यांच्या कुटुंबातील सदस्यांविरूद्ध हेतुपुरस्सरपणे खोटे आरोप लावून अवैध सावकारीच्या कारणाखाली तक्रारी केल्या जात असून या तक्रारीच्या सत्यतेबाबत छाननी करता गुन्हे दाखल केले जात असल्याबाबत तक्रार केली आहे. या तक्रारीची माननीय मुख्यमंत्री यांनी गंभीर दखल घेतली असून अशा प्रकारच्या तक्रारी प्राप्त झाल्यास माननीय आमदार श्री.दिलीपकुमार सानंदा व त्यांच्या कुटुंबातील सदस्यांविरूद्ध गुन्हा दाखल करण्यापूर्वी अशा प्रकारचे प्रकरण / तक्रार अवैध सावकार प्रतिबंधक जिल्हा स्तरीय समितीपुढे निर्णयासाठी ठेवावे आणि समितीने जिल्हा सरकारी वकिलांचे अभिप्राय घेतल्यानंतरच याबाबतचा निर्णय घेऊन यथोचित कारवाई करावी असे आदेश दिले आहेत. तरी आपणास कळविण्यात येते की, माननीय मुख्यमंत्री

..... 3एफ 2 ...

श्री. फुंडकर ....

यांनी दिलेल्या निदेशाप्रमाणे सावकार प्रतिबंधक कायद्यातील सानंदा कुटुंबाबाबतची प्रकरणे हाताळावीत." सभापती महोदय, अशा प्रकारे मुख्यमंत्री कार्यालयाकडून सूचना गेल्यानंतर कलेक्टर हे पत्र एसपीला लिहित आहेत. एका व्यक्ती संबंधात हे पत्र लिहिता तर मग महाराष्ट्रातील इतर सावकारांनी काय केले ? सर्वसाधारण सावकारांच्याबाबतीत तक्रारी आहेत त्याबद्दल देखील शहानिशा केल्याशिवाय त्यांच्यावर देखील गुन्हे दाखल करून नका असे पत्र आपण का देत नाही ? पण तसे आपण करीत नाही. केवळ तुमच्या पक्षाच्या आमदाराला वाचविण्यासाठी आपण हे करीत आहात. राज्यकर्ते असे करणार असतील तर मग जनमानसात तुमची प्रतिमा ती काय राहणार आहे याचाही आपण विचार करावा. म्हणून आज बाहेर म्हटले जात आहे की, आज महाराष्ट्रात सर्वात मोठा सावकार कोणता असेल तर तो तुमच्या पक्षातील आमदार श्री.दिलीप सानंदा आहे. आता तुम्ही त्यांना वाचविल्यामुळे महाराष्ट्रात सर्वात मोठे सावकार श्री.विलासराव देशमुख आणि श्री.आर.आर.पाटील हे आहेत असेही म्हटले जात आहे. कारण तुम्ही त्या सावकाराला पाठीशी घातले आहे. अशा पद्धतीने कारभार चालला असेल तर याची निश्चितपणे दखल घेण्याची गरज आहे.

सभापती महोदय, मी आपल्याला दोन तीन प्रश्न विचारले आहेत, सीडी संबंधात विचारले त्याबद्दल तुम्ही निर्णायक उत्तर येथे दिले पाहिजे. अशा किती घटना आपल्याला मी सांगू ? आता वेळ नसल्याने त्या साऱ्या काही मी येथे सांगू शकत नाही. मला आपला जास्त वेळ घ्यायचा नाही. पण आपल्या या सभागृहामध्ये नागपूर अधिवेशनामध्ये एका अधिकाऱ्यासंबंधी तक्रार केली होती. गुन्हा ग्रामीणचे पोलीस निरीक्षक श्री.आंदळकर यांनी या सभागृहाच्या उपसभापतींना कशा प्रकारची वागणूक दिली त्याबद्दल मी औचित्याचा मुद्दा उपस्थित केला होता. त्या ठिकाणी तक्रार केली, त्याबाबत लाचलुचपत विभागामार्फत, सीआयडी मार्फत चौकशी झाली आहे. तुम्ही त्याची बदली देखील केली पण त्याने 'मॅट' मधून त्यावर स्टे आणला. असा हा पोलीस अधिकारी आहे की त्यांना यापूर्वी देखील अनेकांचा अवमान केलेला आहे. उपसभापतींचा अवमान केलेला आहे. पीठासीन अधिकाऱ्यांच्या संबंधात असे वागणारे आपले अधिकारी इतके मुर्वतखोर असतील तर ते उद्या तुमच्याशी देखील असेच वागायला कमी करणार नाहीत हे आपण लक्षात घ्या. त्यामुळे या संबंधात काय चालले आहे त्याबाबतही या ठिकाणी खुलासा केला तर बरे होईल.

...... 3एफ 3 ...



KBS/ SBT/ श्री. गायकवाड नंतर --- 15:40

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. फुंडकर ....

सभापती महोदय, आता शेवटचा मुद्दा मांडून मी माझे भाषण संपविणार आहे. मागील अधिवेशनामध्ये खामगाव येथील एका मुलाच्या मृत्यूसंबंधात मी औचित्याचा मुद्दा येथे उपस्थित केला होता. महादेव दगडू ठाकरे याने त्याला विहीर मिळाली नाही, दारिद्र्यरेषेखालील कार्ड मिळाले नाही आणि त्याला आमदाराने बोलावून शिवीगाळ करून हाकलून दिले. .....

( यानंतर सौ.रणदिवे ....3जी 1 ..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ SBT/ MMP/ पूर्वी श्री.सुंबरे . . . . 15:45

श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

अशा प्रकारे त्याचा जो अपमान झाला तो त्या मुलाला सहन झाला नाही. त्याने आपल्या आई-वडिलांसाठी पत्र लिहून ठेवले. मी मागच्या अधिवेशनाच्यावेळी माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील साहेबांना ते पत्रही दिलेले आहे. या मुलाने गळफास लावून आत्महत्या केली. पण पोलिसांनी गुन्हा रजिस्टर केलेला नाही. मग आता काय करावयाचे ? त्यांनी आमदारांचे आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे नाव चिठ्ठीमध्ये लिहीले. पण तुम्ही कारवाई केलीच नाही. मात्र नंतर तुमचे जिल्हाधिकारी त्याच्या घरी गेले आणि त्यांनी सांगितले की, आम्ही तुम्हाला मदत देत आहोत. तुम्ही सन्माननीय आमदार श्री.सानंदा यांचे का घेत आहात ? त्यांचे नाव चिठ्ठीमध्ये का लिहीण्यात आले आहे ? अशा प्रकारे कलेक्टर यांनी त्या मुलाच्या आई-वडिलांना धमकी दिली. त्यांचे नाव घेऊ नकोस असे सांगितले. परंतु ते प्रकरण एवढयावरच थांबले नाही. तर त्यांना धमकी देखील देण्यात आली. शेवटी याबाबतीत त्या मुलाच्या आईने तीन महिन्यापूर्वी पोलीस स्टेशनमध्ये नावानिशी तक्रार दाखल केलेली आहे. यामध्ये दोन आमदारांच्या नावाने, त्यांच्या दोन सहकाऱ्यांच्या नावाने तक्रार केलेली आहे. त्या तक्रारी केल्यानंतर देखील तीन महिने पोलीस स्टेशनमार्फत कोणतीही दखल घेण्यात आली नाही. मला दिनांक 4 मार्च 2008 रोजी तुमच्या मंत्रालयाकडून एक पत्र देण्यात आले. त्या पत्रामध्ये असे म्हटलेले आहे की, "मृतकाच्या खिशामध्ये सापडलेल्या चिठ्ठीमधील हस्ताक्षर व नैसर्गिक हस्ताक्षर एकच आहे काय ? हे तपासण्यासाठी ते पत्र हस्ताक्षर तज्ञांकडे पाठविलेले आहे. त्यांचे अभिप्राय येणे बाकी आहे." दि.22 नोव्हेंबर 2007 मध्ये ठाकरेचा मृत्यू झाला होता आणि आता एप्रिल 2008 सुरु आहे. तोपर्यंत या चिठ्ठीतील हस्ताक्षरासंबंधीचा अभिप्राय अजूनपर्यंत पोलीस स्टेशनला प्राप्त झालेला नाही. यामध्ये काय खरे आहे आणि काय खोटे आहे हे समजलेले नाही. खरे म्हणजे त्या मुलाची आई पोलीस स्टेशनमध्ये ते पत्र घेऊन गेली, परंतु तेथे अजून गुन्हा रजिस्टर करण्यात आला नाही. माननीय गृहमंत्री महोदय, त्यांना कशासाठी जपत आहात ? ते तुमच्या पक्षाचे सन्माननीय सदस्य नाहीत. त्यामुळे माननीय गृहमंत्री महोदय, तुमची इमेज खराब होत आहे. माझा असा प्रश्न आहे की, अजूनपर्यंत गुन्हा रजिस्टर का करण्यात आला नाही ? माननीय गृहमंत्री महोदय, आपण याबाबतीत खुलासा करणार आहात काय ? यामध्ये कोणाचा दबाव आहे ? पोलीस कोणाच्या दबावाखाली काम करीत आहेत ? म्हणून संबंधितांच्या विरुध्द गुन्हा रजिस्टर झाला पाहिजे. संबंधित शेतकऱ्याच्या मुलाने...

. . . .3 जी-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

आत्महत्या केलेली आहे, त्या आई-वडिलांना न्याय मिळाला पाहिजे. यासंबंधात माननीय सभापतींनी सुध्दा माननीय गृहमंत्र्यांना बोलावून सांगितले होते की, हे प्रकरण गंभीर आहे. याबाबतीत तुम्ही लक्ष घालावे. मी तुम्हाला पत्र देतो. एवढे असूनही चार महिने झाले तरी अजूनपर्यंत त्या मृत झ ालेल्या मुलाच्या आईला न्याय मिळालेला नाही. तुमचे राज्य अशा प्रकारे चालू आहे. सिमी संघटना, अल कायदा यासंदर्भात माझ्याकडे अनेक प्रकरणे आहेत. मी सदनाचा अधिक वेळ घेऊ इच्छित नाही. मी याठिकाणी जे महत्वाचे मुद्दे मांडलेले आहेत, कृपा करुन आपण त्या मुद्यांच्या बाबतीत खुलासा करावा आणि "मंदिर वही बनाऐंगे". तसेच आपल्या राज्यामध्ये हिंदू लोकांची जी मुस्कटदाबी सुरु आहे, ती अशीच सुरु रहाणार आहे काय ? याबाबतीत देखील आपण खुलासा करावा एवढेच मी सांगू इच्छितो आणि माझे भाषण संपवितो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

यानंतर कु.गायकवाड . . . .

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**( सभापतीस्थानी : माननीय उपसभापती )**

**पृ.शी** : विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन ( सुधारणा ) विधेयक, 2008

L.A. BILL NO. XXVII OF 2008.

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA LEGISLATURE MEMBERS' PENSION ACT, 1976.)

श्री. हर्षवर्धन देशमुख ( संसदीय कार्यमंत्री ) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2008 चे वि.स.वि क्रमांक 27 महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन अधिनियम, 1976 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

**उपसभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री. हर्षवर्धन देशमुख : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2008 चे वि.स.वि. क्रमांक 27 महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन अधिनियम, 1976 विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, आपल्या राज्यामध्ये 1750 माजी आमदार आहेत. त्यांना दर महिन्याला 8 हजार रुपये पेंशन दिले जाते. या विधेयकामध्ये अशी सुधारणा करण्यात आली आहे की, त्यांची पेंशन 8 हजार रुपयांवरुन 10 हजार रुपये करण्यात आली . त्यांच्या पेंशनमध्ये 2 हजार रुपयांची वाढ करण्यात आली आहे. तसेच दुसरी अशी सुधारणा करण्यात आली आहे की, प्रत्येक टर्मला, प्रत्येक वर्षी त्यांना 500 रुपयांच्या ऐवजी 750 रूपये दिले जातील. म्हणजेच 250 रूपये वाढ करण्यात आली आहे. माजी सदस्यांना 25 हजार किमी. पर्यंत रेल्वे कूपन्स देण्यात येत होती. आता या मर्यादेमध्ये वाढ केलेली असून 35 हजार किमी. पर्यंत कूपन्स देण्याचा निर्णय घेण्यात येणार आहे. हे विधेयक मंजूर करण्यात यावे अशी माझी विनंती आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, आपण ज्याप्रमाणे सन्माननीय सदस्यांना कूपन्स देतो तसे कूपन्स माजी सदस्यांना देत नाही. त्यांनी तेथे खर्च करावयाचा व त्यानंतर त्यांना अधिकाऱ्यांकडे यावे लागते. त्यामुळे त्यांनाही कूपन देण्यात यावे अशी मी विनंती करीत आहे.

श्री. हर्षवर्धन देशमुख : या संदर्भात परवाच एक बैठक झालेली आहे. याबाबत लवकरच निर्णय घेण्यात येईल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 व 3 विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. हर्षवर्धन देशमुख : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2008 चे वि.स.वि क्रमांक 27 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : सन 2008 चे वि.स.वि क्रमांक 27 संमत झाले आहे.

श्री. दिवाकर रावते : सन्माननीय सदस्य श्री. राम पंडागळे यांनी माजी सन्माननीय सदस्यांची पेंशन वाढवावी असे त्यांनी आपल्या भाषणात सांगितले होते. त्यामुळे आता आपण त्यांचे अभिनंदन केले पाहिजे.

श्री. हर्षवर्धन देशमुख : आता मानधनापेक्षा पेंशनची रक्कम वाढल्यामुळे, त्याचा फायदा विद्यमान सन्माननीय सदस्यांनी धेऊ नये.

यानंतर श्री. बरवड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यातील कायदा व सुव्यवस्थेचा पूर्णपणे बोजवारा उडणे

**मु.शी.**: राज्यातील कायदा व सुव्यवस्थेचा पूर्णपणे बोजवारा उडणे या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, मधुकर सरपोतदार, नितीन गडकरी, दिवाकर रावते, विनोद तावडे, अरविंद सावंत, संजय केळकर, डॉ. दीपक सावंत, श्री. मधुकर चव्हाण, डॉ. नीलम गोऱ्हे सर्वश्री प्रकाश शेंडगे, अनिल परब, वि.प.स. यांचा प्रस्ताव

(चर्चा पुढे सुरु)

श्रीमती फौजिया खान (नाम-नियुक्त) : सभापति महोदय, "कायदा व सुव्यवस्था" एक ऐसा विषय है जो किसी भी अधिवेशन में विरोधी पक्ष के लिए आसानी से अंतिम आठवडा प्रस्ताव बन सकता है. इसलिए कि हम रामराज्य में नहीं, बल्कि हम कलियुग में जी रहे हैं और खासकर ऐसे देश में जहां अलग अलग जात, धर्म, पंथ, भाषा और संस्कृति के 100 करोड़ से भी ज्यादा लोग रहते हैं. जिस दौर में दो भाइयों का एक घर में सुख-समाधान से रहना मुश्किल है, ऐसे दौर में इतनी बड़ी आबादी वाले देश में सब कुछ अलबेल रहेगा, ऐसी अपेक्षा भी नहीं करनी चाहिए. पिछले 10 साल से महाराष्ट्र ने अनेक विघातक शक्तियों का डटकर मुकाबला किया है और उसका श्रेय यहां की शांतिप्रिय, धर्मनिरपेक्ष जनता के साथ साथ राज्य के माननीय गृहमंत्री "आबा" को भी देना चाहिए, ऐसा मैं यहां पर कहना चाहती हूँ. यह बात स्वीकार करने में हमें कोई हिचकिचाहट नहीं होनी चाहिए. मैं आपको एक उदाहरण देना चाहती हूँ कि अभी हाल ही में माननीय श्री. सरपोतदार जी रिटायर हो गए हैं, वे अपने तेज तर्रार स्वभाव और सत्ताधारी पक्ष को कठघरे में खड़ा करने के लिए माहिर हैं, उन्होंने 2 दिन पहले सभागृह में यह बात कबूल की है कि मुंबई में गँगवार पर नियंत्रण रख पाने में हम लोग यशस्वी हुए हैं. वह मुंबई जहां दिन चलते सड़कों पर शूट-आउट्स की घटनाएं आम बात थी, अब ऐसी घटनाएं सुनने में नहीं आती हैं. इसका श्रेय हमारे माननीय गृहमंत्री को ही देना चाहिए. वह चमकती, मुस्कराती, गुनगुनाती मुंबई की आत्मा चिल्ला-चिल्लाकर वर्षों से शासन से कहती रही है :

"कुछ तू ही मेरे दर्द का मकहूम समझती,
हँसता हुआ चेहरा तो जमाने के लिए है."

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान .......

सभापति महोदय, ऐसी मुंबई जहां पर गँगवार आज बंद हो गए हैं. मुंबई का दर्द समझने का काम सत्तारुढ़ पक्ष के गृहमंत्री की तरफ से हुआ है, ऐसा मैं कहना चाहती हूँ. मैं एक और शेर आपके सामने पेश करना चाहती हूँ :

"गम क्या है, दर्द क्या है, भला क्या समझें वह,
वह लोग जो पले हैं, बहारों की गोद में."

सभापति महोदय, इसका मतलब यह भी नहीं है कि राज्य में लॉ एन्ड ऑर्डर का कोई मसला ही नहीं है. मसले हैं और उनका हल ढूंढने की इच्छा शक्ति भी शासन के पास है. सवाल यह है कि पुलिस यंत्रणा में और उसकी कार्य-प्रणाली में थोड़ा सा सुधार लाने की आवश्यकता है. आतंकवाद ने जहाँ हमारे सामने बड़ी बड़ी चुनौतियाँ खड़ी कर रखी हैं, वहीं जब इलेक्शन करीब आता है तो पुलिस को ज्यादा सतर्कता बरतने की जरुरत होती है, क्योंकि सोसायटी में ध्रुवीकरण कराना आज एक कारगर चुनावी हथियार बन चुका है. इस बात का जिक्र विरोधी पक्ष के नेता माननीय श्री. फुंडकर कर रहे थे. पिछले कुछ दिनों से बदनापुर, भराडी, औरंगाबाद, रावेर, परभणी और अब चोपड़ा में जातीय तनाव फैलाने और लोगों को भड़काने की जो घटनाएं घटी हैं, वह एक नियोजनबद्ध षडयंत्र की कड़ियाँ हैं, क्योंकि हर जगह "कॉज ऑफ इन्सटेंस" एक ही पाया गया है. चोपड़ा की घटना होने से 4 दिन पहले मैं सदन का ध्यान आकर्षित करने और शासन को आगाह करने की कोशिश कर रही थी, लेकिन मुझे यह बात संदन में रखने की संधि नहीं मिली. हो सकता है कि अगर मुझे यह संधि मिली होती तो शायद चोपड़ा का इतना बड़ा हादसा न होता, ऐसी मेरी भावना है. आज हम जिस लोक कल्याणकारी राज्य की बात करते हैं, वह तो मर्यादा पुरुषोत्तम श्रीराम ने हजारों साल पहले इस भारतवर्ष में प्रस्थापित किया था. आदर्श राजा कैसा हो, त्याग क्या होता है, पुरुषोत्तम के मापदंड क्या होते हैं, इन सवालों का जबाब भी खुद श्रीराम ही हैं. रामराज्य के जमाने में इस्लाम का उदय हुआ होता तो शायद इस्लाम के रास्ते चलने वाले लोगों को प्रोटेक्ट करने में श्रीराम ही सब से आगे होते, क्योंकि कोई भी धर्म हिंसा की बात नहीं करता है. मानवता ही दुनिया के हर धर्म का अधिष्ठान है.

. . . . भाषण जारी (नंतर तालेवार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान ..

और सहिष्णुता अपने धरम के रास्ते पर चलने की अंतिम कसौटी है, ऐसा मैं समझती हूं. जो इंसान अपने धर्म पर चलता है उसी की समाज में इज्जत होती है. अपने धर्म पर चलने वालों की ही लोग सम्मान और इज्जत करते हैं. लेकिन जिस राम ने दुनिया को धर्म सिखाया, उन्हीं को अपने राजनीतिक स्वार्थ के लिए आज कुछ लोग एक्सप्लाइट कर रहे हैं, ऐसा मेरा मत है. धर्म के नाम पर अधर्म जो भी समाज के लोग करते हैं वे इस समाज के, देश के असल दुश्मन है. चाहे वे हिन्दू हो या मुस्लिम. मैं यह भी कहना चाहूंगी कि हिन्दू और मुसलमान की भाषा हमको नहीं करनी चाहिए. दूसरी बात यह है कि समाजकंटक का कोई धर्म नहीं होता है. बात यह है कि किसी घटना के लिए प्रोव्हकेशन होता है तो वह सबसे ज्यादा चिंता की बात है. सम्माननीय सदस्य श्री फुंडकर जी ने कहा कि मंदिर वहीं बनायेंगे कॅसेट में क्या है, आप उसका विश्लेषण करके देखिए. लेकिन मैं यह कहना चाहूंगी कि, जरुरी नहीं कि उसमें कुछ हो. प्रोव्हकेशन के लिए अगर मैं अपनी मुट्ठी बंद करके आपके सामने हाथ हिलाती हूं तो यह मुट्ठी है, हिलाने में कुछ नहीं है. लेकिन जेस्चर में भी पोव्हकेशन हो सकता है. ऐसी बहुत सारी चीजे है. यूं तो अगर कोई किसी लड़की को छेड़ रहा हैं तो एक आँख बंद करने में क्या है, लेकिन अगर कोई लड़की की तरफ देखकर आँख बंद करता है तो उसका इन्टेंशन गलत होता है. उसी तरह मैं यह बताना चाहती हूं कि इस सी.डी. का बंटवारा खुले आम हो रहा है. इन्किलाब नाम का एक इन्टरनेशनल डेली न्यूज पेपर है, उसमें कुछ फोटो छपे है, सभापति महोदय, मैं वे फोटों आपको देना चाहती हूं.

( इस समय सम्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान ने कुछ फोटोग्राफ्स सम्माननीय सभापति जी को दिए )

सभापति महोदय, 'चोपड़ा ' में दंगा होने के बाद जलगांव से फोन किए गए थे, पेपर में भी संवाद छपे हैं. लोग एक दूसरे से मोबाईल पर किस तरह से बोल रहे थें, उसकी भी जांच की जाए, ऐसा मैं आपके माध्यम से सम्माननीय गृह मंत्री जी से कहना चाहती हूं. कुछ लोग अपने रिश्तेदारों से मोबाईल पर चिल्ला-चिल्ला कर अपने रिश्तेदारों से कह रहे थे कि, " हमें बचाओ भाई, फसादियों की तादाद बहुत ज्यादा है और वे आगे बढ़ते जा रहे हैं, कुछ तो करो भाई, पुलिस के जवान बहुत कम है, वे भी खामोश तमाशाई बने हैं. अल्ला के वास्ते हमारे लिए कुछ करो."

...2



श्रीमती फौजिया खान ..

सभापति महोदय, मंदिर वहीं बनायेंगे के दुराग्रह की इस देश और महाराष्ट्र ने पहले ही बहुत बड़ी कीमत चुकायी है. जान-माल की जो हानि हुई है, उसकी भरपाई नहीं की जा सकती. इसके बावजूद उसकी पुनरावृत्ति हो रही है. इसलिए हमें समय पर जागना होगा. ऐसी ताकतों पर लगाम लगाना होगा. भारतीय दंड संहिता के अनुसार किसी भी क्राईम के 4 स्टेप्स होते हैं और ये चारों स्टेप्स होने के बाद ही अपराध प्रूव्ह होता हैं,जैसे- 1) इन्टेंशन 2) मोटिवेशन 3) प्रिप्रेशन 4) कमीशन. लेकिन देखा यह जाता है कि पुलिस हमेशा कमीशन यानी प्रत्यक्ष कृति के बाद ही एक्शन में आती है. पहले तीन स्टेप्स को नज़रअंदाज़ किया जाता है. अगर पहले 3 स्टेप्स के दौरान ही अपराधियों पर शिकंजा कसने में पुलिस कामयाब होती है तो कमीशन का सवाल ही पैदा नहीं होता. लेकिन प्रचलित पुलिस यंत्रणा इसमें कहीं न कहीं कम पड़ रही है. इसलिए मेरी मांग है कि पहले 3 स्टेप्स पर कॉन्सेन्ट्रेट करने के लिए प्रभावी इनपुट देने के लिए जिस तरह एन्टी टेरोरिस्ट स्कवॉड (एटीएस) की स्थापना की गई है उसी प्रकार से " समाजकंटक विरोधी विशेष माहिती पथक " की राज्य में स्थापना की जाए.

सभापति महोदय, जो गाना आज सभी दंगों की जड़ बन गया है उसे सार्वजनिक जगह पर और पर्टीकुलरली मस्जिद के सामने बजाने पर बॅन लगाया जाए. क्योंकि ये जो गाने बज रहे हैं उससे प्रोव्हकेशन हो रहा है. अगर किसी चीज़ को रोकना है तो पहले आपको उसका इन्टेंशन और प्रोव्हकेशन की जानकारी पता करनी चाहिए. क्योंकि कौन मासूम है और कौन मासूम नहीं है, यह पता नहीं चलता और हजारों मासूमों पर एक्शन होती है.

सभापति महोदय, मैं अंत में इतना ही कहना चाहूंगी कि युनियन चार्टर ऑफ ह्यूमन राईटस ने कहा है और यह प्रस्ताव किया है कि हर नेशन में मायनारिटी और मेजारिटी होती है, लेकिन जहां मायनारिटी प्रोटेक्टेड और सेफगार्डेड फील करती है, ऐसे ही स्टेट का यह ॲसिड टेस्ट (सत्तव परीक्षा ) है कि वह जस्ट स्टेट है.

इसके बाद श्री शर्मा..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

. . . . श्रीमती फौजिया खान जारी (पूर्वी तालेवार)

सभापति महोदय, मेजर कम्युनिटी को बड़े भाई की भूमिका अदा करनी चाहिए. अगर मेजर कम्युनिटी बड़े भाई की भूमिका अदा करती है और छोटे भाई की गलतियों को नजरअंदाज करने का काम होता है तो समाज बहुत अच्छी तरह से चल सकता है.

सभापति महोदय, मैं 2 मिनट में एक कहानी सुनाकर अपनी बात खत्म करुँगी. 2 लड़के रास्ते पर जा रहे थे और उस रास्ते से एक कार गुजर रही थी. एक दोस्त ने कहा कि कितनी अच्छी कार है, चलो उसके मालिक से पूछते हैं. कार के मालिक से पूछा आप यह मर्सडीज कार कहाँ से लाए हो, तो गाड़ी के मालिक ने कहा कि यह कार मुझे मेरे भाई ने भेंट दी है. पहले दोस्त ने कहा कि काश मुझे भी ऐसे बड़े दिल वाला भाई होता. इस पर दूसरे दोस्त ने कहा कि काश मेरे पास कार होती और मैं भी इतने बड़े दिल वाला भाई होता. कहने का मतलब यह है कि अगर हम सभी लोग ऐसे भाई बनने की बात करेंगे तो समाज में कोई समस्या नहीं रहेगी. लेकिन आज समाज में राजनीति चल रही है और ऐसी घटनाओं से लोगों की भावनाएं भड़काकर सत्ता हासिल करने की बात हो रही है. लेकिन ऐसा नहीं होगा.

सभापति महोदय, आखिर में मैं माननीय गृहमंत्री से विनंती करना चाहती हूँ कि विवादास्पद कॅसिट को बॅन किया जाए, पब्लिक प्लेसस, प्रार्थना स्थलों और विशेष रुप से मस्जिद के सामने पर इस कॅसिट को बजाने पर बंदी लगाई जाए, इतना कहते हुए मैं अपना भाषण पूर्ण करती हूँ.

................

भाषण पूर्ण, .. 3K 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (महाराष्ट्र विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मला आता परभणीला जाताना विचार करावा लागेल. काश, ऐसे भाई होते, तो मैं गाडी दे देती, असे सन्माननीय सदस्या श्रीमती फौजीया खान म्हणाल्या. त्यामुळे ही माझी बहीण मी तिकडे गेल्यानंतर मला गाडी वैगैरे देईल म्हणून मला तिकडे जाताना दहा वेळा विचार करावा लागेल. सभापती महोदय, त्या शाळेमध्ये शिकवतात त्यामुळे गोष्टी वगैरे छान सांगतात. पण आताची गोष्ट त्यांना व्यवस्थित सांगता आली नाही. शेजारचा येतो आणि रडणा-याला मुलाला सांगतो की, तुला माहीत नाही काय, तुझा बाप कसा आहे, अमूक कसा आहे, तमूक कसा आहे ? मग तो मुलगा म्हणतो की, माझा बाप आहे ना, त्याच्या बद्दल तू काय मला सांगतोस..(अडथळा).. राम मर्यादा पुरुषोत्तम होते, ते एक पत्नी होते. ते तुमच्या समाजाने स्वीकारले तर या हिंदुस्थानचे एकदम भले होऊन जाईल. रामाचे महात्म्य मी ऐकत होतो. मला फार बरे वाटले. मला वाटले आम्हाला एक तरी मुल्ला असा मिळाला की तो आता त्याच्या धर्मामध्ये जाऊन सांगेल की, मंदिर वहीं बनना चाहिये, ऐसा राम था.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

सभापती महोदय, हा विषयाला वेगळे वळण देण्याचा प्रयत्न केला गेला आहे त्या गोष्टीचे मला दु:ख होत आहे. दंगल माजविण्यासाठी "मंदिर वही बनाऐंगे" ही कॅसेट लावली जाते असे ज्यावेळी रेकॉर्डवर सांगितले जाते तेव्हा दु:ख होते. मी तो विषय आता घेणार नव्हतो. परंतु हा विषय या ठिकाणी वेगळया पध्दतीने मांडला गेला. माझ्याकडे लग्नपत्रिका आहे. ज्या मुलाचे लग्न होते, तो औरंगाबाद येथे राहणारा होता. ग्रामीण भागामध्ये अशी पध्दत आहे की, बाहेर गावातील नवरा मुलगा असला तरी त्याने लग्नापूर्वी मंदिरात जावयाचे, तेथे देवाचे दर्शन घ्यावयाचे आणि नंतर लग्नासाठी लग्न मंडपात यावयाचे. ही दंगल भराडीची आहे. मी त्या ठिकाणी प्रत्यक्ष भेट दिली आहे. मंदिर एका कोप-यात आणि मशिद दुस-या कोप-यात आहे. नव-या मुलाची मिरवणूक देवळाजवळ आली. या मिरणवणुकीत 25 ते 30 माणसे होती. मिरवणुकीत अतिशय कमी माणसे होती, त्याचे कारण नवरा मुलगा त्या गावातील नव्हता. देवळात जाऊन देवासमोर नव-या मुलाने नारळ ठेवावयाचा आणि नंतर लग्नमंडपात जावयाचे अशी पध्दत आहे. मिरवणुकीत बेन्जो लावलेला असतो आणि तो वाजवण्यिासाठी एक-दोन माणसे असतात. "मंदिर वही बनाऐंगे" ही कॅसेट लावल्यानंतर एका गटाने त्या मिरवणुकीवर दगडफेक केली. देवळाच्या आजुबाजूच्या परिसरात मुस्लिमांची वस्ती आहे. त्या वस्तीतून त्या समाजातील माणसे भराभर बाहेर आली आणि त्यांनी मिरवणुकीतील माणसांना मारहाण केली. त्या ठिकाणचे फोटो माझ्याकडे आहेत. लग्नाला जाणारा माणूस ही कॅसेट दंगल घडावी म्हणून वाजवितो काय ? मी स्वत: हा सर्व परिसर फिरलो. या दंगलीमध्ये फक्त हिंदू समाजाच्या माणसांना पोलिसांनी अटक केली. माननीय शरद पवार साहेबांनी 15 दिवसापूर्वी म्हणाले की, यापुढचे आयुष्य सच्चरची अंमलबजावणी करण्यासाठी घालवीन. म्हणून सगळयांच्या डोक्यात असेच शिरले की, याच समाजाचे बघितले पाहिजे. बाकीच्यांचे बघितले नाही तरी चालेल. माननीय शरद पवार असे बोलले आहेत हे तरी मान्य आहे काय ? लग्नकार्यातील माणसे अशा प्रकारची कॅसेट वाजवून दंगली घडविण्यास येतात काय ? या देशात आणि या राज्यात सिमी संघटनेवर बंदी घातलेली असताना या संघटनेची माणसे राज्यातील

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

कापाकोप-यात आपल्या संघटनेचा मोठया प्रमाणात प्रचार करीत आहेत. पोलीस यंत्रणा त्या संघटनेच्या विरुध्द कोणत्याही प्रकारची कारवाई करीत नाही. पोलीस फक्त बघ्याची भूमिका घेत आहेत. वर्धा येथे 12 जीवंत बॉम्ब सापडले. यासंदर्भात पोलीस आरोपीला पकडण्यासाठी गेले असताना संबंधित आरोपींना पकडू नका सांगण्यासाठी आमदारपुत्र पोलीस स्टेशनमध्ये गेले. मला सांगण्यास वाईट वाटते की, स्वत: आमदार सुध्दा संबंधित आरोपीला पकडू नका म्हणून सांगण्यात गेले. या प्रकरणी पोलिसांनी ज्या आरोपीला पकडले होते, तो आरोपी सिमी संघटनेचा सक्रीय कार्यकर्ता निघाला. आता तो आरोपी अटकेमध्ये आहे. माझ्यामागे राज्यकर्ते आहेत, त्यामुळे आपले काहीही होऊ शकत नाही अशी प्रवृत्ती वाढते आहे, त्या प्रवृत्तीला आवर घातला गेला पाहिजे. अशा आरोपींना वाचविण्यासाठी गेलेल्या आमदार पुत्रावर पोलिसांकडून का गुन्हा दाखल केला जात नाही ? त्यास सह आरोपी का केले जात नाही ? राज्यकर्ते आपल्या फायद्यासाठी कळत न कळत अशा देशद्रोही व आतंकवादी लोकांना साथ देत आहेत ही अतिशय गंभीर बाब आहे. वर्धा येथे बॉम्ब सापडले, त्याची प्रचिती म्हणून अचलपूर मध्ये दंगल घडली. त्या दंगलीच्या ठिकाणी मी स्वत: गेलो होतो. त्या दंगलीमध्ये हिंदुची सगळी दुकाने बेचिराख करुन टाकली. मागच्या अधिवेशनात शेवटच्या दिवशी आणि शेवटच्या तासात अचलपूर येथील दंगलीचा विषय आम्हाला सभागृहात उपस्थित करता आला. या ठिकाणी सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान गेल्या होत्या. त्यांनी देखील दंगलीची परिस्थिती जाणून घेतलेली आहे. गणपती उत्सवात " मंदिर वही बनायेंगें" कॅसेट वाजविली होती. नवरात्री उत्सवाच्या मिरवणुकीमध्ये कॅसेट वाजविली नाही. परंतु मिरवणुकीवर एका समाजाच्या गटाने दगडफेक केली. मुस्लीम समाजातील मुलांनी पोलिसांना अधिकृतपणे सांगितले की, त्यांनी गणपती उत्वसाच्या वेळी " मंदिर वही बनायेंगे " कॅसेट वाजविली होती म्हणून आमच्या त्या लोकांवर राग आहे. या दंगलीमध्ये मुस्लीम समाजाच्या गटाने हिंदुची दुकाने जाळली, मोठया प्रमाणात दगडफेक करुन मिरवणुकीतील अनेकांना जखमी केले आणि या दंगलीमध्ये फक्त पोलिसांनी हिंदु समाजातील मुलांना अटक केली. मी प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन आलो आहोत. तेथे जाऊन मी पोलीस अधीक्षकांना भेटलो. तेथून मी माननीय उपमुख्य मंत्र्यांशी बोललो. गणपती उत्सवात "मंदिर वही बनायेंगे" वाजविणा-या मंडळातील मुलांना पोलिसांनी अटक केली.

यानंतर श्री. कानडे......

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ SBT/ MMP/ 16:15

श्री. दिवाकर रावते....

कायद्याचे काय नपुसकत्व आहे ? किती वाकाल ? हे सगळे बघितल्यानंतर आम्हांला काय वाटायला पाहिजे? गणपतीउत्सवात कॅसेट वाजविली मंदिर वही बनाएगे. नवरात्र उत्सवात जाळपोळ ? त्याच्या आधी चार दिवस मोहल्ल्यामध्ये मिटींग झाली. 200/400 लोकांना जमा करण्यात आले. व्यापाऱ्यांनी त्याबाबत रिपोर्ट दिला की येथे आम्हांला काहीतरी संशय येतो आहे. कोणतरी बाहेरचा मुस्लीम माणूस आलेला आहे, तो सर्वांना जमा करतो आहे, तो काहीतरी सांगतो आहे तुम्ही लक्ष द्या. पोलिसांनी लक्ष दिले नाही. अचलपूरच्या दंगलीच्या संदर्भात मागील अधिवेशनात मी लक्षवेधी दिली होती पण ती लागली नाही. सभापती महोदय, ज्यावेळेला भराडीचे प्रकरण झाले त्यावेळी मी स्वत: गेलो होतो. कशासाठी दंगल केली ? लग्न झालेला मुलगा आपल्या देवाला नारळ ठेवण्यासाठी गेला. टेम्पो मशिदीसमोर नेला. पोलिसांच्या समोर ढकलत टेम्पो नेला. पोलीस एकतर्फी का वागतात हा माझा प्रश्न आहे. या प्रकरणानंतर पुढे जी परिस्थिती निर्माण झाली ती जालन्यामध्ये निर्माण झाली. जालन्यामध्ये दंगल झाली. त्या दंगलीमध्ये विषय हाच. टपरीवर छोटया मुलाने एक कॅसेट होती ती लावली आणि त्यातून ती नेमकी मंदिर वही बनाएगेची कॅसेट निघाली. टपरीवरील कॅसेट. बाजूला चार मुस्लीम युवक होते त्यांनी सांगितले की कॅसेट बंद करो. कॅसेट बंद झाली. तीन तासांनी जमाव आला आणि दंगल सुरु झाली. 8 मुसलमान तरुण मोटारसायकलवरुन आले. त्यांनी गुप्त्या घेतल्या दिसेल त्याला खुपसले. 9 जणांना भोसकले. हॉस्पीटलमध्ये ते अॅडमिट झाले. तिघांच्या तर आरपार गुप्ती गेली होती. दंगल कोणी केली मुस्लीम समाजाने केली आणि संध्याकाळी एकत्र जमाव करुन केली. कारण दुपारी 2.00 वाजता कुठेतरी एक कॅसेट वाजविली म्हणून. ही दंगलीपर्यंत ठीक आहे. पोलिसांनी अॅक्शन घेतली. दोन्हीकडच्या जमावावर अॅक्शन घेतली. आबासाहेब तुम्हांला कोणाला समाधान द्यावयाचे आहे ? दंगल ते घडवत असतील तर त्यांना अटक करा आणि दंगल हिंदू घडवत असतील तर त्यांना अटक करा. पण त्यांची संख्या नाही तर ही संख्या दाखविण्याकरिता अटक केली. पोलीस खात्याची शरम वाटते आणि सरकारच्या लांगूलचालनाची शरम वाटते. यासंदर्भातील फोटो मी आपल्याकडे पाठवीत आहे. गृहमंत्र्यांना दाखवा. दंगलखोर मुसलमानांना जामीन मिळण्याकरिता आरपार भोसकलेला एक मुलगा याची किडनी गेली आणि संडासाच्या ठिकाणी जखम झाली म्हणून पिशव्या लावलेल्या होत्या. एक महिना त्याला बाहेर काढता येत नव्हते पण त्याला बाहेर काढला





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

नाही तर मुसलमान आरोपींना जामीन मिळणार नाही म्हणून त्याला हॉस्पीटलच्या बाहेर काढण्यात आले. त्याला घरी पाठविण्यात आले. मी त्याच्या घरी भेट देऊन आलो. एवढया मानसिकतेमध्ये मुसलमानांची चाटूगिरी करणार आहात काय ? भोसकलेला माणूस मेला. एसपीना विचारले आता काय करता 307 किंवा 302 लावता की नाही अटक करता की नाही. तपास कसला करता माणूस मेला ना. जामीन कसले देता ? माणूस हिंदू मेला. 9 जण हिंदू भोसकले आणि अटक पुन्हा हिंदूनाच. हे मला कायद्याचा कोणता परिपाक आहे हे कळले नाही ? एवढे मुलसमानांना खूष करण्याकरिता का करीत आहात ? मुलाच्या घरचे फोटो आहेत. जामीन मिळण्यासाठी त्या मुलाला घरी पाठविता. त्याला मी मूठमाती देऊन आलो. रामनवमीच्या दिवशी अशीच मंदिर वही बनाएंगे ही कॅसेट लावली. शासनाला याबाबतीत भूमिका घ्यावीच लागेल. जाहीर करावीच लागेल. मंदिर वही बनाएंगे ही कॅसेट लावण्याच्या संदर्भात पोलीस खात्याला चवताळलेपणा आला आहे. मला दु:ख होते की हे पोलीस आहेत की कोण आहेत ? पोलिसांनी तुमच्या राज्यात काय चालविले आहे ? पैठणला काय झाले आहे ? कोणीही कॅसेट लावली नाही. एक नोटीस वाचून दाखवितो. बी.एम.खिलारी यांनी पाठविली आहे. आबासाहेब तुमच्या खात्यात मराठीकरण करावयाचे नाही असे ठरविले आहे काय ? सगळे अधिकारी एस.एम.,बी.एम. असे लावून फिरत आहेत त्यांच्यावर कारवाई करा. परिपत्रकाप्रमाणे कारवाई करा.

सभापती महोदय, पोलिसांनी मंडपवाल्याला नोटीस दिली. रामदास चंद्रभान वाघमारे, कैलास मंडप डेकोरेटर्स याला नोटीस दिली आणि सांगितले की तू मंडप डेकोरेशनचे सामान असताना तू कुठेही अशा प्रकारची कॅसेट वाजविली तर तुझ्यावर गुन्हा दाखल करु.

यानंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..........

काय आहे हे? असे काय त्या मुसलमानांमध्ये आहे ज्यामुळे त्यांच्यासाठी एवढी सेवा करायला तुमचे पोलीस निघाले आहेत. दंगा झालेला नाही. काही घडलेले नाही. हा खिलारी कोण आहे? याचा सुंता झाला आहे काय? सन्माननीय सदस्यांनी ज्या घटनेचा उल्लेख केला होता ती घटना ग्रामीण भागातील होती, मी जो उल्लेख करीत आहे ती घटना अमरावती शहरातील आहे.........

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.........

श्री.दिवाकर रावते : सुंता करणे हा धार्मिक विधी आहे. त्याची सभागृहात व्यवस्थित चर्चा झालेली आहे.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : भावना चेतवण्याचा प्रयत्न होत असेल तर ते योग्य नाही.

श्री.दिवाकर रावते : तुझे बारसे झाले काय असे म्हणण्याऐवजी सुंता केला का असेच म्हटले जाते. तो धार्मिक विधी आहे. तुमचा झाला का? तुम्हाला राग का येतो? मी अनैतिक काही बोललो नाही. या सदनामध्ये चर्चा झालेली आहे. मला मुसलमान समाजाच्या एका आमदारानी सांगितले की, रावते साहब आप बराबर बोले है.

(सत्ताधारी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

श्री.राम पंडागळे : हे राज्य एका धर्माचे नाही. सर्वधर्मसमभाव पाळला जात आहे.

श्री.दिवाकर रावते : मुसलमानांची चाटूगिरी करणाऱ्या शासनाला सांगा. हे मुस्लिमांचे राज्य आहे का?

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.........

श्री.दिवाकर रावते : मुसलमानांबद्दल एवढी लॉयल्टी का दाखविता?

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : आम्हाला तुमचे मार्गदर्शन नको आहे.

श्री.दिवाकर रावते : किती लॉयल्टी दाखवाल?

(दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री.दिवाकर रावते : मी शब्द मागे घेतो आणि म्हणतो, यांचे धर्मांतर झाले काय? मी सुंता झाला काय हे शब्द मागे घेतो. कारण आमच्या सन्माननीय मित्रांच्या भावना दुखावल्या जातात. त्यांचे धर्मांतर झाले का असे विचारतो.

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

**उपसभापती** : मी सभागृहात वारंवार एक गोष्ट सांगितली आहे, ती म्हणजे मी याठिकाणी बेल वाजविल्यानंतर सर्व सन्माननीय सदस्यांनी सभागृहात शांत बसणे आवश्यक आहे. मग कोणत्याही बाजूचे सन्माननीय सदस्य शांतता पाळणार नसतील तर कारवाई केली जाईल. पीठासीन अधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय कोणीही बोलू नये. सन्माननीय सदस्य जागेवर बसून का बोलण्याचा प्रयत्न करीत आहेत? मी सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांना परवानगी दिल्यानंतर अनेक सन्माननीय सदस्य बोलण्यासाठी उभे राहतात हे योग्य नाही. सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी हरकतीचा मुद्दा मांडला असता तर त्या संदर्भात मी योग्य तो निर्णय देणार होतो. परंतु आता सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी शब्द मागे घेतले असल्यामुळे मी त्यांच्या भाषणाचा भाग तपासून पाहण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी त्यांचा हरकतीचा मुद्दा मांडावा.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना आपले म्हणणे मांडण्याचा पूर्ण अधिकार आहे. त्यांनी जरुर म्हणणे मांडावे. मी त्यांचा राग समजू शकतो. सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी "सुंता" या शब्दाबद्दल आक्षेप घेतला. परंतु सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी तो शब्द मागे घेतला आहे. पुढे ते म्हणाले की, तुम्ही धर्मांतर केले आहे का? या सभागृहात एकमेकाचा धर्म काढण्याची गरज नाही. या सभागृहातील सन्माननीय सदस्यांची भूमिका सेक्युलर असली पाहिजे.

(नंतर श्री.जुन्नरे......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ MMP/ SBT/ प्रथम श्री. भोगले.... 16:25

श्री. कपिल पाटील....

येथे कोणालाही धर्म नाही.

**उपसभापती** : धर्मनिरपेक्षतेचा मुद्दा आता संपलेला असून सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी आपल्या भाषणाला सुरुवात करावी.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, पैठणच्या या खिला-याने काहीही न होता, अटकेचे ॲडव्हान्स बुकिंग करुन टाकले. अमरावतीला सुध्दा असाच प्रकार झालेला आहे. पोलीस अधिक्षक अमरावती यांनी असे लिहिले आहे की, माननीय जिल्हाधिकारी अमरावती यांच्या आदेशान्वये 12.4.2008 अन्वये रामनवमी व हनुमान जयंती सनाच्या दरम्यान फौजदारी दंड प्रक्रिया संहिता 144 अन्वये अमरावती ग्रामीण ... दिनांक 12.4.2008 ते 25.4.2008 या दरम्यान "मंदिर वही बनायेंगे" हे गाणे ऑडियो, व्हीडीयो पध्दतीने कोणत्याही व्यक्तीने किंवा संघटनेने प्रसिध्द करण्यास बंदी घालण्यात आलेली आहे. तरी या प्रेस नोट द्वारे आवाहन करण्यात येत आहे की, वरील कारणास्तव "मंदिर वही बनायेंगे" हे गाणे वाजवण्यास बंदी घालण्यात आलेली आहे. "मंदिर वही बनायेंगे" हे वाक्य बोल्ड-बिल्ड करुन प्रसिध्दी केलेले आहे. स्वत:च्या मुलाला एवढया कौतुकाने शिकवले नसेल एवढया कौतुकाने ही प्रेस नोट प्रसिध्द करण्यात आलेली आहे. रामनवमीच्या दिवशी "मंदिर वही बनायेंगे" हे गाणे नाही वाजवायचे. मला तर असे म्हणावयाचे आहे की, ज्याने ही प्रेस नोट प्रसिध्दी केलेली आहे तो खराच आयपीएस अधिकारी आहे काय हे विचारले पाहिजे. सदर नोटीस द्यावयाची असेल तर ती 149 अन्वये द्यावयाची असते परंतु ही नोटीस 144 अन्वये देण्यात आलेली आहे. ज्याला कायद्याचे ज्ञान नाही अशांनी ही नोटीस दिलेली आहे. कायद्याचे ज्ञान आयपीएस अधिका-याला असते परंतु भावनेच्या भरात लवकरात लवकर नोटीस द्यावयाची म्हणून कोणत्याही कलमाने का होईना पण द्या असे त्यांनी ठरवलेले दिसते. हिंदुंना, रामांना अडवण्याचे यांना फार घाई झालेली आहे. मी या ठिकाणी राम मंदिरांच्या संदर्भात बोलणार नाही परंतु "मंदिर वही बनायेंगे" या गाण्याला तुम्ही बंदी घातली आहे हे तुम्हाला जाहीर करावे लागणार आहे. एवढे तुम्ही कायद्याचे रक्षक आहात ना? मग टाईम्स ऑफ इंडियाची माझ्याकडे एक बातमी आहे. या बातमीत म्हटले आहे की, Illicit relation: Couple beaten up: Paraded naked"एका 22 वर्षाच्या मुस्लीम मुलीची नग्न करुन औरंगाबाद आणि जालण्यात धिंड काढली. यासंदर्भात तुम्ही का





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.....

कारवाई केली नाही ? तुमच्या पोलिसांचे कोणी हात बांधले होते? "मंदिर वही बनायेंगे"ही कॅसेट लावल्याबरोबर पोलीस भरा-भरा उतरतात, दांडक्याने चोपून काढतात, गोळीबार करुन हिंदूना ठार मारता.आणि एका 22 वर्षीय मुस्लीम मुलीची गावात नग्न धिंड काढली असतांना पोलीस हातावर हात घालून बसले होते कारण मुसलमानांनीच आपल्या बिरादारीतील एका मुस्लीम मुलीची धिंड काढली होती त्यामुळे मुसलमानांना अटक कशी करावयाची, लोकांना काय वाटेल, कॉंग्रेस सरकारला काय वाटेल, कारण कॉंगेस सरकार निधर्मी आहे. धर्माच्या माणसांना हात लावला तर निधर्मीपणाचे फूल लगेच कुसकरले जाईल. द्या उत्तर.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य जे सांगत आहेत....

श्री. दिवाकर रावते : ते मुसलमान असल्यामुळे त्यांना हात लावला तर काय होईल, सरकारचे मतं जातील त्यामुळे पोलीस हातावर हात धरुन निमूटपणे हा प्रकार पाहत होते.

निधर्मी माणसांनो द्या आता उत्तर. हे सरकार निधर्मी आहे, समाज निधर्मी आहे, सभागृह निघर्मी आहे, आमदार निधर्मी आहे. कपिल पाटील द्या आता उत्तर. ज्या लोकांनी 22 वर्षीय मुस्लीम मुलीची धिंड काढली त्यांच्यावर कारवाई का केली नाही असा माझा आरोप आहे.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..

मुस्लिम समाजाच्या एका 22 वर्षीय मुलीची धिंड काढली जाते तेव्हा त्यांच्यावर कारवाई करावयास नको काय ? केवळ मुस्लिम आहेत म्हणून त्यांच्यावर कारवाई केली नाही हा माझा आरोप आहे , हा माझा दावा आहे. त्यांची किती चाटूगिरी करावयाची ......

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय,

( गोंधळ )

**उपसभापती** : अशा परिस्थितीमध्ये सभागृहाचे कामकाज चालविणे अशक्य झाल्यामुळे मी सभागृहाची बैठक 10 मिनिटांसाठी स्थगित करतो.

( सभागृहाची बैठक 4.30 ते 4.40 पर्यंत स्थगित झाली )

-----

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर ...)

**सभापतीस्थानी - माननीय उपसभापती**

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.रावते यांनी आपले भाषण पुढे सुरू करावे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आता या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.गुरूनाथ कुलकर्णी उपस्थित नाहीत, ते कधी येतील याची मी वाट पाहतो आहे. माझा मुद्दा एवढाच होता की, केवळ लग्नामध्ये कॅसेट वाजत होती म्हणून तेथे दंगल झाली. रामजन्माच्या दिवशी कॅसेट वाजवू नका म्हणून पोलिसांकडून सांगितले जात होते. कारण काय तर मुसलमानांच्या भावना दुखावल्या जातील. ती मुलगी स्वत: जाऊन त्याबाबत पोलीस ठाण्यामध्ये सांगायला गेली. शेवटी ती मुलगी आहे, स्त्री आहे हे आपण लक्षात घ्यावे. वाटेवर पोलीस ठाणे होते म्हणून ती तेथे सांगायला गेली तर पोलिसांनी तिला हाकलून दिले. मुसलमानांचे लांगूलचालनासाठी सरकार आता आणखी किती पातळीपर्यंत खाली येणार आहे ? आम्ही कॅसेट लावतो, आम्ही दंगे माजवितो म्हणून एकीकडे आमच्यावर आरोप करण्यात येतात. पण त्यांच्यासाठी एवढे आपण जे लांगूलचालन करीत आहात ते कशासाठी ? सरकारने इतका निर्लज्जपणा कशासाठी करावा. आमचे श्री.गोपीनाथ मुंडे यांनी म्हटले होते की, त्या दाऊदला तो कोठेही असला, सातासमुद्रापलिकडे जाऊन त्याला बांधून हिंदुस्थानात आणले जाईल. पण ते त्याला आणू शकले नाहीत म्हणून त्यांच्या या बोलण्याची, त्यांची तुम्ही नेहमी टिंगल करता. आता तो दाऊद पाकिस्तानातही नाही आणि तो कोणालाच सापडत नाही. पण आमच्या आबांनी तरी काय केले ? जेम्स लेनबाबत जेव्हा आम्ही येथे सांगितले तेव्हा तो जेम्स लेन कोणीही असो त्याच्या मुसक्या आवळून त्याला शिक्षा केल्याशिवाय हा आबा स्वस्थ बसणार नाही म्हणून तुम्हीच म्हणाला होता ना ? तेव्हा आबा काय आवेशामध्ये हे बोलत होते ? त्यांच्या बोलण्यावरून मला तर वाटले की, आबांएवढे शिवभक्त तर बाबासाहेब पुरंदरे देखील नसतील. पण मला खरोखरी लाज वाटते. आता या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील उपस्थित नाहीत. पण त्यांच्या अलिबागमध्ये त्यांच्या काकांच्या शाळेमध्ये ते गेले. ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( यानंतर सौ. रणदिवे ..... 3आर 1 ..

APR/ MMP/ SBT/ पूर्वी श्री.सुंबरे . . . . 16:45

श्री.दिवाकर रावते . . . .

सभापती महोदय, अलिबाग येथे सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांच्या काकांच्या शाळेमध्ये एका शिक्षकाने जेम्स् लेनच्या बाबतीत वर्गामध्ये सांगावयास, शिकवावयास सुरुवात केल्यानंतर सातवीतील एक तरुण मुलगा उभा राहिला आणि त्याने सांगितले की, गुरुजी, तुम्ही हे शिकवू नका, तुम्ही हे बोलू नका आणि तुम्ही याबाबतीत सांगू सुध्दा नका. आम्ही छत्रपती शिवाजी महाराज आणि जिजाऊ मातेच्या बाबतीत काही ऐकणार देखील नाही. मी याचे असे वर्णन केले होते की, पुन्हा एकदा लोकमान्य टिळकांचा जन्म झाला आहे. हे ऐकल्यानंतर शिक्षकाने लेखी तक्रार केली की, माझ्या वर्गामध्ये अशा-अशा प्रकारे घडलेले आहे. आता त्या मुलाला कुठे माहिती होते की, जे शिकवत आहेत, ते लिहावयाचे नाही. आपण उच्चार सुध्दा करु शकत नाही. लेखी तक्रार केल्यानंतर सर्व मुलांनी त्या मुलाला पाठिंबा देऊन शाळा बंद पाडली. आमचा उप जिल्हा प्रमुख त्या शाळेमध्ये जाब विचारण्यासाठी गेला. जिजामातेबद्दल असभ्य उद्गार काढल्यानंतर शिवसेनेचा उप जिल्हा प्रमुख त्या शाळेमध्ये जाब विचारण्यासाठी गेला असेल तर तो गुन्हा ठरु शकतो काय ? जेम्स् लेनला फरफटत आणणाऱ्या माननीय गृहमंत्र्यांच्या राज्यामध्ये हा गुन्हा ठरला. त्याच्याबरोबर 14 विद्यार्थ्यांवर शाळेच्या आवारामध्ये कलम 144 मोडल्याबद्दल गुन्हा दाखल करण्यात आला. आमच्या माननीय गृहमंत्र्यांची काय मुर्दूमकी आहे ? जिजामातेबद्दल असभ्यपणे बोलल्यानंतर त्याविरुध्द बाणेदारपणे बोलणाऱ्या एका विद्यार्थ्याला पाठिंबा देण्यासाठी गेलेल्या उप जिल्हा प्रमुखावर आणि शाळेतील 14 विद्यार्थ्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आणि जेम्स लेन फरफटत आणणाऱ्या माननीय गृहमंत्र्यांच्या कर्तृत्वाचा आमच्या अलिबागमध्ये डंका वाजला. परवा मी रदबदली करुन अर्ज दिला की, ही केस मागे घ्यावी. काय पाळी आली आहे ? पण संबंधित शिक्षकाला काहीही शिक्षा झाली नाही. उलट संबंधित शिक्षक आणि अधिकाऱ्यांनी संगनमताने बामसेफचे अधिकारी बोलावून ॲक्ट्रॉसिटीखाली केस कशी दाखल करावयाची यादृष्टीने चर्चा सुरु केली. शेवटी जिल्हाधिकारी म्हणाले की, काहीतरी वेडेपणा करु नका. दंगे होतील. संबंधितांविरुध्द ॲक्ट्रॉसिटीची केस दाखल करावयास निघाले होते. हा काय प्रकार आहे ? "मंदिर वहीं बनाऐंगे" असे म्हटल्यानंतर तुमच्या भावना दुखावतात. छत्रपती शिवाजी महाराजांचा उल्लेख केल्यानंतर तुमच्या भावना का दुखावतात ? सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे येथे उपस्थित आहेत.

सभापती महोदय, शिवजयंतीच्या निमित्ताने जे घडले, त्यासंबंधात या पोलीस अधिकाऱ्याला

. . . .3 आर-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

सस्पेंड केले नाही तर ते योग्य होणार नाही. माननीय गृहमंत्र्यांनी त्याला भर चौकात फटके मारावेत एवढया लायकीचा हा अधिकारी आहे. मी आपल्याला काही पोस्टर्स् दाखवू इच्छितो. शिवजयंतीच्या निमित्ताने जी पोस्टर्स् लावली होती, त्यातील पहिले पोस्टर आहे ते मराठी बाणा. दुसरे पोस्टर हे शहाजीने हत्तीची सोंड कापली होती, तो प्रसंग. हा छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरित्रातील आहे. तिसरे पोस्टर म्हणजे शिवगाथा. चौथे पोस्टर म्हणजे रोहिडेश्वरावर घेतलेली शपथ. पाचवे पोस्टर म्हणजे तुकाराम महाराज आणि छत्रपती शिवाजी महाराज, सहावे पोस्टर म्हणजे शंभू तुळजेच्या भूमीशी करील कोण गद्दारी, "म्यानामधूनी असंख्य उठतील रणमर्दाच्या समशेरी, रायभान, फौज तुमची हरली खिंडीत सारी" हे खिंडीमध्ये जी लढाई झाली, त्याच्यासंदर्भातील हे पोस्टर आहे.सातवे पोस्टर कोकणातील सागर माथ्यातील आहे. आठवे पोस्टर हे जिजामाता आणि शिवबा यांचे पोस्टर आहे. या एवढया पोस्टर्स्बरोबर आणखी दोन पोस्टर्स् होती. त्यातील एक पोस्टर हे अफझलखानाचा वध करताना आणि दुसरे पोस्टर हे लाल महालामध्ये शाहिस्तेखानाची बोटे तोडली त्यावेळचे होते. या पोस्टर्समध्ये काय गैर आहे ? ते मला सांगावे. या हिंदुस्थानामध्ये आणि महाराष्ट्रामध्ये रहाणाऱ्या मुसलमानांच्या भावना दुखावतात. हे कोणी सांगितले ? तर ते मुसलमानांनी सांगितले नाही. तर बीडमध्ये असलेल्या आमच्या उप विभागीय दंडाधिकारी, बीड यांनी सांगितले. त्यांनी नोटीस दिली की, "ज्या अर्थी सहाय्यक पोलीस अधिक्षक, बीड यांनी संदर्भीय पत्रकान्वये दिनांक 22-3-2008 रोजी होळी व दिनांक 23-3-2008 रोजी धुलीवंदन व दिनांक 24-3-2008 रोजी शिवजयंती होत आहे. सभापती महोदय, त्यादिवशी सभागृहाला सुटी होती. मी एवढा बेशरमपणा महाराष्ट्र विधीमंडळामध्ये खपवून घेऊ इच्छित नाही आणि जर माननीय गृहमंत्री खरेच शिवभक्त असतील तर या हरामखोर अधिकाऱ्याला ताबडतोब, सॉरी, मला माफ करावे. माझ्या तोंडातून चुकून असा शब्द निघाला. या अधिकाऱ्याला ताबडतोब घरी पाठवावे. तो अधिकारी पुढे जे लिहीत आहे, ते इंग्रजांनी लिहावे अशा प्रकारचे आहे. त्याने काय लिहीलेले आहे ? तर "शिवजयंतीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना अध्यक्ष श्री.उल्हास किराम यांनी अफझलखानाचा वध आणि शाहिस्तेखानाची बोटे छाटीत असल्याबाबतचे दृश्य असणारे पोस्टर शिवाजी चौकात लावले असून सदरचे देखावे हे ऐतिहासिक स्वरुपाचे असले तरी . . . पुढचे सर्व काही छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान करणारे आहे.

यानंतर कु.गायकवाड . . . .

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DVG/ SBT/ MMP/ प्रथम श्रीमती रणदिवे.. 16:50

श्री. दिवाकर रावते..

महाराष्ट्र शासनाचा अधिकारी शिवाजी महाराजांबद्दल इतक्या खालच्या पातळीवर नोटीस देत आहे ?. हे छत्रपती शिवाजी महाराजांचे राज्य आहे ना ? हा छत्रपतींचा मुलूख आहे. त्यांची पूजा केल्याशिवाय कोणाचे चालत नाही. एवढे आदराचे स्थान आपण त्यांना देतो. हा अधिकारी असे लिहित आहे ? हिंदूंचा राजा, हिंदूंचा सरदार एक हल्लाकारी दिसतोय त्यामुळे मुस्लिम समाजात मुस्लिम बांधवांच्या भावना दुखावल्याचे सध्या पोलीस स्टेशनच्या हद्दीत चर्चा सुरु आहे. कोठली औलाद भरती केली आहे तुम्ही ? मी औलाद बोलल्याबद्दल कोणाची भावना तर दुखावली नाही ना ? आता मला विचारावे लागत आहे. आपल्याला हे सहन होत आहे काय? या दृष्यामध्ये असे काय दाखविले आहे ? असे या मध्ये काय आहे की ज्यामुळे मुस्लिम बांधवांच्या भावना दुखावल्याचे हिंदूंना वाटत आहे ? हे आता सहन होण्यासारखे नाही. या हरामखोर माणसांना .. सॉरी. या बीडच्या उपविभागीय अधिकाऱ्याचे आपण काय करणार आहात ?

काही सन्माननीय सदस्य : असे शब्द रेकॉर्डवर येऊ नये. आपण यापूर्वी देखील असे शब्द वापरले होते.

श्री. दिवाकर रावते : मी सॉरी म्हणालो आहे. हे रेकॉर्डवर आलेले नाही. आपण देखील या बाबत भावना व्यक्त करा. हे आता किती सहन करायचे ? भावना दुखावल्या आहेत. तेथले पोस्टर काढून टाकले. हे सरकार आहे काय ? हे हिजडयांचे सरकार आहे. हे मी रेकॉर्डवर बोलत आहे. सभापती महोदय,भाऊंनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयाचा उल्लेख केला. हिजडा हा शब्द मी मागे घेतो. हे सरकार नपुसकांचे आहे काय ?

एक सन्माननीय सदस्य : त्यांनी हरामखोर म्हणावयाचे, हिजडा म्हणावयाचे, आम्ही हे सर्व ऐकून घ्यावयाचे काय ?

**उपसभापती** : त्यांनी शब्द मागे घेतले आहेत.तेव्हा हे सर्व शब्द कामकाजातून काढून टाकण्यात येतील.

श्रीमती उषा दराडे : सभापती महोदय, हिजडयांना सन्मान नाही काय ?

श्री. दिवाकर रावते : हिजडयांचा अवमान होऊ नये हे मला मान्य आहे.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री दिवाकर रावते यांना मी सांगू इच्छितो की, आपण

....2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** ..

सभागृहामध्ये भाषण करीत असून आपण एक अत्यंत जबाबदार नेते आहात तेव्हा कृपया आपण असे शब्द वापरू नयेत.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, हे आपल्याला तरी सहन होण्यासारखे आहे काय ? हे सर्व सहन करण्याच्या पलिकडे आहे. या विषयावरील लक्षवेधी सूचना दखील स्वीकारली जात नाही. मी मागील 3 ते 5 आठवडयापासून गप्प आहे. कोणाला पाठीशी घातले जात आहे ? अफजलखानाचा कोथळा काढला. शाहीस्तेखानाची बोटे तोडली. कोणाच्या तरी भावना दुखावतील या करिता पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये असणारे पोस्टर काढण्याचे आदेश पोलिसांना दिले. रावेरचा आपण उल्लेख केला होता. हा पुतळा बंदिस्त केला. तो पुतळा गुंडाळून ठेवला. असे का केले ? तर हा पुतळा पाहण्यासाठी लोक गर्दी करु लागले होते. 15 दिवस तालुक्यातील जनतेने पुतळा पाहिला. पुतळा पाहण्याचे श्रेय दुसऱ्या एका व्यक्तिला जात असल्याचे माननीय आमदार श्री.विखे यांच्या लक्षात आल्यानंतर जिल्हाधिकारी यांचेवर दबाव आणून त्यांनी सदर पुतळा तहसीलदारांच्या गोडाऊनमध्ये डांबून ठेवण्याचे आदेश दिले. प्रथम सत्तारुढ असलेल्या श्रीमती ममता पिपाण व त्यांचे पती श्री. राजेंद्र पिपाण यांना पहाटे पाच वाजता अटक केली. महाराजांचा पुतळा आणला म्हणून त्यांना अटक केली. त्यामुळे नागरिकांनी शहरामध्ये 100 टक्के बंद पाळला, मोर्चे काढून निषेध नोंदविला.या मोर्चामध्ये महिला मोठया प्रमाणात सामील झाल्या होत्या. तेथे जनक्षोभ उधळला. ज्यांच्यामुळे जनक्षोभ उधळला, त्यांना का अटक करण्यात आली नाही ? त्यांच्यावर आपण का कारवाई केली नाही ? हे कसले राज्य आहे?

**उपसभापती** : वास्तविक पाहता ही सर्व चर्चा मुख्य विषयापासून इतर विषयाकडे चालली आहे.

श्री. दिवाकर रावते : ही चर्चा कायदा व सुव्यवस्थेवर आहे. हे सर्व एकतर्फी सुरु आहे.

यानंतर श्री.बरवड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राम पंडागळे : सभापती महोदय, या पुतळ्याचा आणि पोलिसांचा काही संबंध आहे काय ? ते तांत्रिक कारण आहे. यामध्ये महापालिकेचे कारण आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते हे जेष्ठ सन्माननीय सदस्य आहेत

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रामभाऊ पंडागळे यांना धन्यवाद देतो की, आपण मस्तपैकी ताबडतोब रिॲक्ट होणारे सदस्य आहात. सन्माननीय सदस्य श्री. रामभाऊ पंडागळे यांच्या माहितीकरिता सांगतो की, मी कालपरवा परभणीमध्ये स्वत: गेलो होतो. त्या ठिकाणी जो निळा झेंडा होता तो काढून हिरवा झेंडा लावला म्हणून संतापलेल्या दलित बांधवांवर हल्ला करणाऱ्या मुसलमानांवर दगड मारण्याची पाळी दलित बांधवांवर आली. ही चार दिवसांपूर्वीची परभणीमधील घटना आहे. हा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न नाही काय ? सभापती महोदय, आपण विनंती केली असल्यामुळे मी थोडक्यात भाषण सपवणार आहे. मला असे सांगावयाचे आहे की, कायदा एकतर्फी राबविला जात आहे. मुस्लीम समाजाच्या अनुकरणाकरिता, त्यांना काय वाटेल या त्यांच्या भावनांचा फार मोठा आब राखण्याकरिता हे सरकार पूर्ण लीन-दीन झालेले आहे. त्यांनी गुडघे टेकलेले आहेत. ज्यावेळी हिंदू प्रक्षुब्ध होतात त्यावेळी अधिकारी अशा प्रकारचे आदेश काढत आहेत. त्या अधिकाऱ्यांचे काय करावयाचे हे मला माहीत नाही. एक दिवस जर जास्त प्रक्षोभ झाला तर त्या अधिकाऱ्याचे काय होईल हेही सांगता येत नाही. त्यामध्ये एक एक कलमे लावण्याचे काम चालू असते. मी पोलिसांनाही सांगतो की, हे जास्त दिवस चालणार नाही. महाराजांचा पुतळा डांबला त्यासंदर्भात विरोध करणाऱ्यांना अटक करणाऱ्या पोलिसांना कोणत्या पध्दतीचे ट्रेनिंग दिले आहे, हे मला माहीत नाही. जेम्स लेनच्या प्रकरणामध्ये एवढ्या वीररसाने गाणारे आमचे आबा जेम्स लेनच्याच प्रवृत्तीने एका ठिकाणी अवमान होतो तेव्हा त्याचा प्रतिकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर, आमच्या जिल्हा प्रमुखांवर खटला दाखल करतात आणि त्या मास्तरला सोडून देतात हे कोणत्या प्रवृत्तीने चाललेले आहे हे आम्हाला कळू शकत नाही. केवळ संभोगाला परवानगी दिली नाही म्हणून त्या ठिकाणी माझ्या भगिनीची नग्न धिंड काढल्यानंतर केवळ ते मुस्लीम बांधव आहेत म्हणून त्यांच्यावर कारवाई केली जात नाही. सगळीकडे एकाच प्रकारचे लांगूलचालन चाललेले आहे. सिमीचा प्रचंड असा मोठा वावर चाललेला आहे. दुर्देवाने

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MMP

श्री. दिवाकर रावते ........

महाराष्ट्रामध्ये सगळीकडे मुस्लीम समाजामध्ये या सिमीच्या सगळ्या हस्तकांनी असे वातावरण निर्माण केले आहे की, ज्या ठिकाणी कॅसेट वाजेल त्या ठिकाणी हल्ला करा, सरकार आपले आहे, आपले काही होणार नाही. मरतील तर हिंदूच मरतील, मार खातील तर हिंदूच मार खातील अशी दुर्दैवी परिस्थिती बाबा आपण निर्माण केलेली आहे आणि या लांगूलचालनामधून हा देश अराजकतेकडे नेण्याचे पाप हे सरकार करीत आहे, हे या ठिकाणी मुद्दाम मांडतो. आपली भूमिका आज आम्हाला 100 टक्के हवी आहे. "राम मंदिर वहीं बनायेंगे" या कॅसेटवर जर आपली बंदी असेल तर आम्ही बंदी घातलेली आहे असे या ठिकाणी जाहीर करावे. त्यानंतर काय करावयाचे आहे ते आम्ही पाहू. एवढेच या ठिकाणी मी नम्रपणाने मांडतो आणि कायदा व सुव्यवस्थेच्या नावाखाली मुसलमानांना एका बाजूला देकार देत असताना हिंदूना चेचण्याचे जे काम शासन करीत आहे त्याचा मी तीव्र निषेध करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

---

**उपसभापती** : यानंतर सन्माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे आणि त्यानंतर सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई बोलतील व नंतर माननीय मंत्रिमहोदयांचे उत्तराचे भाषण सुरु होईल.

( अनेक सन्माननीय सदस्य बोलण्यासाठी परवानगी मागतात )

श्री. सय्यद जामा : सभापति महोदय, जितना समय विरोधी पक्ष के सन्माननीय सदस्य को दिया गया है उतना ही समय सत्ताधारी पक्ष के सदस्यों को भी मिलना चाहिए. कृपया आप हम पर अन्याय न करें. विरोधी पक्ष के सम्माननीय सदस्यों ने जो बातें यहां कही है, उसका हमें जवाब देना है.

श्री. राम पंडागळे : सभापती महोदय, हा सारासार अन्याय आहे. आम्हाला बोलण्याची संधी मिळाली पाहिजे.

**उपसभापती** : आपण रात्रभर बोलावे. सर्व सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे. मला ज्या सूचना मिळालेल्या आहेत त्याप्रमाणे मी कामकाज घेत आहे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, या प्रस्तावावर मी नाव दिले आहे.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्यांनी पाच पाच मिनिटात बोलावे असे मी दरवेळी सांगत असतो पण आपल्यापैकी कोणीही ऐकत नाही. सन्माननीय सदस्य मघाशी सभागृहात हजर होते. या ठिकाणी काय सूचना देण्यात आल्या हे आपल्याला माहीत आहे. त्यानंतर देखील या ठिकाणी सभागृह चालविणाऱ्याची काय परिस्थिती होते हे आपल्याला माहीत आहे काय ? अनेक सन्माननीय सदस्य हात वर करीत असतात. आपल्याला बोलावयास मिळाले पाहिजे ही माझीही भावना आहे. त्या दिवशी असे ठरले की, या बाजूला अर्धा वेळ द्यावयाचा आणि त्या बाजूला अर्धा वेळ द्यावयाचा. ते मान्य झाले.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती.....**

अनेक सन्माननीय सदस्य खाली बसून कॉमेंटस् पास करुन सभागृहाचा वेळ वाया घालवितात. (अडथळा) मी कोणालाही नजरेसमोर ठेवून बोलत नाही. ज्या सदस्यांना बोलण्याची संधी मिळते त्यांना संधीचा सदुपयोग केला पाहिजे.

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.अरविंद सावंत )**

**तालिका सभापती** : मी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, या प्रस्तावावर बोलत असताना मुद्यांची द्विरुक्ती करु नये. कायदा व सुव्यवस्थेबद्दल नवीन मुद्दे मांडावेत. मी बोलू इच्छिणा-या सर्व सदस्यांना बोलण्याची संधी देईन. परंतु 5 मिनिटांमध्ये त्यांनी आपले भाषण संपवावे, अन्यथा, मी मंत्रिमहोदयांना उत्तर देण्यास सांगेन.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MMP

श्रीमती उषा दराडे ( विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी नियम 259 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर बोलण्यासाठी उभी आहे.

सभापती महोदय, मी सुरुवातीलाच एक गोष्ट नमूद करु इच्छिते की, गुन्हेगाराला जात नसतो, धर्म नसतो, पंथही नसतो. पण या सभागृहामध्ये असा वारंवार उल्लेख केला जात होता की, हिंदुंनी मुस्लिमांवर हल्ला केला, मुस्लिमांनी हिंदुंवर हल्ला केला किंवा मुस्लिमांनी दलितांवर हल्ला केला, या रंगाचा झेंडा काढला, त्या रंगाचा झेंडा लावला. ही जातीय भावना भडकावणारी भाषा आहे. गुन्हेगार हा कोणत्याही जातीचा नसतो तो गुन्हेगारच असतो. विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांकडून समाजामध्ये तेढ निर्माण करणारी वक्तव्ये करण्यात आली आहेत त्याचा निषेध करते. महाराष्ट्र सरकारचा धर्मनिरपेक्ष भावनेने कारभार चालू आहे. हे सरकार सर्व जाती धर्माच्या लोकांना बरोबर घेऊन जाण्यामध्ये, त्यांच्या मनामध्ये निर्माण झालेले भीतीचे वातावरण दूर करण्यामध्ये यशस्वी झाले आहे असे नमूद करते. त्याचप्रमाणे एका गोष्टीचा खेद व्यक्त करते. काही वर्षांपूर्वी बाबरी मशिद पाडण्यात आली. त्यानंतर केंद्रामध्ये भाजपाचे सरकार आले. त्या सरकारने तेथे मंदिर बांधले नाही. वास्तविक मंदिर बांधण्यामध्ये कोणालाही रस नाही. 'मंदिर वही बनायेंगे' यामध्ये कोणालाही रस नाही. मंदिर न बांधता मंदिर व मशिदीचा वाद शिल्लक ठेवून त्याच्यावर आपली राजकीय पोळी भाजावयाची आणि येणा-या निवडणुकीत आपले पोट भरुन सत्तेवर येण्याचे दिवा स्वप्न विरोधी पक्षाचे लोक पहात आहेत. (अडथळा) यामुळे समाजामध्ये अस्थिर वातावरण निर्माण होईल, कायदा व सुव्यवस्था बिघडू शकते याचे भान विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांनी ठेवले पाहिजे. याचे कारण असे की, लोकशाहीची अस्मिता जपणे जसे सत्ताधारी पक्षातील लोकांचे काम आहे तसेच लोकशाहीचा सन्मान ठेवणे, धर्मनिरपेक्षतेचा सन्मान ठेवणे, घटनेचा सन्मान ठेवणे ही विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांचीही जबाबदारी आहे. त्यामुळे विरोधकांनी अशाप्रकारची वक्तव्ये करु नयेत. सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.दिवाकर रावते हे आजच शिवसेना पक्षाचे गट नेते झाले आहेत. त्यांनी मघाशी बोलताना शेवटी दोन वाक्ये उच्चारली होती. त्याबाबत मला गंमत वाटली. त्यांनी असे म्हटले होते की, "असे घडले तर अधिका-यांचे काय हाल होतील हे मला माहीत नाही, हे फार काळ चालणार नाही." माझे असे

3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MMP

श्रीमती उषा दराडे.....

म्हणणे आहे की, कायदा कायद्याचे काम करील. अधिका-यांची चूक असेल तर त्यांना शिक्षा होईल, जो कोणी दोषी असेल त्याला शिक्षा होईल. पण त्यांचे काय होईल, अशाप्रकारचे वाक्य उच्चारत असताना त्याच्या पाठीमागचा गर्भित अर्थ काय आहे ? ते स्पष्ट झाले पाहिजे. अशाप्रकारची धमकीवजा विधाने लोकांना चिथावणी देणारी असतात. त्यामुळे त्यांनी अशी विधाने करु नयेत, त्यांच्या ज्येष्ठतेचा आदर ठेवून मी हे बोलते. या सदनामध्ये हिंदू-मुस्लिम, हिंदू-मस्लिम म्हटले जात आहे. ही चर्चा कोणत्या दिशेने चालली आहे ? सामान्य माणूस, धर्मनिरपेक्षता, कौमी एकता, यासाठी काही तरी करावे. माननीय श्री.शरद पवार यांनी सच्चर आयोगाच्या अहवालाची अंमलबजावणी करण्यासाठी मी जन्माला आलो आहे, असे त्यांनी म्हटल्याचा आरोप करण्यात आला. मी म्हणते की, भा.ज.पा., शिवसेनेचा यासाठी जन्म झाला आहे काय ? या देशातील दलित, पदलित, भटके, विमुक्त यांना जगविण्याचे स्वप्न बघणारी माणसेच सच्चर समितीची अंमलबजावणी करु असे बोलतात, त्यावेळी ते हिंदू आहेत की मुसलमान आहेत याचा विचार करावयाचा नसतो. ते या राष्ट्राचे नागरिक आहेत, सर्वसामान्यांचे नेते आहेत, "जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुले," या उक्तीप्रमाणे माननीय श्री.शरद पवार यांनी केलेल्या स्टेटमेंटचा आम्हाला स्वाभिमान वाटतो. याचे कोणाला दु:ख वाटेल असेल तर त्याची आम्हाला काळजी करण्याचे कारण नाही. एक बाब याठिकाणी स्पष्ट करावयाची आहे की, शासन लोकांच्या हितासाठी खूप काही करीत आहे, पण आणखी करण्याची गरज आहे, म्हणून मला शासनाला काही गोष्टी सुचवावयाच्या आहेत.

नंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MMP/ पूर्वी श्री.खंदारे 17:05

(श्रीमती उषा दराडे....

लैंगिक शिक्षणाच्या बाबतीत कायदा करण्यासंबंधी चर्चा झाली आणि ती माघारीही घेतली गेली. या विषयावर सर्वंकष चर्चा झाली पाहिजे हे मला मान्य आहे. समाजामध्ये संतुलन कायम ठेवणे, महिलांवर होणा-या अत्याचाराला आळा घालणे, लहान वयामध्ये मुलींवर होणारे अतिप्रसंग, त्यांच्या विनयभंगाच्या, बलात्काराच्या घडणा-या घटना किंवा अगदी जवळच्या नातेवाईकाकडून त्यांना समज नसताना त्यांचा केला जाणारा वापर यासंदर्भात समाजामध्ये जाणीव निर्माण होणे गरजेचे आहे. म्हणून कायदा आणि सुव्यवस्था आणण्याच्या दृष्टीने, महिलांवरील होणारे अन्याय कमी करण्याच्यादृष्टीने हा कायदा होणे फार गरजेचे आहे. त्यादृष्टीने शासनाने माघार घेऊ नये अशी मला शासनाला विनंती करावयाची आहे. गर्भजल परीक्षेच्या बाबतीत मला असे सांगावयाचे आहे की, गर्भजल चाचणी प्रतिबंध कायदा आहे परंतु त्याची कडक अंमलबजावणी होताना दिसत नाही. समाजामध्ये मुलींचे प्रमाण कमी कमी होत आहे. गर्भजल परीक्षेचे किती केन्द्रे राज्यात आहेत आणि किती शिक्षा झाल्या याचा आढावा आपण घेतला तर. या कायद्याची कठोर अंमजलबजावणी होताना दिसत नाही. मागील दोन महिन्यापूर्वी परळीमध्ये एक अर्भक कुत्र्याने फरफटत रस्त्यावर आणून टाकले होते. नंतर समजले की, ते अर्भक मुलीचे होते. कायदा असून सुध्दा असे प्रसंग समाजामध्ये घडत आहेत. म्हणून कायद्याची कडक अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. बालविवाह प्रतिबंध कायदा असताना सुध्दा लहान मुलींची लग्ने होत आहेत. या कायद्याची देखील अंमलबजावणी होत नाही. द्विभार्या प्रतिबंधक कायदा आहे. त्याचीही अंमलबजावणी होत नाही. सभापती महोदय, माझी स्वत:ची भाची आहे. तिचा नवरा कर्मचारी आहे. त्याने दुसरे लग्न केले. तो सुखाने संसार करतोय. पण नव-याच्या विरोधात त्याची पहिली पत्नी 494ची केस दाखल करीत नाही. 494 रेड विथ 109 खाली केस दाखल केली तर त्याला शिक्षा होणार नाही याची तिला खात्री वाटते. दुस-या बाजूला तिला असेही वाटते की, त्या दुस-या बायको बरोबर जरी तो असला तरी माझ्या कपाळाचे कुंकू हे जिवंतच राहिले पाहिजे. एके ठिकाणी असे म्हटलेले आहे की, "चिरंजीव वेदना अंतरी दरवळणारी, जखमांना मधुमास म्हणाले चुकले का हो, चुकले को हो". या उक्ती त्या महिलेच्या वेदनेला चपखल लागू होतात. ती बाई जिवंत उपाशी मरतेय, तडफडतेय. नव-याने दुसरी बायको केली, पण 494/109 मध्ये शिक्षेबद्दल खात्री नसल्यामुळे ती

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(श्रीमती उषा दराडे....

बाई फौजदारी गुन्हा दाखल करत नाही. सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांचे मी कौतुक करते. त्यांनी कायद्यामध्ये काही सुधारणा सुचविलेल्या आहेत. आयपीसी कलम 494, 498(अ)मध्ये, सीआरपीसीच्या कलम 125,मध्ये सुधारणा करणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, आणखी एक बाब आपण गांभीर्याने घेतली पाहिजे. ब-याच डेकॉईटच्या गुन्ह्यामध्ये पारध्यांनाच संशयीत म्हणून पकडण्याची जी प्रथा पडलेली आहे ती बंद झाली पाहिजे. पुरवा असेल तर तो कोणीही असला तरी त्याला पकडा. परंतु पुराव्या अभावी केवळ तो त्या जातीचा आहे म्हणून संशय निर्माण करणे ही अत्यंत चुकीची बाब आहे.

सभापती महोदय, वेश्या व्यवसायाच्या बाबतीत मला सांगावयाचे आहे की, माणूस गुन्हेगारीकडे केव्हा वळतो ? तर जेव्हा त्याच्या हाता तोंडाची गाठ पडत नाही तेव्हा. जेवायला मिळत नाही म्हणून वेश्या व्यवसाय केला जातो. आमच्या समाजामध्ये बाईचे शरीर हे क्रयवस्तू झालेले आहे आणि हा आमच्या समाज व्यवस्थेला लागलेला शाप आहे. म्हणून या गोष्टीकडे आपण समाजिक दृष्टीकोनातून पाहिले पाहिजे आणि माझ्या शासनाकडून मला याबाबतीत अपेक्षा आहेत. ज्यांनी डान्सबार बंदीचा निर्णय घेतला, महिलांसाठी अनेक पुरोगामी निर्णय घेतले, महिलांकरिता परिर्वतनाच्या चळवळी करण्याच्यादृष्टीने कायद्याचे फॉर्मेशन केले, त्या सरकारकडे आज महाराष्ट्र आशेने बघतोय. माझ्या समाजामध्ये महिलाना वेश्या व्यवसाय करावा लागणार नाही, त्यांचे पुनर्वसन कसे करता येईल, त्यांना उद्योगधंद्यांना कसे लावता येईल हे पाहिले पाहिजे. एक साखर नावाची बाई मला आठवते. मी जेव्हा आणीबाणीमध्ये कारागृहात होते, त्यावेळी त्या बाईला कलम 302खाली अटक झालेली होती. हायकोर्टच्या अपिलात ती सुटली. त्यानंतर ती चुकीच्या लोकांच्या हातामध्ये गेली. बीडच्या नेताजी मैदानावर तिने वेश्या व्यवसाय केला. मी त्या वेश्या व्यवसाय करणा-या महिलांची संघटना बांधली होती. नंतर तिची अशी अवस्था झाली की, शेवटी तिचे तारुण्य कमी झाल्यानंतर ती दररोज कोर्टामध्ये येऊन माझ्याकडून 10 रुपये घेऊन जायची आणि त्या 10 रुपयातून 5 रुपयाचे खायची आणि 5 रुपयाची दारु प्यायची. नंतर ती मेली. नव-याच्या खुनाबद्दल तिच्यावर 302 खाली गुन्हा दाखल झालेला होता. तिने खून केलेला नव्हता.

..3..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्रीमती उषा दराडे....

परिस्थितीने बायका गुन्हेगार होतात, परिस्थितीने माणूस गुन्हेगार होतो. म्हणून अशी परिस्थितीच निर्माण होणार नाही अशी समाजव्यवस्था आणि महिलांचे सक्षमीकरण केले पाहिजे. वेश्या व्यवसाय करणा-या महिलांना त्या व्यवसायापासून परावृत्त करुन त्यांना कसे कामाला लावता येईल यादृष्टीने आपण विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, शेतक-यांच्या आत्महत्येचा प्रश्न याठिकाणी नेहमीच चर्चिला जातो. आत्महत्या करणे हा गुन्हा आहे. तरीही "ये मरणा, ये ये मरणा, मजवाटे या जगण्याचे भय " अशा पध्दतीच्या कविता रचल्या जातात. कोणत्याही माणसाला जीव घालवावा असे वाटत नाही. शेतक-याने आत्महत्या करु नये यासाठी शासन प्रयत्न करीत आहे त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करते. शेतक-यांची कर्जमाफी केल्याबद्दलही मी शासनाचे अभिनंदन करते. यामध्ये आपणाला अजून प्रगती करावी लागेल. शेतीला पूरक असा व्यवसाय देऊन शेतकरी आत्महत्येकडे जाणार नाही यादृष्टीने आपणाला प्रयत्न केले पाहिजेत. लाल्या रोगामुळे काही शेतकरी उद्विग्न झालेले आहेत. माझ्या जिल्हयामध्ये लाल्या रोगामुळे झालेल्या नुकसानी बाबत शेतक-यांना अनुदान मिळालेले नाही. या सर्व गोष्टींचा बारकाईने अभ्यास करावा लागेल. माझे शासन कायदा आणि सुव्यवस्थेसाठी झटत आहे, पुरोगामी पावले टाकत आहे, अशीच पावले पुढे टाकाली जातील अशा प्रकारची अशा व्यक्त करते, शासनाचे अभिनंदन करते आणि पुन्हा एकदा जातीय तणाव निर्माण करणा-या वक्तव्यांचा निषेध करुन मी माझे दोन शब्द संपविते. जय हिंद ! जय भीम !! जय महाराष्ट्र !!!

----

....नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी "राज्यातील ढासळलेली कायदा व सुव्यवस्था " या विषयाच्या अनुषंगाने अतिम आठवडा प्रस्ताव माडलेला आहे, त्या प्रस्तावास पाठिंबा देण्यासाठी आणि त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. कोळसा कितीही उगाळला तरी तो काळाच असतो त्याप्रमाणे कायदा व सुव्यवस्थेवर कितीही बोलेले तरी त्याचा उपयोग होईल असे मला तरी वाटत नाही. त्याचे कारण हा विषय गेल्या पाच,सहा अधिवेशनात उपस्थित होतो आहे आणि त्या विषयाच्या संदर्भात गेल्या पाच,सहा अधिवेशनापासून माननीय उप मुख्यमंत्री साखरेच उत्तर देत आहेत. मला अपेक्षा आहे की, आजच्या चर्चेला देखील पूर्वीसारखेच उत्तर देतील आणि हा विषय संपतील. परंतु महाराष्ट्रात कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती भयंकर वाईट झालेली आहे. दिवसें दिवस कायदा व सुव्यवस्थेचा बोजवारा उडतो आहे. रोज सकाळी वृत्तपत्र उघडल्यानंतर राज्यातील कायदा व सुव्यस्थेचे धिंडवडे निघालेले वाचावयास मिळातात. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी आपल्या भाषणात कायदा व सुव्यवस्थेचे पोस्टमार्टेम केले. मी पोलिसांच्या बाबतीत काही ठराविक मुद्देच या ठिकाणी उपस्थित करणार आहे. पोलीस दलाची वाईट अवस्था झाली आहे ती दोन,तीन कारणामुळे झाली आहे. पोलिसांची मानसिकता बरोबर राहिलेली नाही. पोलीस दल काही विभागात विभागले गेले आहे जणू काही पोलीस अधिकारी कोणत्या ना कोणत्या राजकीय नेत्यांच्या तसेच मोठ मोठया बिल्डरांच्या पे रोलवर काम करीत आहेत काय ? अशा प्रकारची एक परिस्थिती पोलीस दलात निर्माण झाली आहे. कर्तव्यदक्ष पोलीस अधिका-यांना बाजूला डावलले जात आहे. पोलिसांमध्ये एक मानसिकता अशी निर्माण झाली आहे की, दिवस भरावयाचा आणि घरी निघून जावयाचे आणि दुस-या प्रकारची अशी मानसिकता निर्माण झाली आहे की, आपला जो कालावधी आहे, त्या कालावधीत चांगल्या ठिकाणी पोस्टींग करुन घ्यावयाचे, त्या ठिकाणी राहून भरपूर पैसे कमवावयाचे आणि चांगल्या प्रकारे सेवानिवृत्तीचा कालावधी घालवावयाचा. या दोन मानसिकतेमध्ये पोलीस दल भरडले जात आहे. अतिशय चांगले कर्तव्यदक्ष पोलीस अधिकारी आपल्या अंगावर कामाची जबाबदारी घेत नाहीत. स्कॉटलँड यार्ड नंतर मुंबई पोलीस दलाचे दुसरे नाव होते. मुंबई दलाचे पोलीस कर्तव्यदक्ष म्हणून ओळखले जावयाचे. एखादी गुन्हा घडल्यानंतर, त्या घटनेच्या अनुषंगाने पोलिसांचा एक प्रमुख असावयाचा आणि तो ताबडतोब तिकडच्या पोलीस अधिका-यांची

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब....

बैठक घ्यावयाचा आणि जबाबदारी निश्चित करावयाचा. आणि माहिती घ्यावयाचा की, हा गुन्हा कोणत्या टोळीने केलेला असेल ? हा गुन्हा कोणी केलेला असेल ? गुन्हयांची माहिती गोळा करण्यासाठी खब-यांची टीम तयार होती...

**<u>सभापतीस्थानी माननीय सभापती</u>**

यानंतर श्री. कानडे...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, माझ्या बोलण्याने सरकारला फरक पडत नाही.

**सभापती** : प्रयत्नांची पराकाष्ठा केल्यावर फरक पडत असतो.

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, आता माझी दोन वर्षे बाकी राहिलेली आहेत. पोलीस दलाच्या मानसिकतेबाबत मी खूप वेळा बोललो आहे. परंतु मी आता महत्वाच्या विषयावर येत आहे. मध्यंतरी शहा आणि चतुर्वेदी अशी जी केस पोलीस दलामध्ये झाली त्याबाबतीत या दोन बिल्डरमध्ये अक्षरश: गँगवार झाले. पोलीस दलातील अधिकारी या बिल्डरच्या पे रोलवर होते. 13 अधिकारी पोलीस दलातून निलंबित केले गेले. याबाबतीत जो रिपोर्ट देण्यात आला त्याबाबतीत स्पष्टपणे सांगण्यात आले की, यांच्याबाबतीत अतिशय स्पष्टपणाने आक्षेप नोंदविण्यात आला आहे म्हणून त्यांना आम्ही निलंबित करतो. हे कोण अधिकारी होते हे पाहिले तर हे खालच्या स्तरावरील अधिकारी होते आणि त्यांच्यामध्ये एक अतिरिक्त आयुक्त दर्जाचा अधिकारी होता. परंतु 164 सीआरपीसी नुसार मॅजिस्ट्रेटसमोर सिनीयर इन्स्पेक्टरचे स्टेटमेंट रेकॉर्ड केले गेले आणि त्याने त्यामध्ये श्री.अरुप पटनायक या अधिकाऱ्याचे नांव घेतले आहे. याबाबतीत गृहमंत्र्यांनी सांगितले होते की, सीआयडीचा अहवाल आला तर एक तासाच्या आत मी त्यांच्यावर ॲक्शन घेईन. आम्ही त्यांच्याकडे वारंवार मागणी करतो आहोत आज गृहमंत्री आम्हांला असे उत्तर देत आहेत की त्याच्यामध्ये स्पष्टता आलेली नाही. काय स्पष्टता यायची आहे ? ज्यावेळेला सीआरपीसीमध्ये एखाद्या अधिकाऱ्याचे नांव त्याठिकाणी स्पष्टपणे लिहिले गेले असेल आणि त्याच्यावर कारवाई होत नसेल तर त्यामुळे पोलिसांची मानसिकता तुटते आहे. कुठल्याही खालच्या दर्जाचा अधिकारी जेव्हा वरिष्ठांकडून आदेश येतात त्यावेळी ते आदेश तो अधिकारी पाळतो. याबाबतीत आबासाहेबांनी एकदा सांगितले होते की, वरिष्ठांचे चुकीचे आदेश मानू नका. परंतु वरिष्ठांचे आदेश मानले नाहीत तर त्या अधिकाऱ्याला घरी बसविले जाते. आज एक ते तेरा नंबरचे आरोपी म्हणजे पोलीस घरी आहेत परंतु या पोलिसांना ज्यांनी आदेश दिले ते बाहेर आहेत. आजच या सदनात सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर आलेले आहेत. याच किरण पावसकर हे हॉटेलमध्ये व्यवस्थापनाकडे चर्चेसाठी गेले होते आणि तेथे सिक्युरिटीला लिफ्टमध्ये कुणीतरी कानफडात मारली म्हणून या अरुप पटनायक यांनी त्यांच्यावर 307 चा गुन्हा दाखल करायला लावला होता. त्यावेळेला मोठे आंदोलन झाले आणि नंतर त्यांच्यावरील 307 चा गुन्हा पाठीमागे काढून घेतला गेला. अशा पध्दतीने राजकीय हेतूने प्रेरित होऊन आणि कुणाची तरी सुपारी घेऊन पोलीस

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अधिकारी काम करीत असतील दुसरे पोलीस अधिकारी काम करतात त्यांचे काय होईल ?साधे कार्यकर्ते मिळाले कुठले राजकीय कायकर्ते मिळाले तर त्याला त्रास दिला जातो. माझ्यासारखा राजकीय कार्यकर्ता रास्ता रोकोमध्ये मिळाला तर माझी फिंगरप्रिंट घेतली जाते. फिंगर प्रिंट कोणाची घेतली जाते यासंबंधात कायदा आहे. कोणाची फिंगर प्रिंट, कोण अट्टल गुन्हेगार आहे....

**सभापती** : मगाशी तालिका सभापती श्री. अरविंद सावंत यांनी असे सांगितले की, प्रत्येक वक्त्याला भाषणासाठी मी 5 मिनिटांची परवानगी देतो. फक्त मुद्दे जरी सन्माननीय सदस्यांनी सांगितले तरी 5 मिनिटांमध्ये भाषण पूर्ण होऊ शकते.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, एमव्हीएलयू हे कॉलेज बंद झाले. पालकांनी मोर्चा नेला. मुलाचे भवितव्य काय होणार म्हणून पालकांनी मोर्चा नेला तर या पालकांवरच गुन्हा नोंदविला. पेट्रोपंप लुटले जात आहेत, हायवेवर रॉबरी होते आहे असे डझनावरी किस्से आहेत. त्यांच्यापैकी किती लोकांवर गुन्हे दाखल केले गेले ? मागे मी सांगितले होते की, पूर्वी पोलीस त्यांना स्वत:चे पैसे घालून खबऱ्यांकडून माहिती घेत होते. शासन त्यांना पैसे देत होते. या खबऱ्यांना वेगवेगळया ठिकाणी पाठवून माहिती गोळा केली जात होती. त्यावेळी इंटेलिजन्स एवढा पॉवरफूल होता. आज खबऱ्यांची परिस्थिती काय आहे ? जे आरोपी पकडले जात आहेत, जे जामिनावर सुटत आहेत त्यांचे ट्रॅकरेकॉर्ड कोण बघते आहे ? मागील वर्षी बॉम्बस्फोट झाले त्यातील बरेचसे आरोपी सुटलेले आहेत. हे आरोपी आज कुठे आहेत ? हे कुणाला माहीत आहे काय ? याठिकाणी डान्सबारवर चर्चा केली जाते. डान्सबार बंद केले आहेत. आज मला माहिती मिळाली की असेच कुठलेतरी आणखी एक आबा परदेशात आले आहेत आणि त्यांनी तिकडचे डान्सबार बंद केले आहेत. म्हणून तेथील डान्सबारमध्ये ज्या मुली काम करतात त्यांच्या पुनर्वसनासाठी त्यांना येथे आणले गेले अशा प्रकारची चर्चा करीत आहेत.डान्सबार बंद केले. मुजरे चालू झाले आहेत. मागील वेळी मी या विषयावर बोललो होतो त्यावेळी आबा म्हणाले होते की, तुम्ही हवेत तलवारी चालवू नका. माझ्याकडे 25 पोलीस स्टेशनची लिस्ट आहे ही जाहीर करावयाची असेल तर मी जाहीर करतो आणि आबांनी सांगावे, त्यांनी माझ्याबरोबर फिरावे आणि जेथे जेथे डान्सबार चालू आहेत तिकडच्या वरिष्ठा अधिकाऱ्यांना सस्पेंड करण्याचे धोरण त्यांनी

....3

ॲड. अनिल परब....

ठेवले तर मुंबईतील अर्धेअधिक पोलीस घरी बसतील. मागील वेळी मी त्यांना सांगितले होते की, माझ्याबरोबर चला मी तुम्हांला कुठेकुठे काय काय धंदे चालतात ते दाखवितो. अशा प्रकारे ठराविक पोंलिसांना संरक्षण दिले जाते आणि पोलिसांची जी मानसिकता तुटते आहे ती बरोबर नाही. आज किरण पावसकर सभागृहात आले. त्यांच्यावर 307 चा गुन्हा दाखल केला गेला होता. त्यावेळी जर ते चुकीच्या पध्दतीने अटकेत गेले असते तर आज सभागृहात येऊ शकले नसते आणि त्यांच्यावर काळिमा लागला असता. अशा प्रकारे चुकीचे गुन्हे दाखल करणाऱ्या आणि अशा प्रकारे पोलिसांची मानसिकता तोडणाऱ्यांच्या बाबतीत सरकार काय उपाययोजना करणार आहे ? राज्यमंत्र्यांना खुलासा द्यावा लागतो की डान्सबारमध्ये जे पोलीस फिरत आहेत त्यांच्याशी माझा काही संबंध नाही. अशा प्रकारे गृहराज्यमंत्र्यांना खुलासा द्यावा लागतो ?

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

ॲड.अनिल परब...........

वेगवेगळी प्रकरणे त्यांची उघडकीस आणली आहेत. अनेक ठिकाणाहून हप्ते गोळा केले जातात. खरे म्हणजे या विषयावर सविस्तर बोलावयाचे होते. परंतु वेळेअभावी माझे भाषण संपवित असताना एकच सांगू इच्छितो की, शासनाने स्वतःच पोलिसांची मानसिकता तोडलेली आहे. पोलिसांचे मनोधैर्य ऊंचावले जात नाही, चांगले कार्यक्षम अधिकारी आजही मुंबईत कार्यरत आहेत, या अधिकाऱ्यांना चांगल्या ठिकाणी नियुक्तीवर घेतले तरच कायदा व सुव्यवस्था नियंत्रणात येऊ शकेल. सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांच्या कार्यक्षमतेबद्दल शंका नाही. परंतु ज्या उपाययोजना व्हावयास पाहिजेत त्या होत नाहीत. त्या होण्यासाठी आम्हाला देखील चर्चेसाठी वेळ द्यावा, आमच्याकडून सूचना ऐकून घ्याव्यात आणि योग्य पध्दतीने उपाययोजना करावी एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो. धन्यवाद. जय हिंद, जय महाराष्ट्र!

----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सभागृहाचे विरोधी पक्षनेते सन्माननीय श्री.पांडुरंग फुंडकर यांनी कायदा व सुव्यवस्थेच्या संदर्भात मांडलेल्या अंतिम आठवडा प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, या राज्यामध्ये अलिकडे ज्या दंगली घडल्या, विशेषकरुन छोट्या शहरांमध्ये दंगली घडल्या, त्याचे मुख्य कारण मंदिर वही बनायेंगे ही गाण्याची कॅसेट असल्याचे विरोधी पक्षनेत्यांनी सांगितले. दंगे करणारे हिंदू नसतात आणि मुसलमानही नसतात. या राज्यामध्ये दंग भडकविणारे उच्चभ्रू हिंदू आणि उच्चभ्रू मुसलमान असतात. मला वाटते की, मरणारे बहुजन वर्गातील हिंदू आणि बहुजन वर्गातील मुसलमान, ओबीसीमधील मुसलमान आणि हिंदू ही मंडळी मारतात आणि मरतात ही वस्तुस्थिती आहे. या निमित्ताने मंदिर वही बनायेंगे ही कॅसेट जाणीवपूर्वक वाजविली जाते. भडकविण्यासाठी वाजविली जाते. त्या कॅसेटवर राज्य सरकारने ताबडतोब बंदी आणावी अशी मी मागणी करतो. अलिकडच्या काळात छोट्या शहरांमध्ये आणि निमशहरांमध्ये ज्या दंगली घडविण्यात आल्या त्यामागे नक्की राजकीय कारण काय आहे? सामाजिक कारण काय आहे? आर्थिक कारण काय आहे हे शोधण्याची आवश्यकता आहे. अचलपूर, रावेर, मराठवाड्यातील दंगल असो, या छोट्या शहरामध्ये व्यापाऱ्यातील भांडणे, बाजारपेठेतील भांडणे ही धार्मिक आधार घेत भावना भडकवितात, एकमेकाचे उट्टे काढण्यासाठी वापरत असतात आणि याकडे शासनाचे लक्ष वेधतो. शासनाने यासंबंधी समिती नेमून छोट्या शहरातून होणाऱ्या दंगलीबाबत अभ्यास करावा. आज राज्यामध्ये 45 ते 47 टक्के नागरीकरण सुरु झाले आहे. छोट्या शहरांमध्ये परिस्थिती का बिघडते याचा शोध घेतला पाहिजे अशी मी मागणी करतो. सांगलीचा वारंवार उल्लेख झाला. सांगलीतील मनोहर भिडे यांचे स्वातंत्र्य चळवळीतील कार्य काय? सांगलीमध्ये स्वातंत्र्य चळवळीत कोण होते याची आपल्याला कल्पना आहे. मनोहर भिडे कुठेही नव्हते. संभाजी भिडे असे नाव बदलून स्वत:ला देशभक्त ठरविण्याचा उद्योग करीत असून त्यांना देशभक्त आणि देवभक्त म्हणणे यासारखे दुसरे पाप नाही.

(नंतर श्री.जुन्नरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील .....

कृपा करुन कोणत्याही स्थरावरुन मनोहर भिडे यांनी संभाजी भिडे असे खोटे नाव घेतलेले आहे त्यांचे कृपाकरुन शासनाने समर्थन करु नये. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्थरावर जोधा अकबर चित्रपट गाजत असून हा चित्रपट कोल्हापूरचे श्री. अशुतोष गोवारीकर यांनी तयार केलेला आहे. हा चित्रपट बंद पाडण्याचे कारण दाखवत, दंगल घडवण्याचे काम मनोहर भिडे सातत्याने करीत आहेत. श्री. मनोहर भिडेंचे समर्थन जर राज्यसरकारकडून होत असेल तर शासन दंगे थांबविणार कसे? हा माझा प्रश्न आहे.

सभापती महोदय, मी आता भिवंडीच्या विषयावर विचार व्यक्त करणार आहे. भिवंडीमधील मुस्लीम समाजाला जाणीवूपर्वक टार्गेट करत,ज्या पध्दतीने पोलीस अधिका-यांनी जो छळवाद मांडलेला आहे त्याला तुम्ही अटकाव करणार आहात की, नाही ? पोलीस स्टेशन कोठे व्हावे यासंदर्भात जेव्हा कोर्ट निर्णय देईल त्यावेळेस तुम्ही त्या ठिकाणी पोलीस स्टेशन तयार करा पण कोणावरही जबरदस्ती करणार असाल आणि मुसलमान म्हणून त्यांना सिमी ठरवणे, जातीयवादी ठरवणे हा प्रकार बंद झाला पाहिजे. श्री. गुलामनबी अन्सारीसारखा एका ज्येष्ठ प्रत्रकाराला गेल्या एक वर्षापासून तुम्ही तुरुंगात ठेवलेले आहे. या पत्रकाराचा दंगलीशी काहीही संबंध नाही, तसेच त्यांची यासंदर्भातील पूर्वपिठीकाही नाही. हा पत्रकार अतिशय संयमी असतांना त्याला तुम्ही खोटया केस खाली गेल्या वर्षभरापासून डांबलेले असून तेथील विभागीय कमिशनर असे म्हणतात की, "मी याला आज धडा शिकवणार." श्री. गुलामनबी अन्सारीवर अगोदर मोक्का लावण्यात आला होता परंतु मोक्का आता काढण्यात आलेला असून त्यांना खोटया गुन्हयाच्या केसमध्ये अडकवून तुरुंगात टाकलेले आहे. अधिका-यांना जात आणि धर्म कधी पासून कळायला लागला? अधिकारी रिपोर्टींग करतांना असे म्हणतात की, साहेब आपल्या माणसाने असे केले, त्यांच्या माणसाने तसे कले आहे. आपले आणि त्यांचे अशा प्रकारचे रिपोर्टींग अधिकारीच करीत असतात. त्यामुळे अशा अधिका-यांना त्यांची जागा आणि त्यांचे कर्तव्ये समजून सांगण्याची आवश्यकता आहे. माझी मागणी आहे की, श्री. गुलामनबी अन्सारींच्या प्रकरणात माननीय उपमुख्यमंत्र्यांनी सांगलीच्या विद्यार्थ्यांच्य संदर्भात सोडून देण्याची भूमिका घेतली तशीच भूमिका त्यांनी याही प्रकरणात घेण्याची आवश्कता



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील .....

आहे. माननीय उपमुख्यमंत्र्यांमुळेच आज या दोन तरुण विद्यार्थ्यांना कोर्टात जामीन मंजूर होऊ शकला. विशेष उल्लेखा द्वारे दोन तरुण विद्यार्थ्यांना नक्षलवादी प्रकरणात तुरुंगात टाकण्यात आले होते यासंदर्भात मी परवा सभागृहात विषय उपस्थित केला होता त्यावेळेस सभापती महोदय, आपण सभागृहात उपस्थित नव्हता.

सभापती महोदय, मी नक्षलवादाच्या संदर्भात या सभागृहात अनेक वेळा बोललो आहे. मी नक्षलवादाचे किंवा हिंसेच्या कोणत्याही मार्गाचे मी समर्थन करीत नाही. आपण संसदीय लोकशाहीचे कट्टर पुरस्कर्ते आहोत. परंतु संसदीय लोकशाहीच्या प्रक्रियेमध्ये अनेक घटकांना सामावून घेण्याची भूमिका असली पाहिजे. नक्षलवादी म्हणजे कोणी अतिरेकी नव्हे. नक्षलवाद्यांचा मार्ग चुकला असेल परंतु या राज्यातील शोषणाच्या, विषमतेच्या विरोधात जे तरुण उभे राहतात, ते का उभे राहतात हे समजून घेण्याची आवश्यकता आहे. नक्षलवाद कोठे वाढतो आहे ते समजून घेण्याची आवश्यकता आहे. असे असतांना कोठे तरी, काही तरी कृत्ये घडली म्हणून परिवर्तनवादी चळवळीतील कार्यकर्त्याला नक्षलवादी ठरवून बेदम मारुन तुरुंगात वर्षोनवर्षे खितपत पाडणार असू तर ते आता चालणार नाही. त्यामुळे माझी आपल्याला पुन्हा एकदा विनंती आहे की, नक्षलवादाच्या आरोपाखाली या राज्यात जे कोणी तुरुंगात आहेत त्यांच्यांशी शासनाने संवादाची भूमिका घेतली पाहिजे. ज्यांच्यावर गंभीर स्वरुपाचे गुन्हे आहेत त्यांच्याबाबत मी समर्थन करीत नाही, ते काम कायदा आणि कोर्ट करेल. परंतु त्यांच्याशी तुम्ही बोलणार आहात की, नाहीत? त्यांना लोकशाही प्रक्रियेत तुम्ही सामावून घेणार आहात की, नाही? त्यांना जर तुम्ही लोकशाही प्रक्रियेत घेणार नसाल तर ज्या गरीब समाजाच्या बाजूने ते उभे आहेत तो गरीब समाज उद्या पेटून उठेल आणि त्यात आपण सारे भस्मसात होऊ. ही वेळ जर येऊ द्यावयाची नसेल तर त्याबाबत आपण भूमिका घेतली पाहिजे. अजूनही ती मुले गेल्या 16-17 दिवसापासून उपोषणाला बसलेली आहेत. यातील अनेकांची परिस्थिती उपोषणामुळे खालावली आहे त्यामुळे ती मुले मानवी हक्काचे हक्कदार आहेत की, नाही, त्यांच्या बाबत कोर्टात जे काही व्हायचे ते होईल परंतु त्यांना मानवी हक्क मिळाले पाहिजेत. एवढीच माझी या निमित्ताने मागणी आहे.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त ) : सभापती महोदय, कायदा व सुव्यवस्थेच्या प्रश्नासंबंधी मांडण्यात आलेल्या अंतिम आठवडा प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, भारतात सर्व धर्म समभाव आहे असे मानणा-यापैकी आपण या देशाचे व राज्याचे नागरिक आहोत असे असतांना देखील काही प्रश्न अनुत्तरित राहतात. या संदर्भात मी थोडक्यात माझे विचार येथे मांडणार आहे. काही वर्षापूर्वी मुंबई शहरात गॅन्गवॉर वाढत असल्याच्या आणि एका गँगमधील गुंडाने दुस-या गॅगमधील गुंडाला ठार मारल्याची चर्चा आम्ही त्यावेळी ऐकत होतो. मुंबई शहरातील पोलीस कमिशनरांनी आणि पोलीस डिपार्टमेन्टने यामध्ये हस्तक्षेप केला होता. मी खब-यांचा उल्लेख करणार नाही कारण खब-या विषयी मला जास्त माहीत नाही. मी पोलीस स्टेशनमध्ये फारशी जात नाही. परंतु खब-या मार्फत या प्रकारांना थोडासा आळा बसला होता. मुंबई शहर वाढत असल्यामुळे नवीन मुंबई निर्माण करण्यात आली. त्याच प्रमाणे तेथे नवीन मुंबई महानगरपालिका देखील स्थापन करण्यात आली असून तिला स्वच्छतेचे तिसरे पारितोषिक मिळाले होते. या ठिकाणी मी खास करुन ऐरोलीचा उल्लेख करणार आहे. त्या परिसरात आम्ही सर्वजण बचतगटाच्या माध्यमातून काम करीत असल्यामुळे व्यक्ती व्यक्तीशी ओळख आहे आणि व्यक्ती व्यक्तीच्या घरी जाणे येणे आहे. त्या ठिकाणी दोन फर्लांगावर पोलीस स्टेशन आहे आणि गेल्या पाच वर्षापासून तेच अधिकारी तेथे ठाण मांडून बसलेले आहेत. पाच वर्षापासून एकाच ठिकाणी असलेल्या अधिका-यामुळे तेथे पाच नगरसेवकांची राजकीय हत्या झाली आहे. परंतु अजूनही त्यांना गुन्हेगार सापडत नाही.

सभापती महोदय, सोमवारी सकाळी श्री. काळे नावाच्या एक कॉग्रेस पक्षाच्या नगरसेवकाची तेथे एक हत्या झाली होती .माझा व त्यांचाशी चांगला परिचय होता. इतकेच नव्हे तर त्यांच्या कुटुंबियांशी देखील माझा चांगला परिचय होता. सकाळी कार्यालय उघडण्यासाठी आपल्या गाडीतून तेथे आले असतांना त्यांच्या मागावर असलेल्या मारेक-यानी त्यांना जवळून गोळया घातल्या होत्या. त्या परिसरातील डॉक्टरांनी आणि इतर मंडळीनी त्यांना वोक्हार्ट हॉस्पिटलमध्ये दाखल केले होते परंतु तोपर्यंत त्यांचा अंत झाला होता. ही घटना घडण्याच्या सहा महिने अगोदर आणखी एका नगरसेवकाची हत्या करण्यात आली होती, त्या अगोदर श्री. सावंत नावाच्या एका नगरसेवकाची हत्या करण्यात आली होती, त्या अगोदर एका नगरसेविकेची हत्या करण्यात



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आली होती. या मागे कोणाचे राजकीय षडयंत्र आहे काय ? सरकार चांगले काम करीत असतांना मुद्दाम सरकारला बदनाम करावयाचे आहे काय याचा देखील खुलासा होणे आवश्यक आहे

सभापती महोदय , काल रात्री मी घरी गेल्यानंतर ऐराली परिसरातील दहा बारा जण माझ्याकडे आले होते त्यात व्यापारी ,प्रोफेसर व डॉक्टर्स होते. ऐरोली परिसर सोडून जावा अशी त्यांची मानसिकता तयार झाली आहे. एका बाजूने महाराष्ट्र हा शिवाजी महाराजांचा आहे असे आपण सर्वजण म्हणत असतो त्याच प्रमाणें स्कॉटलॅन्डच्या तोडीची पोलीस यंत्रणा आहे असे म्हणत आपली पाठ थोपटून घेत असतो. परंतु दुस-या बाजूला मात्र सतत हत्या घडत आहेत. नवीन मुंबईमध्ये पोलीस कमिशनराचे कार्यालय असतांना नवीन मुंबईमध्ये खून खराबा का होत आहे, त्यात कोणाचा व्हेस्टेड इंटरेस्ट आहे ? हे समजत नाही तेव्हा या भागात राहणा-या नागरिकांना शासनाने दिलासा द्यावा अशी माझी शासनाला विनंती आहे.

सभापती महोदय, पोलिसांना 12 - 14 तास काम करावे लागते हे मला माहीत आहे त्यांना पुरेशी झोप मिळत नाही, त्यांना पुरेशी विश्रांती मिळत नाही. पंरतु अशा प्रकारे चांगले काम करणारे पोलीस अधिकारी हाताच्या बोटावर मोजण्या इतके असतात इतर पोलीस अधिका-यांचे मात्र बाकीचे उद्योग चालतात जे काम करतात ते गाढवासारखे कामच करीत राहतात परंतु ज्यांना कामच करावयाचे नाही त्यांच्या बाबतीत काय करावयाचे हे पोलीस यंत्रणेने आणि पोलीस अधिका-यांनी पाहणे गरजेचे आहे असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.त्या परिसरातील लोकांना दिलासा देण्यासाठी सरकार काय उपाययोजना करणार आहे याबाबतीत माननीय उप मुख्यमंत्र्यांनी येथे खुलासा करावा अशी माझी त्यांना विनंती आहे. सरकार हे आपले आहे तेव्हा आपल्या सरकारकडून जनतेची अपेक्षा आहे त्या अपेक्षेपोटी मी याठिकाणी विचार मांडलेले आहेत . एवढे बोलून मी माझे भाषण संपविते. जयहिंद.

-----

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी या चर्चेमध्ये भाग घेण्यास सुरूवात करताना माननीय गृहमंत्री सभागृहामध्ये उपस्थित होत आहेत हे माझे भाग्य आहे. या राज्यामध्ये कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न कसा निर्माण होतो आणि त्यासंबंधात काय कारवाई केली पाहिजे एवढ्यापुरतेच त्यांच्या उपस्थितीतच मी बोलणार आहे. पुणे येथील डेक्कन मस्जिदीच्या संदर्भात केसरी वर्तमानपत्राचे एक कात्रणच मी सोबत आणले आहे. मी आपल्याला सांगू इच्छितो की, केसरी वर्तमानपत्राच्या 30 जून 1970 च्या अंकामध्ये संभाजी पुलाखाली ही मशीदच नव्हती असा निष्कर्ष न्या. नाईक मंडळाने काढला असल्याची बातमी आलेली आहे आणि हे मंडळ पुणे महापालिकेने नियुक्त केलेले होते. त्याच्या अधिक डिटेल्समध्ये मी आता वेळेअभावी जात नाही. पण यासंबंधात मला असे सांगावयाचे आहे की, माननीय गृहमंत्र्यांनी त्या मशिदीच्या बांधकामास स्थगिती दिलेली आहे, ती स्थगिती आपण कायम करावी. कारण तेथे ती मशीद अगोदर पासून नव्हतीच. मी हे यासाठी सांगतो आहे की, पुण्यातील सगळ्या गणपतीच्या मिरवणुका तेथूनच जात असतात आणि त्यामुळे पुढे तेथे वादाचे प्रश्न उद्‌भवू शकतात. तेथे मशीद पूर्वी कधीच नव्हती याचे सगळे पुरावे माझ्याकडे आहेत. तेथील 7/12 चे उतारे अगदी 1934 पासूनची सर्व संबंधित कागदपत्रे मी आणली आहेत. ते सारे पुरावे मी या संबंधात आपल्याला दाखवू शकतो., आपल्या माध्यमातून मी ते पुरावे माननीय गृहमंत्र्यांना देतो आणि त्यांना विनंती करीन की, माननीय उपमुख्यमंत्र्यांनी ताबडतोब तेथील या मशिदीचे बांधकाम थांबवावे.

सभापती महोदय, पोलीस खात्याच्या कारभारामध्ये काही चांगली माणसेही असतात पण काही माणसे आपल्या कामाने, आपल्या वागणुकीने खात्याचे नाव बदनाम करतात. त्याचे उदाहरण मी आपल्याला देणार आहे. एसआरए योजनेमध्ये बोरीवली येथील चंद्रकांत रामचंद्र पवार या तरूणाने तक्रार केली. तेव्हा त्या तरूणाला तेथील विकासकाने मारझोड केली, त्याबाबत त्याने पोलिसांकडे तक्रार केली असता पोलिसांनी तक्रार घेतली नाही. त्यामुळे श्री.चंद्रकांत पवारांना कोर्टामध्ये जावे लागले आणि कोर्टाने सांगितले म्हणून त्या विकासकाच्या विरूद्ध पोलिसांनी फिर्याद घेतली. 24 फेब्रुवारी 2008, बोरीवली पश्चिम, लोकमान्य टिळक नगर येथे ही घटना घडलेली आहे. तेव्हा ज्या पोलीस अधिकाऱ्याने अगोदर तक्रार दाखल करून घेतली नाही त्याच्याकडे त्याबद्दल विचारणा करून त्याचेवर त्याबद्दल कडक कारवाई करावी अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

..... 4बी 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत ....

सभापती महोदय, अहमदनगर जिल्ह्यामध्ये भानुदास कोतकर या व्यक्तीवर आतापर्यंत 4 खुनांसह 28 गुन्ह्यांची नोंद आहे आणि त्या भानुदास कोतकरची तीन मुले आणि दोन भाऊ हे सारे गुन्हेगारी प्रवृत्तीचे असून त्या सर्वांच्यावर मिळून एकंदर 42 गुन्ह्यांच्या नोंदी आहेत. त्यांच्या प्रवृत्तीमध्ये काहीच फरक पडत नाही. आजवर केडगाव, चास, अमरगाव इत्यादी गावांच्या पंचक्रोषीत त्याने काही हत्याकांडे घडविली आहेत. त्यातील 12 खूनाचे गुन्हे तपासाविना प्रलंबित आहेत. बऱ्याच ज्ञात-अज्ञात तसेच पंचक्रोषीतील मानवांची हत्याकांडे करून त्यांची प्रेते हातपास तोडून पोत्यात घालून विहिरीत, काट्याकुपाट्यात, रस्त्याच्या कडेला, रेल्वे लाईनमध्ये टाकली जातात आणि पोलिसांच्या मदतीने त्या साऱ्या आत्महत्या असल्याचे भासवून ते गुन्हे दडपले आहेत. त्या 70 जणांची यादी माझ्याकडे आहे. त्या 70 खुनाच्या गुन्ह्यांचा तपास नगर जिल्ह्यामध्ये आपले पोलीस करीत आहेत. पण या भानुदास कोतकराला कोणाचा आशीर्वाद आहे हे आपण पहावे. हे सारे बाड मी पुराव्यानिशी आपल्याकडे देतो. आपण याचा अवश्य तपास करावा. मी याच संदर्भात आपल्याला असेही सांगू इच्छितो की, तेथील महसूल खात्यातील एका कर्मचाऱ्याच्या 22 वर्षे वयाच्या मुलाची हत्या झाली आहे आणि त्या मुलाच्या आईने श्रीमती पार्वती शंकरराव राऊत, वय वर्षे 48 ही घरकाम करणारी बाई आहे. तिने ही हत्या भानुदास कोतकरने केली असल्याची तक्रार पोलिसांकडे केली पण त्याकडे पोलिसांनी लक्ष दिलेले नाही. ही 48 वर्षे वयाची घरकाम करणाऱ्या त्याच्या आईने सर्वांना याबाबत पत्रे पाठविली आहेत, आपल्याला न्याय मिळावा म्हणून ती टाहो फोडते आहे पण कोणी त्यांची दखल घेतलेली नाही, आणि या भानुदास कोतकरला मात्र बरोबर सगळीकडून संरक्षण मिळते आहे तेव्हा माननीय गृहमंत्र्यांनी याबाबतीत तातडीने लक्ष घालावा आणि या बाईला न्याय द्यावा अशी मी आपल्याला विनंती करतो.

सभापती महोदय, जळगावातील चोपडा आणि श्रीरामपूर येथे झालेल्या दंगलीचा उल्लेख येथे करण्यात आला असल्याने मी त्याबाबत जास्त बोलणार नाही. पण या संदर्भात एवढेच सांगतो की, चोपड्याच्या दंगलीमध्ये जी दोन तरूण मुले पोलिसांच्या गोळीबारात मेली आहेत, त्यांना गोळ्या कोठे लागल्या आहेत हे आपण आवर्जून पहावे. अगदी ज्याला पॉईंट ब्लँक म्हणावे अशा प्रकारे त्यांना गोळ्या लागल्या आहेत आणि ते जागीच ठार झाले आहेत. पोलीस गोळीबारामध्ये

.....4बी 3 ...



KBS/MMP/SBT. श्री. गायकवाड नंतर --- 17:35

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दंगेखोरांना अशा प्रकारे गोळ्या मारल्या जातात का ? दंगा झाला तर अश्रूधूर नाही, लाठीमार नाही, पाणी नाही काहीही नाही, डायरेक्ट गोळ्या मारल्या गेल्या. खरे तर तेथे एवढी मोठी दंगल अगोदर झालीच नव्हती. सुरूवात केवळ बाचाबाचीने झाली होती. तरीही पोलिसांनी गोळीबार केला. त्यात जी दोन मुले मारली गेली आहेत त्यांच्या कुटुंबियांना एक लाख रूपये जाहीर केले आहेत पण तेवढ्याने काही होणार नाही त्यांना अधिक मदत आपण या निमित्ताने जाहीर करा. त्यांचे सारे कुटुंब पोलिसांच्या चुकीने उद्ध्वस्त झाले आहे. पोलिसांनी पॉईंट ब्लॅक गोळ्या मारल्या आहेत. तेव्हा आपण याबाबत तपास करावा आणि त्यांना अधिक मदत करावी ही अपेक्षा करतो.

सभापती महोदय, एम.एफ.हुसेन, द ग्रेट पेंटर ऑफ धीस कंट्री. त्यांनी तर ठरविलेच आहे की, आपले वाटोळे करायचे. हा पेंटर भारत मातेची नग्न चित्रे काढतो, हिंदूच्या देव-दैवतांची नग्न चित्रे काढतो. त्यांच्या चित्रांचे प्रदर्शन पुन्हा एकदा भरविण्याचा प्रयत्न येथील ख्रिस्ती क्लबने केला आहे. आपण त्याबाबत कारवाई थोडीफार केली आहे, त्यामुळे मी आपल्याला त्याबद्दल काही दोष देणार नाही. परंतु त्याकडे पोलिसांचे पूर्णपणे लक्ष नाही. त्यांचे चित्र परदेशामध्ये 5 कोटीला विकले गेले आहे. असे असताना ती चित्रे येथे पुन्हा आणून अगदी दिल्लीपासून गल्लीपर्यंत अशा क्लबमधून पदर्शने करून दाखविण्याचा प्रयत्न होतो आहे. आपण या संदर्भात लक्ष घालावे. आपण ताबडतोब त्या कुलाब्यातील क्लबवर कारवाई करावी. त्या क्लबच्या ठिकाणी 'आय लव्ह मुंबई' या संस्थेचे श्री.नाना चुडासामा यांनी 'वेलकम् एम.एफ.हुसेन, हुसेन द प्राईड ऑफ अवर नेशन' असे आमचे नाना चुडासामा सारखी ग्रेट माणसे म्हणतात. मुंबई, न्यूयॉर्क येथे विरोध करूनही त्या ठिकाणी ख्रिस्ती संघटनेने श्री.एम.एफ.हुसेन यांनी काढलेले नग्न चित्र, गंगा-यमुना देवतेचे चित्र साडेसहा कोटी रूपयांना विकले. वरळी येथील टाओ आर्ट गॅलरी तेथेही त्यांनी या चित्रांचे प्रदर्शन करण्याचा प्रयत्न केला होता, तो आपण हाणून पाडला. तरीही आपण या बाबतीत बारकाईने लक्ष द्यावे. यातूनच पुढे वाद होत राहतात म्हणून मी हे सगळे थोडक्यात येथे सांगतो आहे.

( यानंतर सौ. रणदिवे..... 4सी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत . . . .

सभापती महोदय, परदेशी गाडयांच्या बाबतीत सांगावयाचे तर नांदेड मध्ये सर्वात जास्त परदेशी आणि परराज्यातून गाडया आलेल्या आहेत. लोकांनी बोगस रजिस्ट्रेशन करुन, कर्ज काढून ट्रक विकत घेतलेले आहेत. परंतु आता पोलिसांनी ते पकडल्यानंतर गाडीही गेली आणि पैसेही गेले अशी संबंधितांची स्थिती झाली आहे. तेव्हा नांदेडमधील आणि खास करुन श्रीरामपूर येथे ज्या गाडया पकडलेल्या आहेत, त्यांचा मालक कोण आहे ? याचा शोध घेण्यात यावा अशी विनंती करतो.

सभापती महोदय, छत्रपती शिवाजी महाराजांच्या संदर्भात शेवटचा एक मुद्दा मांडू इच्छितो. याठिकाणी रहाता तालुक्यातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयासंबंधात उल्लेख करण्यात आला होता, पण त्यावेळी आपण उपस्थित नव्हता. म्हणून मी पुन्हा उल्लेख करीत आहे. मला खूप वेदना होत आहेत. मी मुंबईतील वेधशाळेच्या संदर्भात नियम 93 अन्वये सूचना दिली होती, ती आपण स्किकृत देखील केली. पण 10 एप्रिल रोजी नियम 93 अन्वये दिलेली सूचना स्विकृत झ ााली, परंतु आजपर्यंत त्याबाबतीत निवेदन झालेले नाही ही दुर्दैवाची गोष्ट आहे. मुंबईच्या वेधशाळेमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी करण्यासाठी तेथील कर्मचाऱ्यांनी पुढाकार घेतला. त्यादिवशी छत्रपती शिवजी महाराजांच्या फोटोला फक्त एक पुष्पहार अर्पण करावयाचा होता. सुरुवातीला यासाठी तेथील अधिकाऱ्यांनी तोंडी परवानगी दिली. परंतु नंतर असे सांगितले की, शिवाजी महाराज कोण आहेत ? आम्ही त्यांना ओळखत नाही. हे पॉलीटिकल आहे. आम्ही यांना ओळखत नाही आणि संबंधित अधिकारी या कार्यक्रमासाठी आले नाहीत. त्यानंतर 14 एप्रिल रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्याचे ठरविण्यात आले. त्यादिवशी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या फोटोला पुष्पहार घालण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यास बोलाविण्यात आले, तेव्हा सुध्दा तो अधिकारी आला नाही. त्यावेळी असे सांगण्यात आले की, मी त्यांना ओळखत नाही. इतका बेगुमान अधिकार आहे आणि हा विभाग केंद्र शासनाच्या अखत्यारितील असला तरी संबंधितांना सोडू नये. म्हातारी मेल्याचे दुःख नाही, पण काळ सोकावत आहे. जर एखादा अधिकारी महाराष्ट्राच्या अस्मितेला धक्का लावण्याचा प्रयत्न करीत असेल तर ते योग्य नाही. आपण जेम्स् लेनच्या बाबतीतही एक भूमिका घेतली होती.संबंधितांना एवढेच कळवावे की, महाराष्ट्राच्या अस्मितेला धक्का लावण्याचे पाप करु नका.दक्षिणेतील कोणीतरी विरभद्र नावाचा

. . . .4 सी-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत . . . .

दळभद्री माणूस आहे. शिवाय तेथील कर्मचारी छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करतात, म्हणून त्यांच्यावर कारवाई करीत आहे. आपण याबाबतीत तातडीने लक्ष घालावे अशी मी माननीय गृहमंत्र्यांना विनंती करतो.

सभापती महोदय, मी पाच मिनिटामध्ये मोजून पाच मुद्दे मांडलेले आहेत. शेवटचा एकच मुद्दा मांडावयाचा आहे. याठिकाणी सर्व सन्माननीय सदस्यांनी चिअर्स गर्ल्स्बद्दल मुद्दा मांडला आहे की, हा प्रकार बंद करावा. ठीक आहे. मी त्याच्या पलिकडे जाऊन सूचना करु इच्छितो. मुंबईचे कमिशनर यांनी कायद्याने यांना परवानगी दिलेली आहे. कदाचित आपल्याला माहिती नसेल. म्हणून डी.वाय.पाटील यांच्या स्टेडिअमवर क्रिकेटची मॅच होणार आहे, तेथे त्यांचा डान्स होणार आहे. आपले म्हणणे आहे की, संस्कृतीचा प्रश्न असेल, ठीक आहे. तुम्ही मुंबईमध्ये करा, महाराष्ट्रामध्ये करा. मी माझ्या सहकाऱ्यांना देखील विचारले की, यातून काय होणार आहे ? मद्रासमध्ये मॅच झाली तर तेथे हा डान्स होणार. मग तो संपूर्ण देशामध्ये दिसणार आहे. आमच्या राज्यामध्ये बंद झाला तरी काय फरक पडतो ? मूळ मुद्दा असा आहे की, फरक पडला पाहिजे. माझी सूचना अशी आहे की, चिअर्स गर्ल्स्चा नाच ठेवा. मग आमची जी संस्कृती आहे, त्यानुसार नाच ठेवा. लावण्या ठेवा, वारकरी नृत्य ठेवा. तेथील मुली आणून त्यांना पूर्ण पोशाखामध्ये नाचवा. असे केले तर चालेल. म्हणून आपण यादृष्टीने प्रयत्न करावेत. नुसते चिअर्स गर्ल्स्चा नाच बंद करा हे सांगणे सोपे आहे. पण असे सांगून टी.व्ही.वरील हा नाच बंद होणार नाही. आपण याबाबतीत केंद्र शासना कडे देखील मुद्दा मांडावा अशी विनंती करतो. सभापती महोदय, आपण मला बोलण्यासाठी संधी दिली त्याबद्दल आपल्याला धन्यवाद देतो आणि माझे भाषण संपवितो.

----

. . . .4 सी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



APR/ SBT/ MMP/ 17:40

श्री.संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, याठिकाणी झालेल्या चर्चेमध्ये जे मुद्दे मांडण्यात आलेले नाहीत, तेवढेच मांडणार आहे.

सभापती महोदय, मुंबईजवळ ठाणे जिल्हा आहे आणि तेथे जमिनीच्या बाबतीत प्रचंड प्रमाणात गुन्हेगारी होत आहे. ठाणे महानगरपालिकेच्या आयुक्तांनी देखील स्टेटमेंट केलेले आहे की, अनधिकृत बांधकामांमध्ये माफिया गुंतलेले आहेत. त्यामुळे तेथे गुन्हेगारीचे प्रमाण टोकाला गेलेले आहेत. यासंबंधात शासन नेमकी कोणती भूमिका घेणार आहे ? याबाबतीत कोणती ठोस कारवाई करणार आहे ? जर आयुक्तांनी, जबाबदार अधिकाऱ्यांनी याबाबतीत स्टेटमेंट केले असेल तर त्याबाबतीत माहिती घेऊन शासनाने कारवाई करावयास पाहिजे असे मला वाटते.

सभापती महोदय, दुसरी बाब म्हणजे ठाणे जिल्हयामध्ये सगळीकडे घरफोडया, चोऱ्या, दरोडयांचे प्रकार घडत आहेत. मी याबाबतीत महाराष्ट्रातील, ठाणे जिल्हयतील आकडेवारी देत नाही. राज्यातील एकही शहर शिल्लक राहिलेले नाही, ज्या ठिकाणी चोऱ्या झालेल्या नाहीत, दरोडे पडलेले नाहीत, घरफोडीचे प्रकार झालेले नाहीत. परंतु लोकांच्या काळजीचा विषय असा आहे की, हे चोर, दरोडेखोर सापडत नाहीत. याबाबत शासन नेमकी भूमिका घेणार आहे ?

सभापती महोदय, तिसरा मुद्दा बांगला देशी नागरिकांच्या बाबतीत आहे. रोज वर्तमान पत्रामध्ये बातम्या येत असतात.

यानंतर कु.गायकवाड . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर ..

ठाणे जिल्हयामध्ये बऱ्याच ठिकाणी बांगला देशीय नागरिक राहत असल्याचे आढळून आले आहे. कधी भायंदर, मिरा रोड व कोकणच्या किनारपट्टीवर देखील ते वास्तव्य करीत असल्याचे दिसून येत आहे. बांगलादेशीय नागरिक आपल्या राज्यामध्ये मोठया प्रमाणात राहत आहेत त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात येणार आहे ? जे लोक अवैधपणे राहत आहेत. त्यांच्यावर कोंबींग ऑपरेशन करणार आहे काय ?

मी आणखी एक शेवटचा मुद्दा मांडू इच्छितो की, रत्नागिरी येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारातील रजिस्टारच्या कार्यालयातून देखील सव्वा लाख रुपये चोरी झालेले आहेत. कॉलेज, शाळेमधून चोरी झालेली आहे. पाच दिवसांमध्ये पाच ठिकाणी चोऱ्या झालेल्या आहेत. परंतु एकही गुन्हेगार सापडलेला नाही. चोऱ्या, घरफोडया हा अतिशय चिंतेचा विषय आहे. त्यामुळे या संबंधी ठोस कारवाई केली जावी अशा प्रकारची मी मागणी करतो.

**सभापती** : आता मी दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, आता आपण हा विषय थांबवून आपण माननीय गृह मंत्र्यांच्या उत्तराच्या भाषणास सुरुवात करु द्यावी.

श्री. अरविंद सावंत : आम्हाला बोलण्याची संधी द्यावी.

**सभापती** : मी आता कोणालाच बोलण्याची परवानगी देणार नाही.

श्री. राम पंडागळे : आपण माझे ऐका.

**सभापती** : अशा प्रकारे बोलण्याची ही पद्धत मला या सभागृहामध्ये चालणार नाही. माझे ऐका या पद्धतीने आपण बाहेर बोलावे.

श्री. राम पंडागळे : या पद्धतीने आपणही बोलू नका.

( अनेक सन्माननीय सदस्य बोलतात. )

श्री. विनोद तावडे : अशापद्धतीचे बोलणे आम्ही सहन करणार नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी माफी मागितली पाहिजे.

श्री. विनोद तावडे : हा सभापतींचा अवमान आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. राम पंडागळे हे या पूर्वी विधानसभेमध्ये होते. त्यामुळे त्यांनी सभागृहाचा अपमान करणे योग्य होणार नाही. आपण सभागृहामध्ये दिलगिरी व्यक्त केली पाहिजे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राम पंडागळे : मी आपल्याकडे हात केला म्हणजे मी आपल्याकडे मार्क केला नाही. मी विनंतीसाठी हात केला होता. माझी विनंती आपण ऐकावी तरी देखील आपला अवमान हेत असेल तर मी येथे दिलगिरी व्यक्त करतो. तरीसुध्दा आपण माझे म्हणणे ऐकून घ्यावे..

**सभापती** : मी आपल्याला बोलण्याची परवानगी दिलेली नाही.

श्री. राम पंडागळे : सभापती महोदय, आपण माझे म्हणणे ऐकून घ्यावे.

श्री. विनोद तावडे : सन्माननीय सदस्यांनी आव्हान दिले आहे. आव्हानाची भाषा या सभागृहात चालत नाही.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. राम पंडागळे हे यापूर्वी विधानसभेमध्ये देखील होते. सभागृहाचा डेकोरम कसा ठेवता येईल पीठासीन अधिकाऱ्यांशी बोलताना काही पद्धती आहेत. त्यामुळे मी त्यांना सांगणे काही बरोबर नाही. सभागृहामध्ये बोलण्याकरिता आपण विनंती करा. मी आता बोलण्याकरिता कोणालाही परवानगी देणार नाही असे सांगितले आहे त्यामुळे आपल्यालाही आता बोलता येणार नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : त्यांनी दिलगिरी व्यक्त केली पाहिजे.

श्री. आर.आर. पाटील : त्यांनी आताच दिलगिरी व्यक्त केलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. राम पंडागळे या सदनामध्ये नवीन आहेत. ते या पूर्वीही विधानसभेमध्ये होते ही गोष्ट खरी आहे. परंतु मध्यंतरी फार मोठा गॅप पडला आहे.

यानंतर श्री. बरवड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील .....

त्यामुळे कदाचित बाहेर फिल्डवर मोर्चामध्ये त्यांना मधल्या काळामध्ये जास्तीचे काम करावे लागले. बाहेर रस्त्यावरच्या लागलेल्या सवयी बदलण्यास आणि सदनामधील सवयी लागण्यास थोडा वेळ लागेल. त्यांचे नवेपण लक्षात घ्यावे. त्यांनी दिलगिरी व्यक्त केलेली आहे. मला एका गोष्टीचा आनंद होतो की, आपला अवमान होत असेल तर आपल्या रक्षणासाठी पूढची बाजू एवढ्या तावाने धावून आली. आज सकाळी आपली सभापतीपदी निवड होत असताना स्वत: माननीय विरोधी पक्ष नेते आपले सूचक होते आणि आज आपला अवमान होत असताना इतके सगळे सन्माननीय सदस्य धावून आले. आपल्या बाबतीत त्यांची भूमिका भविष्यामध्ये सुध्दा अशीच राहावी अशी मी विनंती करतो. जो प्रकार पाच दहा मिनिटे या सदनामध्ये झाला त्याबद्दल मी सदनाचा नेता म्हणून दिलगिरी व्यक्त करतो आणि आपण पुढचे कामकाज सुरु करावे अशी विनंती करतो.

( काही सन्माननीय सदस्य बोलण्याची परवानगी मागतात )

**सभापती** : आता मी कोणाही सदस्यास बोलण्याची परवानगी देणार नाही. आता माननीय उपमुख्यमंत्र्यांनी उत्तराच्या भाषणाला सुरुवात करावी.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MMP/

श्री. आर. आर. पाटील ( उपमुख्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी या राज्यातील कायदा व सुव्यवस्थेबद्दल या सदनामध्ये चर्चा उपस्थित केलेली आहे. अनेक प्रश्नांच्या निमित्ताने, लक्षवेधी सूचनांच्या निमित्ताने गृह खात्यावर, कायदा व सुव्यवस्थेवर चर्चा झालेलीच आहे, असे असले तरी सुध्दा सात आठवड्यांच्या अधिवेशनामध्ये कायदा व सुव्यवस्थेवर जर चर्चा झ ाली नसती तर ते योग्य झाले नसते. विधानसभा सभागृहात तर राज्यातील कायदा व सुव्यवस्थेवर सविस्तरपणे चर्चा झालेली आहे. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी या चर्चेच्या माध्यमातून अनेक प्रश्न उपस्थित केलेले आहेत. मी नेहमी आकडेवारीचा आधार घेऊन बोलतो परंतु आज सगळे आकडे पुन्हा पुन्हा सांगण्याची आवश्यकता नाही. कारण ती आकडेवारी विधानसभा सभागृहामध्ये मी सांगितलेली आहे आणि अनेक वर्तमानपत्रांमध्ये ती छापून आलेली आहे. एका गोष्टीचे मला समाधान आहे की, गेल्या वर्षीच्या तुलनेमध्ये या वर्षी दरोडे रोखण्यात महाराष्ट्राच्या पोलीस दलाला पूर्णपणे चांगले यश मिळाले आहे. अनेक ठिकाणी दरोडेखोरांना आपण जेरबंद केले आहे. राज्यामध्ये मागील तीन महिन्यांमध्ये जेवढे दरोडे पडले त्यांचे डिटेक्शन 84 टक्के झाले आहे. देशात हे प्रमाण सर्वात जास्त आहे. हे करीत असताना मध्य प्रदेशमधील काही आरोपींना आपल्याला पकडावे लागले. गुजरातमधील काही आरोपीना आपल्याला पकडावे लागले. तसेच थेट उत्तर प्रदेशमधून येऊन त्या लोकांनी या ठिकाणी काही दरोडे घातले आणि रेल्वेने निघून गेले. परंतु तिथपर्यंत महाराष्ट्राचे पोलीस दल पोहचू शकले. जनतेच्या जीविताचे आणि मालमत्तेचे रक्षण करणे ही पोलिसांची जबाबदारी आहे. गेल्या वर्षी आपल्या पोलीस दलाचा पिच्छा या दरोडेखोरांनी पुरविला होता. खूप काम करावे लागले. जवळजवळ 21 पोलीस या कामासाठी तैनात केले होते. खबऱ्यांनी माहिती दिली. मुद्देमाल मोठ्या प्रमाणावर जप्त झाला आहे. या राज्यामध्ये जीविताचे आणि मालमत्तेचे रक्षण करण्यामध्ये पोलीस दल सक्षम आहे ही गोष्ट पोलिसांनी कृतीने सिध्द केलेली आहे.

सभापती महोदय, केवळ पोलिसांनी किती काम केले हे मोजण्याची कोणतीही पध्दती नाही. गुन्हे किती घडले यावरुनही पोलिसांच्या कामाचे मूल्यमापन होऊ शकणार नाही. महाराष्ट्रामध्ये दरवर्षी साधारणतः 2600 खून होत आहेत. ज्यावेळी मी अन्य राज्यांमध्ये किती खून होत आहेत हे

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MMP/

श्री. आर. आर. पाटील ......

पाहिले त्यावेळी 2600 हा आकडा मोठा असला तरी देशामध्ये 8 राज्ये अशी आहेत की, ज्या ठिकाणी दरवर्षी खुनांची संख्या महाराष्ट्रापेक्षा अधिक आहे. खुनाचा तपास करणे, त्यांना कोर्टासमोर उभे करणे हेच काम पोलीस करु शकत असतात. परंतु भावाभावामधील भांडणे असतील. वडील आणि मुलाचे भांडण असेल यामध्ये प्रत्येक नागरिकाला आपण एक संरक्षक दिलेला नाही. अनेक ताणतणाव निर्माण होत असतात. बेकारीचा प्रश्न आहे, गरिबीचा प्रश्न आहे. बदलत निघालेली समाजव्यवस्था, घरातील बदलत असलेली परिस्थिती आणि छोट्या छोट्या वादातून असे खून राज्यामध्ये होत आहेत. यासाठी जे सामाजिक दोष आहेत, जे आर्थिक दोष आहेत त्यासाठी आपण पोलिसांना जबाबदार धरावयास लागलो तर

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.....

सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांना मी सांगू इच्छितो की, रोग रेडयाला आणि औषध पखाल्याला असे होईल. समाजव्यवस्थेतील दोष दूर करण्याची जबाबदारी पोलिसांवर टाकून उपयोगाचे होणार नाही. किंबहुना, ती टाकताही येणार नाही. जे सामाजिक दोष आहेत ते समाजकारण्यांनी दूर केले पाहिजेत, जे आर्थिक दोष निर्माण झालेले आहेत, गरीब आणि श्रीमंतांमध्ये अंतर वाढत चालले आहे ते तुम्ही आणि आम्ही राजकारण्यांनी कमी केले पाहिजे. आज सांस्कृतिक अतिक्रमणे होत आहेत आणि त्याचाही परिणाम एकंदरीत समाज मनावर होतो. हया सर्व गोष्टी विचारात घेतल्या तर अन्य राज्यांच्या तुलनेमध्ये महाराष्ट्र कसा आहे हे आपण बारकाईने बघावे. महाराष्ट्रात दंगे धोपे असते, महाराष्ट्रात कायदा व सुव्यवस्था चांगली नसती, महाराष्ट्रामध्ये लोकांच्या जीविताची हमी नाही असे वातावरण असते तर आज देशामध्ये अन्य कोणत्याही राज्यापेक्षा महाराष्ट्रात गुंतवणुकीचे प्रस्ताव आले नसते. एका बाजूला राज्यात जास्तीची गुंतवणूक होत आहे. त्याचबरोबर मायग्रेट्स होऊन जगातून, देशातील अन्य राज्यातून आलेले लोक महाराष्ट्र राज्याला प्राथम्यक्रम देत आहेत. अन्य राज्यातून मोठया संख्येने लोक महाराष्ट्रात येत आहेत. या राज्यात कायदा व सुव्यवस्था चांगली नसती, चांगले वातावरण नसते तर अन्य राज्यातून लोक येथे आले असते का ? भांडवलदारांनी आपले भांडवल आगीत ओतण्याचे धाडस दाखविले असते काय ? आपल्या राज्यातील कायदा व सुव्यवस्थेवर राजकीय अभिनिवेशातून आपण टीका करीत असतो, त्यात कोठे त्रुटी आहेत त्या दाखवित असतो. त्या दाखविण्याचे काम विरोधी पक्षाचे आहे. परंतु नाराज व्हावे अशी राज्यातील कायदा व सुव्यवस्थेची स्थिती नाही. देशामध्ये गुन्हेगारीमध्ये महाराष्ट्राचा खालचा क्रमांक आहे. राज्यात होत असलेल्या गुन्हयाबद्दल पोलिसांना जबाबदार धरता येणार नाही. तसेच महाराष्ट्र शांत आहे त्याचे श्रेय सुध्दा मी पोलिसांना देऊ इच्छित नाही. महाराष्ट्राची सामाजिक जडणघडण वेगळी आहे. लोकांवर चांगले संस्कार झालेले आहेत. लोक शांतताप्रिय आहेत. त्यामुळे कायद्याचे पालन केले पाहिजे अशी जाणीव त्यांच्यात आहे. त्यामध्ये पोलीसही थोडेसे काम करीत असल्यामुळे महाराष्ट्रात कायदा व सुव्यवस्था विस्कटली असा अर्थ काढू नये अशी मी माननीय विरोधी पक्ष नेत्यांना विनंती करतो. एवढया मोठया महाराष्ट्रामध्ये कोठे

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ SBT/

श्री.आर.आर.पाटील....

चोरीच होणार नाही, कोठे दरोडाच पडणार नाही, कोठे एखादी दंगल होणार नाही असा अर्थ कोणाला कसा काढता येईल ? समाजामध्ये चांगल्यांची व वाईटांची लढाई ही केवळ आजच चालू आहे, ही लढाई यापूर्वी नव्हती अशातील भाग नाही. आपण जे रामराज्य स्थापन करु पाहता त्या रामराज्यामध्ये रावणी प्रवृत्ती होत्या आणि रावणही होता. चांगले आणि वाईट हे नेहमी समाजामध्ये असते, यातील संघर्ष नेहमीच सुरु आहे. परंतु त्यासमोर मान न तुकवता वाईटाच्या लढाईसाठी सिध्द राहणे हे ज्या समाजव्यवस्थेमध्ये तत्व शाबूत असते ती समाजव्यवस्था निश्चितपणे चांगली असते. मी विनम्रपणे सन्माननीय सदस्यांच्या लक्षात आणून देऊ इच्छितो. काही सन्माननीय सदस्यांनी असा उल्लेख केला की, आज देशातील काही राज्यांमध्ये नक्षल चळवळ वाढत चालली आहे. परंतु ही नक्षल चळवळ रोखण्यासाठी सर्वाधिक चांगले यश जर कोणत्या पोलीस दलाला मिळाले असेल तर ते महाराष्ट्राच्या पोलीस दलाला मिळाले आहे. जर आपल्या पोलीस दलावर भ्रष्टाचाराचे, जातीयवादाचे शिक्के चिकटवावयास लागलो तर अहोरात्र गडचिरोलीच्या डोंगर कपा-यावर उभे असणा-या जवानांवर अन्याय होईल. वेळ प्रसंगी राज्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी, लोकांच्या जीविताचे, मालमत्तेचे रक्षण व्हावे म्हणून प्राण देण्यासाठी जो जवान तयार आहे, त्यातील अनेकांनी हौतात्म्य पत्करले आहे त्यांच्यावर सुध्दा अन्याय होईल. कोणत्याही संघटनेमध्ये सगळेच चांगले आणि सगळेच वाईट नसतात. शेवटी या पोलीस दलातील जवान कोठून आले आहेत ? हे लोक आपल्या समाजव्यवस्थेतील गुणदोषासह या दलात आलेले आहेत. जर समाजामध्येच दोष असतील तर थोडासा दोष, थोडयाशा चुका, थोडयाशा त्रुटी या दलामध्ये राहण्याची शक्यता मी बिलकूल नाकारत नाही. पण इतकी टीका करावी एवढे राज्यातील पोलीस दल वाईट आहे काय ? एवढे मी विनम्रपणे सांगेन की, आज महाराष्ट्र सरकारच्या सेवेमध्ये जेवढया शाखा आहेत, खाती आहेत यामध्ये कमी पगार घेऊन सर्वाधिक राबणारी यंत्रणा जर कोणती असेल तर ती पोलीस यंत्रणा आहे. त्यांना 3 महिन्यात एकही सुट्टी मिळत नाही. दिवसाचे 14 तास काम करावे लागते.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 18:00

(श्री. आर.आर.पाटील...

राहायला घरे नाहीत, पगार कमी आहे, मुलांच्या शिक्षणाचे प्रश्न आहेत, घरा पासून बाहेर रहावे लागते. एसआरपीएफमध्ये काम करणा-या जवानाना वर्षातून 140 दिवस घराच्या बाहेर रहावे लागते. त्यांचे सामाजिक आणि मानसिक स्वास्थ्य टिकवायचे असेल तर त्यांना 140 दिवस घराबाहेर काम दिले जाऊ नये हे जगभरातील सैनदलाने मान्य केलेले आहे. आज आपल्या एसआरपीएफ मधील जवानांना वर्षातील 210 दिवस कुठे दंगल होईल तेथे तर कुठे अतिरेक्यांच्या मागे रहावे लागते. तरी सुध्दा हे जवान धैयाने लढतात, चांगले काम करतात. एका बाजूला चांगले काम करुन आपल्या राज्यासाठी हौतात्म्य पत्करणारी खूप मोठी फौज आपल्या राज्यामध्ये आहे. आता पोलीस दल आपण जसे बघतो तसे दिसते. भिवंडीत थोडीशी दंगल झाली, 2 अल्पसंख्यांक मारले गेले त्यावेळी पोलिसांवर ते हिंदुत्ववादी आहेत असा शिक्का मारला गेला. पोलीस हिंदूंची बाजू घेतात कारण मयत झालेले मुस्मिल असतात. चोपड्याला दंगल झाली त्यावेळी 2 हिंदू मारले गेले. त्यावेळी पोलिसांवर मुस्लिमधार्जिणे म्हणून आरोप केले गेले. पोलीस दल एकच आहे. भिवंडीमध्ये त्या दलाला हिंदुधार्जिणे म्हटले जाते तर चोपड्यामध्ये मुस्लिमधार्जिणे म्हटले जाते. पण पोलीस पोलिसांचे काम करतात.

सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर आणि सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांची आजची भाषणे बघितली तर ती कॅसेट भोवती फिरताना दिसली. ह्या कॅसेट आता नको तितक्या वाजतील. जसजशा निवडणुका जवळ यायला लागल्या तसतशा काही कॅसेट वाजायला सुरुवात झाली. आज राज्यामध्ये ज्या तीन-चार ठिकाणाहून प्रतिक्रिया उमटल्या त्या भविष्यातील निवडणुकांची नांदी आहे असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. ही नांदी लक्षात घेऊन पोलिसांना सतर्क राहाण्याच्या सूचना दिलेल्या आहेत...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, रेकॉर्डवर चुकीचे येऊ नये म्हणून मी सांगू इच्छितो की, सन्माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील यांनी, आता कॅसेट वाजायला लागतील कारण ही भविष्यातील निवडणुकांची नांदी आहे, अशा प्रकारचे जे व्यक्तव्य केले ते निखालस असत्य आहे. मला वाटते गृह खात्याच्या अधिका-यांनी त्यांना चुकीची माहिती दिली असावी म्हणून

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. आर.आर.पाटील....)

कदाचित ते असे बोलले असावेत. लग्नाच्या वरातीमध्ये ती कॅसेट वाजविण्यात आली होती. तेथे कोणत्या पक्षाची मिरवणूक नव्हती की मोर्चा नव्हता. दंगलीचा उल्लेख करण्यात आला. त्यामध्ये 4 माणसे मारली गेली आणि भोसकाभोसकीमध्ये 9 माणसे जखमी होऊन ती हॉस्पिटलमध्ये आहेत. विरोधी पक्षाचा तो कार्यक्रम नव्हता..

श्री. आर.आर.पाटील : माहिती घेऊन आम्ही ॲनलिसिस करायला लागलो आहोत. आपल्या राज्यामध्ये काही अन्य नेते येऊन गेले आणि त्यांनी मिटींग्स् घेतल्या. त्यानंतरच्या काही काळामध्ये हिंदू आणि मुस्लिमामधील तक्रारी वाढलेल्या दिसतात. गुण्यागोविंदाने एकत्र राहाणारी गावे, त्यातले वेगवेगळे समाज एकमेकांसमोर उभे टाकलेले दिसतात. त्यांना भडकविण्याचे काम कोण करते याच्या खोलात गेल्या शिवाय मी आणि पोलीस दल स्वस्थ बसणार नाही. समाजासमाजामध्ये तेढ निर्माण करणा-या, जाती-जातीत भांडणे लावणा-या, धर्मा-धर्मामध्ये संघर्ष पेटविणा-या ज्या शक्ती आहेत, गरिबांची घरे जळली तरी चालतील पण राजकीय पोळया भाजल्या पाहिजेत अशा विचारधारणेने जे लोक वागत आहेत त्यांना निश्चितपणे उघडे करण्याचे काम येत्या काही दिवसामध्ये केले जाईल. यामध्ये मी कुणा ऐकाला दोष देत नाही. पण तरी सुध्दा या गोष्टी होत आहेत. कॅसेटच्या संदर्भात या ठिकाणी वारंवार विचारणा करण्यात आली. ही गोष्ट खरी आहे की, या कॅसेटच्या संदर्भात स्थानिक अधिका-यांनी तेथील परिस्थिती लक्षात घेऊन निर्बंध आणलेले आहेत आणि तसे अधिकार त्या अधिका-यांना आहेत. "मंदिर वहि बनायेंगे" या कॅसेटवर राज्य सरकारने कुठेही बंधन आणले नाही. पण याची व्हिडिओ कॅसेट आहे.आतापर्यन्त पोलीस दलाला जी माहिती प्राप्त झालेली आहे. ती कॅसेट सेन्सॉर करुन घ्यायला पाहिजे होती, प्रमाणपत्र घ्यायला पाहिजे होते. ते प्रमाणपत्र घेतले नसेल, नियमाप्रयमाणे, कायद्याप्रमाणे केले नसेल तर बंदी आणण्याचा अधिकार राज्य सरकारला आहे, पोलिसांना त्या पॉवर्स आहेत हे सन्माननीय सदस्यही समजू शकतात.

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील...

ज्या कॅसेटला प्रमाणपत्र दिलेले नाही, अशा प्रकारच्या कॅसेटसाठी ज्या परवानग्या घेणे आवश्यक आहे. या व्ही.डी.ओ. कॅसेटच्या बाबतीत प्रमाणपत्र आणि परवानग्या घेतलेल्या नसतील तसेच सदर कॅसेट तयार करताना कायद्याचे पालन केले नसेल तर निंबंध आणण्याची भूमिका शासनाच्या माध्यमातून घेतली जाईल. ही कॅसेट तयार करताना कायद्याचे पालन केले गेले असेल तर राज्य सरकारला हस्तक्षेप करण्याचा काडीमात्र अधिकार नाही आणि तशी राज्य शासनाची इच्छा देखील नाही. कुठे तरी वाजविलेल्या कॅसेटवरुन दंगली व्हाव्यात, लोक मृत्यूमुखी पडावेत ही बाब दोन्ही बाजुंनी समजून घेण्याची आवश्यकता आहे. कॅसेट वाजिविली जाते ही बाब किती गांभीर्याने घ्यावयाची हा एका बाजूने विचार केला पाहिजे. कॅसेट कोणत्या कार्यक्रमात वाजवावी हा ज्यांचा त्यांचा अधिकार असला तरी तारतम्य बाळगण्याची आवश्यकता आहे. आपल्या भावना दुस-याने दुखवू नये असे प्रत्येकाला वाटते. अशा वेळी दुस-यांच्या भावनांची देखील कदर करण्याची आवश्यकता आहे. रामाची मिरवणूक काढण्यास कोणाचा विरोध असण्याचे कारण नाही. मिरवणूक काढत असताना मशिदीवर गुलाल फेकलाच पाहिजे काय ? रावेर येथील मशिदीत गुलाल पडला नव्हता काय ? त्या समाजाच्या धार्मिक भावना का दुखावण्याचा प्रयत्न केला जातो ? मशिदीसमोर "मंदिर वही बनायेंगे " ही कॅसेट वाजविलीच पाहिजे काय? समाजाचे, राज्याचे, देशाचे आपण सगळे काही देणे लागतो की नाही ? सामाजिक स्वास्थ्य टिकविले पाहिजे किंवा नाही ? धर्माधर्मातील तेढ देशाला आणि राज्याला स्वस्त पडेल काय ? या गोष्टीचा सगळयांनी गांभीर्याने विचार केला पाहिजे. दोन्ही समाजातील गरीब माणसे भावनेच्या आहारी जाऊन अशा दंगलीमध्ये मारली जात आहेत. त्यांचे मुडदे पडता आहेत. ही गोष्ट या राज्याला न शोभणारी आहे. 21 व्या शतकात जात असताना डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या घटनेचे पावित्र्य सगळयांनी प्रामाणिकपणे पाळावयाचे ठरविले तर प्रत्येकाला आपल्या धर्माप्रमाणे वागण्याचा अधिकार आहे. धर्माचा प्रचार करण्याचा अधिकार आहे. परंतु आपल्याला धर्माप्रमाणे वागण्याचा हक्क आहे, तसा दुस-या धर्माला देखील त्यांच्या धर्माप्रमाणे वागण्याचा हक्क आहे. दोन्ही समाजांनी या बाबी समजून घेण्याची आवश्यकता आहे. काही ठिकाणी या बाबी समजून घेतल्या जात नाहीत. कधी तरी पोलिसांवर जातीयवादाचा, धार्मिकतेचा आरोप होतो. या बाबी समजून घेणे घेतल्या जात नाहीत म्हणून लहान लहान कारणांवरुन दंगली भडकता आहेत. अलिकडच्या काळात तीन,चार गावात

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील....

दंगली झाल्या. त्या दंगलीची कारणे पोलिसांनी शोधून काढली. ही कॅसेट आमच्या भावना भडकविण्यासाठी वाजविली जाते अशा पध्दतीच्या प्रतिक्रया पोलिसांसमोर आल्या आहेत. मंदिर कधी बांधावयाचे ? कुठे बांधावयाचे ? हा प्रश्न सुप्रीम कोर्टात प्रलंबीत आहे. अशा स्वरुपाच्या गीतांनी सुप्रीम कोर्टाचा अवमान होतो आहे किंवा नाही ही बाब सुध्दा तपासून घेण्याची आवश्यकता आहे. या सगळया गोष्टी आम्ही निश्चितपणे तपासू. या संदर्भात माझ्याकडून स्पष्टपणे उत्तर सन्माननीय सदस्यांनी मागितले आहे, त्याबाबतीत मी सांगू इच्छितो की, या कॅसेटवर राज्य सरकारने बंधन आणणेले नाही. या कॅसेटमुळे तीन, चार ठिकाणी दंगली झाल्याचे पोलिसांना आढळून आले आहे. सदर कॅसेटवर बंदी आणण्याच्या दृष्टीने राज्य सरकारला काही करता येते काय याचा गांभीर्याने विचार करण्यात येईल. ही एकच कॅसेट नाही, तर काही नेत्यांना काही गावांमध्ये भाषण करण्यास निर्बंध घालतो. भाषण स्वातंत्र्य हा त्याचा हक्क असतो. परंतु कायदा व सुव्यवस्था चांगली रहावी म्हणून त्यांना भाषण करण्यास निर्बंध घालतो. अशा वेळी त्या विभागात संचारबंदी करीत असतो. काही लोकांना जिल्हा बंदी करण्यात येते. काहींना जिल्हयाच्या बाहेर जावयास सांगण्याचे अधिकार शासनाला आहेत. या कॅसेटमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा संपूर्णपणे अभ्यास केला जाईल आणि नंतरच याबाबतचा निर्णय अंतिमत: घेतला जाईल. चोपडा येथे दंगल झाली, रावेर येथे दंगल झाली, त्या दंगलीची कारणे खूपच लहान आहेत. जणू काही सर्व साधनसामुग्रीसह दंगलीसाठी तयारीत असावेत अशा काही बाबी पोलिसांच्या निदर्शनास आल्या आहेत. हे समाजकंटक कोण आहेत ? सदर समाजकंटक लोकांना का भडकावीत आहेत ? अशा समाजकंटकावर लक्ष ठेवण्याचे काम यापुढच्या काळात पोलिसांना करावे लागणार आहे. तशा सूचना पोलीस विभागाला देण्यात आलेल्या आहेत. या राज्यात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आणि लोकांच्या मालमत्तेचे रक्षण करण्यासाठी शासनावर टोकाचे आरोप झाले तरी चालेल परंतु पोलीस दल निपक्षपातीपणाने वागेल आणि पोलिसांच्या हातात दिलेल्या शस्त्राचा वापर करण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली तर निर्भिडपणे शस्त्रांचा देखील वापर केला जाईल असे मी या ठिकाणी सांगतो. मी गृहमंत्री झाल्यानंतर सर्वात जास्त पोलीस अधिका-यांना निलंबित करण्याचे काम दुर्देवाने मला करावे लागले....

यानंतर श्री. कानडे....

अशुध्दित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील....

पण सभापती महोदय, जसे या अधिकाऱ्यांना निलंबित केले तसेच योग्य काम करणाऱ्या अधिकाऱ्यांची पाठराखण करण्याच्या बाबतीत शासन कमी पडले नाही. जातीय वादाच्या विरोधात योग्य पध्दतीने बळाचा वापर करताना जर या राज्याच्या व्यापक हिताच्या दृष्टीने कोणी पॉवर्स वापरल्या तर अशा अधिकाऱ्यांच्या पाठीशी आणि अशा पोलीस कर्मचाऱ्यांच्या पाठीशी ठामपणाने उभे राहण्याची राज्य सरकारची भूमिका आहे आणि भविष्यात या अधिकाऱ्यांच्या मागे शासन ताकदीने उभे राहील. भिडे गुरुजींच्या बाबतीत याठिकाणी मुद्दा उपस्थित करण्यात आला. मी वारंवार या सदनामध्ये सांगितलेले आहे आणि कालही सांगितलेले आहे की खरोखरच भिडे गुरुजी सद्‌गृहस्थ आहेत. तरुणांना छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र समजावून सांगून त्यांच्यामध्ये प्रेरणा निर्माण करण्याचे काम ते करीत आहेत. त्यांच्या अनेक कार्यक्रमांना मी उपस्थित राहतो. एका बाजूने ते अत्यंत चांगले आहेत. दुसऱ्या बाजूने अलिकडच्या काळात पोलीस अधीक्षकांनी घेतलेल्या भूमिका सुध्दा योग्य आहेत. वेगळया पध्दतीने त्यांना अटक करता आली असता का ? लाठीचार्ज टाळता आला असता काय ? या सगळया गोष्टींची आय.जी.पी.चौकशी करीत आहेत. त्यामुळे भिडे गुरुंजीवर झालेल्या लाठीचार्जचे मी कुठेही समर्थन केलेले नाही. पण सभापती महोदय, कधी कधी एखाद्या चांगल्या माणसाच्या बाबतीत अशी घटना घडते आणि समाजकंटक त्याचा अचूक फायदा उठवितात. मी सत्य सांगतो की, ज्यावेळी पोलीस अधिक्षकांनी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी हा लाठीचार्ज केला होता त्यावेळी वेश्याव्यवसाय चालविणाऱ्यांनी त्यांच्या गल्लीमध्ये, अवैध वाहतूक करणाऱ्यांनी हायवेवर म्हणजे ज्यांचा आणि भिडे गुरुजींचा काडीमात्र संबंध नव्हता अशा माणसांनी भिडे गुरुजींवर हल्ला झाला म्हणून आंदोलने सुरु केली आणि सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करायला सुरुवात केली. काही वेळेला अशी चांगली आंदोलने होतात त्यावेळी त्यामध्ये दुष्ट शक्ती सुध्दा उतरण्याची शक्यता असते. त्यामुळे आंदोलने करताना सुध्दा काळजी घेतली पाहिजे. हा प्रसंग घडला आहे त्याची चौकशी योग्य पध्दतीने होईल. पण तारतम्य बाळगले पाहिजे. प्रत्येक वेळी रस्त्यावरच आल्यावर न्याय मिळतो या भूमिकेतून जर आपण बाजू लावू लागलो तर त्यासाठी यंत्रणा लागेल. माझे स्टेटमेंट आहे की एसपी चांगले काम करीत आहेत. सभापती महोदय, विशेषत: राज्यातील प्रत्येक घटनेकडे आणि सांगली जिल्हयातील घटनेकडे माझे बारकाईने लक्ष

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील....

असते. मला आजपर्यंत जी माहिती मिळालेली आहे मी अगदी विद्यार्थी असल्यापासून आणि सामाजिक कार्यकर्ता झाल्यापासून भिडे गुरुजींबद्दल माझ्याकडे सगळे आदरानेच बोलतात. याबद्दल दुमत नाही. माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांच्याकडे जर काही वेगळी माहिती असेल तर ती त्यांनी द्यावी मी तपासून बघेन. पण निश्चितपणाने मला कुणाची स्तुती करण्याची आवश्यकता नाही आणि कोणावर टीका करण्याची आवश्यकता नाही. एसपी चांगले काम करीत आहेत हे मी रेकॉर्डवर आणले आहे. त्यांच्यावर अन्याय होता कामा नये. राहता तालुक्यामधील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयाबद्दल सर्वांनीच प्रश्न उपस्थित केला. यात मी स्वत: लक्ष घालीन. विखे-पाटील आणि पिंपाडा यांनी पुतळा आणून ठेवला होता. परंतु तोपर्यंत नगरपालिकेत सत्तांतर झाले. त्यानंतर आम्हांला याच्यापेक्षा मोठा पुतळा बसवायचा आहे आम्ही ऑर्डर दिलेली आहे अशी भूमिका सत्तेवर आलेल्या गटाने घेतली त्यामुळे एका गावात छत्रपतींच्या पुतळयावरुन वाद होऊ नये म्हणून थोडासा समन्वयाने काही मार्ग निघतो आहे काय हे मी स्वत: त्यात पुढाकार घेऊन पाहीन आणि माझी निश्चित खात्री आहे की, तो पुतळा बसविण्याच्या बाबतीत काही ना काही एक चांगला मार्ग काढला जाईल.

सभापती महोदय, सावकारीच्या बाबतीत माझा एक शब्द सगळयांनीच पाठ केला आहे. मी पुन्हा एकदा सांगतो की , कुठल्याही एखाद्या शब्दाचा शब्दश: अर्थ घ्यावयाचा असतो काय ? आता कोपरापासून ढोपरापर्यंत सोलून काढणे असे ग्रामीण भागामध्ये बोलले जाते.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील...........

आणि याची हिस्टरी अशी आहे की, मी आणि माननीय मुख्यमंत्र्यांनी राज्यातील सगळ्या खासदारांची एक बैठक बोलावली होती. विदर्भातील एका खासदारानी या बैठकीत सांगितले की, कर्ज आणि व्याज भरले नाही म्हणून एका सावकाराने कास्तकाराची बायको नेऊन आपल्या घरात ठेवली आहे. हे सगळ्या खासदारांच्या बैठकीमध्ये माननीय मुख्यमंत्र्यांसमोर आपल्या एका खासदारांनी सांगितले. बैठक चालू होती. पण मला राहवले नाही, म्हणून मी बाहेर आलो आणि एस.पी.ना फोन लावला. खासदारांनी अशी अशी तक्रार केली आहे असे त्यांना सांगितले. दुर्दैवाने मलाही वाईट वाटले. एस.पी.नी सांगितले की, या केसमध्ये तथ्य आहे आणि सावकाराने असे कृत्य केले आहे. त्यानंतर प्रेस कॉन्फरन्स होती. मी स्पष्टपणे बोलतो. वाईट किंवा अंगावर येणारे कधी बोलत नाही. मला पत्रकारांनी प्रश्न विचारला. त्यांनी चिडून नाराजीतून प्रश्न विचारला होता. अशा सावकारांबाबत आपण काय करणार आहात? माझ्या ठिकाणी दुसरा कोणताही माणूस असता तर यापेक्षा वेगळया शब्दात बोलला नसता. मी स्पष्ट सांगून टाकले. असे सावकार जर गोरगरिब कास्तकारांच्या बायका-मुलांपर्यंत त्यांची नजर जाणार असेल, त्यांची हिंमत होणार असेल तर त्यांना कोपरापासून ढोपरापर्यंत सोलून काढले जाईल. ग्रामीण भागात हा शब्दप्रयोग वापरला जातो. 'कोपरापासून ढोपरापर्यंत' हा शब्द माझ्याबद्दल इतका फिट्ट बसविला, जणूकाही याच भाषेत मी बोलतो. तो वेगळा प्रश्न होता. वेगळे वातावरण होते. त्यातून बोललो होतो. तुमचा प्रश्न वेगळा आहे. तुम्ही बोललात, या सावकारांबद्दल केले काय?

सभापती महोदय, मी विनम्रपणाने सांगतो. या देशातील कुठल्याही राज्याने केल्या नाहीत एवढ्या कारवाया महाराष्ट्र शासनाने सावकारांच्या विरोधात या राज्यात केल्या आहेत. महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये सावकारांच्या विरोधात जेवढ्या केसेस झाल्या तेवढ्या केसेस फक्त या दोन वर्षात झालेल्या आहेत. एका-एका सावकारावर कारवाई करताना कोणाचे फोन आले आणि कोणाचे प्रेशर आले तरी भीक न घालता 2100 सावकारांवर महाराष्ट्रात कारवाया केल्या आहेत. आपण ज्यांचे नाव घेतले त्यांच्यावर सुध्दा 35 केसेस दाखल झाल्या आहेत. दोन गोष्टी बघितल्या पाहिजेत. आज असलेले कायदे आणि पोलिसांच्या हातात असलेले अधिकार...........

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, गुन्हा रजिस्टर झाल्यानंतर एका महिना तुम्ही त्यांना मोकळे सोडले, अटक केली नाही. कर्तव्यदक्ष एस.पी. श्री.प्रसाद यांनी एक महिना मोकळे फिरु दिल्यामुळे त्यांनी अँटीसिपेटरी बेल घेतली.

श्री.आर.आर.पाटील : गुन्हे नोंद केलेले आहेत. चार्जशीट काही केसेसमध्ये दाखल केलेल्या आहेत. कोणाला अटक केली पाहिजे किंवा नको हा एक तर तपासी अधिकाऱ्याचा अधिकार असतो. बऱ्याच वेळेला अटकपूर्व जामीन मिळतो. तपासी अधिकाऱ्याला इच्छा असताना सुध्दा अटक करता येत नाही. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी एवढे तरी मान्य करावे. सत्ताधारी पक्षाचे एक कुटुंबीय यामध्ये असताना त्यांच्यावर सुध्दा केस दाखल करण्याचे धाडस पोलिसांनी दाखविले. 2100 सावकारांवर राज्यभरात कारवाया केलेल्या आहेत. केवळ केसेस करुन थांबलो असे नाही. आम्ही प्रयत्न केला की, सावकारांचे कंबरडे मोडायचे असेल तर त्यांनी ताब्यात घेतलेल्या कास्तकारांच्या जमिनी, त्यांनी केलेले व्यवहाराचे रजिस्ट्रेशन रद्द करुन जमिनी मूळ मालकांना परत देण्यात आल्या नाहीत तर सावकारांकडे तारण म्हणून जी मालमत्ता असेल ती त्यांच्याकडून काढून घेऊन ऋणकोला परत दिली पाहिजे. आज कायद्यात तशा कोणत्याही तरतुदी नाहीत. माझा व्यक्तिगत प्रयत्न होता. सरकारचा प्रयत्न होता. या सात आठवड्याच्या अधिवेशनात विधेयक आणायचे होते. सरकारने सगळी तयारी केली. कॅबिनेटने मान्यता दिली. परंतु केंद्र शासनाची मान्यता घ्यावी लागत असल्यामुळे एवढ्या कमी वेळात मान्यता मिळणे शक्य नसल्यामुळे या अधिवेशनात ते विधेयक आणू शकलो नाही. या कामासाठी लागले तर सन्माननीय सहकार मंत्री आणि मी स्वत: दिल्लीला जाऊ आणि या देशात कोणत्याही राज्याने न केलेल्या सावकारांच्या विरोधात कडक पावले उचलली जातील. जर कोणत्या माणसाने त्याची मूळ रक्कम आणि मध्यवर्ती बँकेच्या व्याज दराने व्याज परत केले तर त्याची असलेली इस्टेट, गहाण ठेवलेली मालमत्ता मूळ मालकाला परत केली पाहिजे.

(नंतर श्री.जुन्नरे........

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील.....

शासन ती परत घेऊन देऊ शकेल, रजिस्ट्रेशन केलेले असेल तर झालेले रजिस्ट्रेशन रद्द होईल, जमिनी मूळ मालकाच्या नावावर होतील या कायद्यातील दुरुस्ती आम्ही वटहुकूम काढून करु. लवकरात लवकर या कायद्याच्या अंमलबजावणी केली तर पोलिसांच्या हातामध्ये शक्ती प्राप्त होईल व आपल्याला अपेक्षित असलेल्या कारवाया पोलीस करु शकतील. आज केवळ दमदाटी केली एवढेच गुन्हे सावकारांविरुध्द आम्हाला नोंद करता येतात याच्या पलिकडचे गुन्हे नोंद करण्याचे कोणतेही अधिकार आजच्या प्रस्थापित कायद्या प्रमाणे पोलिसांना नाही. त्यामुळे या आरोपींना जामीन का मिळाला? हे आरोपी सुटले का? छोटे छोटे गुन्हे त्यांच्यावर लागत असल्यामुळे कडक आणि प्रभावी कायदा नसल्यामुळे सावकारांना आज पळवाटा मिळत आहेत. पण जो कायदा आम्ही करु त्याला रिट्रॉस्पेक्टीव्ह इफेक्ट देऊन मागील तारखेपासून हा कायदा लागू करुन काही सावकारांना गरीब कास्तकारांच्या मालमत्ता परतच कराव्या लागतील. सावकारांना स्वस्थ बसू दिले जाणार नाही ही गोष्ट मी या निमित्ताने सांगतो. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी सांगितले की, तुम्ही आमची एक सिस्टीम रद्द करीत शेतक-याला जर पैशाची गरज पडली तर त्याने जायचे कोठे? ज्यावेळी सावकारांवर कारवाया करण्यास सुरुवात केली त्यावेळी लोकांच्याच तक्रारी येण्यास सुरुवात झाली की, तुम्ही सावकारांची दारें बंद केली, बँका कर्ज देत नाहीत अशावेळी शेतक-याने पैशासाठी जायचे कोठे? यासंदर्भात मी स्वत:ही प्रयत्न केलेले असून माननीय कृषी मंत्री श्री.पवार साहेबांनी सुध्दा प्रयत्न केलेले आहेत. अगोदर देशभरातील शेतक-यांना 80 हजार कोटी रुपयांचा पुरवठा केला जात होता परंतु तो यावर्षी 2 लक्ष 10 हजार कोटी रुपये झालेला आहे. म्हणजे बँकानी तिप्पट फायनांस शेतीसाठी आणि शेतक-यांसाठी उपलब्ध करुन दिलेला आहे. यामध्ये अजून वाढ करावी लागली तर करु. सिस्टीम आम्ही रद्द करु इच्छित नाही. ग्रामीण भागातील शेतक-यांना आवश्यक असेल तर सावकार ठेवला जाईल परंतु त्याने नियमाप्रमाणे सावकारकी केली पाहिजे. मध्यवर्ती बँकेच्या व्याज दरापेक्षा अधिकचे व्याज घेतले नाही पाहिजे. सावकार जर आज बायकामुलांना उचलण्या इतपत मुजोर झाले असतील तर ही सीस्टीम मोडली तरी चालेल नव्हे, जाळली तरी चालेल अशा लोकांवर दया माया दाखवण्यामध्ये कोणताही अर्थ नाही. जे सावकार कोणतेही लायसन्स घेत नाहीत, जे 2100 सावकार आपण पकडलेले

...2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील.....

आहेत ते वर्षाला 60 टक्के व्याजाच्या आत व्याज घेत नव्हते अशाच सावकारांना आपण पकडलेले आहे. जे 2100 सावकार आपण जे पकडले आहेत ते 100 रुपयांला एक वर्षाला 60 रुपये किंवा त्यापेक्षा अधिकचे व्याज घेत होते. अशा लोकांवर कारवाई करणे आवश्यक होते. कारवाई, मोहिमा अजून थोडया तीव्र केल्या जातील. कायदा झाल्यानंतर चांगल्या पध्दतीचे निर्बंध येऊ शकतील.

सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी श्री. महादू दगडू ठाकरेंनी आत्महत्या का केली? चार महिने गुन्हा नोंद का केला नाही असा मुद्दा त्यांनी उपस्थित केलेले आहे. त्यामुळे आजच्या आज ही केस मी सीआयडीकडे वर्ग करीन आणि यासाठी खास अधिकारी सुध्दा नेमला जाईल. कोणी आत्महत्या कराव्यात, कोणी मरावे आणि त्याची साधी चौकशी सुध्दा होऊ नये ही गोष्ट मलाही मान्य नाही. एवढेच नव्हेतर पुरावे हातात असतांना तपास का केले गेले नाहीत याचीही माहिती चौकशीमध्ये घेतली जाईल. जर अधिकारी कोणाला पाठीशी घालतो आहे असे आढळून आले तर अशा अधिका-यावर सुध्दा कारवाई केली जाईल.

"सच्चर कमिटी"च्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी विचार मांडलेले आहेत. देशाने प्रगती केली असा दावा जर देशाला करावयाचा असेल तर एखादा समाज घटक, एखादा धार्मिक घटक पाठीमागे ठेवून देशाने प्रगती केली असा दावा आणि निष्कर्ष आपण काढू शकत नाही. प्रगती ही सर्वांची झाली पाहिजे. आता ही गोष्ट आकडेवारीनुसार पुढे आलेली आहे की, काही समाज दुबळे, मागासलेले आहेत ते पाठीमागे राहिलेले असून काही धार्मिक लोक शिक्षणामध्ये, नोक-यांमध्ये आणि आर्थिक क्षमतेतही पाठीमागे राहिलेले आहेत. त्यांनीही पुढे यावे अशा पध्दतीच्या भूमिका केंद्रस्तरावर आणि राज्यस्तरावर घेतल्या तर त्यामध्ये गैर काय? जे आर्थिक आणि शैक्षणिक दृष्टया अप्रगत आहेत त्यांना पाठीमागे ठेवून बाकीचे लोक काय स्वस्थ जीवन जगू शकतील? समाजामध्ये शांतता राहायची असेल तर सगळयांचीच प्रगती व्हायला हवी. त्यामुळे जे समाज घटक पाठीमागे राहिलेले आहेत त्यांच्या बाबतीत शासनाने जी भूमिका घेतलेली आहे ती भूमिका योग्यच आहे.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील ..

सभापती महोदय, सीमीच्या कारवाया वाढल्या आहेत असे सांगितले जाते. परंतु कोठे तरी एखादा तुरळक प्रकार त्यांच्याकडून घडत असतो. परंतु अलीकडच्या काळात व्यापक प्रमाणात सीमीच्या कारवाया महाराष्ट्रात आढळून आलेल्या नाहीत. ज्या ठिकाणी या कारवाया आढळून येतात त्यावर त्वरित कारवाई केली जाते. सीमी असो, लष्कर-ए-तोयबा असो वा अन्य अतिरेकी संघटना असो, ज्यावेळी महाराष्ट्राला उद्दिष्ट बनवून मुंबईवर हल्ला करण्याचा ते प्रयत्न करतात त्यावेळी अतिशय सतर्कतेने अतिरेकी लोकांच्या विरुध्दच्या कारवाया करण्याच्या भूमिका पार पाडण्यात पोलीस दल नेहमीच यशस्वी झालेले आहे. आपले अधिवेशन सुरु होण्यापूर्वी चार जणांना आरडीएक्ससह पकडण्यात आले होते. त्यांची पाळेमुळे खणून काढण्यात महाराष्ट्राचे पोलीस दल आणि त्याच्या विविध शाखा निश्चितपणे सक्षम आहेत. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकार रावते यांनी अनेक प्रश्न उपस्थित केलेले आहेत. त्यातील बीडमधील कोणत्या घटनेचा त्यांनी उल्लेख केला होता याबाबतीत त्यांनी पुन्हा सांगावे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, बीड येथे शिवजयंतीच्या निमित्ताने छत्रपती शिवाजी महाराजांची बरीचशी पोस्टर्स लावण्यात आली होती . त्यामध्ये अफजलखानाचा वध आणि शाहिस्तेखानाची बोटे तोडणे ही पोस्टर्स काढून टाकण्याच्या संदर्भात फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 च्या कलम 144 अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार श्री.प्रवीणकुमार धरमकर, उप विभागीय दंडाधिकारी, बीड आदेश करतो की, " अफजलखानाचा वध आणि शाहिस्तेखानाची बोटे छाटत असतांना शिवाजी महाराजांचे पोस्टर्स शिवाजी चौकात लावले असून सदर देखावे ऐतिहासिक स्वरुपाचे असले तरी सार्वजनिक ठिकाणी एक हिंदू राजा व मुस्लिम सरदारावर हल्ला करण्याचे दृश्य आहे त्यामुळे मुस्लिम समाजातील मुस्लिम बांधवाच्या भावना दुखावल्याची सध्या पोलीस स्टेशनच्या हद्दीत चर्चा चालू आहे..." दुस-या एका घटनेमध्ये नग्न मुलीची हत्या करण्यात आली असतांनाही संबंधितावर कारवाई केली जात नाही त्याचे कारण असे सांगण्यात येते की त्याबाबतीत कोणीही तक्रार दिली नाही. या प्रकरणात मात्र कोणत्याही मुस्लिम व्यक्तीची तक्रार नसतांना एक हिंदू राजा मुस्लिम सरदारावर हल्ला करीत असल्याचे पोस्टर लावल्यामुळे

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ...

मुस्लिमांच्या भावना दुखावल्या आहेत असे स्वत: ठरवून कारवाई केली आहे अशा प्रकारे कोणाच्या भावना दुखावल्या आहेत असे स्वत: ठरविले जात असेल तर ती कठीण गोष्ट आहे. हा इतिहास घडलेला आहे. त्यामध्ये गैर काहीही नाही अफजलखानाचा वध आणि शाहिस्तेखानाची बोटे तोडणे यासंबंधीची पोस्टर लावल्यामुळे भावना दुखावल्या आहेत असे स्वत: पोलिसांनी ठरविलेले आहे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितलेल्या घटनेची मी निश्चित माहिती घेईन. ते ऐतिहासिक सत्य आहे हे मी देखील मान्य करीन. आपल्या राज्याचा इतिहास पहिला असता छत्रपती शिवाजी महाराजांचा अपवाद सोडता अनेक मुस्लिम राजांनी हिदू राजांचा आपल्या देशामध्ये आणि आपल्या राज्यामध्ये पराभव केला आहे हे जसे खरे आहे तसेच त्याही गोष्टी खऱ्या आहेत. म्हणून तीच पोस्टर्स लावणे बरोबर नाही. एखादे म्युझियम तयार केले आणि त्यामध्ये जर इतिहास लिहिला असेल तर ते मी समजू शकतो ...........................

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझ्याकडे इतरही पोस्टर्स आहेत. ती पोस्टर्स मी आपल्याला दाखवतो. कोकणात आरमार उभारत असतानाचे एक पोस्टर आहे , तुकाराम महाराज आणि शिवाजीमहाराज यांचे एक पोस्टर आहे, दुसरे एक पोस्टर खिंडीतील आहे, आणखी एक पोस्टर रोहिडेश्वर येथे शपथ घेत असतांनाचे आहे, शिवगाथाचे एक पोस्टर आहे, त्याच प्रमाणे हत्तीची सोंड कापत असतांना एक पोस्टर आहे. अशा प्रकारे अनेक पोस्टर्स असतांना त्यातील फक्त ही दोन पोस्टर्स काढून टाका असे सांगण्यात आले होते. त्यामुळे ही दोन पोस्टर्स कोणाला तरी चिथावण्यासाठी लावली आहेत असे आपण म्हणत आहात परंतु तो विषयच नाही.

श्री.आर.आर.पाटील :सभापती महोदय, कोणाच्या भावना दुखावल्या नसतील आणि चिथावणीसाठी ही पोस्टर्स लावण्यात आली नसतील तर या संदर्भात योग्य ती भूमिका घेतली जाईल आणि या घटनेची सगळी माहिती मी घेईन.

श्री.विनोद तावडे : या मधून कोणाच्या भावना दुखावण्याचे कारण नाही.

श्री.आर.आर.पाटील : या संदर्भात माहिती घेईल असे मी सांगितलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांना मी विचारु इच्छितो की, जुन्या इतिहास काळातील एखाद्या हिंदू

..3..



VTG/ प्रथम श्री.जुन्नरे.. 18:25

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील .......

राजाचा, मुस्लिम राजाने केलेल्या पराभवाचे पोस्टर दारात आणून लावले तर पुढे काय होईल

श्री.विनोद तावडे : याचा अर्थ असा की,छत्रपती शिवाजी महाराजांनी अफजलखानाला मारले होते त्याचे पोस्टर जर लावण्यात आले तर या देशातील मुसलमांनाना राग आला पाहिजे? असे आपल्याला म्हणावयाचे आहे काय ?

श्री.आर.आर. पाटील : त्यांना राग यावयास नको . परंतु दोन्ही बाजूच्या लोकांना राग येतो .

श्री.विनोद तावडे : त्यांना राग येतो म्हणून आपण पोस्टर लावण्यावर बंदी घालणर आहात काय ?

श्री.आर.आर.पाटील : दोन्ही बाजूच्या लोकांना राग येत असल्यामुळे त्यातून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असतो.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : नामदार श्री.पवार यांनी सच्चरची बाजू घेतली त्याबद्दल मी बोललो नाही. खाली लोकांना आता असा मेसेज जाईल की, आता आपल्याला हेच काम आहे. ..

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री.रावते साहेबांना हे सांगू इच्छितो की, आपण सांगितलेल्या सगळ्या घटनांची मी स्वत: माहिती घेईन. म्हणून अशा प्रकारे ऐतिहासिक घटनांचा वापर करीत असताना कोणाच्या भावना, मग त्यात कोठल्या धर्माच्या, कोठल्या व्यक्तीच्या, कोठल्या समाजाच्या भावना दुखावल्या जाणार नाहीत... सामाजिक स्वास्थ्यासाठी अशा पद्धतीची भूमिका ...

श्री. दिवाकर रावते : माझी आपणाकडून एवढीच अपेक्षा आहे की, आपण असे ठणकावून या संदर्भात सांगितले पाहिजे की, हा शिवबांचा देश आहे, त्या देशामध्ये कोणालाही छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल अनादर, राग येता कामा नये. सभापती महोदय, पण आपण ज्या प्रकारे दोन्ही बाजू घेऊन बोलू लागलात तर त्यांना एक प्रकारे ऑब्जेक्शन घेण्याचा अधिकार प्राप्त होतो आहे....

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान करण्याचा अधिकार मी कोणालाही दिलेला नाही, देऊही शकत नाही. सभापती महोदय, या सगळ्या गोष्टी करीत असताना आज एका बाजूने मोठ्या प्रमाणात पोलीस कॉन्स्टेबल्सची भरती करण्यास आपण सुरूवात केली आहे. दरवर्षी 11 हजार पदे भरली जात आहेत. पण मध्यंतरी एमपीएससीमध्ये घोटाळा झाला त्यामुळे 3-4 वर्षे एमपीएससी बंद पडली. परिणामी आज मोठ्या प्रमाणात काही वरिष्ठ अधिकाऱ्यांची पदे देखील रिक्त आहेत. आपल्या राज्यात पीएसआयची 1857 पदे रिक्त आहेत, पीआयची 318 पदे रिक्त आहेत, डीवायएसपीची 78 पदे रिक्त आहेत, एस.पी.ची 31 पदे रिक्त आहेत. ही सगळी पदे भरून घेण्याच्या दृष्टीने एमपीएससी बरोबर लवकरात लवकर चर्चा केली जाईल. सभापती महोदय, प्रस्तावाचे उत्तर न देता मी भाषाण संपविले तर मी कोणाला तरी वाचवितो आहे आणि काही तरी लपवितो आहे असा त्याचा अर्थ होईल. सभापती महोदय, राज्य शासनाला काहीही लपवायचे नव्हते म्हणूनच चतुर्वेदी बिल्डरची केस सीआयडीला देण्यात आली होती. कोणाला वाचवायचे असते, कोणाला पाठीशी घालायचे असते तर ही केस सीआयडीकडे दिली गेली नसती. याचा स्पष्ट अर्थ आहे की, राज्य सरकारच्या हेतूबद्दल कोणीही गैरविश्वास दाखविण्यात अर्थ नाही. या संबंधातील सीआयडीचा पहिला अहवाल आमच्याकडे आला त्यात

...... 4एम 2 ...

श्री. आर.आर.पाटील ....

अनुक्रमांक 1 ते 13 लोकांना निलंबित करावे असे म्हटले होते. त्यातच त्यांनी पुढे असेही म्हटले होते की, त्यातील चार लोकांनी सीआयडीला तपास कामात मदत केली आहे त्यामुळे त्यांचे निलंबन रद्द करावे. त्याप्रमाणे त्यातील चार लोकांचे सस्पेंशन रद्द करण्याची प्रक्रिया सुरू आहे आणि लवकरच त्याबाबतीतील अंतिम निर्णय होईल. सभापती महोदय, पुन्हा एक सीआयडीचा अहवाल आला. त्यातील सीआयडीचे निष्कर्षच सुस्पष्ट नाहीत. त्यात काही ठिकाणी संदिग्धता आहे म्हणून त्या संबंधात त्यांच्याबरोबर चर्चा करण्याची निश्चितच आवश्यकता आहे. त्याप्रमाणे चर्चा करून, माहिती घेऊन यामध्ये कोणी दोषी असेल तर कोणालाही पाठीशी घालण्याची भूमिका स्वीकारली जाणार नाही तसेच कोणाचा त्यात दोष नसेल, तो निर्दोष असेल तरीही त्याच्यावर कारवाई करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. गुणवत्तेवरच याबाबतीतील निर्णय घेतला जाईल. आलेल्या अहवालाची छाननी करून याबाबतीतील भूमिका निश्चितपणे लवकरात लवकर घेतली जाईल. याबाबतीतील सरकारचे धोरण आणि भूमिका स्पष्ट आहे ...

ॲड. अनिल परब : पण सीआयडीचा अहवाल आल्यानंतर एका तासात त्याबाबत निर्णय घेऊ असे आपण यापूर्वी सांगितले होते. ....

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, मी दोन्ही अहवाल सन्माननीय सदस्यांनाही दाखविण्यास तयार आहे. दोन्ही अहवालातील फरक आपल्यालाही मग दोन मिनिटात समजून येईल. सभापती महोदय, ठामपणे निष्कर्ष नसतीलच तर त्याबद्दल विचारावे लागेल. एखाद्यावर अन्याय करणे हे तरी किती योग्य राहील ? म्हणून हे दोन्ही रिपोर्टस् आपल्यापुढे घेऊन बसायची देखील माझी तयारी आहे. यात कोणालाही पाठीशी घालण्याची काहीही आवश्यकता नाही. सभापती महोदय, आंदळकरांच्या बाबतीत अंतरिम अहवाल आलेला आहे. पण नेहमीच प्रशासनामध्ये पूर्ण अहवाल आल्यानंतरच प्रशासकीय कारवाई केली जाते. या प्रकरणामध्ये देखील सीआयडी इन्क्वायरी सरकारने बंद केलेली नव्हती. तर त्या विरूद्ध ते कोर्टामध्ये गेले होते आता त्यांच्या विरोधात तेथे निकाल गेल्यानंतर ते अपिलामध्ये गेले आहेत. तरीही मी आपल्याला सांगू इच्छितो की, या संबंधातील अंतिम अहवाल 15 दिवसात शासनाकडे येईल. त्यानंतर जी काही कारवाई कायद्याने करणे आवश्यक असेल ती निश्चितपणे केली जाईल. सभापती महोदय, माननीय

.....4एम 3 ...



KBS/ श्री. गायकवाड नंतर --- 18:30

श्री.आर.आर.पाटील ....

उपसभापतींचाच काय पण या सदनातील सदस्याचा, इतकेच नव्हे तर राज्यातील कोठल्याही सर्व सामान्य माणसाचा अवमान देखील पोलीस दलातील कोठल्याही कर्मचाऱ्याने करता कामा नये ही शासनाची भूमिका आहे. शेवटी पोलीस कर्मचारी-अधिकारी हे कायद्याचे पालक आहेत, लोकांचे ते रक्षक आहेत, त्यांनी कोणाचा का म्हणून अवमान करावा ? म्हणूनच अशा प्रकारे कोणाचाही अवमान आपण सहन करणार नसू तर माननीय उपसभापतींचा अवमान तरी आपण कसा सहन करणार ? तेव्हा या बाबत अहवाल आपल्यानंतरच आपण निश्चितपणे त्यांच्यावर जी कारवाई करणे आवश्यक आहे ती करू. ...

( यानंतर सौ.रणदिवे.....4एन 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील . . . .

सभापती महोदय, अनेक अडचणीतून पोलीस दल काम करीत आहे. लोक टीका करीत आहेत. पिढयानपिढया माध्यमांच्या मार्फत लिहिले जाते की, भरतीमध्ये, बढतीमध्ये राजकीय हस्तक्षेप होत आहे. हे टाळण्याच्या दृष्टीने स्टेट सिक्युरिटी कौन्सिलला मान्यता देण्याची भूमिका राज्य शासनाने स्विकारलेली आहे. येत्या महिन्याभरामध्ये स्टेट सिक्युरिटी कौन्सिल कार्यान्वित होईल. गृहमंत्र्यांचे अधिकार गेले तरी चालतील, नसले तरी चालतील. पण नि:पक्षपातीपणे गुणवत्तेवर निर्णय झाले पाहिजेत अशी राज्य शासनाची आणि माझी याबाबतीत ठाम भूमिका आहे. हे स्टेट सिक्युरिटी कौन्सिल लवकरच कार्यान्वित होईल इतकेच मी यानिमित्ताने सांगू इच्छितो. या ठिकाणी दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी अनेक प्रश्न उपस्थित केलेले आहेत. मी त्या प्रश्नांच्याबाबतीत नोंद घेतलेली आहे. याबाबतीत जी कारवाई करणे, चौकशी करणे आवश्यक आहे, त्या सर्व बाबतीत चौकशी केली जाईल. सगळयाच प्रश्नांची उत्तरे भाषणामध्ये द्यावयाची झाली तर . . .

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, मी भाषणामध्ये उल्लेख केलेला आहे की, श्री. भानुदास खोतकर याच्या नावावर 70 खून आहेत. 4 गुन्हे, 28 केसेस आहेत. तो कॉंग्रेसचा अध्यक्ष आहे. त्याला नगरमध्ये पूर्ण संरक्षण आहे. 70 खून झालेले आहेत. प्लॅटफॉर्मवर लोकांना मारले जाते. पण अजून कोणाचाही तपास लागलेला नाही.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, गृहमंत्र्यांपासून अशा प्रकारची माहिती लपून रहाते असे मला वाटत नाही. परंतु 70 खून झाल्याची माहिती अद्यापपर्यंत मला तरी कोणी दिलेली नाही. सन्माननीय सदस्यांनी याबाबतीत माहिती द्यावी, मी ती तपासून पाहीन. याबाबतीत चौकशी करीन. कारण सन्माननीय सदस्यांनी जे प्रश्न उपस्थित केलेले आहेत, त्याबाबतीत योग्य पध्दतीची कारवाई होईल. मी सदनाला आणि सदनाच्या माध्यमातून राज्याच्या जनतेला आश्वासन देईन की, महाराष्ट्र शांत आहे, सुरक्षित आहे. याबाबतीत कोणतीही तडजोड कधीच केली नाही. पण ही शांतता टिकविण्याच्या बाबतीत राजकीय अभिनिवेषातून कुठे बाधा येऊ नये, कुठे एखादी ठिणगी पडली तर तेथे पाण्याचा बंब घेऊन जावा, कोणी पेट्रोलचा टॅंकर घेऊन जाऊ नये. याबाबतीत जर सर्वांनी मिळून सहकार्य केले तर 21 व्या शतकाला सामोरा जाणारा एक सक्षम महाराष्ट्र तयार होऊ शकतो आणि तसा तो तयार करावयाचा असेल तर राज्यामध्ये कायदा आणि सुव्यवस्था चांगली

. . . .4 एन-2

राखणे ही सर्वांची जबाबदारी आहे. त्याबाबतीत आम्हाला सदनातील दोन्ही बाजू सहकार्य करतील असा मला विश्वास आहे. मी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना सांगू इच्छितो की, महाराष्ट्र केवळ पोलिसांच्या दंडुक्याच्या जोरावर शांत राहू शकत नाही. त्यामध्ये आम्हाला तुमच्या सहकार्याची गरज आहे. तुम्ही सहकार्य दिले तर मागची बाजू देखील सहकार्य देईल. अशा प्रकारे दोघांच्याकडून प्रयत्न झाले तर पोलिसांना हत्यार वापरण्याची गरज भासणार नाही. आज खऱ्या अर्थाने दोन्ही बाजूच्या, दोन्ही विचारांच्या सन्माननीय सदस्यांच्या सद्‌भावनांची, सदिच्छेची आणि सहकार्याची आवश्यकता आहे. ते सर्व सहकार्य मिळेल अशा अपेक्षा बाळगतो आणि या विषयावर काही मते मांडत असताना, शासनाला काही सूचनाही केल्या आहेत त्याबद्दल धन्यवाद देऊन मी माझे दोन शब्द संपवितो.

**सभापती** : सभागृहाने प्रस्तावावर विचार केला आहे.

. . . .4 एन-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मी सोमवार, दिनांक 10 मार्च, 2008 ते दिनांक 25 एप्रिल, 2008 या सत्रकाळातील कामकाजाचा आढावा आता सदनासमोर ठेवतो. अर्थसंकल्पिय अधिवेशनाचा आजचा शेवटचा दिवस आहे आणि आजचे दिवसाचे कामकाज सुध्दा आता संपले आहे.

एकूण बैठकीची संख्या - 31

एकूण काम - 214 तास

मंत्री उपस्थित नसल्यामुळे वाया गेलेला वेळ - 50 मिनिटे.

कोरम अभावी बैठक स्थगित केल्यामुळे वाया गेलेला वेळ - 20 मिनिटे

अन्य कारणांमुळे वाया गेलेला वेळ - 1 तास 20 मिनिटे

प्रत्यक्षात झालेले कामकाज - 211 तास 30 मिनिटे

रोजचे सरासरी कामकाज 6 तास 50 मिनिटे

( विधान परिषद नियमानुसार बैठकीची वेळ 4 तास आहे. म्हणजेच आपण एकूण 52 दिवसांचे काम केले आहे. )

**तारांकित प्रश्न**

आलेल्या सूचना - 4679

कार्यवाहीसाठी घेतलेल्या सूचना - 3882

स्वीकृत प्रश्न - 1897

तोंडी उत्तरे - 279 प्रश्न.

**नियम 93 सूचना --**

एकूण सूचना - 467 सूचना

स्वीकृत सूचनांची संख्या- 285 सूचना

चर्चा झाली - 177 सूचना.

**लक्षवेधी सूचना --**

प्राप्त झाल्या - 1086

मान्य - 376

चर्चा झाली - 109

. . . .4 एन-4



**सभापती.....**

**विशेष उल्लेख --**

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विशेष उल्लेख 169 सूचना मांडण्यात आल्या.

**औचित्याचे मुद्दे --**

औचित्याचे मुद्दे 71 उपस्थित करण्यात आले.

**नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चा --**

प्राप्त झाल्या - 4

मान्य झाली - 01

चर्चा झाली - 01

शासकीय विधेयके संमत - 19 ( 7 परिषद - सभा 12 )

नियम 260 अन्वये प्रस्तावावरील चर्चा झाली - 9

अशासकीय ठराव चर्चा झाली - 2

अंतिम आठवडा प्रस्ताव चर्चा झाली - 1

**अर्धा तास चर्चा -**

प्राप्त झाल्या - 116

मान्य झाल्या - 103

चर्चा झाली - 37

मी आता अर्थसंकल्पिय अधिवेशन संस्थगित करण्याबाबत माननीय राज्यापालांकडून आलेला संदेश वाचून दाखवितो.

यानंतर कु.गायकवाड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: पुढील अधिवेशनासंबंधी घोषणा.

**सभापती** : मी जाहीर करतो की, महाराष्ट्र विधान परिषदेचे पुढील अधिवेशन सोमवार, दिनांक 14 जुलै, 2008 पासून मुंबई येथील विधान भवनात बोलवावे, अशी शिफारस राज्यपालांकडे करण्याचे ठरले आहे.

---------

**पृ.शी./मु.शी.**: सत्र-समाप्तीसंबंधी घोषणा.

**सभापती** : सभागृहापुढील कामकाज संपले आहे. आता मी सत्र समाप्तीसंबंधीचा राज्यपालांचा आदेश वाचून दाखवितो.

" भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 174, खंड (2), उपखंड (क) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन मी, एस.सी. जमीर, महाराष्ट्राचा राज्यपाल, याव्दारे महाराष्ट्र विधानपरिषदेचे सत्र संस्थगित करीत आहे."

आता राष्ट्रगीत गाईले जाईल व त्यानंतर सत्र संस्थगित होईल, असे मी घोषित करतो.

( यानंतर राष्ट्रगीत झाले )

( 6 वाजून 42 मिनिटांनी सत्र संस्थगित झाले. )

-------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही